म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. 675

REFBK-0023548

संदर्भ सुप्रवास
६२५
२३५४८
१२।४।०२



REFBK-0023548
REFBK-0023548

शालीमार प्रकाशन
अहमदनगर

# शालीमारची बाग

लेखिका

© प्रा सौ मेधा यशवत काळे

प्रकाशक

शालीमार प्रकाशन
माळीवाडा, म फुले रोड
अहमदनगर ४१४००१

मुद्रक

श्री म श परभाणे
सुभाष प्रिंटिंग प्रेस
३९०, क, शनिवार पेठ
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ चित्रकार

श्री अनत मालकर
पुणे ३०

मूल्य

रुपये सव्वीस

प्रकाशन क्रमांक

– १ –

आवृत्ती

द्वितीय–१९८२

फोटो ब्लॉक्स

व्ही जोशी अँड कं.
पुणे ३०

मुखपृष्ठ

शालीमार बगीचा

मुखपृष्ठ छपाई

स्वरूप मुद्रण
पुणे ३०

मलपृष्ठ

हवामहल, जयपूर

ती. बाईंना–सौ मनोरमाबाईंना
–तुम्ही आमच्याबरोबर प्रवासाला
येऊ शकला नाहीत,
–तुमच्या स्नुषेचा हा पुस्तकरूपी
प्रवास तुम्हालाच अर्पण

--सौ. मेधा

## निवडक अभिप्राय

* डॉ. ग श्री खैर, सुप्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ, पुणे

बहुश्रुतता, जिज्ञासातृप्ती व नाविन्यदर्शन अशी सर्वांगीण दृष्टी ठेवून प्रवास कसा करावा हे या ग्रंथावरून लक्षात येते त्याच्या वर्णनशैलीमुळे वाचकांच्या मन चक्षुपुढे संपूर्ण चित्र उभे रहाते व स्वानुभवाचा प्रत्यय येतो

हे रुक्ष प्रवासवर्णन नाही तर प्रत्येक स्थळाविषयी ऐतिहासिक, शिल्पशास्त्रीय व कलावैशिष्ट्यनिदर्शक माहिती ललित साहित्य स्वरूपात वाचकापुढे ठेवली आहे उत्तरेतील सात राज्यांची ही सप्तपदी लेखिकेने आपल्या स्थापत्य विशारद पतीबरोबर केली असल्याने विज्ञान विषयक भरपूर माहिती आली आहे

* श्री वि द घाटे, सुप्रसिद्ध साहित्यिक, पुणे

शालीमारची साद हे पुस्तक सुंदर झाले आहे भाषा ओघवती व रसाळ असून स्थलवर्णने चटकदार व मार्मिक आहेत

* 'मृत्युंजय 'कार श्री शिवाजी सावंत, पुणे

प्रवासातील ऐतिहासिक व पौराणिक संदर्भ अचूक व आकर्षकरीतीने शब्दबद्ध केले आहेत पुस्तकात प्रतिभेचा स्पर्श ठायी ठायी जाणवतो

* श्री प्रभाकरपंत किर्लोस्कर, हॉटेल ब्ल्यू डायमंड, पुणे

सदर प्रवास वर्णन मध्यमवर्गीय प्रवाशाला लाभदायक असून त्याला प्रवासाची हौस व दृष्टी प्राप्त होण्यास उपयुक्त आहे

* श्री राजा पाटील, संचालक, राजा ट्रॅव्हल मुंबई

पुस्तक उत्तम वाटले

* श्री गोपीनाथ तळवलकर, पुणे

पुस्तकात प्रत्यक्ष वर्णनाबरोबर चिंतनिकेचीही जोड लाभल्याने निवेदनात रंजन, उद्‌बोधन दोन्ही चांगले आले आहे किंचित कमी प्रसिद्ध असलेल्या स्थळाच्या महत्त्वाच्या तपशीलामुळे पुस्तकाचा आशय अधिक गहिरा झाला आहे या पुस्तकाच्या वाचनाने वाचक भारताच्या मानस यात्रेचे पुण्य खास मिळवील

* **सौ मालती तांबे वैद्य**, आय ए एस, पर्यटन विभाग, मुंबई

सुबोध शैलीतील हे रसाळ प्रवासवर्णन वाचनीय झाले असून त्यातील सुंदर छायाचित्रे व नकाशे यामुळे हौशी पर्यटकांना ते उपयुक्त ठरेल

* **श्री द दि कुलकर्णी**, दत्त दिगंबर यात्रा कंपनी,

पुस्तकातील स्थळांचे विशेषत काश्मीरचे वर्णन खूपच सुंदर आहे

* **डॉ यू म पठाण**, प्रमुख मराठी विभाग
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रवासवर्णनपर लेखनाचा प्रयत्न चांगला वाटला

* **दै पुढारी, कोल्हापूर**

प्रवासासंबंधी पूर्वतयारी कशी करावी, प्रवास कसा करावा, प्रेक्षणीय स्थळे कशी पाहावी, प्रवासवर्णन कसे लिहावे याचे हे पुस्तक म्हणजे उत्कृष्ट नमुना आहे हौसेने प्रवास करून परिश्रमपूर्वक मिळवलेली सर्व माहिती पर्यटकासाठी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली हे कौतुकास्पद आहे हे एक उत्कंठा-वर्धक, रोचक व मनोरंजक प्रवासवर्णन आहे

* **विशाल सह्याद्री, पुणे**

हौशी प्रवाशांना व शिक्षण संस्थांच्या सहलीसाठी आदर्श मार्गदर्शक पुस्तक सरस कादंबरीप्रमाणे मनाचा वेध घेणारे दिलखुलास प्रवासवर्णन, प्रवासातील स्थळांच्या सौंदर्याबरोबर त्यांच्या नावाची व्युत्पत्ती, त्यांचा इतिहास, भूगोल, स्थापत्यशास्त्र दृष्ट्या वैशिष्ट्य आणि तंत्रकौशल्य ही माहिती आढळून येते

* **महाराष्ट्र टाइम्स, मुंबई**

शालीमारची साद " हे एक भरगच्च प्रवासवर्णन आहे या प्रवास-वर्णनातील सर्वात मोठा वाटा काश्मीरचा आहे हा या पुस्तकातील सर्वात वाचनीय भाग आहे सुंदर काश्मीरचे वर्णन देखील समरसतेने केले आहे

* **महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे**

लेखिकेची व तिच्या कुटुंबियांची योजकता, कुशलता, प्रत्येक तप-शीलाची नोंद घेण्यात त्यांनी दाखविलेली तत्परता आणि उत्साह यांचा प्रत्यय पुस्तकात पानोपानी येतो, प्रसन्न लेखन शैलीतील हे प्रवासवर्णन रंजक मार्गदर्शकाचे काम उत्तम करते

* रविवार सकाळ, पुणे

ललित निबधातली कल्पकता व प्रबधातील सत्य याचे मिश्रण प्रवास वर्णनात येते निसर्गसौंदर्याच्या दर्शनाने चकित व प्रमुदित होणारे संवेदनाक्षम अत करण तर प्रवासवर्णन लेखकाला आवश्यक असतेच, पण ती ती स्थळे व वास्तु याचे इतिहास व सस्कृती यात कोणते स्थान असते हेही लेखकाला नेमके कळले पाहिजे, या रजक प्रवासवर्णनात या सर्व गोष्टी प्रामुख्याने आढळतात पुस्तकातील स्वतत्र आर्ट पेपरवरील उत्कृष्ट चित्रदर्शन-सुद्धा भारताच्या नैसर्गिक व मानवनिर्मित सौंदर्याची स्पष्ट कल्पना देईल

* साप्ताहिक गोमतक, पणजी

या प्रवासवर्णनामध्ये रुक्षता नाही, निव्वळ माहितीही नाही, तर त्या माहितीच्या जोडीला विचारचिंतनाचा पदर आहे प्रवास करणाऱ्याना पुस्तक निश्चित उपयोगी पडणार आहे

* दै सत्यवादी, कोल्हापूर

लेखिकेची भाषाशैली ओघवती व आकर्षक आहे

* गोदातीर समाचार, नांदेड

भारत भ्रमणास उद्युक्त करणारे शालीमारची साद हे एक अत्यत प्रभावी व वाचनीय प्रवासवर्णन आहे प्राथमिक, माध्यमिक शाळेतील मुलाना ज्ञानसाधनेत भर घालण्याच्या दृष्टीने हे पुस्तक फारच उपयुक्त असून शाळानी अवानर वाचनासाठी जरुर ठेवावे लेखिकेस जास्तीत जास्त प्रवास करावयास मिळावा व केवळ शालीमारचीच साद नव्हे तर सपूर्ण भारतमातेची साद ऐकायला व वाचायला मिळावी

* ललित, मुबई

भरपूर तपशील, रसिकपणे केलेले अवलोकन आणि अनुभवांची सुजाण प्रतिक्रिया ही उल्लेखनीय वैशिष्टचे

* केसरी, पुणे

हे एक सरस, वेधक प्रवासवर्णनात्मक पुस्तक असून उत्तर भारतातील विविध स्थळाची रसडोळस वृत्तीने केलेली पाहणी आहे निसर्ग, मानव, चित्रशिल्प इत्यादि विविध विषयात लेखिकेला रस असल्यामुळे छायाचित्रानी युक्त असे तिचे हे प्रवासवर्णन आस्वाद्य उतरले आहे


सहा

# शालीमार

श्रीनगरच्या दल सरोवराकाठची डोंगराच्या उतरणीवरील ही भूमी काश्मीरचा हिंदू राजा दुसरा प्रवरसेन याने सहाव्या शतकात तेथे छोटी हवेली बांधली व त्याचे नाव ठेवले 'शालामार'. शाला म्हणजे प्रीती व मार म्हणजे निवासस्थान–प्रीतीचे निवासस्थान

सुमारे हजार वर्षांनंतर सतराव्या शतकाच्या सुरुवातीला एके दिवशी मोगल सम्राट जहांगीर आणि सौंदर्य सम्राज्ञी नूरजहान या राजदांपत्याचे पाय या भूमीला लागले त्याच्या भेटीने या भूमीचे भाग्य उजळले राणीने इच्छा प्रदर्शित केली की शाही प्रणयासाठी ही जागा योग्य आहे राणीची इच्छा व बादशहाचा हुकूम मग कसला अवकाश ? बगीच्याच्या आखणीत राजपुत्र खुर्रम–शहाजहान याचेही साहाय्य झाले त्यावेळी हा बगीचा ओळखला जाई 'फरह–बक्ष'–आनंद दाता या नावाने


डोंगराच्या उतरणीवरून झुळझुळ वहात येणारा पाण्याचा प्रवाह या बगीच्यातून काढलेल्या पाटातून दल सरोवरात जातो डोंगराच्या उतरणी-वरील चार टप्प्याच्या या बगीच्यातून प्रवाह धबधब्या-सारखा पडतो कॅनॉलला पेव्हिंग केले असून दुतर्फा उंच सफेदा वृक्षाची रांग शोभिवंत दिसते पाण्याचा प्रवाह प्रथम एका आयताकृती उथळ हौदात सोडला तेथे काळ्या



संगमरवराने घडवलेला मंडपही (बारादरी) उभारला भोवती शे–दीडशे कारंजी बेहोषपणे उडत असत

जहांगीरनंतर शहाजहानने बागेमध्ये उत्तरेला झनाना बगीचा या नवीन भागाची भर घातली हा नवा भाग 'फैज–बक्ष' नावाने ओळखला जाऊ लागला

या नव्या भागात आणखी एक बारादरी उभारली फ्रेंच प्रवासी बर्नियरने लिहून ठेवले आहे की 'शहाजहानने नाश केलेल्या हिंदू मंदिरांचे संगमरवरी, गुळगुळीत, नाजूक पुष्पवेली कोरलेले स्तंभ बारादरीच्या कमानीला आधार देण्यासाठी वापरले ।'



एका कमानीवर पर्शियन भाषेत कोरले आहे–

"अगर फिर्दोस बर–रू–ए जमीं अस्त
हमीं अस्तो हमी अस्तो हमी अस्त ।"
'भूतलावर जर कुठले नंदनवन असेल
तर ते येथेच आहे, येथेच आहे, येथेच आहे'

दोन मोगल सम्राट व एक मोगल सम्राज्ञी यांनी हातभार लावलेल्या या बगीच्याची–शालीमारची साद एक न विसरणारी सुनहरी याद आहे .

राज्यमंत्री, कृषि मंत्रालय व पाटबधारे, भारत
कृषिभवन, नवी दिल्ली
दिनांक, १७ नोव्हेंबर १९७५

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

सौ मेधा काळे यांनी मी 'शालीमारची साद' या त्यांच्या पुस्तकास प्रस्तावना लिहावी अशी मला पत्राद्वारे विनंती केली होती आमचे परम मित्र व सौ मेधा काळे याचे श्वशुर श्री बाळासाहेब काळे याच्या मार्फतही मला हे सुचविण्यात आले माझे आजारपण, मंत्रालयाच्या आवश्यक व अनावश्यक कामाची धादल, राजकारणातील धावपळ या सर्व गर्दीत हे कधी शक्य होईल याचा मला स्वतःलाही अदाज नव्हता सौ काळे यानी मला अशा प्रवासवर्णनात्मक पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्यास का सागावी अशीही एक शका माझे मनात चाटून गेली मी गेले १३–१४ वर्षे दिल्लीत आहे शेती खात्यातील मंत्री म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यात फिरण्याची मलाही खूप संधी मिळाली कदाचित याही कारणास्तव मला सुचविले असावे

प्रवासात काळे कुटुबियाचा मुक्काम असताना माझी सर्वांची भेटही झाली होती परंतु त्याच्या प्रवासातून एक उत्तम प्रवासवर्णनात्मक ग्रथ वाचकांना उपलब्ध होईल असे वाटले नव्हते काळे कुटुबियानी राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, काश्मीर, पजाब ह्या प्रातातील अनेक ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळाना भेटी दिल्या सौ मेधा काळे यानी बहुतेक सर्व स्थळाची माहिती त्याचे ऐतिहासिक पार्श्वभूमीसह दिली आहे शिवाय छायाचित्राचीही भर टाकली आहे त्यामुळे हे प्रवासवर्णन वाचताना त्यांनी पाहिलेली ऐतिहासिक स्थळे, स्मारके यांचे चित्रच जणू काय आपल्या डोळ्यापुढे उभे रहाते अतिशय अभ्यासूपणे सौ मेधा काळे यानी हे लिखाण केले आहे अलीकडे महाराष्ट्रातून वाढत्या सख्येने प्रवासी उत्तर भारताचे प्रवासास येत आहेत उत्तर भारताचा प्रवास करू इच्छिणाऱ्या चौकस प्रवाशाना सौ मेधा काळे याचा ग्रथ मार्गदर्शक म्हणून फारच उपयुक्त ठरणार आहे सौ काळे यांनी अशाच प्रकारे पूर्व व दक्षिण

बऱ

भारताचा दौरा करून तेही प्रवासवर्णन ग्रंथ रुपाने प्रसिद्ध करावे असे सुचवावेसे वाटते अनेक लोक परदेश दौऱ्यावरही उत्सुकतेने जातात परंतु यापैकी अनेकांनी भारतही पुरा पाहिलेला नसतो भारत हा खऱ्या अर्थाने खंडप्राय देश तर आहेच, परंतु भारतातील निसर्ग, प्रेक्षणीय व ऐतिहासिक स्थळे व स्मारके इतकी पाहण्यासारखी आहेत की हौशी प्रवाशांना खरा आनंद चाखावयास मिळतो सौ काळे यांच्या ग्रंथामुळे आमच्या पर्यटन विभागास तर फारच फायदा होणार आहे कारण सौ काळे यांचा ग्रंथ वाचून अनेकांच्या मनात आपणही स्वत ही स्थळे पाहून यावीत असा विचार आल्यावाचून राहणार नाही

प्रवासवर्णन लिहिण्याची परंपरा तशी फार जुनी आहे प्रवासवर्णन हा वाङ्मयातील एक स्वतंत्र विभागच समजला पाहिजे प्यथियस, हिरोडोटस, हुआनसांग, मार्को पोलो यांनी लिहिलेली प्रवास वर्णने तर जगात सुप्रसिद्ध आहेत 'माझा प्रवास (सन १८५७ सालच्या बंडाची हकीकत) हे वे शा विष्णूभट गोडसे, वरसईकर यांनी लिहिलेले प्रवासवर्णन १९०७साली प्रसिद्ध झाले कै बाळासाहेब लक्ष्मणराव घोरपडे यांनी मनोरंजन व माहितीपूर्ण असे 'भारत प्रवास वर्णन' म्हणून एक पुस्तक १९१२ चे सुमारास लिहिले त्यानंतर अनेक प्रवास वर्णने मराठी भाषेत प्रसिद्ध झाली आहेत मराठी भाषेतील प्रवास वर्णनाच्या वाङ्मयात श्री पु ल देशपांडे यांनी तर अपूर्व भर घालून प्रवास वर्णनाच्या वाङ्मयावर कळस चढविला आहे

सौ मेधा काळे यांचा ग्रंथ थोडा निराळ्या प्रकारचा आहे वाचावयास सुरुवात केल्यानंतर पुस्तक संपविल्याशिवाय बाजूला ठेवावेसे न वाटणे व आता पुढे काय असे असावे असे वाचकास वाटणे हीच यशस्वी लिखाणाची गुरुकिल्ली आहे व ही कसोटी जर सौ मेधा काळे यांच्या या प्रवास वर्णनास लावली तर सौ मेधा काळे यांनी लिहिलेला ग्रंथ वाचनीय झाला आहे सौ काळे यांनी मराठी प्रवासवर्णन वाङ्मयात चांगली भर घातली आहे याबद्दल सौ मेधा काळे यांचे अभिनंदन प्रवासाची आवड असलेल्या वाचकांनी जरूर सौ मेधा काळे यांचा हा ग्रंथ वाचावा असे सुचवावेसे वाटते सौ मेधा काळे या नवोदित लेखिकेच्या 'शालीमारची साद' ग्रंथाचे वाचक सुहास्य वदनाने स्वागत करतील अशी मी अपेक्षा करतो

—अण्णासाहेब शिंदे

# ' शालीमारची साद ' वाचण्यापूर्वी–

१९७४ च्या दिवाळीच्या सुटीत उत्तर भारताच्या प्रवासाचा योग जमून आला खरे म्हणजे मे महिन्याच्या उन्हाळयाच्या सुटीतच निघायचा बेत होता परंतु रेल्वे संपाने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे तो बेत रद्द करावा लागला पण पाच महिने लांबलेला प्रवास पथ्यावरच पडला प्रवासाला आवश्यक अशी माहिती गोळा करण्यास चांगलाच वेळ मिळाला खाजगी आणि सरकारी प्रकाशने, नकाशे यांचा प्रवास आखताना खूप उपयोग झाला

राजस्थान, उत्तर प्रदेश, काश्मीर, पंजाब हिमाचल प्रदेश असा सुमारे सात हजार कि मी अंतराचा प्रवास ३५ दिवसात आम्ही सहाजणांनी पूर्ण केला म्हणजे दररोज सरासरी २०० कि मी प्रवास केला आम्ही रेल्वे, बस, टॅक्सी, रिक्षा, टेंपो, टांगा, शिकारा, तट्टू यांच्या सहाय्याने व पायी-सुद्धा दोन लहान मुलांसकट प्रवास केला प्रवासात भेटलेले अनेक प्रवासी एवढा प्रवास कसा काय आखला व लहान मुले बरोबर असल्याने प्रवास कसा काय झेपतो याबद्दल आश्चर्य व्यक्त करायचे प्रवासात सर्वात लहान प्रवासी होता ६ वर्षांचा तर सर्वात मोठा प्रवासी होता ६४ वर्षांचा माझे यजमान श्री यशवंत यांनी ५–६ महिने झटून खूप तयारी केल्याने हा प्रदीर्घ प्रवास यशस्वी होऊ शकला व्यवस्थित आखणी केल्यानेच प्रवासातील एकही दिवस वाया गेला नाही

प्रवासासाठी निवडलेल्या चितोडगड, फत्तेपूर-शिक्री या जुन्या गावां-बरोबरच अत्याधुनिक शहर चंदीगडही होते हरिद्वार, हृषिकेश अलाहा-बाद या पौराणिक शहरांबरोबरच निसर्गसौंदर्याने नटलेले काश्मीरचे खोरे व मसुरी निवडले होते राजपूत शैलीचे जयपूर, मुस्लीम संस्कृतीचे आग्रा, शीखांचे अमृतसर तसेच चंदेलवंशीयांचे खजुराहो ही शहरे निवडली होती

प्रवासात अनेक बरे वाईट अनुभव आले भारताच्या संपन्न संस्कृतीचा साक्षात्कार झाला प्रवास संपल्यावरही मन त्या अनुभवांनी, तसेच पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांच्या, निसर्गाच्या सौंदर्याने इतके भारून गेले की ते सारे शब्दांकित केल्याशिवाय रहावेना अनुभवाच्या संपन्नतेतूनच हे माझे सर्व लेखन झाले आहे

अंकरा

प्रवासवर्णन लिहिताना वेळोवेळी मिळालेल्या ऐतिहासिक, पौराणिक माहितीबरोबरच दंतकथा, रिक्षावाले, टांगेवाले, नावाडी, ठिकठिकाणी भेटलेले गाईड आणि स्टेशनवरील हमालही यानी दिलेल्या माहितीचा उपयोग करून घेतला आहे प्रवासात आम्ही दोघांनी घेतलेल्या टिपणांचाही फार उपयोग झाला मिळालेली जास्तीत जास्त माहिती सादर करण्याचा प्रयत्न केला आहे मात्र दिलेली सर्व माहिती परिपूर्ण आहे असा माझा मुळीच दावा नाही काही माहिती वगळली गेली असल्याचाही संभव आहे तरीपण भूतकालाचा मागोवा घेत वर्तमान व भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे

प्रवासवर्णन लिहिताना माझा प्रमुख दृष्टीकोन कोणता आहे हे सांगणे जरूर आहे पुष्कळ वेळा असे होते की एखादे गाव पाहून आल्यावर व इतरांनी विचारल्यावर अमके पहायचे राहिले, तमके विसरलो कारण ते माहीतच नव्हते असे सांगताना खंत वाटते शिवाय परत काही आपण त्या गावाला जाणार नसतो त्यामुळे चुटपुट लागते त्यासाठी प्रवासात भेट द्यायच्या गावातील नेमकी सौंदर्यस्थळे कोणती, प्रत्येक स्थळाचा नेमका आकर्षक भाग कोणता आहे याचा मी सविस्तर उल्लेख वेळोवेळी केला आहे उदा खजुराहोत आज अस्तित्वात असलेल्या २२ मंदिरात काही ना काही वैशिष्ट्य आहे प्रत्येक मंदिरातील नेमक्या सौंदर्यस्थळाचा आवर्जून उल्लेख केला आहे प्रवास करणाऱ्यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी प्रेक्षणीय स्थळांची सविस्तर माहिती दिली आहे खास पर्यटकासाठी हे माहितीप्रद पुस्तक लिहिले आहे या दीर्घ प्रवासात आलेले अनुभव, इतर प्रवाशांचे अनुभव, ठिकठिकाणचे सामाजिक जीवन याचा उल्लेख वेळोवेळी केला आहेच तरीसुद्धा माझा सर्व भर आहे प्रेक्षणीय स्थळावर, त्याची समग्र माहिती देण्यावर व त्यांच्यातील सौंदर्य उकलून दाखवण्यावरच ।

आणखी एक महत्त्वाचा उल्लेख करणे जरूर आहे तो म्हणजे काही ठिकाणी मंदिराची, प्रेक्षणीय स्थळाची प्रासादाची मापे दिली आहेत त्यामागे हेतू आहे जर नुसते लिहिले की भाक्रा धरण खूप उंच आहे तर त्यामुळे नक्की वास्तववादी कल्पना येत नाही म्हणून नक्की कल्पना येण्या-

माठी थोडीफार आकडेवारी द्यावी लागली त्या दृष्टीनेच भाक्रा धरण खूप उच्च आहे म्हणण्यापेक्षा ते ७४० फूट उच्च असून कुतुबमिनारच्या उंचीच्या तिप्पट उंचीचे आहे असे म्हटले आहे कदाचित इंजिनिअर पती प्रवासात बरोबर असल्याचा हा परिणाम असावा त्याचप्रमाणे ठिकठिकाणी प्रचलित असणारे इंग्लिश शब्द लिखाणातही येणे अपरिहार्य आहे उदा चंदीगडच्या वर्णनातील सेक्टरसारखे शब्द किंवा भाक्राच्या वर्णनातील मेगॅवॅटसारखे तांत्रिक शब्द पण हे इंग्रजी शब्द सर्वसामान्य लोकांच्याही तोंडी रुळलेले असल्याने त्यांना प्रतिशब्द न देता तसेच वापरले आहेत

हौसेने प्रवास केला, हौसेखातर प्रवासवर्णन लिहिले व हौसेनेच आर्टपेपरवर निवडक फोटो छापून घेतले माझे हे पहिलेच पुस्तक आहे त्यामुळे त्यात काही उणीवा असण्याची शक्यता आहे पण मला त्याची जाणीव आहे प्रवासवर्णन वाचून व फोटो पाहून लोकांना प्रवास करायला उत्तेजन मिळावे हीच इच्छा आहे

प्रवास आखण्यापासून ते हे पुस्तक प्रकाशित करण्यापर्यंत माझे यजमान श्री यशवंत यांनी दाखवलेल्या उत्साहाला, चोखंदळपणाला मर्यादा नाही त्यांनीच प्रेरणा, सतत उत्तेजन दिल्यामुळे व मार्गदर्शन केल्यामुळे हे पुस्तक मी लिहू शकले ती. अण्णासाहेब रा ना झोळ व श्वशुर ती काकासाहेब ह कृ उर्फ बाळासाहेब काळे यांनीही मला वेळोवेळी मार्गदर्शन केल्याने त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्यावाचून राहवत नाही.

नामदार श्री अण्णासाहेब शिंदे, कृषी राज्यमंत्री नवी दिल्ली यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय हे निवेदन पूर्ण होणार नाही प्रवासासाठी तर त्यांनी मार्गदर्शन केलेच, शिवाय आजारपणामध्ये व राजकीय कामकाजातून वेळात वेळ काढून त्यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत

रसिक वाचकांच्या पसंतीस हे पुस्तक उतरेल अशी आशा आहे

दि. २८-११-१९७५
अहमदनगर

सौ. मेधा काळे

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने –

इ स १९७५ साली प्रसिद्ध झालेली 'शालीमारची साद' ची आवृत्ती दोन वर्षांपूर्वी संपली पहिल्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण की नवे पुस्तक यामध्ये शालीमारची नवी आवृत्ती मागे पडली आज 'शालीमारची साद' ची नवी आवृत्ती देताना होणाऱ्या आनंदात माझी मी हरवून गेले आहे

मागे वळून पाहताना माझ्या मनाला मीच प्रश्न करते 'शालीमारने मला काय दिले ?' शालीमारच्या प्रेरणेने कोणार्क, गिरनार, हल्दीघाटी अशी वाटचाल उत्साहाने झाली दिल्लीपासून पणजीपर्यंत विविध व्यवसायातील अपरिचीत वाचक, हौशी पर्यटक यांचा स्नेहपरिवार जमला शालीमारने मला दिले थोर साहित्यिक, मान्यवरांचे आशिर्वाद, विविध वृत्तपत्रांशी ऋणानुबंध सर्वांची मी कृतज्ञ आहे

नवीन आवृत्तीत पहिल्या आवृत्तीतील चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला आहे नवीन आवृत्तीत सहा छायाचित्रांची भर घातली आहे. तसेच नवीन उपलब्ध झालेल्या माहितीचा सामावेश केला आहे पुस्तकाची छपाई सुभाष प्रिंटिंग प्रेसचे श्री मधुकर परभाणे यांनी तत्परतेने केली तसेच स्वरुप मुद्रणचे श्री सोनवणे यांनी आर्ट प्लेटस् कव्हर सुबक छापले चित्रकार श्री सालकर यांची नेहमीच आत्मीयतेने मदत होते सर्वांची मी आभारी आहे.

शालीमारची साद नव्याने घरोघरी ऐकली जाईल अशी आशा आहे

माळीवाडा, फुले रोड,
अहमदनगर
पिन नं ४१४००१

सौ. मेघा काळे
दि २६ मार्च ८२
चैत्र शुद्ध एक, गुढीपाडवा.

* नगरचा निरोप ... १७
* अजरामर चितोडगड ... २०
* धवलगिरी उदयपूर ... २९
* ब्रह्मदेवाचे पुष्कर, ख्वाजासाहेबच्या दर्ग्याचे-अजमेर ३७
* गुलाबी नगर-जयपूर ... ४४
* आग्रा ताजचा की एतिमाद-औद-दौलाचा ?' ... ५३
* कहाणी लाल पत्थराची-फत्तेपूर शिक्री ... ६६
* व्रजभूमी मथुरा ... ७५
* भारताची राजधानी-जुनी आणि नवी दिल्ली ... ८०
* काश्मीरच्या नंदनवनात-श्रीनगरकडे ... ९९
* जेहलम नदीतील फेरफटका, मोगल उद्याने ... १०६
* सोनमर्गच्या सोनेरी कुरणात ... ११३
* पहलगाम-तुझ्या पुनर्भेटीसाठी आतुर ... ११६
* दल सरोवरातील जलविहार ... १२२
* गुलमर्गची सफर ... १२६
* श्रीनगर सोडताना ... १३१

| | | |
|---|---|---|
| * दणकट प्रकृती, कणखर जिद्द—अमृतसर | ... | १३५ |
| * सुजला सुफला भूमी—पंजाब | ... | १४१ |
| * भारताचे आधुनिक मंदिर—भाक्रा नानगल | ... | १४४ |
| * ला कार्बुझरचे स्वप्न—चंदीगड | ... | १५१ |
| * चंडीगड ते हरिद्वार | ... | १५८ |
| * लक्ष्मण झुल्याचे—हृषिकेश | ... | १६० |
| * जय गंगे भागीरथी—हरिद्वार | ... | १६४ |
| * हिमालयाच्या पायथ्याशी—डेहराडून | ... | १६८ |
| * हिमराणी मसुरी | ... | १७१ |
| * नवाब नसलेले लखनौ | ... | १७५ |
| * काशी विश्वेश्वराचे—वाराणशी | ... | १८४ |
| * बुद्धं शरणं गच्छामि—सारनाथ | ... | १९१ |
| * लालबहादूर शास्त्रीजींचे रामनगर | ... | १९५ |
| * आनंदभवन—अलाहाबादची शान | | १९९ |
| * नारी सौंदर्याचा आविष्कार—खजुराहो | | २०८ |
| * संगमरवरी खडकांत—भेडाघाट | ... | २२६ |
| * भारकडे | ... | २३० |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२५
२३५८८
भूप्रवास मध्य प्रदेश

# नगरचा निरोप

खरे म्हणजे आम्हाला मे महिन्याच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत काश्मीरची थंड हवा चाखायची होती निसर्गसौंदर्य लुटायचे होते रेल्वे संपाने सगळेच बारगळले एका दृष्टीने चांगले झाले खूप तयारी करता आली गेले सहा महिने प्रत्येक आठवड्यात उत्तर भारताच्या प्रेक्षणीय स्थळांपैकी कोणत्या ना कोणत्या गावाचा नकाशा अथवा प्रवासी वाङ्मय टपालाने यायचे तेव्हा कल्पनेने आम्ही त्या गावाला जाऊन पोहोचायचो

आग्र्याचा नकाशा जेव्हा आला, तेव्हा यशवंत यानी आग्र्याला ताजमहाल-पेक्षा सुंदर असलेली नूरजहानच्या पित्याची कबर एतिमाद–उद्–दौला आहे हे सांगितले, तेव्हा विश्वास बसला नाही पण नंतर प्रत्यक्षात पाहिल्यावर ते पटले एके काळी राजधानीचे राजवैभव भोगलेल्या फत्तेपूर शिक्रीचा बुलंद दरवाजा यानी डोळ्यासमोर उभा केला वाराणसीचा जेव्हा नकाशा आला तेव्हा नुसते काशी विश्वेश्वराचे मंदिर पाहून चालायचे नाही तर स्वर्गीय लालबहादूर शास्त्री जेथून पोहून जात, ते गंगेच्या पैलतीरावरील रामनगर पहायला विसरायचे नाही असे ठरविले काश्मीरचा जेव्हा नकाशा व रंगी-बेरंगी प्रवासी साहित्य टपालाने आले तेव्हाच ठरवून टाकले की शालीमार

बागेत नूरजहान आणि जहांगीर याच्या प्रणयाने रंगलेल्या गुजगोष्टी ध्वनि-प्रकाशाच्या सहाय्याने ऐकायला विसरायचे नाही एक ना अनेक! चदी-गडची जेव्हा माहिती आली, तेव्हाच ठरविले की—ज्या बागेने महाभारत-कालीन द्रौपदीची स्पदने ऐकली ती पिंजोर बाग पहायची मरुभूमी राज-स्थानबाबत जेव्हा प्रवासी वाङ्मय मिळाले तेव्हा राजपूत रमणींच्या जोहा-राने पुनित झालेल्या चितोड गडावर आम्ही कल्पनेने जाऊन पोहोचलो खजुराहोचा जेव्हा विषय निघाला तेव्हा स्त्रीसौदर्याने तेथील मंदिरे कशी नटली आहेत हे त्यानी रगवून सांगितले तेव्हाच सुस्नात स्त्रीच्या मोकळ्या कसातून घळणाऱ्या जलाबदूना मोती समजून ते टिपणाऱ्या हसाची मूर्ती पाहायला आम्ही उत्सुक झालो होतो उत्तर भारताच्या आम्ही भेट द्याव-याच्या ठरविलेल्या पर्यटन स्थळांची माहिती, नकाशे मिळाले की आर्किमिडीझला जसा "सापडले, सापडले!" म्हणून आनद झाला तसा त्यानाही व्हायचा एकदा पुण्याला मिटींगला गेले व येताना मिळालेले उत्तर प्रदेशचे टूरिस्ट-गाईड रात्री दहाला वाचायला घेऊन मध्यरात्री तीनला संपविले, तेही रात्रीच्या जेवणाला सुट्टी देऊन!

प्रवासाला निघण्याची आदल्या दिवसाची रात्र म्हणजे 'कत्तलकी रात!' रात्री काय काय, कसे कसे आवरले, कशा बॅगा भरल्या व दमून मध्यरात्री केव्हा झोपलो कळलेच नाही. प्रवासात लागणाऱ्या बारीक सारीक सामानाची यादी वाढतच चालली होती बॅटरीपासून ते सुईदोऱ्यापर्यंत, अॅनासिनपासून ते [illegible]पर्यंत!

रात्री नऊला कन्या उल्का, पुत्र उदय, भाची मंजुषा, श्वशुर ती काका व यजमान यशवत अशा सहा प्रवाशानी सामानाच्या सहा बॅगासह उत्साहाने नगर सोडले आमचा डबा दादर-अमृतसर गाडीला मनमाडला जोडण्यात येणार होता त्यामुळे व चितोडगडपर्यंतचे रिझर्वेशन मिळाल्यामुळे आम्ही निर्धास्त होतो झोपेतही आम्हाला प्रेक्षणीय स्थळाचीच स्वप्ने पडत होती

सकाळी साडेसातला 'गरम चाय' अशा आरोळ्यांनी जाग आली भुसा-वळ जक्शन आले होते प्रवासातील स्टेशनवरच्या पहिल्या मचूळ चहाने तल्लफ गेली नाही. साडेआठला खांडवा जक्शन आले प्लॅटफॉर्म बदलल्यावर खांडवा-अजमेर मीटरगेज गाडी तयारच होती. गाडीत सामानाची ठेवाठेव

झाल्यावर गर्दी नसल्याने सगळेजण ऐसपैस बसलो तासाभरातच गाडीने खांडवा सोडले रेल्वेलाईन मीटरगेज त्यात गाडी पॅसेंजर। गाडी माळवा भूमीवरून मदगतीने धावू लागली ओंकारेश्वर स्टेशनजवळ सर्वांनी नर्मदा-माईचे दर्शन पुलावरून जाताना घेतले नर्मदेपासून झेलमकडे आम्ही निघालो होतो व परत याच नर्मदेला भेडाघाटजवळ गाठायचे होते नर्मदा नदीवर अहिल्यादेवीने बांधलेले प्रशस्त घाट दिसत होते इतिहासप्रसिद्ध मांडू किल्ल्यावरून बाजबहद्दराची प्रेयसी राणी रूपमती नर्मदेचे दर्शन कशी घ्यायची याबद्दलची हकीकत त्याच्या तोंडून ऐकत असतानाच महू स्टेशन आले तेथे मिलिटरीचे ठाणे खूप मोठे आहे स्टेशनवरही मिलिटरी ऑफिस-र्सची बरीच वर्दळ दिसली

अर्ध्याच तासात दुपारी साडेचारला इंदूर स्टेशन आले ह्याचे मामा आम्हाला भेटायला आले होते त्यांनी जेवणाचा डबा, मिठाई आणली होती. तेथे उतरण्याचा त्यांनी फार आग्रह केला पण अजून प्रवासाचा फार मोठा पल्ला गाठायचा होता इंदूरला उतरता आले नाही म्हणून हळहळ वाटली इंदूर स्टेशनला गाडीत गर्दी वाढली रात्री नऊला रतलाम जंक्शनवर गर्दी कमी झाली मामांनी दिलेल्या पुरी-भाजी लोणच्यावर ताव मारला व बर्थ-वर झोपेच्या आधीन केव्हा झालो कळले नाही दुसऱ्या दिवशी पहाटे पाचला गाडी चितोडगड स्टेशनवर पोहोचली चितोडगड पाहून मुक्कामाला उदय-पूरला जायचे असल्याने स्टेशनवरच क्लोकरूममध्ये सामान ठेवून थोडी विश्रांती घेतली चहापाणी करून सकाळी सातला टांग्याने चितोडगड पाहायला निघालो

□

# अजरामर चितोडगड

चितोडगड बाबत हिंदी म्हण प्रसिद्ध आहे–

**" गड तो चितोडगढ और सब गडइया ।"**

चितोडगड म्हणजे शौर्य व बलिदान याचे प्रतीक ! चितोडगड म्हणजे गौरवशाली इतिहासाची गाथा ! केशरीया वस्त्रे परिधान केलेल्या त्यागमूर्ती राजपूत रमणीच्या जोहाराच्या धगधगत्या ज्वालेने पुनित झालेली भूमी ! त्या ज्ञात-अज्ञात वीरांगनांच्या स्मृती उराशी जतन करून देशप्रेम व त्यागाची प्रेरणा देत असलेला हा दुर्ग म्हणजे चितोडगड !

चितोडगडची भूमी राणा प्रतापच्या देशप्रेमाची, राणासगाच्या शौर्याची, स्वरूपसुंदरी महाराणी पद्मिनीच्या जोहाराची, संत मीराबाईच्या कृष्णप्रेमाच्या वेडाची, पन्ना दाईच्या स्वामीभक्तीची कल्पना देते जगाच्या पाठीवर इतका ज्वलंत, चित्तथरारक इतिहास घडलेली दुसरी भूमी कुठे नसेल !

गडावर पोहोचण्यासाठी निघालेला टांगा नदीच्या पुलावर आला असता टांगेवाल्याजवळ चौकशी केल्यावर कळले की, या नदीचे नाव गांभिरी आहे गांभिरी नदीवरील हा पांचशे फूट लांबीचा नऊ कमानी असलेला दगडी पूल तेराव्या शतकात अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीच्या वेळी बांधला गेला

मुस्लिमांनी उध्वस्त केलेल्या हिंदू मंदिराचे दगड गाभिरी नदीवरील या पुलाच्या दगडी बांधकामाला वापरले । पूल ओलाडून टांगा गडाच्या पायथ्याशी पोहोचला तेथे एक जैन मंदिर आहे मंदिराच्या गच्चीवरून गडाचे विहंगम दृश्य दिसते अरवली पर्वताच्या दक्षिण-पूर्व पहाडावर साडेतेराशे फूट उंचीवर चितोड वसलेला आहे चितोडगड साडेतीन मैल लांबीचा, अर्धा मैल रुंदीचा, आठ मैल परीघाचा, सातशे एकर भूमी असलेला असा विशाल आहे

मेवाडचा मूळ पुरुष बाप्पा रावळने आठव्या शतकात राजपुतान्यावर राज्य करणाऱ्या मौर्य राजाकडून चितोडगड जिंकून ताब्यात घेतला महाराणा कुंभाने पंधराव्या शतकात गडाच्या तळापासून माथ्यापर्यंतचा रस्ता व लागणाऱ्या सात कमानी किंवा पोळ बांधले पायथ्याजवळील मुख्य प्रवेशद्वार ‘ पदन पोळ ’ ओलांडून गेल्यावर दुसऱ्या ‘ भैरव-फत्ता पोळ ’ जवळ एक लहान व दुसरी मोठी छत्री दिसली लहान छत्री महान योद्धा कल्ला याची व मोठी छत्री शूरवीर जयमल्ल राठोड याची आहे इ स १५६८ मध्ये मोगल सम्राट अकबर चितोडच्य पाडावासाठी जातीने तळ देऊन बसला होता किल्ल्याच्या भिंतीची डागडुजीची देखरेख करण्यात शूरवीर जयमल गर्क असताना सम्राट अकबराने आपल्या ‘ संग्राम या बंदुकीच्या अचूक नेमाने जयमलचा पाय जायबंदी केला तशा जखमी अवस्थेत त्याने पराक्रमाची शर्थ केली त्यावेळी राजपूत राठोड कल्ला याने जायबंदी झालेल्या जयमलला खांद्यावर घेऊन अचाट पराक्रम करून शेकडो यवनांना यमसदनाला पाठविले असे म्हटले जाते की त्याने शीर उडविलेल्या अवस्थेतही तलवार चालवून शत्रूचे बळी घेतले शूर वीर कल्ला याची देवासमान पूजा केली जाते व त्याच्या मूळ गावी त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रतिवर्षी यात्रा भरते या दोन योद्ध्यांचा पराक्रम टांगेवाल्यामार्फत ऐकताना नकळत पावनखिंडीत एकाकी लढणाऱ्या बाजी प्रभूंची आठवण झाली ।

जयमल व कल्ला यांच्या पाडावानंतर शूर योद्धा फत्ता याने राणाच्या सैन्याचे सेनापतीपद स्वीकारले वीरवेष चढवून स्वतःची आई, तरुण पत्नी व सैन्यासह तो त्वेषाने अकबराच्या सैन्यावर चालून गेला व युद्धात कामास आला रामपोळजवळ त्याचे स्मारक दिसते. जयमल व फत्ता यांची अजोड

# अजरामर चितोडगड

चितोडगड बाबत हिंदी म्हण प्रसिद्ध आहे–

**" गड तो चितोडगढ और सब गडइया ।"**

चितोडगड म्हणजे शौर्य व बलिदान याचे प्रतीक ! चितोडगड म्हणजे गौरवशाली इतिहासाची गाथा ! केशरीया वस्त्रे परिधान केलेल्या त्यागमूर्ती राजपूत रमणींच्या जोहाराच्या धगधगत्या ज्वालेने पुनित झालेली भूमी ! त्या ज्ञात-अज्ञात वीरांगनाच्या स्मृती उराशी जतन करून देशप्रेम व त्यागाची प्रेरणा देत असलेला हा दुर्ग म्हणजे चितोडगड !

चितोडगडची भूमी राणा प्रतापच्या देशप्रेमाची, राणासंगाच्या शौर्याची, स्वरूपसुंदरी महाराणी पद्मिनीच्या जोहाराची, संत मीराबाईच्या कृष्णप्रेमाच्या वेडाची, पन्ना दाईच्या स्वामीभक्तीची कल्पना देते जगाच्या पाठीवर इतका ज्वलंत, चित्तथरारक इतिहास घडलेली दुसरी भूमी कुठे नसेल !

गडावर पोहोचण्यासाठी निघालेला टांगा नदीच्या पुलावर आला असता टांगेवाल्याजवळ चौकशी केल्यावर कळले की, या नदीचे नाव गांभिरी आहे गांभिरी नदीवरील हा पाचशे फूट लांबीचा नऊ कमानी असलेला दगडी पूल तेराव्या शतकात अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीच्या वेळी बांधला गेला

मुस्लिमांनी उध्वस्त केलेल्या हिंदू मंदिरांचे दगड गांभिरी नदीवरील या पुलाच्या दगडी बांधकामाला वापरले। पूल ओलांडून टांगा गडाच्या पायथ्याशी पोहोचला तेथे एक जैन मंदिर आहे मंदिराच्या गच्चीवरून गडाचे विहंगम दृश्य दिसते अरवली पर्वताच्या दक्षिण-पूर्व पहाडावर साडेतेराशे फूट उंचीवर चितोड वसलेला आहे चितोडगड साडेतीन मैल लांबीचा, अर्धा मैल रुंदीचा, आठ मैल परीघाचा, सातशे एकर भूमी असलेला असा विशाल आहे

मेवाडचा मूळ पुरुष बाप्पा रावळने आठव्या शतकात राजपुतान्यावर राज्य करणाऱ्या मौर्य राजाकडून चितोडगड जिंकून ताब्यात घेतला महाराणा कुंभाने पंधराव्या शतकात गडाच्या तळापासून माथ्यापर्यंतचा रस्ता व लागणाऱ्या सात कमानी किंवा पोळ बांधले पायथ्याजवळील मुख्य प्रवेशद्वार ‘पदन पोळ’ ओलांडून गेल्यावर दुसऱ्या ‘भैरव-फत्ता पोळ’ जवळ एक लहान व दुसरी मोठी छत्री दिसली लहान छत्री महान योद्धा कल्ला याची व मोठी छत्री शूरवीर जयमल्ल राठोड याची आहे इ स १५६८ मध्ये मोगल सम्राट अकबर चितोडच्या पाडावासाठी जातीने तळ देऊन बसला होता किल्ल्याच्या भिंतीची डागडुजीची देखरेख करण्यात शूरवीर जयमल गर्क असताना सम्राट अकबराने आपल्या ‘संग्राम’ या बंदुकीच्या अचूक नेमाने जयमलचा पाय जायबंदी केला तशा जखमी अवस्थेत त्याने पराक्रमाची शर्थ केली त्यावेळी राजपूत राठोड कल्ला याने जायबंदी झालेल्या जयमलला खांद्यावर घेऊन अचाट पराक्रम करून शेकडो यवनांना यमसदनाला पाठविले असे म्हटले जाते की त्याने शीर उडविलेल्या अवस्थेतही तलवार चालवून शत्रूचे बळी घेतले शूर वीर कल्ला याची देवासमान पूजा केली जाते व त्याच्या मूळ गावी त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रतिवर्षी यात्रा भरते या दोन योद्ध्यांचा पराक्रम टांगेवाल्यामार्फत ऐकताना नकळत पावनखिंडीत एकाकी लढणाऱ्या बाजी प्रभूंची आठवण झाली।

जयमल व कल्ला यांच्या पाडावानंतर शूर योद्धा फत्ता याने राणाच्या सैन्याचे सेनापतीपद स्वीकारले वीरवेष चढवून स्वतःची आई, तरुण पत्नी व सैन्यासह तो त्वेषाने अकबराच्या सैन्यावर चालून गेला व युद्धात कामास आला रामपोळजवळ त्याचे स्मारक दिसते. जयमल व फत्ता यांची अजोड

स्वामीभक्ती व अचाट पराक्रम पाहून सम्राट अकबर स्तिमित झाला त्यांच्या गौरवशाली स्मृतीप्रित्यर्थ सम्राट अकबरने त्यांच्या हत्तीवर बसलेल्या दगडी मूर्ती आग्र्याच्या किल्ल्याच्या दरवाज्यावर कोरून घेतल्या कालांतराने त्या दिल्लीच्या किल्ल्यात नेल्या.

एकामागून एक वीराचा पाडाव झाल्यानतर काहीच उपाय न चालल्याने चितोडगडच्या किल्ल्यात जोहाराच्या ज्वाला धगधगू लागल्या ! अकबर-कालीन झालेला हा जोहार चितोडच्या इतिहासात ' तिसरा जोहार ' समजला जातो नऊ राण्या, पाच राजकुमारी व हजारापेक्षा अधिक स्त्रियांनी जोहार केला अकबराच्या या स्वारीच्या वेळी चितोडगडाला तीस हजारावर लोकांची आहुती पडली चितोड पडला होता पण अकबराचा विजय राजपुताचा स्वाभिमान जिंकू शकला नव्हता !

अकबराच्या आक्रमणामुळे चितोड खाली करण्यात आले तेव्हा ते जिंके-पर्यंत घर वसवणार नाही, अशी दृढ प्रतिज्ञा करून चितोडहून निघून हजारो लोकांनी अशाप्रकारे भटक्याचे जीवन जगण्यास सुरुवात केली व शतकानू-शतके हे दु खद जीवन कंठले ही खरोखर जगाच्या पाठीवरील एक आश्चर्य-कारक घटना आहे स्वातन्त्र्य मिळाल्यानतर अशा भटक्या लोकांना मुक्ती देण्यासाठी ६ एप्रिल १९५५ ला पंडित नेहरूनी चितोडवर येऊन उपस्थित विशाल जनसमुदायला सांगितले– "चितोड स्वतत्र झाला आहे तुमची प्रतिज्ञा पूर्ण झाली आहे तेव्हा भटके जीवन सोडून तुम्ही चितोडमध्ये परत वास्तव्य करा " अशाप्रकारे इतिहासातील या असामान्य व्रताची समाप्ती झाली

शेवटच्या ' राम पोळ ' नतर गडावरील विविध राजवाडे, मदिरे भग्नावस्थेत दिसू लागतात प्रथम दिसणारे तुळजा भवानीचे प्राचीन मंदिर राणा सगाचा भाऊ वनबीरने बांधले त्यातील मूर्ती दक्षिणेकडील आहे असे म्हटले जाते शिवाजी-महाराजांची कुलस्वामीनी असलेल्या तुळजापूरच्या भवानी मदिरातील मूर्तीशी तर या या मूर्तीचा काही सबध नसावा ना अशी शका मनात येऊन गेली

नजीकच सुदर शिल्पकाम असलेले जैन मदिर आहे, तेथे फोटो घेण्यासाठी पोझमध्ये सर्वजण उभे राहिलो. तेवढ्यात मदिर पाहणारा भगव्या वस्त्रा-तला एक लगडा बैरागी जवळ आला व म्हणाला, " बहनजी आप भी खडे

रहिये। मैं फोटो खींच लेता हूँ। बिलकूल फिक्र मत कीजिये।" भारत दर्शनासाठी निघालेला हा लगडा बैरागी सोरटी सोमनाथकडला. एक पाय अधू असूनही उत्साहाने प्रवास करीत होता तो फोटो कसा घेतो शका होती. परतु त्याने घेतलेले गडावरील तीन चार फोटो उत्कृष्ट निघाले या सन्याशाला सन्यासी कसे म्हणावे ? त्याने आधुनिक युगाशी जमवून घेतले होते चक-चकीत उन्हासाठी कॅमेऱ्याची लेन्स स्वत अॅडजेस्ट करून फोटो काढले चितोड गडावर भेटलेल्या या अजब बैराग्याने गडाच्या शेवटपर्यंत आमची सोबत केली व विविध फोटो काढले

जैन मदिराजवळचे स्मारक म्हणजे प्रसिद्ध राणा कुभाचा राजवाडा मूळ राणा हमीरने बांधलेल्या या तीन मजली महालात राणा कुभाने वेळोवेळी अनेक दुरुस्त्या करून घेतल्या सध्या तो भग्नावस्थेत आहे राणा कुभाने पधराव्या शतकात एकूण ३५ वर्षे चितोडवर अधिपत्य गाजविले तो काळ मेवाडचे सुवर्णयुग समजले जाई राणा कुभाने अचाट पराक्रमाबरोबर स्थापत्यकला सवर्धनही केले त्यानेच गडापर्यंतचा रस्ता, सात कमानी, विजय स्तभ, कीर्तीस्तभ, कुभस्वामी मदिर बांधले

या राजवाड्याच्या परिसरात राणा संगाची राणी कर्णावतीने तेरा हजार राजपूत रमणीसह इ स १५३५ मध्ये गुजरातचा सुलतान बहादूरशहाच्या स्वारीच्या वेळी जोहार केला होता चितोडचा हा 'दुसरा जोहार' समजला जातो या महालाशी निगडित पन्नादाईने केलेल्या असीम त्यागाची घटना आहे महाराणी कर्णावतीने दुसरा जोहार होण्यापूर्वी आपल्या मुलाला—राणा उदय-सिहाला-पन्नादाईकडे सोपविले होते त्याचा जन्म राणा सगाच्या मृत्यूनतर झाला होता राणा सगाच्या मृत्यूनतर त्याचा भाऊ बनबीरने गादी बळकाव-ण्याचा मार्ग निष्कटक करण्याच्या दृष्टीने प्रथम राजपुत्र विक्रमादित्याचा (उदयसिहाचा वडील भाऊ) खून केला व उदयसिहाचा काटा काढायचे ठर-विले त्याच्या कारस्थानाची कुणकुण पन्नादाइला लागल्यावर तिने योजना-पूर्वक बाल उदयसिहाला फळाच्या करडीत पानाखाली लपवून करडी दुसऱ्या दासीमार्फत किल्याबाहेर काढली आणि तिला नदीच्या पात्राजवळ भेटायला सागितले बनवीरने जेव्हा पन्नादाईजवळ उदयसिहाची चौकशी केली तेव्हा तिने अबोलपणे खुणेने स्वत च्या मुलाला राजपुत्राचे कपडे घालून जेथे

निजविले होते तो बिछाना दाखविला बनबीरने त्वेषाने निर्घृणपणे त्या बाल-काचे काळीज तळपणाऱ्या तलवारीच्या पात्याने फोडले ! आपल्या डोळ्यादेखत स्वतःच्या पोटच्या गोळ्याचा खून पन्नदाईला पहावा लागला ! नतर ती पळत पळत नदीच्या पात्राकडे गेली सगळीकडे आश्रय नाकारला गेल्यावर तिने उदयसिंहाला अरवली पर्वतावरील कुभलगडी पोहोचते केले याच उदय-सिंहाने मेवाडची नवी राजधानी उदयपूर वसविली व हाच महापराक्रमी राणा प्रतापचा पिता होता पन्नादाईच्या या असीम त्यागाला जगाच्या इतिहासात तोड नाही धन्य तो चितोडगड की ज्याच्या पराक्रमी भूमीवर अशी रत्ने जन्मली

चितोडगडावरील मीराबाईच्या मदिरात उत्सुकतेने प्रवेश केला मीरा केवळ दहा वर्षाची होती तेव्हा तिचा विवाह महाराणा सगाचा सुपुत्र भोज-राज याच्या बरोबर झाला मीरा लहानपणापासूनच कृष्णाची भक्ती करीत होती कृष्णाशिवाय दुसरे प्रेमबधन मानायला ती तयार नव्हती मीराच्या एका पदात म्हटले आहेच—

**मेरो तो गिरीधर गोपाल, दूसरो न कोई ।**
**जाके सिर मोर मुकुट, मेरो पति सोई ।।**

पती व सासऱ्याच्या निधनानतर महाराणा विक्रमादित्य तिच्या गिरीधर गोपालाच्या आराधनेवर क्रोधित होऊ लागला व द्वेष करू लागला त्याची मजल विष देण्यापर्यंत गेली परतु मीराच्या भक्तीमुळे विषाचे रूपातर अमृतात झाले ! मीराबाईला असह्य कष्ट देण्याचे प्रयत्न होऊन तिचा सारखा छळवाद मांडला गेला शेवटी यातनाना कटाळून तिने वदावन द्वारका या तीर्थस्थानाना भेटी दिल्या शेवटी द्वारका येथे कृष्णाची प्रार्थना करता करता ते मदिर तेजोवलयाने प्रकाशीत होऊन सतमीरा कृष्णरूपात विलीन झाली ! मीराबाईच्या भक्तीपर भजनांची गोडी अवीट आहे व आजही भारतात घरोघर ती गुणगुणली जातात मीराबाईचे श्वशुर महाराणा सगाने मीराबाईबद्दलच्या आदराच्या भावनेने हे मदिर उभारले मदिरात मुरली वाजविणाऱ्या श्रीकृष्णाची व भक्तीमध्ये तल्लीन झालेल्या मीराची मूर्ती आहे देवळासमोरच मीराबाईचा अध्यात्मिक गुरु सत रायदासची सुदर छत्री आहे. छत्रीच्या छतावर एक डोके व चार सोडा असलेली विचित्र मनुष्याकृती आहे त्यावरून सर्व वर्णांच्या लोकाना ईश्वर प्राप्तीचा समान अधिकार आहे

असे सूचित होते

मीराबाईचे मदिर पाहून कुभश्याम मदिरात पोहोचलो पधराव्या शतकातील राणा कुभ निर्मित या मदिराचे शिखर गगनचुबी असून मडप विशाल आहे मदिरावर कोरलेल्या विविध मूर्तीच्या वेशभूषा, अलकार, केशरचना, प्रसाधन यावरून मेवाडच्या जनजीवनाची कल्पना येते

चितोडगडावरील एकशेबावीस फूट उचीचे नऊ मजली विजयस्तभ हे स्मारक स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना समजला जातो या मनोऱ्याला आतून दगडी जिना आहे आठ मजल्याच्या आतील पायऱ्या ओलाडल्यावर नवव्या मजल्यावर लाकडी शिडीने चढल्यावर चितोडगडावरील आसमतातील विहगम दृश्य दिसते या विजय स्तभाच्या आतरिक व बाह्यभागावर हिंदू देवदेवतांच्या रामायण, महाभारतातील प्रसंगाच्या मूर्ती नाजूकपणे कोरल्या आहेत ठिकठिकाणी विजयाचे प्रतीक मानलेली व्याघ्रमुखे कोरलेली दिसली या विजय स्तभाची निर्मिती महाराणा कुभाने दहा लाख रुपये खर्चून इ स १४४०–१४४८ या दरम्यान केली महाराणा कुभाने माळव्याच्या सुलतानावर विजय मिळविल्याच्या प्रित्यर्थ विजयाचे स्मारक म्हणून हा स्तभ उभारला व आपला इष्टदेव श्री विष्णूला अर्पण केला खाली उतरल्यावर या प्रचड स्मारकाची आठवण म्हणून फोटो घेऊन नजीकच्या समिद्धेश्वर मदिराकडे वळलो

माळव्याचा राजा भोजराजाने चौदाव्या शतकात हे मदिर उभारले मदिरात दोन शिलालेख आहेत त्यात उल्लेख केला आहे की चितोडचा महाराणा मोकलने या मदिराचा जीर्णोद्धार केला आहे या मदिरास मोकलजीचे मदिर असेही म्हणतात मदिरात शिवाची मूर्ती असून मदिर सुस्थितीत आहे मडपाची शिल्पकृती सुदर आहे समिद्धश्वर मदिराच्या नजीकच राजपूत राजपरिवार, राजस्त्रिया याचे स्मशानस्थळ होते ते महासती स्थळ या नावाने ओळखले जाते तेथे अनेक स्त्रिया पती-निधनानतर सती प्रथेचे पालन करीत असत काही काळापूर्वी तेथे झालेल्या उत्खननात अनेक परातो भरून राख मिळाल्याचे बोलले जाते. मदिराच्या पिछाडीला गौमुख कुड आहे शिवलिंगावर निरतर जिवत पाण्याचा झरा तेथे वहात असतो प्रवाशांनी टाकलेले पदार्थ खाऊन पोसलेले मासे कुडात निर्धास्तपणे वावरताना दिसत होते

पुढे सडकेने जाताना बाजूला जयमल आणि फत्ताचे महाल पडीकावस्थेत दिसले त्याचे भग्नावशेष आपल्या स्वामींच्या वीरोचित कार्यांची स्मृती करून देतात

दुसऱ्या बाजूला विजयस्तंभासारखाच दिसणारा थोडा लहान स्तंभ दिसत होता हा चितोडचा कीर्तिस्तंभ ! दिगंबर जैन संप्रदायातील महाजनांनी बाराव्या शतकात कीर्ती स्तंभ उभारला हा स्तंभ सात मजली व ऐंशी फूट उंचीचा असून भगवान आदिनाथांचे स्मारक आहे स्तंभावरील जैन शिल्पकृतींचे कोरीव काम प्रेक्षणीय आहे

सूर्य डोक्यावर आला होता आणि आम्ही चितोडगडावरील प्राचीन कलिका मातेच्या मंदिरात पोहोचलो तेव्हा घंटा निनादत आरती चालू होती आजूबाजूचे उभे पुजारी आदिवासी लोकांसारखी वस्त्रे घातलेले जुन्या परंपरेचे वाटले सातव्या शतकात बाप्पा रावळने सूर्यमंदिर म्हणून या मंदिराची निर्मिती केली होती मोगल आक्रमणानंतर या मंदिरात कलिका मूर्तीची प्रस्थापना तेरा व्या शतकात झाली. मंदिराचे प्राचीन शिल्प भव्यतेची कल्पना देते नवरात्रात यात्रिकांनी हे मंदिर गजबजलेले असते.

गडावरील फेरफटका संपत आला होता शेवटी पद्मिनीच्या महालात उत्सुकतेने प्रवेश केला महाराणी पद्मिनी राजा रावळ रतनसिंहाची सुंदर पत्नी ! बाप्पा रावळने मूळ बांधलेल्या व नंतर भग्न झालेल्या महालाच्या जागी महाराणा सज्जनसिंहाने जीर्णोद्धार करून हा महाल पद्मिनी तलावाच्या कडेला बांधला तलावात बेटासारखा दिसणारा हा सुंदर महाल महाराणीच्या ग्रीष्मकालीन विहारासाठी होता असे म्हटले जाते की तळ्याच्या कडेच्या महालात लावलेल्या आरशात तळ्यातील पद्मिनी महालातील महाराणीचे पाण्यातील प्रतिबिंब अल्लाउद्दिन खिलजीला दाखविले गेले कथा कादंबरीतील प्रसंगाला लाजवील असा हा ऐतिहासिक प्रसंग डोळ्यासमोर नाचू लागला !

महाराणी पद्मिनीच्या अप्रतिम लावण्याची कीर्ती ऐकून दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीने गडाला दीर्घकाळ वेढा दिला पण त्याची डाळ शिजली नाही शेवटी पद्मिनीला प्राप्त करण्यात असमर्थता दिसल्यावर त्याने रावळांना संदेश दिला की, मला पद्मिनीचे केवळ मुख दाखविले तर मी दिल्लीला परत जायला

तयार आहे शेवटी प्राप्त परिस्थितीत शातता राखण्याच्या दृष्टीने रावळ रतनसिंहाने दर्पणात पद्मिनीचे मुख दाखविण्याचे मान्य केले

सुलतानाने आपल्या काही सैनिकांसह किल्ल्यात येऊन महाराणी पद्मिनीच्या मुखाचे प्रतिबिंब पाहून परतताना पोहोचविण्यास आलेल्या रावळ रतनसिंहाला कैद केले व महाराणीला संदेश पाठविला की महाराणी सुलतानाबरोबर येण्यास तयार असेल तरच रावळांना सोडण्यात येईल महाराणीने निराश न होता चतुराईने रावळ बंधमुक्त होण्याच्या दृष्टीने निरोप पाठविला की 'मी यायला तयार आहे' सुलतानाने दासीसाठी सातशे पालख्या पाठविल्या '

पालख्या आल्यावर प्रत्येक पालखीत एक एक सशस्त्र योद्धा व त्या उचलणारे प्रत्येकी सहा वीर कहार (भोई) पालख्या घेऊन सुलतानाच्या डेऱ्यात पद्मिनीचा चुलता गोरा याच्या नेतृत्वाखाली दाखल झाले। गोराने सुलतान खिलजीला सांगितले की, पद्मिनीला आपल्या पतीची अंतिम भेट पाहिजे सुलतान राजी झाल्यावर सर्व पालख्या रतनसिंहाच्या डेऱ्यात दाखल झाल्या व रजपूत वीरानी रावळाला बंधमुक्त केले क्षत्रिय वीरांनी पराक्रमी युद्ध करून एकच दाणादाण उडवून दिली सुलतान निराश होऊन दिल्लीला परतला

पुढच्याच वर्षी सुलतानाने सेना संघटित करून चितोडवर चढाई केली चितोडवर मोठा बाका प्रसंग गुदरला किल्ल्याला दीर्घ काळ वेढा पडला. शेवटी राणा रतनसिंहाने किल्ल्याचे रक्षण करण्याचे काम आपला चुलता राणा लक्ष्मणसिंहावर सोपविले गडाच्या कुलदेवतेच्या स्वप्नातील संदेशानुसार चितोडचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने राणाने स्वेच्छने स्वत च्या सातही पुत्राना सार्वभौम चितोडचा राणा म्हणून पुकारून बळी दिले।

चितोडच्या इतिहासातील चित्तथरारक प्रसंगाची शेवटची तयारी गडावर सुरू झाली राणी पद्मिनीने राजपरिवारातील इतर अनेक हजारो रमणीसह स्नान करून लग्नाचे सौभाग्याचे लेणे घालून, केशरीया वस्त्रे घालून शिवाची शेवटची प्रार्थना केली व जोहारासाठी त्या धगधगत्या ज्वालेला सामोऱ्या झाल्या। चितोडगडचा हा 'पहिला ऐतिहासिक जोहार।' मेवाडच्या इतिहासातील धर्म, शील, स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी केलेल्या या त्यागाला तोड नाही.

महाराणी पद्मिनीचा महाल पाहून गड उतरू लागलो मन मात्र चितोड-गडाच्या कानाकोपऱ्यातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या स्मारकाभोवती रेंगाळत होते गडावरील प्रत्येक दगड धोंड्याला ज्वलंत इतिहास होता! गड पूर्ण उतरून पायथ्याशी आलो तेव्हा गडावर ढग जमले होते चितोडच्या ऐतिहासिक वैभवाची शान दाखवीत विजय स्तंभ जणू ढगांना टेकला होता

स्टेशनवर पोहोचलो तेव्हा दुपारचे दोन वाजले होते उदयपूरला जाणारी गाडी दुपारी साडेतीनला निघणार होती स्टेशनजवळ भोजन उरकून घेतले. चितोड सोडताना स्टेशनवरील टी सी तिकिटावर चितोडगडावरून निघाल्याची नोंद करून देण्यास हुज्जत घालीत होता, का तर म्हणे सकाळी चितोडला आल्याची नोंद नाही प्लॅटफॉर्मवर प्रमुख स्टेशनमास्तरच्या आडनावाच्या पाटीवरून महाराष्ट्रीय असलेल्या स्टेशनमास्तरांना मराठीतून नमस्कार करून अडचण सांगितली त्यांनी आस्थेवाईकपणे चौकशी करून आल्या-गेल्याच्या दोन्ही नोंदी स्वत करून दिल्या अडचणीत मदत केल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे होते उदयपूरला जाण्यासाठी गाडीने दुपारी साडेतीनला चितोडगड सोडले गाडीतून धुक्याच्या पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या राजपूत रमणींच्या आहुतीने पुनित झालेल्या गडाला शेवटचा प्रणाम करून उदय-पूरच्या दिशेने प्रवास सुरू केला वाटेत मालवी जंक्शनला चहा घेतला, रात्रीचे नऊ वाजले तेव्हा आम्ही महाराणा प्रतापच्या कर्मभूमीत उदयपूर-मध्ये दाखल झालो

□

# धवलनगरी उदयपूर

अकबराच्या चितोडगडच्या १६ व्या शतकातील स्वारीनतर महाराणा उदयसिंहाने चितोड ऐवजी सुरक्षिततेच्या दृष्टीने उदयपूरची मेवाडच्या राजधानीचे शहर म्हणून निवड केली।

उदयपूर शहर अरवली पर्वतच्या कुशीत चहूबाजूनी वेढलेले आहे शहराभोवतालचा प्रदेश हिरव्यागार डोगरानी वेढल्यामुळे निसर्गसुदर दिसतो. हिरव्या टेकड्या जणू उदयपूरच्या संरक्षणासाठी सज्ज आहेत सुदर कलात्मक बाधणी, डोळे दिपून टाकणारे राजवैभव, शूरता व वीरोचित वृत्ती, राजपुतान्याची रगीबेरगी सस्कृती इत्यादींचे उदयपूर हे प्रतीक आहे

तीन निसर्गसुदर तळी हे उदयपूरचे खास आकर्षण । मुख्य ' पिचोला तळे ' पश्चिमेला आहे सध्या तेथे लेक पॅलेस हॉटेल आहे दुसरे ' फत्तेसागर ' त्याच्या काठी लक्ष्मी विलास पॅलेस हॉटेल आहे तिसरे ' स्वरूप सागर ' त्याच्या काठी लेक व्ह्यू हॉटेल आहे सुदर तळ्याच्या परिसरात वसलेल्या उदयपूरला भारताचे व्हेनिस म्हणूनच ओळखतात !

सकाळी बरोबर आठ वाजता उदयपूरचा टांगेवाला आपल्या तेज ' राजू ' घोड्यासह हजर झाला उदयपूरचे राजशाही रस्ते, चौक ओलाडून आम्ही

उदयपूरच्या ' मोतीमगरी ' या रम्य टेकडीकडे निघालो होतो.

'मोतीमगरी टेकडी फत्तेसागर तळयाच्या काठावर डौलाने उभी आहे महाराजा उदयसिंह चितोडगडहून आपल्या लवाजम्यासह नातू अमरसिंह (राणा प्रतापचा ज्येष्ठ पुत्र) याच्या जन्माच्या वेळी भगवान एकलिंगजीच्या दर्शनार्थ जाताना या टेकडीला भेट देऊन गेला होता. त्याचवेळी त्याने उदय-पूर शहराची सुरक्षिततेच्या दृष्टीने राजधानी म्हणून निवड केली सध्या टेकडीवर अस्तित्वात असलेले भग्नावशेष तत्कालीन ' मोती-महालचे ' आहेत. टेकडीवर चढून गेल्यावर प्रथम डोळयात भरतो तो उच चबुतऱ्यावर विराज-मान झालेला महाराणा प्रतापचा आपल्या प्रिय व विश्वासू ' चेतक ' घोडया-वरील भव्य पुतळा ! महाराणा प्रतापचा लढवय्या वेषातला रुबाबदार पुतळा ग्वाही देतो—त्याच्या अचाट पराक्रमाची, प्रखर देशाभिमानाची, स्वातंत्र्य रक्षणाच्या जिद्दीची ! पुतळयासमोर सुंदर कारंजी आहेत ते चालू करून पहाण्यासाठी फी मात्र एक रुपया आहे आम्ही सर्व कारंजी सुरू करायला सांगितली मऊ हिरवळीत बसून त्या सौंदर्याचा आनंद मनसोक्तपणे लुटला कारंज्यामधून उडणाऱ्या तुषारात इंद्रधनुष्य पाहून उल्का-उदयनी टाळया वाजवून आनंद व्यक्त केला आजूबाजूला सर्वत्र रंगीबेरंगी फुले फुलली होती. शेजारीच एक कलात्मक मंडप होता पायऱ्या चढून आम्ही वर गेलो तेव्हा उदयपूर शहराचे विहंगम दृश्य दिसले तेथे दुर्बिणीतून आजूबाजूचा परिसर, टेकडीवरील राजवाडा, मंदिरे पहाण्याची सोय होती तेथून फत्तेसागर व त्यामधील नेहरु पार्क, आजूबाजूच्या निसर्गसुंदर टेकडया यांचे सुंदर दृश्य दिसते. राणा प्रतापच्या पुतळयाला वंदन करून, फोटो घेऊन आम्ही टेकडी उतरू लागलो

मोतीमगरी टेकडी उतरून नागमोडी किनाऱ्याच्या काठाकाठाने झुळझुळ वाऱ्याचा आस्वाद घेत फत्तेसागर तळयाच्या काठी आलो तळयाच्या काठी किर्लोस्कर कंपनीने पुरविलेले भारतातील सर्वात अधिक दीडशे फूट उंचीचे कारंजे लक्ष वेधून घेते तसेच टेकडीच्या पायथ्याजवळील रॉक गार्डन गुरु गोविंदसिंग नावाने प्रचलित असून नैसर्गिक वाटते तळयातील बेटासारखे असलेले नेहरु उद्यान अनेक कारंजानी नटलेले आहे टांगेवाल्याकडून कळले की रात्री रंगीबेरंगी प्रकाशात उडणारी ही कारंजी वृंदावन (म्हैसूर)

बगीच्यातील कारंजाप्रमाणे वाटतात वेळेअभावी रात्री भेट देता येत नाही यामुळे रुखरुख वाटली नेहरु पार्कमध्ये जाण्यास होडीतून जावे लागते पार्कमध्ये बोटीच्या आकाराचे सुंदर रेस्टॉरंट आहे खरोखर मोतीमगरी टेकडी, फत्ते सागर तळे, त्याचे सर्पाकार काठ, तळ्यातील बगीचा हे नैसर्गिक सौंदर्याचे नमुने आहेत

'सहेलियोंकी बाडी' या सुंदर बगीच्यात टांगेवाल्याने आणून सोडले. अठराव्या शतकात महाराजा संग्रामसिंहाने राजपूत दरबारातील स्त्रियांच्या करमणुकीसाठी उभारलेला हा बगीचा मोठा कलात्मक वाटला बगीच्यातील विविध नक्षीदार शिल्पकृतीने सजलेल्या छत्र्या, चौकोनी तळे, शोभिवंत कारंजी, कमलकुंड व त्याचे रक्षणार्थ असलेला संगमरवरी अखंड दगड कोरून बसविलेले चार हत्ती मन वेधून घेतात छोटासाच परंतु कला वैभवाने नटलेला बगीचा उदयपूर शहराच्या गळ्यातील ताईत बनला आहे कारंजी उडवायला मात्र फी द्यावी लागते मोतीमगरी टेकडीवरील अनुभवाप्रमाणे येथेही फी दिल्यावर सुंदर कारंजी सुरू झाली संगमरवरी हत्तींच्या सोंडेतून असंख्य कारंजी उडू लागली तेवढ्यात सूर्यप्रकाश पडला व आकर्षक सप्तरंगी इंद्रधनुष्ये दिसायला लागली

बागेतून निघाल्यावर वाटेत रेल्वे ट्रेनिंग स्कूलच्या नजीकच्या चौकातील पटेल सर्कलमधील शोभिवंत भव्य कारंजं हिरव्यागार हिरवळीच्या व फुलांच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होते दोनशे फूट व्यासाच्या गोलाकार टाकीत एकावर एक असलेल्या तीन नक्षीदार पाकळ्या शोभिवंत दिसत होत्या, तेथे फोटो काढण्याचा मोह आवरता आला नाही

दुपारी साडेअकराच्या सुमाराला उदयपूरच्या प्रसिद्ध 'भारतीय लोक कला मंडल या राजस्थानी कला संस्कृती विषयक म्युझियमच्या आवारात प्रवेश केला कलात्मक प्रवेशद्वारानेच प्रथम लक्ष वेधून घेतले म्युझियमची छोटीशी वास्तु, तिचा अर्धगोलाकार व वर-वर निरुंद होणारा दर्शनी भाग व त्यावरील घुमट रेखीव बांधकामाचा उत्कृष्ट नमुना वाटला म्युझियममध्ये राजस्थानच्या कला संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या विविध वस्तू आकर्षकरीत्या मांडल्या आहेत कठपुतळीचा प्रसिद्ध खेळ पहाण्याचा योग प्रथमच आला सर्व पर्यटकांना शेवटच्या हॉलमध्ये नेण्यात आले ध्वनिमुद्रित


केलेले राजस्थानी मधुर संगीत सुरू झाले आणि राजस्थानी महिलेच्या नाजूक बोटाच्या हालचालींने संगीताच्या तालावर कठपुतळीचा मनोरंजक खेळ सुरू झाला संगीताच्या लयबद्ध तालावर नाचणाऱ्या बाहुल्या पाहून मन हरपून गेले कार्यक्रम केव्हा संपला हे कळलेसुद्धा नाही इतके आम्ही तल्लीन झालो होतो।

दुपारचे ऊन तळपू लागले आणि टांगेवाल्याने आम्हाला जगदीश मंदिराजवळ आणून सोडले सुमारे तीनशे वर्षांपूर्वी दानशूर महाराणा जगतसिंह याने पंधरा लक्ष रुपये खर्चून हे मंदिर सिटी पॅलेस नजीक बांधले उंच चबुतऱ्यावरील हे मंदिर ऐंशी फूट उंचीचे आहे मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच संगमरवरी हत्तीची जोडी भाविकांचे स्वागत करते उंच उंच पायऱ्या चढून मंदिरात प्रवेश केला गर्भगृहात श्री विष्णूची चतुर्भुज दगडी मूर्ती व पितळी गरूडमूर्ती आहे मंदिरात प्राचीन शिलालेखही कोरलेला आहे.


जगदीश मंदिराच्या दर्शनानंतर सिटी पॅलेसकडे वळालो हा सिटी पॅलेस पिचोला तळ्याच्या पूर्व काठावर वसविला आहे १५०० फूट लांबीचा व सुमारे ६०० ते ८०० फूट रुंदीचा हा भव्य राजवाडा राजस्थानात सर्वात मोठा समजला जातो पूर्वी राजदरबारी काम केलेल्या व आता गाईडचे काम करणाऱ्या जुन्या वयस्क गाईडबरोबर 'त्रिपोलीया कमानी' तून राजवाड्याच्या परिसरात प्रवेश केला प्रथम डाव्या बाजूला जेथे हत्तींची झुंज व्हायची ती जागा पाहिली राजवाड्यातून ती पाहण्यासाठी केलेले झरोके दिसले प्रवेशद्वाराजवळ आठ कमानी होत्या महाराणांची सुवर्णतुला अथवा चांदीची तुला झाल्यावर तेथे गोरगरिबांना, साधुसंतांना दान केले जाई महाराणा जगतसिंहाने केलेले रत्नाने बनविलेल्या वृक्षाचे 'कल्पवृक्षदान' जगाच्या इतिहासातील एकुलते एक उदाहरण आहे

महाल पहाण्यासाठी तिकीटे काढून राजवाड्यात प्रवेश केल्यावर उदयपूरच्या राजघराण्याचे मानचिन्ह दिसले मध्यभागी सूर्य कोरला असून जो दृढ राखे धर्मको तिही राखे करतार' असे लिहिले आहे

एका दालनात मेवाडच्या राजघराण्यातील राजाची भव्य तैलचित्रे आहेत मेवाडच्या राजघराण्यात २२ राजे राज्य करून गेले राजपूत राजे स्वतःला सूर्यवंशीय मानतात सूर्यदर्शन झाल्याशिवाय राजपरिवार भोजन करीत नसे



विजयस्तभ, चितोडगड



राजप्रासाद, उदयपुर

↓ सहेलियोंकी बाडी, उदयपुर



वर्षाऋतूत सूर्यराज दिसणार नाहीत म्हणून सूर्यप्रतिमा त्यानी तयार केली व त्या प्रतिमेचे तेव्हा ते दर्शन घेत १०८ तोळ्याची अस्सल सोन्याची सूर्यमुखाची प्रतिमा पाहून डोळे तेजाने दिपले राजवाड्यातील हल्दीघाटीकक्षात युद्ध-प्रसगाची विविध चित्रे आहेत चेतककक्षातील राणा प्रतापचा विश्वासू चेतक हल्दीघाटी युद्धात अखेरचा श्वास घेतानाच्या प्रसगाचे चित्र मन हेलावून टाकते महाराणा प्रतापकक्षात अरवलीचा लोहपुरुष राणा प्रतापच्या जीवनातील विविध प्रसग चित्रित केले आहेत ही चित्रे त्याच्या धीरोदात्त जीवनावर प्रकाश टाकतात महाराणांचे चिलखत, जिरेटोप, धनुष्यबाण, ढाल, भाला ह्या वस्तू तेथे आहेत महाराणा वनवासात असताना चटईवर झोपत व पत्रावळीवर जेवत प्रतीक म्हणून चटई, पत्रावळी ठेवल्या आहेत

ब्रिटिश व्हॉइसरॉयबरोबर काढलेल्या हिंदुस्थानातील सस्थानिकांच्या फोटोंमध्ये बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड व लोकमान्य टिळक यांचेही फोटो आहेत

राजवाड्यातील सग्रहालयमध्ये ऐतिहासिक हत्यारे, कपडे, नाणी इत्यादीचा सग्रह आहे लोखडी चिलखत इतके जड आहे की त्याची एक बाही उचलायलासुद्धा आपल्याला जड जाते मग अगावर पेलणे तर दूरच राहिले महाराजाची चादीची बग्गी, चादीचा हौदा, चांदीची पालखी जतन करून ठेवली आहे हत्ती, घोडे यांचे मौल्यवान साज दिसले महाराजाची दीड लाख रुपये किमतीची जुनी रोल्सराइस कार दिसते

राजवाड्यातील मोतीमहालमध्ये तऱ्हेतऱ्हेच्या रगीत काचा लावल्या आहेत त्यातून उदयपूर शहराचे विविध रगात निळसर, शेवाळी, मोरपिशी लाल दृश्य दिसते पण खरे उदयपूर म्हणजे 'धवलनगरी' आहे कारण उदयपूरमधील सर्व इमारती व राजवाडे पांढऱ्या शुभ्र रगाचे आहेत

राजवाड्यातील कलात्मक 'शीशमहल' मध्ये रगीबेरगी, चित्रविचित्र काचेच्या व आरशाच्या तुकड्यांना भितीवर व छतामध्ये इतके चपखल बसविले आहे की माणूस विस्मयचकित होतो गाईडने एक मेणबत्ती पेटवून एका ज्योतीच्या विविध आरशात दिसणाऱ्या हजारो ज्योती दाखवल्या ह्या

शीशमहल तीनशे वर्षांपूर्वीचा आहे राजमहालातील विविध भित्तीचित्रे प्रेक्षणीय आहेत राजवाड्यातील सर्वोत्कृष्ट कलावैभवाने नटलेल्या मोर चौकात विविध काचेच्या तुकड्यांपासून रंगीबेरंगी मोराची सुंदर चित्रे काढली आहेत भारतीय राष्ट्रीय पक्षी मोर याचे इतके परिपूर्ण दर्शन दुसरीकडे कुठेही आढळणार नाही

तीन मजले चढून जेव्हा चौथ्या मजल्यावर आलो तेव्हा तेथे मोठी नैसर्गिक झाडे पाहून अचंबा वाटला चौथ्या मजल्यावर झाडे कशी उगवली याचे गूढ गाईडने उकलले राजवाडा टेकडीच्या उतारावर बांधला आहे चौथा मजला टेकडीच्या वरील उचवट्याच्या समान उंचीवर आहे त्याचा कौशल्याने उपयोग करून घेतल्यामुळे चौथ्या मजल्यावर झाडे उगवलेली दिसतात आहे का नाही करामत ! महाराणा करणसिंहाने बांधलेले कुंड तेथे आहे अखंड संगमरवराच्या या कुंडात जेव्हढी नाणी मावतील तेव्हढी नाणी महाराजा जेव्हा गादीवर बसत तेव्हा दान दिली जात तेथे जवळच एक मंडप असून अखंड संगमरवराचा हौदही आहे रंगपंचमी सणाच्या वेळी त्यात रंग कालवीत आणि राजे-राण्या हौसेने रंग खेळत रंगपंचमी सणाची हौस-मौज डोळ्यासमोर उभी राहिली राजवाड्याच्या वरच्या मजल्यावरून पूर्वेकडे उदयपूर शहराचे, पश्चिमेकडे पिचोल्याच्या विशाल तळ्याचे, तळ्यातील राजवाड्याचे—लेक पॅलेसचे दर्शन होते

गाईडने एका दालनात शेवटचे राजप्रमुख महाराजा भूपालसिंह यांची खुर्ची दाखविली मरण्यापूर्वी अर्धांगवायूने त्यांना ग्रासल्याने ते या खुर्चीचा उपयोग करीत ती खुर्ची म्हणजे संस्थान विलीनीकरणाची जणू साक्षीदार ! नंतरच्या उदयपूरमहाराजांची हॉर्सपोलो खेळातील कौशल्याबद्दल आंतरराष्ट्रीय ख्याती होती दैवदुर्विलासाने त्यांचा अंत खेळताना घोड्यावरून पडून झाला उदयपूरच्या राजवाड्यातील दालनामागून दालने उतरताना राजपूतांच्या शौर्यशाली कर्तबगारीचा प्रत्यय आला

पिचोला तलावात १८ व्या शतकात बांधलेला जगनिवास संगमरवरी दगडाने बांधलेला आहे सध्या त्याचे लेक पॅलेसमध्ये रूपांतर केले आहे सुशोभित भिंती, त्यावरील प्राचीन रंग व नक्षीकाम, उंची वस्तूंनी सजविलेला, विविध कारंजांनी शोभा आणलेला हा राजवाडा राजपूत वैभवाचे

द्योतक आहे. सिनेमाच्या शूटिंगसाठी तो प्रसिद्ध आहे.

जगमंदिर सतराव्या शतकात बांधलेले असून आजही दिमाखाने उभे आहे तेथील गजमूर्ती आकर्षक आहेत मोगल बादशहा शहाजहान आपल्या पित्याच्या विरुद्ध बंड केल्यानंतर येथे राहिला होता जगमंदिराच्या घुमटांनीच त्याला ताजमहालची रचना करताना प्रेरणा दिली

सर्व उदयपूर शहराचा जवळजवळ फेरफटका मारून झाला होता टांग्यातून परतताना सज्जन निवास उद्यान – गुलाब बाग मधून फेरफटका मारला उद्यानात प्रशस्त हिरवळ व वृक्षांची रेलचेल आहे तेथे पुराणवस्तू संग्रहालय, चित्रालय व ग्रंथालय तसेच प्राणिसंग्रहालयही आहे

पुढे वाटेत नेहरु म्युनिसिपल बाल उद्यान लहान मुलांची खूप करमणूक करते लंब वर्तुळाकार जलाशय, सिमेंट कॉंक्रीटचे प्राण्यांचे आकर्षक पुतळे, कारंजी यांनी ते नटलेले आहे शेवटी टांगा 'सुरजपोल' या गावातील मुख्य प्रवेशद्वाराजवळील फव्वारा चौक येथे आला तेथे बसविलेली रंगीबेरंगी तीनशे कारंजी रात्री चौकाला आगळीच शोभा आणतात असे टांगेवाल्याकडून कळले

उदयपूरच्या खरेदी करण्यासारख्या प्रसिद्ध वस्तू कोणत्या? असे टांगेवाल्याला विचारल्यावर तो म्हणाला, लाकडी खेळणी प्रसिद्ध आहेत आणि बहनजी रागावू नका पण खरे सांगतो उदयपूर प्रसिद्ध आहे परंपरागत 'आशा'साठी' मध व केशरपासून तयार केलेले 'आशा' हे मद्य उत्कृष्ट समजले जाते याच आशेला पूर्वी राजपूत-योद्धे प्राशन करून जोमाने युद्धामध्ये शत्रूवर चालून जायचे 'आशेचा' नाद सोडून आम्ही उदयपूरच्या बाजारात खरेदीसाठी फेरफटका मारला तेव्हा आजूबाजूला भडक रंगाच्या राजस्थानी साड्या दुकानातून टांगलेल्या दिसत होत्या टांगेवाला सांगत होता, याच बाजारात–'गाईड' सिनेमात रोझी (वहिदा रेहमान) पायात घुंगरू बांधून गाईड राजू (देवआनंद) बरोबर फेरफटका मारते त्या प्रसंगाचे चित्रण केले होते विविध लाकडी खेळणी व राजस्थानी साडी खरेदी केल्यावर टांगेवाल्याने संध्याकाळी पाचच्या सुमाराला लॉजवर पोहोचवले

सर्व उदयपूर पाहून झाले होते तेव्हा आठवले की 'व्हेनिस पहा आणि मग

मरा ' असे म्हणतात पण उदयपूरबाबत म्हणावेसे वाटते की उदयपूर पहा आणि पुन्हा पुन्हा पहाण्यासाठी दीर्घकाळ जिवत रहा ! एका फ्रेंच पर्यटकाने लिहून ठेवले आहे की एखाद्या प्रवाशाला हिंदुस्थानात अडीच दिवस घाल-वायचे असतील तर त्याने एक दिवस काश्मीरमध्ये, एक दिवस उदयपूरमध्ये व अर्धा दिवस आग्रा येथे घालवावा व खुशाल परतावे !

उदयपूरला चेतक नाव खूप लोकप्रिय आहे चेतक लॉज, चेतक चौक, चेतक टॉकीज, चेतक एक्स्प्रेस, चेतक मार्केट !

चेतक म्हटला की आठवते हळदी घाटीचे भीषण युद्ध ! अफाट मोगलाच्या सेनेचे अधिपत्य करणाऱ्या, हत्तीवर बसून लढाई करणाऱ्या राजा मानसिंहा-वर राणा प्रतापसिंह स्वत चेतकवर स्वार होऊन चालून गेला चेतकचा चेहरा हत्तीच्या सोंडेच्या झुलीने झाकलेला असायचा दुरून वाटायचे राणा प्रताप हत्तीवरच स्वार आहे युद्धात ऐन वेळी चेतकने मानसिंहाच्या हत्तीवर अशी उडी मारली होती की मानसिंह नशिबानेच वाचला हातघाईच्या लढाईत चेतक जबर जखमी झाला राणा प्रतापचा पराभव झाला राणा रणांगणातून वायुवेगाने बाहेर पडला मोगल सैन्य त्यांच्या मागे लागले त्या इमानी जनावराला धन्याबरील संकटाची चाहूल लागली जखमी अवस्थेत ओढे-नाले, कडे-कपारी, दगडधोंडे याची पर्वा न करता शरीरातून रक्त व तोंडा-तून फेस गळत असलेल्या अवस्थेत जिवाची पर्वा न करता चेतक धावत होता. पाठलाग करणारे मोगल सैनिक निराशेने परतले संकट नाहीसे झाल्यावर राणा प्रतापने चेतकला थांबवून खाली उडी टाकून त्याला थोपटून त्याच्या-वरून ममतेने हात फिरविला इमानी चेतक त्या क्षणाचीच वाट पाहात होता व धन्यावरील संकट दूर झाल्याचे उमगून त्याने प्राण सोडला प्रतापच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या हळदी घाटीच्या अरण्यात राणा प्रतापने चबुतऱ्यावर अश्वमूर्ती उभारली व चेतकचे चिरंतन स्मारक उभारले

चेतकच्या पराक्रमाच्या स्मृती मनात घोळवत, पुढे कधीतरी हळदीघाटीला भेट देण्याचा बेत करीत, सायंकाळच्या सातच्या चेतक एक्स्प्रेसने तळ्याच्या सान्निध्यातील धवलनगरी उदयपूरचा निरोप घेतला

☐

## ब्रह्मदेवाचे पुष्कर
## ख्वाजासाहेबांच्या दर्ग्याचे अजमेर

चेतक एक्स्प्रेस अजमेर स्टेशनमध्ये दिवस उजाडता सकाळी सहाला पोहो-चली अजमेरहून दुपारी निघून रात्री जयपूरला पोहोचायचे होते म्हणून सामान स्टेशननजीक जैन धर्मशाळेत ठेवले स्टेशनजवळ असलेल्या बस स्टँडवर येऊन पुष्करची बस पकडली

पुष्कर हे हिंदूचे प्राचीन पवित्र तळे अजमेरच्या पश्चिमेला अकरा कि मी डोंगराच्या अन्तरावर कुशीत वसले आहे असे म्हटले जाते की, " गंगा ही माता आहे, प्रयाग राजा आहे आणि पुष्कर गुरु आहे. " म्हणूनच प्रत्येक हिंदु पुष्कर तीर्थयात्रा करण्याची इच्छा बाळगतो कारण पुष्करखेरीज इतर तीर्थे केली व पुष्करला भेट दिली नाही तर व्यर्थ आहे पुष्करबाबत म्हटले जाते–

**पुष्कर पुष्करं तीर्थं पुष्कर पुष्कर जलम् ।**
**पुष्कर पुष्कर स्नान सदा पुष्कर दुष्करम् ।**

म्हणजेच–

पुष्कर तीर्थासारखे दुसरे नाही, यातील जलासारखे दुसरे नाही, येथील स्नान सर्वोत्तम पुष्करचा महिमा अपार आहे

पुष्कर निर्मितीची पद्मपुराणातील कथा पंड्याकडून ऐकताना मौज वाटली ब्रह्मदेवाच्या हातातून स्वर्गातून पृथ्वीवर कमलपुष्प निसटले जेथे कमळाच्या पाकळ्या पडल्या तेथे कुंडे निर्माण झाली पहिल्यांदा कमळ जेथे पडले ते ज्येष्ठ पुष्कर, दुसरे मध्य पुष्कर व तिसरे कनिष्ठ पुष्कर

ब्रह्मदेवाने ज्येष्ठ पुष्कर कुंडाजवळ यज्ञ सुरू करण्याचे ठरविले ब्रह्मदेवाची पत्नी सावित्रीदेवी हिच्याखेरीज बहुतेक देवदेवता हजर होत्या ब्रह्मदेवाचा पुत्र नारदमुनी चौकशी करण्यासाठी गेला असताना त्याने सावित्री मातेला सांगितले की, "यज्ञ सुरू व्हायला अजून अवकाश आहे तेव्हा तू इतर राहिलेल्या देवींना घेऊन ये !" सावित्रीला सर्वांना बोलविण्यास खूप वेळ लागला इकडे यज्ञाची तयारी पूर्ण झाली नारदमुनींने परत आल्यावर सांगितले की, "सावित्री मातेला यायला खूप वेळ आहे कारण ती इतर देव-देवींना बोलवायला गेली आहे" शेवटी हवालदिल ब्रह्मदेवाने गायित्रीला दुसरी पत्नी बनवून तिला शेजारी बसवून यज्ञ सुरू केला यज्ञ सुरू झाल्यावर उशीराने सावित्री इतर देवींसह आल्यावर तिने जेव्हा ब्रह्मदेवाजवळ दुसरी स्त्री बसलेली पाहिली तेव्हा तिने संतप्त होऊन शाप दिला "ब्रह्मदेवा, तुला पुष्करखेरीज कोणी ओळखणार नाही", आणि ती रुसून डोंगराच्या माथ्यावर निघून गेली ! आज भारतात पुष्करखेरीज ब्रह्मदेवाचे कोठेही मंदिर नाही सावित्री देवीचे मंदिर पुष्करच्या डोंगरावर आहे पुराणातील कथेत तथ्यांश असावा याची खात्री वाटते

पुष्कर इ स पूर्वी चौथ्या शतकात अस्तित्वात होते सांचीच्या बौद्ध-स्तूपावर पुष्करचा उल्लेख आहे महाकवी कालिदासाने अभिज्ञान शाकुंतलम् मध्ये पुष्करच्या सौंदर्याचे वर्णन केले आहे चिनी प्रवासी फाहैन तसेच अल्बेरुणी यांनी पुष्करच्या धार्मिक महात्म्याबद्दल उल्लेख केला आहे नवव्या शतकात परिहार राजांनी पुष्करला नवे स्वरूप दिले पुष्करची मुख्य मंदिरे आहेत ब्रह्मा, बद्रीनारायण, वराह, शिव, गायत्री, सावित्री औरंगजेबाने पुष्करवर हल्ला करून वराह मंदिर व इतर देवळांचा नाश केला राजपूत राजांनी घाट बांधले, मंदिरांना आश्रय दिला

पुष्कर तळ्याच्या सभोवती सुंदर विस्तृत घाट आहेत त्यात ग्वाल्हेर, कोटा, जयपूर नरेशांनी बांधलेले घाट आहेत इ स १९११ साली इंग्लंडची

राणी मेरी पुष्करला येऊन गेल्या प्रित्यर्थ बांधलेला जनाना घाटही आहे गावात छोटीमोठी मंदिरे आहेत पुष्कर तीर्थात म. गांधी, प नेहरु आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या अस्थीचा काही भाग विसर्जित करण्यात आला होता

पद्मपुराणानुसार पुष्कर तटावर सरस्वती नदीत सुप्रभा, कांचना, प्राची, नदा आणि विशाल या पचधारांचा प्रवाह वाहतो महाभारतानही म्हटले आहे—

**पितामहेन यजता आहूता पुष्करेषु वै।**
**सुप्रभा नाम राजेंद्रा नाम्ना तत्र सरस्वती।**

मुख्य घाटावर आलो आणि पड्याचा 'हल्ला' झाला पुष्कर कुडात करावयाचा मुख्य विधी म्हणजे स्वर्गातील पितराना सुखशाती लाभो म्हणून तळ्यात बुडी मारून करावयाचा विधी । या पुष्कर तीर्थाबाबत पद्मपुराणात उल्लेख आहे की, लकेहून परतताना प्रभू रामचद्राने आपल्या स्वर्गीय पित्याच्या—दशरथ राजाच्या सुखशातीसाठी कुडात स्नान केले होते इतकी प्राचीन परपरा या विधीला आहे आमच्या श्वशुरानी तो विधी केला आम्ही दोघानी 'अखड सौभाग्य' विधी केला कुडातील विधी आटोपून घाटावर फोटो काढून ब्रह्मदेवाच्या मंदिराच्या दर्शनासाठी निघालो

ब्रह्मदेवाचे मूळ मंदिर सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी जगत्गुरु शकराचार्य याच्या हस्ते स्थापन झाले सध्याचे भव्य मंदिर ग्वाल्हेर राज्याचे मत्री श्री गोकुळचद यानी इ स १८०९ मध्ये बसविले प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला द्वारपाल म्हणून हत्तीवर बसलेल्या धनपती कुबेर व सुरपती इद्र याच्या मूर्ती आहेत चतुर्मुख ब्रह्मदेवाची व त्याच्या शेजारी त्याची दुसरी पत्नी गायत्री-देवी याच्या मूर्ती प्रेक्षणीय आहेत मंदिराच्या गाभाऱ्याच्या दरवाज्यानजीक जुने निरनिराळे चांदीचे रुपये ठोकून बसविलेले दिसले मंदिराच्या मागील बाजूला उच डोंगरावर रुसलेल्या सावित्रीदेवीचे मंदिर दिसत होते सावित्रीचा स्त्रीमत्सर अनाठायी वाटला नाही

पुष्करमधील दुसरे उल्लेखनीय मंदिर म्हणजे दाक्षिणात्य पद्धतीचे श्री रगनाथ मंदिर मंदिरातील गाभाऱ्याचा दरवाजा चांदीचा आहे आतील श्री

वैकुंठनाथाची मूर्ती सोन्याची आहे मंदिराच्या आवारात सुमारे चाळीस फूट उंचीचा पन्नास किलो वजनाचा सुवर्णस्तंभ आहे हे मंदिर पन्नास वर्षापूर्वी बावीस लाख रुपये खर्चून बांधले आहे

पुष्कर तीर्थाला कार्तिकी पौर्णिमेला मोठी यात्रा भरते त्यावेळी हे छोटे गाव पन्नास हजारावर यात्रेकरूंच्या गर्दीने गजबजून जाते रंगीबेरंगी घागरा, ओढणी, चांदीचे दागिने घालून सजून राजस्थानी महिला व धोतर, कुडते, रंगीबेरंगी फेटे घातलेले पुरुष यांची आठवडाभर झुबड उडते त्यावेळी राजस्थानी संस्कृतीची झलक दिसते त्यावेळी उंटाचा बाजार भरतो उंटाची खरेदी विक्री होते तसेच उंटाच्या शर्यती होतात पुष्करला गुलाब फुले विपुल आहेत. पुष्करच्या आजुबाजूला ताटवेच्या ताटवे आढळतात दहा पैशात आपल्याकडे एक फूल मिळते तर तेथे १५-२० फुलाचा सुरेख हार मिळतो पुष्करहून अजमेर व जवळपास रोज गुलाब फुलाच्या करंड्या पाठविल्या जातात व तेथे गुलकंद तयार करतात

या प्राचीन पवित्र तीर्थाला भेट देण्याचे भाग्य लाभले म्हणून मनोमन परमेश्वराला धन्यवाद दिले पुष्कर-अजमेर या प्रवासात राजस्थानी उंटांचे तांडे प्रथमच पाहून आनंद झाला दुपारी बाराच्या सुमाराला अजमेरला पोहोचलो

अजमेर ही रघुवंशातल्या अज राजाची राजधानी ! अजमेर अरवली पर्वताच्या टेकड्यांनी वेढलेले आहे जयपाल चौहान याने सातव्या शतकात हे शहर वसविले व तारागड नावाचा मजबूत डोंगरी किल्ला बांधला काहींच्या मते सोळाव्या शतकात अकबराने अजमेर जिंकल्यावर हा किल्ला बांधला आठशे फूट उंचीच्या या तारागडावर जुनी मशीद व प्राचीन इमारतींचे अवशेष आहेत तेथून अजमेर शहर व परिसराचे सुंदर दृश्य दिसते अजमेरचा प्रसिद्ध हिंदु सम्राट पृथ्वीराज चौहान हा होय

अजमेर प्रसिद्ध आहे ख्वाजासाहब शरीफ यांच्या दर्ग्याबाबत ! ज्याला मक्का मदीनेच्या यात्रा करणे शक्य नसते तो प्रत्येक मुस्लीम या दर्ग्याला आयुष्यात एकदा भेट देण्याची इच्छा बाळगतो ख्वाजासाहब यांचे संपूर्ण नाव हजरत ख्वाजा मुइनद्दिन हसन चिश्ती असून त्यांचे अनुयायी त्यांना 'गरीब नवाज', 'सुल्तानुल हिंद', 'ख्वाजासाहब' या नावाने पुकारतात

हे मुसलमान साधु असून त्याचा कालखंड इ स ११४२-१२३९ असा ९७ वर्षांचा आहे मुस्लीम राष्ट्राची यात्रा केल्यानंतर मदीना येथें पोहोचल्या-वर त्याना अल्लाहने हुकूम केला की तुम्ही हिंदुस्थानात जाऊन इस्लामचा प्रचार करा त्याप्रमाणे वयाच्या ५२ व्या वर्षी ते लाहोर मार्गे हिंदुस्थानात अजमेरला प्रथम आले व त्यानी धर्मप्रसारास सुरुवात केली आपल्या ४५ वर्षांच्या कारकीर्दीत त्यानी किमान ब्याण्णव लाख लोकाना मुस्लिम धर्माची दीक्षा दिली । त्यानी अजमेरला प्रथम भेट दिलेल्या जागी हा सुप्रसिद्ध दर्गा आहे तसेच त्यांनी जेथे प्रथम नमाज पढला ती 'औलीया मशीद' आजही तेथे आहे त्यांनी दाखविलेल्या चमत्काराच्या बऱ्याच हकिकती प्रसिद्ध आहेत. त्यामुळे अनेकानी मुसलमानी धर्म स्वीकारून त्यांचे अनुयायित्व स्वीका-रले ख्वाजासाहेब याचे बरेचसे शिष्य तेथून निरनिराळ्या जागी जाऊन त्यांनी धर्मप्रसार केला वयाच्या ९७ व्या वर्षी ते पैगंबरवासी झाले

त्याचा उरुस प्रत्येक वर्षी उत्साहाने साजरा होतो त्यावेळी हिंदुस्थानातील काना-कोपऱ्यातून तसेच विदेशातूनही त्यांचे अनुयायी येतात दुनियेतील मशहूर कव्वाल या प्रसगी आपली हजेरी लावतात व कलाकारी पेश करतात. हैद्राबादच्या वजीराने एक लक्ष रुपये खर्च करून 'महिफिल खाना' कव्वाली मुशायरेसाठी बांधला आहे

दर्ग्यात प्रवेश करण्यापूर्वी भव्य 'नमाज गेट' मधून जावे लागते तसेच माडू (मध्य प्रदेश) येथील सुलतानाने बांधलेला ७५ फूट उंचीचा 'बुलंद दरवाजा' भव्य आहे बुलंद दरवाजाजवळ दोन प्रचंड डेगी-भांडी आहेत. छोटी डेग जहांगीर बादशहाने दिली आहे त्यात एका वेळी साठ मण गोड भात प्रसाद म्हणून शिजवितात मोठी डेग अकबर बादशहाने दिली आहे. त्यात एका वेळी १२० मण भात शिजवला जातो इतकी ती प्रचंड आहे! डेगीत दान धर्मासाठी टाकलेले रुपये, पैसे आढळले गोरगरीबासाठी प्रसाद वाटण्यासाठी लंगरखाना आहे दर्ग्याला इ स १९११ साली ब्रिटिश सम्राट पंचमजॉर्ज व महाराणी मेरी यांनी भेट दिली त्या स्मरणार्थ निजामाने बांध-लेला चौथरा प्रेक्षणीय आहे

दर्ग्याला वाहण्यासाठी गुलाब फुलाचा हार घेऊन दर्ग्याच्या मंडपात प्रवेश केला तेव्हा बाहेरील बाजूला मुसलमान पुजारी बसलेले होते पंढरपूरच्या

बडव्याप्रमाणे आमच्याकडून दक्षिणा उपटून नाव गाव विचारून उर्दूत आम्हाला सुखशाती लाभो म्हणून त्यानी ख्वाजासाहेबाकडे प्रार्थना केली मुख्य दर्गा मनोवेधक आहे दर्ग्याभोवतालचे चादीचे सुबक रेलीग चमकत होते लाल रगाचे मखमली भरजरी छत मौल्यवान आहे दर्ग्यावर गुलाबाच्या फुलाचा खच पडला होता दर्ग्याच्या काही सगमरवरी फरशा हिंदु संस्थानिकांनी दिल्या आहेत त्याचीही नावे कोरली आहेत दर्ग्याच्या नजीक चौदा वर्षे खपून शहाजहान बादशहाने बांधलेली सगमरवरी जुम्मा मशिद आहे

या दर्ग्याविषयक विलक्षण हकीकत अशी आहे सात आठशे वर्षांपूर्वी या दर्ग्याखाली शिवलिंग होते शिवलिंगावर ख्वाजा चिश्ती नेमाने पखालीतून पाणी घालीत त्यामुळे शकराने प्रसन्न होऊन चिस्तींना भोळेपणाने विचारले, "तुला काय हवे ?" त्यावर त्यानी सांगितले "तुझ्या डोक्यावर मला स्थान पाहिजे " दर्ग्याच्या तळघरात अजूनही एक महादेवाची पिंड आहे व त्याची दररोज हिंदु पुजाऱ्याकडून पूजाअर्चा होते हे ऐकल्यावर तर आश्चर्याला पारावार राहिला नाही मनात म्हटले ख्वाजासाहेब आमचे शिवलिंगालाही प्रणाम पोहोचवा

दर्ग्याच्या मागील बाजूला तारागड डोंगराच्या पायथ्याशी असलेला 'ढाई दिनका झोपडा' कुतुहलाने बघायला गेलो तेथे निरनिराळ्या भव्य कमानी असलेली प्राचीन दगडी इमारत आहे पूर्वी तेथे हिंदु पाठशाळा असल्याचा उल्लेख आहे हिंदु मंदिरावर आक्रमण करून मुसलमानानी केवळ सोने नाणीच लुटली नाही तर मंदिराच्या दगडी कमानी, खांब लुटून ही इमारत झटपट उभारण्यात आली व त्याचे मशिदीत रूपातर केले येथे एका फकीराचा म्हणे अडीच दिवसाचा उरूस होत असे

ढाई दिनका झोपडा ' पाहायला आम्ही गेलो तेव्हा तेथे चिटपाखरूही नव्हते एक प्रकारची गूढ शातता तेथे पसरली होती एकेकाळी संस्कृत पाठशाळा असलेली ही इमारत किती गजबजलेली असेल ' पण आता काळाच्या ओघात राहिल्या फक्त हिंदु वळणाच्या शिल्पकामाच्या कमानी, स्तभ, मशिदीला आधार देत ! ढाई दिनका झोपड्यातील सुमारे एक हजार स्तभ उभारण्यासाठी हिंदूच्या किमान पन्नास मंदिराचा नाश करण्यात आला! उदास मनानेच तेथून बाहेर पडलो

शेठ भागचंद सोनी यांनी तांबड्या दगडात बांधलेले जैन मंदिर भव्य आहे तेथील मंदिराजवळील म्युझियममधील हॉलच्या मधल्या भागात सोनेरी रंगातील मूर्तींचा जैन पुराणाचा देखावा प्रेक्षणीय आहे सभोवती भिंतीला काचा लावलेल्या असून काचेतून सोनेरी छोटी छोटी मंदिरे, देवदेवता, पक्षी इत्यादी दृश्ये दिसतात प्रत्येक देखाव्याचे विश्लेषण हिंदी व इंग्लिश भाषेत लिहिले आहे, आमचा जैन तत्त्वज्ञानाचा अभ्यास नसल्याने व सांगण्यासाठी गाईड नसल्याने म्युझियमची माहिती न घेताच परतावे लागले मंदिरासमोरचा शुभ्र संगमरवरी मानस्तंभ डौलदार आहे

अजमेरमधील उल्लेखनीय स्थान म्हणजे अजमेरचा 'अन्ना सागर' हा विस्तीर्ण तलाव अन्नाजी चौहानने या परिसरात असंख्य शत्रूवर विजय मिळविला म्हणून त्याचे नाव या तलावाला दिले शहाजहानने तेथे संगमरवरी सुंदर खांबांची बारादरी व बगीचा उभारला

दुसरे म्हणजे जहांगिरने बांधलेली दौलत बाग, आता त्याचे नाव सुभाष बाग आहे या उद्यानात चितोडची स्वामीभक्त पन्नादाई राजपुत्राला घेऊन पळून जात असताना विसावा घेण्यासाठी थांबली होती त्या स्मृति प्रित्यर्थ तिचा पूर्णाकृती पुतळा उभारला आहे

दुपारचे तीन वाजले होते टांगा परत स्टेशनच्या दिशेने चालला होता दोनच दिवसावर 'ईद' असल्याने गावात ईदचे वातावरण दिसत होते वाटेत जैन लोकांची एक मिरवणूक दिसली, त्यात रंगीबेरंगी भडक पगड्या घातलेले राजस्थानी दिसले

स्टेशननजीक राजस्थानी जेवणाचा आस्वाद घेतला जयपूरला जाण्यासाठी गाडी तयार होती अर्ध्या दिवसाच्या धावत्या अजमेरच्या वास्तव्यात सकाळी दर्शन घेतलेल्या पुष्कर, ख्वाजासाहेबांचा दर्गा, सोनी जैनमंदिरे यांनी मनावर ठसा उमटवला व अजमेरला भेट दिल्याचे सार्थक झाले

□

# गुलाबी नगर जयपूर

राजस्थान राज्याची राजधानी असलेल्या जयपूरची गणना जागतिक कीर्तीच्या काही निवडक सुदर शहरांच्या बरोबरीने केली जाते प्रथम राजपुताची राजधानी जयपूरपासून अकरा किलोमीटर अतरावर असलेल्या डोंगराळ प्रदेशात आमेर या ठिकाणी सुमारे सहा शतके बारा ते अठराव्या शतकापर्यंत होती सुरक्षिततेच्या दृष्टीने नवे टुमदार शहर वसवून तेथे राजधानी हलविण्याचा निर्णय राजपूत राजा सवाई जयसिंहाने घेतला व त्या दृष्टीने जयपूर या ऐतिहासिक नगराची मुहूर्तमेढ इ स १७२७ मध्ये केली प्रशस्त सरळ एकशेदहा फुटी हमरस्ते, त्याला काटकोनात छेदून जाणारे रस्ते, भव्य चौक, आठ भव्य कमानी अशी उत्कृष्ट शहररचना असलेले सोळा चौ कि मी विस्तार असलेले जयपूर आजही कोरे करकरीत वाटते जयपूर शहराची कोनशिला तारकेश्वर मदिर आहे याबद्दल अशी आख्यायिका सांगतात की जेव्हा सवाई जयसिंह एका टेकडीवरून भावी शहराच्या क्षेत्राची पहाणी करीत होते तेव्हा त्यांना एका वृक्षाच्या छायेखाली एक छोटेसे मदिर आढळले. तेथील साधुपुरुषाने सांगितले की या मदिराभोवती जर शहर बांधण्यात आले तर त्याची भरभराट होईल त्यानुसार जयपूर शहराचा आराखडा तयार

करण्यात आला बंगाली वास्तु शिल्पकार श्री विद्याधर भट्टाचार्य यांनी जय-पूरची नगररचना केली हे शहर चौकोनाकृती असून ते वेगवेगळ्या रस्त्यांनी सहा समान विभागात वसवले आहे

वेद काळात ह्या प्रदेशाला मत्स्यदेश ' असे नाव होते महाभारतकाळी ह्याच प्रदेशात विराट नगरी होती उत्तरा व अभिमन्यू यांचा विवाह याच प्रदेशात झाला अशी महाभारतकालीन पार्श्वभूमी जयपूरला आहे

सकाळी आठला जयपूर पाहण्यासाठी रिक्षा लॉजच्या दारात हजर झाली. आदल्या रात्री त्यानेच आम्हाला लॉजवर आणून सोडले होते व आजच्या जयपूर दर्शनासाठी त्याची रिक्षा ठरवून घेतली होती

पहिले स्थान पाहावयाचे होते श्री गलतेश्वर महादेवाचे मंदिर ! रिक्षा-वाल्याने प्रथम जुन्या अजमेर-आग्रा रोडच्या दिशेने रिक्षा सोडली. वाटेत संगमरवरी प्रचंड दगडाच्या खाणीचा डोंगर चमकत होता ईश्वराने राज-स्थानला संगमरवरी दगड ही अमोल देणगी दिली आहे सह्याद्रीचे काळे पत्थर पाहण्याची सवय असलेल्या आपल्यासारख्या प्रवाशाला शुभ्र चमकणारे दगड देहभान हरपून टाकायला लावतात 'गल्ता ' हे स्थान जयपूरपासून पूर्वेला तेरा कि. मी. वर आहे जाताना वाटेत दुतर्फा सुंदर घुमट असलेल्या छत्र्या पाहून असे वाटते की आपण जणू एखादा मोगलकालीन ऐतिहासिक चित्रपट पाहत आहोत गल्ता या ठिकाणी प्राचीन सूर्यमंदिर आहे तसेच नैसर्गिक पाण्याची धार बारा महिने संगमरवरी गोमुखातून उंचीवरून पड-ताना आकर्षक दिसते या झऱ्याचा उगम अज्ञात आहे महादेवाचे मंदिर व समोरील कुंड मनाला खूप समाधान देते या निसर्गरम्य ठिकाणी माणसाळ-लेली माकडे खूप होती धार्मिक महत्त्वाखेरीज गल्ता खास जयपुरी शैलीच्या पेंटींगसाठी प्रसिद्ध आहे

गल्ताहून परतताना दिसतो राजा सवाई जयसिंहाने आपल्या शिसोदिया महाराणीसाठी बांधलेला छोटासा रेखीव महाल व त्याभोवतालचा बगीचा ! तीन टप्प्यात असलेला हा बगीचा चांगली देखभाल करून छान अवस्थेत ठेवला आहे उत्तम संगमरवरी पायऱ्या व कलात्मक कठडे यावरून दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात उतरता येते गोलाकार आकारात कापलेल्या झाडांच्या रांगा सुंदर दिसतात. महाराणीचा महाल व त्यातील जुन्या उंची वस्तू राज_

वैभवाची कल्पना देतात सिनेमा शुटींगसाठी हा बगीचा प्रसिद्ध आहे प्रति-दिनी आठ हजार रुपये शूटींगच्या वेळी घेतात, अशी माहिती बगीच्याच्या माळ्याकडून कळली

तेथून परतताना वाटेत दिसणारा श्री गोलथा मेहताब या जैन ओसवाळ शेठजींचा बगीचाही उत्कृष्ट आहे सगमरवरी पायऱ्या, नक्षीकाम केलेले संगमरवरी कठडे आकर्षक आहेत तेथे खाजगी मालकीचे एक अतिथीभवन आहे

नतर रिक्षावाल्याने आमचा मोर्चा इतिहासप्रसिद्ध आमेर किल्ला व तेथील राजवाड्याकडे वळवला तो पाहण्यासाठी आम्ही उत्सुक झालो होतो

आमेर ऊर्फ अबर ही जयपूरपूर्वीची राजपुताची राजधानी जयपूरपासून अकरा कि मी वर दिल्लीच्या हम रस्त्यावर गतकालाचे वैभव दाखवीत दिमाखाने उभी आहे जयपूरमध्ये इ स १७२७ मध्ये राजधानी हलविण्या-पूर्वी सहा शतके आमेर राजपूताची राजधानी होती अकराव्या शतकात शूर कछवा सरदारांनी मीनाचा पराभव करून हे गाव वसविले अबर हे नाव अबरीप ऋषी अथवा अम्बाभवानी देवीवरून पडले असावे !

आजही जयपूरच्या राजघराण्यातील कुठलाही महत्त्वाचा धार्मिक विधी—उदाहरणार्थ विवाह, मुज, नामकरण विधी सोहळा आमेर येथेच पार पाडला जातो अशी त्याची परपरा आहे राजपूत राजा बिहारीमल व त्याचा पुत्र भग-वानदास याच्या सोळाव्या शतकाच्या कारकीर्दीत राजपूताचे मोगलाबरोबर लग्नाचे सबध बाढून सख्य झाले होते अकबराच्या दरबारातील राजा मान-सिंह हा राजा भगवानदासचा दत्तक मुलगा राजा मानसिहाची बहीण राणी जोधाबाई सम्राट अकबराला दिली होती उदयपूरच्या राजपूत घराण्याचा व जयपूरच्या राजघराण्याचा फरक असा की उदयपूरचे घराणे कडवे होते त्याच्या राजघराण्यातील कोणी स्त्रिया मोगलाना दिल्या नव्हत्या, त्याना जयपूर घराण्याबद्दल म्हणूनच अप्रीती होती अकबराने उदयपूरच्या राणा प्रतापला शरण आणण्याची योजना राजा मानसिहावर सोपवली होती राजा मानसिंहाने आमेरला मानमरातब, वैभव प्राप्त करून दिले मानसिहाने आमेरचे प्रसिद्ध राजवाडे बाधले राजा मानसिह अतिशय शूर असून त्याने अकबराची मर्जी सपादन करून सेनापतीपद मिळविले मानसिह दिसायला कुरूपव

वर्णाने काळा होता एकदा अकबराने मानसिंहाला विचारले "देवाने जेव्हा सौंदर्याची वाटणी केली तेव्हा तुम्ही कुठे होता ?" त्यावर हजरजबाबी मानसिंहाने उत्तर दिले "खाविंद, तेव्हा मी शक्ती कमवीत होतो।" मान-सिंहानंतरच्या दोन राजानी महालात भर घातली राजा मानसिंहानंतरच्या दोन कमकुवत राजानंतर प्रसिद्ध मिर्झा राजा जयसिंहाने आमेरच्या राज-पूत राज्याला परत कीर्ती प्राप्त करून दिली याच मिर्झा राजे जयसिंहाने छत्रपती श्री शिवाजीमहाराज याच्याबरोबर तह करून मोगल दरबारी त्यांची आग्रा भेट ठरविली

आमेरच्या पायथ्याशी आलो तेव्हा प्रथम गाईड ठरवला जुनी ऐतिहासिक स्मारके गाईडशिवाय पाहणे म्हणजे दिवा न घेता अंधारात चाचपडणे जुन्या स्मारकातील खाचा खोचा काहीच कळत नाहीत अर्थात हे जाणून प्रवाशा-कडून जास्ती पैसे उकळण्याचा गाईड प्रयत्न करतात। पण हे कळूनही त्याला इलाज नसतो

पायथ्याजवळ प्रथम दृष्टीला पडतात ती गडावर जाण्याच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेली दोन तळी व बगीचे आमेरचे दोन प्रमुख शिल्पकार मोहन बारी व दिला राम याच्या नावाने हे बगीचे ओळखले जातात त्या शिल्पकारानी धनदौलत अव्हेरली त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांची नावे बगीच्याना दिली गेली व हे त्यांचे चिरंतन स्मारक झाले आहे

बगीचा ओलांडून आत किल्ल्याची मूळ चढण चढायला सुरुवात केली सजलेल्या अंबारीत हत्तीवर बसून परदेशी प्रवासी डुलत डुलत गडावर चालले होते हत्ती जणू जुन्या राजवैभवाची याद करून देत होते। आजही आमेरला प्रवाशांना गडावर ने-आण करण्यासाठी सजलेल्या हत्तींची योजना केली आहे वीस रुपये फी मात्र द्यावी लागते ! गाईडसह आम्ही छोटयाशा चढानंतर भव्य 'जालेब चौकात' पोहोचलो प्रवेशद्वाराजवळ सूरजपोल ही भव्य कमान आहे निरनिराळ्या राजमहालावर जाण्यासाठी पायऱ्यावरून थोडे चढावे लागते

प्रथम जयपूरच्या राजघराण्याचे कुलदैवत असलेल्या कालिका देवीचे सुंदर मंदिर लागते मंदिरातील देवीची वीस भुजाची चांदीची मूर्ती राजा मानसिंहाने बंगालमधून आणली आहे मूर्तीवरील मौल्यवान वस्त्रे ओळे


दिपवितात चादीचे भव्य दरवाजे वैभवाची साक्ष देतात मंदिरातील सगम रवरी काम अत्यत कलात्मक आहे मदिर द्वाराच्या दोन्ही बाजूला आम्हाला वाटले की ताजी हिरवी केळीची पाने टांगलेली आहेत जवळ जाऊन पाहिल्या-वर मात्र भ्रमनिरास झाला खास इटालियन हिरवा सगमरवरी दगड घडवून त्याची हुबेहूब केळीची पाने घडविली आहेत व लाल सगमरवरी दगडांनी केळीचे घड कोरलेले आहेत हा खास राजपूत कारागिरीचा अप्रतिम नमुना आहे

कालिका मातेला तिच्या स्थापनेपासून आजतागायत दररोज एक बळी देण्यात येतो नवरात्रात पहिल्या दिवशी एक बकरा व एक रेडा दुसऱ्या दिवशी दोन बकरे व दोन रेडे असे वाढत वाढत दसऱ्याच्या दिवशी १०१ बळी दिले जातात जितके बळी दिले जातात तितक्या तोफा उडविल्या जातात तोफांच्या आवाजावरून बळींची सख्या मोजली जाते आम्ही भेट दिली तो नवरात्रातील दुसरा दिवस होता बळी दिलेल्या जागी ताजे रक्त डोळ्याने पाहिले बळी देण्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे एका झटक्यात जो कापला जातो तोच खरा बळी ! गडावरील तरबेज लोक एका झटक्यातच बळी देण्याचे काम उरकतात अगदी पूर्वी बकऱ्या-रेड्याऐवजी माणसाचा बळी दिला जाई, हे ऐकून तर अगावर शहारे आले


दसऱ्याच्या दिवशी बळी द्यायचा कार्यक्रम जयपूर महाराजाच्या उपस्थितीत पार पाडला जातो महाराज जगाच्या पाठीवर कुठेही असले तरी त्यांना दसऱ्याच्या दिवशी आमेरला जातीने हजर राहावे लागते, अशी परपरा आहे महाराजाच्या विजया दशमीच्या दिवशी होणाऱ्या आगमनाची पूर्वतयारी म्हणून साफसफाई चालू होती जयपूर गादीवरील राजपुरुष या देवीचे दर्शन घेतल्याशिवाय कुठल्याही महत्त्वाच्या कामाला अथवा प्रवासला निघत नाहीत. या प्रथेचे पालन आजही होते

नतर प्रशस्त दिवाण-ए-आम पाहिला मिर्झा राजे जयसिहाने बाधलेला हा चाळीस स्तभाच्या आधारावर उभा असलेला दिवाण-ए-आम हिंदु शिल्प-कामाचा उत्कृष्ट नमुना आहे छताजवळ हत्ती कोरलेल्या ब्रॅकेट्स सुदर दिसतात

गणेश पोल दरवाजावरील रगीत चित्रकारी आकर्षक आहे राजशाही निवासस्थाने, रगीबेरगी सगमरवरी चिपा, शुभ्र सगमरवरी जाळ्या,



↑ बुलंद दरवाजा, फत्तेपूर शिक्री          ख्वाजासाहब दर्गा, अजमेर ↓





↑ शेख सलीम चिस्ती मकबरा, फत्तेपूर शिक्री पुष्कर सरोवर ↓



आरशाचे मीनाकाम इत्यादींनी सुशोभित केलेले आहेत अष्टकोनी सोहाग मंदिराचे कलात्मक घुमट कमानीमधील संगमरवरी जाळ्या मनोवेधक आहेत महालातील 'शीशमहाल' हा राजपूत कारागिरीचा मुकुटमणी आहे मिर्झा राजे जयसिंहाने बांधलेल्या या महालातील छतात, भिंतीवरील विविध आरशाच्या बहिर्गोल तुकड्यात दिसणाऱ्या हजारो प्रतिमानी दिपून गेलो मेणबत्ती पेटवून ती हलविल्यावर एका ज्योतीच्या हजारो ज्योती पाहून थक्क झालो. मोगले आझम सिनेमातील मधुबाला गाताना याच महालात शूटींग केले आहे

जस मंदिरातील अखंड भव्य संगमरवरी जाळ्या अद्‌भूत कारागिरीचा नमुना आहेत जाळीतून किल्ल्याबाहेरील आजूबाजूचे मनोहारी दृश्य दिसते जाळीच्या पार्श्वभूमीवर आम्ही फोटो टिपला सुखनिवासमध्ये संगमरवरी पाट (चॅनेल) दिसले पूर्वी उन्हाळ्यात त्यातून झुळझुळ वाहणारा प्रवाह निवासस्थानाला थंड राखीत असे हस्तीदंतावर व चंदनावर काम केलेले दरवाजे हे एक आणखी त्याचे वैशिष्ट्य तेथील रंगकाम जुने झाले असले तरी अजून ते टवटवीत दिसते आमेर किल्ल्याचा सर्वात जुना भाग म्हणजे राजा मानसिंहाचा राजवाडा, हिंदु शिल्पकृतीचा तो उत्कृष्ट नमुना आहे

आमेर किल्ला सर्व पाहून झाला होता. राजपुतांच्या उच्च प्रतिभा विलासाने नटलेल्या या ऐतिहासिक स्मारकाची धुंदी गडावरून खाली उतरलो तरी उतरली नव्हती. गत ऐश्वर्याची साक्ष देत डुलत डुलत हत्ती प्रवाशाना घे[illegible] उतरत होते

बोलक्या डोळ्यांची मधुबाला आमेरच्या महालातून 'प्यार किया तो डरना क्या' अशी मधुर स्वरात जणू साद घालत होती ! आणि आमेरच्या परिसरातील डोंगराच्या कुशीत तोफांचे गडगडाट, हत्ती, घोड्याचे चीत्कार, ढाल तलवारीचा खणखणाट जणू ऐकू येत होता

डोंगराळ वाटेतून वळणे घेत घेत रिक्षा शेवटच्या उंच वळणावर थांबली तेथून नव्या जयपूरचे संपूर्ण दृश्य आम्ही पाहिल्यावर रिक्षा जयपूरकडे धावू लागली वाटेत एक पाण्यातील महाल दिसला ग्रीष्मकालीन वास्तव्यासाठी राजपरिवाराला जलमहालाचा उपयोग होई. पुढे काही अंतरावर 'गेटोर' या ठिकाणी रिक्षा थांबलो त्याठिकाणी राजघराण्यातील दिवंगत राजाच्या

स्मरणार्थ छत्र्या बांधल्या आहेत सवाई जयसिंहाच्या छत्रीचे स्तंभ, घुमट आकर्षक आहेत

जयपूर गावात प्रवेश केला तेव्हा दुपारचा एक वाजून गेला होता उपहार-गृहात फराळावर ताव मारून ताजेतवाने होऊन जयपुरातील सिटी पॅलेसमध्ये दाखल झालो

सिटी पॅलेस पहाण्याची माणशी बारा रुपये फी जबरदस्त वाटली शिवाय गाईड फी अलग ! सुट्टीत गाईडचे काम करणारा पदव्युत्तर वर्गाला असणारा विद्यार्थी आम्ही गाईड म्हणून निवडला राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळील आकर्षक कमान प्रथमच लक्ष वेधून घेते दोन्ही बाजूचे संगमरवरी पांढरे हत्ती जणू स्वागत करीत होते हत्तीभोवती उभे राहून गाईडने आमचा फोटो टिपला राजवाड्यातील दिवाणे-खास आणि संगमरवरी खांबाचा दिवाणे-आम लक्ष वेधून घेतात याच दिवाणखान्यात संस्थाने विलीन होण्याचा ऐतिहासिक सोहळा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पार पडला चंद्रमहालमध्ये पेंटींग, नक्षीकाम, मीनाकाम उत्कृष्ट आहे

शस्त्रागार विभागात दोन हजारावर जुन्या विविध युद्ध हत्यारांच्या सामुग्रीचा संग्रह आहे अकबराचा सेनापती राजा मानसिंहाची अकरा पौंडाची तलवार, जुनी चिलखते, जिरेटोप इतके जड आहेत की आज ते उचलण्यास कठीण, मग अंगावर परीधान करणे तर बाजूलाच राहिले ! वस्त्रागार विभागात उंची नक्षीदार जुने पर्शियन गालिचे, जुने भरजरी पोषाख आकर्षक-रीत्या मांडून ठेवले आहे पोथीखाना विभागात जुन्या हस्तलिखितांचा संग्रह आहे अकबरकालीन अबुलफजलने महाभारताचे उर्दूत केलेल्या भाषांतराचे पुस्तक 'रमझाना' येथे मौजूद होते राजा जयसिंहाच्या व्यक्तिगत पुस्तकालयातील नकाशे, चित्रे, खगोल शास्त्रावरील पुस्तके याचा तेथे संग्रह आहे म्युझियममधील जयपूर महाराजांचा पूर्ण उंचीचा फोटो आपण कुठल्याही दिशेने वाजूने उभे राहिलो तर आपल्याकडे टक लावून पहातो व फोटोतील पायाचे बूट आपल्याकडे वळलेले दिसतात हा राजबिंडा फोटो अप्रतिम आहे

राजवाड्याच्या उत्तरेला असलेले 'गोविंद देवजी' मंदिर आम्ही सायंकाळी सहाला आरतीच्या वेळी पाहिले जनतेसाठी मंदिराला अलग रस्ता आहे राजवाड्यातून राजपरिवाराला मूर्तीचे दर्शन होते पाय धुण्यासाठी

मंदिराभोवती स्वतंत्र नळाची योजना आहे मंदिरातील मूर्ती राजा सवाई जयसिंहाने औरंगजेबाच्या कचाट्यातून सोडवण्यासाठी मथुरेहून आणून येथे स्थापन केल्याची माहिती मिळाली

राजा सवाई जयसिंहाचा खगोल शास्त्राचा खास व्यासंग होता व तो त्यात तज्ज्ञ समजला जाई त्याने हिंदुस्थानात जयपूर, उज्जैन, दिल्ली, बनारस येथे वेधशाळा उभारल्या राजवाड्यानजीक असलेली 'जंतर मंतर' वेधशाळा तत्कालीन खगोल शास्त्राच्या प्रगत, शास्त्रशुद्ध अभ्यासाची कल्पना देते जयपूरची 'जंतर मंतर' वेधशाळा इतर वेधशाळांच्या तुलनेने अधिक मोठी व अद्ययावत् मानली जाते या वेधशाळेत जवळजवळ चौदा यंत्रे बसविली आहेत सूर्यचक्र, ध्रुवतारा दर्शक, राशीवलय, क्रांतिवृत्त, जयप्रकाश चक्रयंत्र इत्यादी अनेक भव्य उपकरणे आढळतात सूर्याच्या सावलीच्या अनुरोधाने स्थानिक वेळ मोजली जाते तेथील गाईडने स्थानिक वेळ काढून त्यावरून प्रमाणवेळ काढून दिली व आम्ही आमच्या घड्याळातील फरक दुरुस्त केला ! तीन शतकापूर्वी या प्रगल्भ शास्त्राचा अचूकपणे उपयोग करून घेणाऱ्या राजा सवाई जयसिंहाचे कौतुक वाटले तो खगोलशास्त्राच्या नव्या व जुन्या माहितीचा, मोगल व युरोपियन खगोलशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास करीत असे जयपूरचे जंतरमंतर राजा सवाई जयसिंहाच्या शास्त्रीय अभ्यासाचे चालते बोलते स्मारक आहे

जयपूरचा प्रसिद्ध महाल म्हणजे हवामहल ! अठराव्या शतकात महाराजा सवाई प्रतापसिंहाने बांधलेला हा पाच मजली गुलाबी दगडाचा महाल वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकृतीचा नमूना आहे महालाबाहेर डोकावणाऱ्या अर्ध अष्टकोनी एकावर एक असलेल्या अनेक खिडक्या, त्याच्या जाळ्या, कलात्मक मेघडंबरी, छत, खांब उत्कृष्ट शिल्पकृतीचे नमुने आहेत या खिडकीतून थंडगार झुळझुळणारा वारा राजपरिवाराला सुखवीत असे म्हणूनच याचे नाव 'हवामहल' असे ठेवले या अरुंद हवा महलाच्या गवाक्षातून स्वत लोकांना न दिसता रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुकी राज परिवाराला पहाता येतात आज तेथे असलेल्या सरकारी कचेऱ्यामुळे आतील भाग राजपरिवाराऐवजी पिवळ्या रंगाच्या कागदांच्या फाईलस्च्या गठ्ठ्यांनी भरला आहे ही गोष्ट अलग !

जयपूरच्या राजवाड्याजवळील एक अष्टकोनी स्तंभ लक्ष वेधून घेतो हा सात मजली स्तंभ महाराजा ईश्वरीसिंहाने आपला सावत्र भाऊ माधवसिंह यावर विजय मिळविल्याच्या प्रित्यर्थ उभारला आहे या आकर्षक स्तंभावर जाण्यासाठी गोलाकार जिना आहे

जयपूरच्या हमरस्त्यातून फेरफटका मारताना दोन्ही बाजूंना सारख्या उंचीची घरे, दुकाने दिसतात त्यांचे स्तंभ आणि फिकट गुलाबी रंग यामुळे या 'गुलाबी रंगाच्या' शहरावर प्रवासी आषक होतो। म्हणूनच जयपूर भारतातील 'गुलाबी नगर' (Pink City of India) म्हणून ओळखले जाते

शहराच्या बाजारात पायी फेरफटका मारून थोडीबहुत खरेदी केली जयपूर प्रसिद्ध आहे जयपूरी जोडे, राजस्थानी मेहंदी, सुवासिक अत्तर, भांड्यावरील नक्षीकाम इत्यादींसाठी।

शहराच्या मध्य वस्तीतील सुंदर शिल्प असलेल्या, तीन कमानी असलेल्या आकर्षक त्रिपोलिया गेटमधून बाहेर पडलो शहराच्या दक्षिणेला आग्रा, अजमेर रोडनजीक असलेल्या रामनिवास बागेत विविध पक्षी प्राण्यांचे संग्रहालय आहे बगीचाही रेखीव मांडणीचा आहे जयपूर शहराचे म्युझियम अल्बर्ट हॉल नावाने ओळखले जाते ही इमारत सुंदर व भव्य आहे पाच लक्ष रु खर्चून इ स १८७६–८७ मध्ये बांधली म्युझियममध्ये विविध हस्तीदंती वस्तू, लाकडावरील कोरीव काम, धातूच्या भांड्यांवरील नक्षीकाम विपुल आढळते खास उल्लेखनीय बाब म्हणजे उत्कृष्ट गालीच्याचा संग्रह। त्यात सोळाव्या शतकातील मिर्झा राजा जयसिंहाच्या २८'×१२'–६" लांबी-रुंदीच्या पर्शियन गालीच्याची जगातील काही जुन्या कलात्मक गालीच्यात गणना होते राजस्थानच्या कला, संस्कृती, ऐतिहासिक परंपरेची झलक दिसून आली

संपूर्ण दिवसभर जयपूर, आमेरचा पूर्ण फेरफटका मारून झाला होता शरीर थकले होते पण नेत्र सुखावले होते. रात्री साडेअकराच्या गाडीने या गुलाबी शहराचा निरोप घेतला त्यावेळी आंतरराष्ट्रीय कीर्तीचा जागतिक प्रवासी मॅक्सलेरनने ह्या सुंदर शहराचा साश्रुनयनांनी निरोप घेतल्यावेळी म्हटलेले वाक्य आठवले–' I have seen Jaipura and now I can die.'

☐

## आग्रा ताजचा की एतिमाद उद् दौलाचा ?

पहाटेची वेळ ! आग्रा स्टेशन यायला दोन तास अवधी होता डब्यामध्ये जयपूरपासून गर्दी होती त्यामुळे रात्रभर डोळ्याला डोळा लागला नव्हता डोळे किलकिले करून अर्धवट डुलक्या घेणे चालू होते तेवढ्यात डब्यात एक मजेशीर संवाद कानावर पडला एका मध्यम वयाच्या जाडजूड रुबाबदार प्रवाशाला शेजारचा तरुण प्रवासी विचारीत होता " बाबूजी आप कौनसे डिपार्टमेंटमे हो ? " " हम सुबह सुबह हमारे डिपार्टमेंटका नाम नही लेते ! " त्या जाडजूड प्रवाशाचे हे उद्गार ऐकून तो तरुण शेजारी चिकाटीने हळूच विचारता झाला—" बडा खतरनाक डिपार्टमेंट दिखता है बाबूजी आपका " आता वाटले की तो रुबाबदार प्रवासी चांगलाच तापणार ! परंतु तो काही उत्तर न देता गप्प बसला आणि भरतपूर जंक्शन आल्यावर उतरून चालता झाला जाता जाता तो उत्तरला " जेल डिपार्टमेंटमे जेलर हूँ जयपूरमें । ' तो उतरल्यावर डब्यात हास्याची एकच लकेर उमटली अजूनही त्या अनामिक जेलरचा उग्र मिशांचा चेहरा आठवला की हसणे आवरत नाही

भरतपूर स्टेशन आले तेव्हा सकाळचे सहा वाजले होते भरतपूरला भारतातील-विविध पक्षांचे अभयारण्य आहे प्लॅटफॉर्मवर लोकांना खापराच्या

कपात चहा पिताना पाहून कसेसेच वाटले उत्तर प्रदेशातील बऱ्याच स्टेशन वर चहा तसाच खापराच्या कपात मिळतो. चहा पिऊन झाल्यावर खापराचा कप फेकून द्यायचा झाले '

सकाळी आठ वाजता आग्रा फोर्ट स्टेशनमध्ये गाडी आली स्टेशनच्या समोरच भव्य लाल किल्ला दिसत होता स्टेशननजीक लॉजवर चांगल्यापैकी रूम मिळाली तेथे सामान लावून व स्नान, भोजन आटोपून दोन तास विश्रांती घेतली पडल्या पडल्या आग्र्याचा इतिहास आठवत होता महाभारतात आग्र्याचा उल्लेख अग्रबन असा आढळतो येथे कंसाचे कारागृह होते आर्य भारतात आल्यावर त्यांनी येथे वस्ती केली होती त्यावरून आर्यगृह, अग्रबन व पुढे आग्रा हे नाव पडले

यमुनेच्या काठी असलेल्या आग्रा शहराची शिकदर लोदीने प्रथम इ स १५०३ मध्ये राजधानी म्हणून निवड केली सम्राट अकबराने इ स १५५८ मध्ये आग्र्यात प्रवेश केला व आग्र्याच्या लाल किल्ल्याचे बांधकाम केले या किल्ल्यातच अकबर इ स १६०५ मध्ये मरण पावला अकबराचा नातू शहाजहानने आग्र्याहून दिल्लीला तख्त हलविल्यावर आग्र्याचे राजधानीचे शहर म्हणून महत्त्व कमी झाले पण येथील ऐतिहासिक जिवंत स्मारकानी आग्र्याचे महत्त्व कधीच कमी होऊ दिले नाही म्हणूनच येथे देशी विदेशी प्रवाशांची अव्याहत रीघ लागलेली असते

दुपारी दोनच्या सुमाराला टांगा ठरवून आम्ही आग्र्याचा प्रसिद्ध लाल किल्ला व ताजमहाल पहाण्यासाठी बाहेर पडलो रेल्वे लाईन ओलांडून टांगेवाल्याने प्रथम लाल किल्ल्याच्या प्रमुख प्रवेशद्वाराजवळ आणून सोडले आग्र्याचा हा लाल किल्ला मोगल सम्राट अकबरने आठ वर्षे खपून दोन किलोमीटर घेराचा व सुमारे सत्तर फूट उंचीचा, पस्तीस लक्ष रुपये खर्चून बांधला त्यात जहांगीर, शहाजहान व औरंगजेब यानी भर घातली किल्ल्याच्या भिंती मजबूत व भव्य आहेत व आजही किल्ला भरभक्कम वाटतो

किल्ल्याची दक्षिणेकडील गेट ' अमरसिंह गेट ' म्हणून ओळखली जाते शहाजहानचा खजिनदार सलाबतखान याच्या चुगलीमुळे जोधपूरच्या अमरसिंह राठोडवर भर दरबारात वार करण्यात आला जखमी झालेल्या अमर-

सिहाने याच गेटमधून भरधाव घोडा नेला व प्राण सोडला. अमरसिंहाच्या विधवा पत्नीने गेटच्या दगडावर डोके आपटून प्राण सोडला पुढे बादशहाला कळले की चुगलीत तथ्यांश नव्हता ज्या गेटमधून अमरसिंह बाहेर पडला ती गेट त्याचे स्मारक म्हणून 'अमरसिंह गेट' या नावाने ओळखली जाते धन्याला दु:खाने वेफामपणे नेणाऱ्या स्वामीभक्त घोड्याचाही एक दगडी पुतळा गेटवर कोरला आहे गाईडकडून हा इतिहास कळल्यावर अमरसिंहाच्या दुर्दैवाबद्दल खंत वाटली

लाल किल्ल्यातील प्रेक्षणीय महाल म्हणजे अकबराने बांधलेला 'जहागीर महाल' मोगल शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना समजला जातो २६० फूट लांबी व २८८ फूट रुंदी असलेल्या या भव्य महालामध्ये हिंदु शिल्पाचेही मिश्रण ठायी ठायी आढळते विशेषत: जोधाबाईचा महाल त्याच्या कमानी हिंदु पद्धतीच्या असून त्यावर कमळे कोरली आहेत सोनेरी पेंटींग हे या महालाचे वैशिष्ट्य भिंतीवर मोर, बदक, पोपट असे निरनिराळे पक्षी चितारलेले आहेत शहाजहानने बांधलेला 'खास महल' हा संपूर्ण पांढऱ्या संगमरवराचा मोगल शैलीचा आहे त्याचे अंगण प्रशस्त आहे अंगूरी बाग, संगमरवरी पदपाथ, कारंजी आकर्षक आहेत शीशमहलमध्ये आरशाच्या तुकड्यांचा कलात्मक उपयोग केला आहे

तेथील दोन खोल्यांचा उपयोग हमामखाना ऊर्फ शाही स्नानघर म्हणून केला जाई तेथील संगमरवरी टाक्या, कारंजी आकर्षक आहेत तेथूनच वॉटरगेट या दरवाज्यातून यमुना तीराकडे जाता येते यमुना नदी तेथे पश्चिम वाहिनी असल्याने अधिक पवित्र समजली जाते महाराणी जोधाबाई यमुनादर्शन घेतल्याशिवाय भोजन घेत नसे तिचा यमुना स्नानाला जाण्याचा मार्ग गाईडने दाखविल्यावर डोळ्यासमोर साक्षात् तो प्रसंग तरळला सध्या या मार्गाच्या शेवटी लोखंडी दरवाजा बसविला असल्याने हा मार्ग बंद आहे

जहांगीरने आपली प्रिय राणी नूरजहान हिच्यासाठी संगमरवराने बांधलेल्या जॅस्मिन बुरुज–सामन बुरुज मध्ये पूर्वी मौल्यवान हिरे, माणके, रत्ने बसविली होती व तो पूर्वी सोन्याने मढवलेला होता हा अष्टकोनी बुरुज नूरजहानने काढलेल्या नकाशाप्रमाणे बांधला होता तेथील महालात मध्यभागी सुशोभित कारंजी आहेत याच महालात आपल्या मुलाच्या–औरंगजेबाच्या

कैदेत असताना दूरवर दिसणाऱ्या ताजमहालकडे टक लावून पहात शहाजहानने शेवटचा श्वास सोडला ! जस्मिन बुरुजाच्या संगमरवरी खांबा-वर सध्या विशिष्ट कोन करून बसविलेल्या आरशाच्या तुकड्यात यमुने-काठचा ताजमहाल दिसतो पूर्वी तेथे असलेल्या हिऱ्याच्या तुकड्यातून दृष्टी अधू झालेला शहाजहान ताजमहाल न्याहाळीत असे, असे गाईड सांगत होता

'दिवाणे-खास' या महालात बादशहा सरदार, सेनापती, राजदूत यांच्याशी खाजगी सल्लामसलत, स्वागत करीत असे

'दिवाणे आम' खूप भव्य दोनशे फूट लांबीचा, साठ फूट रुंदीचा, चाळीस खांबावर आधारित असा असून त्या समोरील प्रांगणही विस्तीर्ण आहे दिवाणे-आम हा मूळचा तांबड्या दगडात बांधला असून त्यावर शुभ्र चक-चकीत प्लॅस्टर आहे अंतःपुरातील राण्यांना दरबार अवलोकनार्थ झरोका ठेवला असून तेथे संगमरवरी जाळ्या बसविलेल्या आहेत राजाचे सिंहासन संगमरवरी आहे त्यास पूर्वी चांदीचे रेलींग होते दिवाणे-आममध्ये भरलेल्या औरंगजेबाच्या दरबाराचे फ्रेंच प्रवासी बर्नियर याने यथार्थ वर्णन लिहून ठेवले आहे

दिवाणे-आममध्येच न्याय मागण्यासाठी धोबिणीने सोन्याची घंटा वाजवून जहांगीरकडे नूरजहान विरुद्ध कैफियत सादर केली एके दिवशी निशाण बाजीच्या खेळात नूरजहानच्या हातातील बंदुकीच्या गोळीने एक धोबी मरण पावला धोबीण आक्रोश करीत बादशहाजवळ आली व तिने न्यायाची याचना केली त्याच्या कसोटीची वेळ आली त्याने शांतपणे न्याय दिला की "तुझ्या पतीच्या मृत्यूला माझी पत्नी कारणीभूत आहे तेव्हा तुला झालेल्या तीव्र दुःखाचा स्वीकार आरोपी नूरजहानने करावा' त्यासाठी त्याने स्वतःचे मस्तक उडविण्याची सजा दिली म्हणजे तिला पती निधनानंतर होणाऱ्या दुःखाची कल्पना येईल अर्थात हा न्याय धोबिणीने मंजूर केला नाही

किल्ल्यात जहांगिरी महालसमोर पटांगणात पाच फूट उंचीचा पंचवीस फूट घेर असलेला एक भव्य असा अखंड दगडाचा कपासारखा दिसणारा हौद आहे त्याला आत उतरायला पायऱ्या आहेत ! हा 'जहांगिरी हौद' या नावाने ओळखला जातो या हौदामध्ये नूरजहान बादशहांच्या स्नानासाठी अत्तर मिश्रीत गुलाबजल तयार करीत असे

दिवाणे-खास समोर तख्ताचे छत आहे हा भाग मच्छीभवनाचे तख्त होय. तेथे शहाजहान वापरीत असलेले एक पांढरे संगमरवरी तख्त आहे दुसरे तख्त काळ्या संगमरवराचे अखंड दगडापासून बनवलेले, नक्षीकाम केलेले आहे ते जहांगीर वापरीत असे त्या काळ्या तख्तावर जहांगीर बसून प्राण्यांच्या झुंजी पहात असे इ स १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात या आसनावर एक तोफेचा गोळा पडून तो समोरच्या संगमरवरी महालाच्या कमानीवर पडल्याने कमानीला भोक पडून तडा गेला तसेच आसन एका बाजूला फुटले या दगडावर सोन्याची कसोटी घेता येते म्हणून तो 'कसोटी पत्थर' म्हणूनही ओळखला जातो फोटो काढण्यासाठी गाईडने या तख्तावर बसवून आम्हाला क्षणभर नामधारी 'राजे' बनविले दूरवरचा ताजमहालही फोटोत उतरला !

चितोडगडच्या पाडावानंतर अकबराने तेथून आणलेले दोन दरवाजे एका दालनात ठेवले आहेत अकरा फूट रुंदीच्या ब्राँझच्या या प्रचंड दरवाजावर नक्षीकाम केले आहे गाईड सांगत होता की, लॉर्ड कर्झनने मूळ दरवाजा विलायतेला नेला व मॉडेल म्हणून हा दरवाजा ठेवला एका दालनातील छताला एक कोपरा नवा कोरा, सोनेरी व रुपेरी नक्षीकामाने मढवलेला दिसला लॉर्ड कर्झनने पूर्वी हा भाग कसा दिसत असावा ही कल्पना यावी म्हणून मुद्दाम करवून घेतला !

सर्व किल्ला पाहून झाला होता परंतु शिवाजीमहाराजांना अडकवून ठेवलेली जागा पहायची राहिल्याने वेड्या मनाचे समाधान झाले नाही सध्या मिलिटरीच्या ताब्यात किल्ल्याचा बराचसा भाग आहे त्यातील वीटाचुन्याने बंद केलेली 'ऐतिहासिक कोठी' दुरुनच पाहून समाधान पावलो

किल्ल्यातून बाहेर पडताना नजरेसमोर तरळत होता कपटी शहेनशहा आलमगीर औरंगजेब दिसत होते संतापाने लाल झालेले करारी शिवाजी महाराज व निरागस बाल संभाजी राजे ! आणखी दिसत होती यमुना स्नानाला निघालेली जोधाबाई ! दिसत होता खिन्न मनाने अश्रु ढाळणारा शहाजहान बादशहा ! दिसत होती कबुतरे उडवीत बसलेली लावण्यलतिका नूरजहान, तख्तावर बसलेला जहांगीर व न्यायासाठी दिवाणे-आममधील

सोन्याची घटा वाजविणारी थोबीण ! दिसत होता जायबंदी होऊन बेफाम पणे घोड्यावर बसून गेटमधून जाणारा अमरसिंह राठोड ! आणि त्याच 'अमरसिंह गेट 'मधून आम्ही ताजमहालाकडे निघालो होतो

सध्याकाळची पाचची वेळ झाली होती ईदचा दिवस होता ताजमहालकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रवाशाची नुसती रीघ लागली होती

मुमताजमहाल ही ताजमहालच्या कथानकाची नायिका जहांगीरची लावण्यवती राणी नूरजहान हिचा भाऊ सरदार आसफखान याची अर्जुमदबानू बेगम उर्फ मुमताज ही मुलगी वयाच्या १९ व्या वर्षी तिचे राजपुत्र खुर्रम् उर्फ शहाजहान बादशहा याजबरोबर लग्न झाले शहाजहान इ स १६२८ साली तख्तावर बसला आणि दुसऱ्याच वर्षी दख्खनच्या बडाचा उपशम करण्यासाठी तो आला असता त्याच्याबरोबर असलेल्या मुमताजमहलचा बऱ्हाणपूर येथे इ स १६२९ मध्ये चौदाव्या अपत्याच्या जन्माच्या वेळी मृत्यु झाला मृत्युपूर्वी तिने शहाजहानकडून असे वचन घेतले की त्याने तिच्यावर केलेल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून ज्याला आख्या दुनियेत तोड नसेल असे अप्रतिम स्मारक बाधावे

तिच्या मृत्यूच्या वेळचे शहाजहानचे दु:ख काय वर्णावे ! कित्येक दिवस त्याने राजदरबारी लोकांना भेटायचे नाकारले त्याचे केस थोड्या दिवसातच रुपेरी दिसू लागले मुमताजचे शव तात्पुरते बऱ्हाणपूर येथील झेनाबाद बगिच्यात ठेवले होते दोन वर्षानतर दख्खनची मोहीम यशस्वी करून पण आपली प्रिया गमावून शहाजखान आग्र्याला परतला

यमुनेकाठची जागा ताजमहालसाठी नक्की करण्यात आली देश-विदेशातून निरनिराळी डिझाईन्स मागविण्यात आली पुष्कळ डिझाईन्समधून शहाजहानने मूळचा हिंदुस्थानचा व नतर तुर्कस्तानचा रहिवासी असलेल्या उस्ताद इसाखान याचे डिझाईन पसत केले. इ स १६३२ ते १६५४ अशी बावीस वर्षे दररोज एकवीस हजार माणसानी खपून ताजची उभारणी केली कारागिराच्या वसाहतीसाठी नजीकच मुमताजाबाद—ताजगज नावाचे गाव वसविले गेले ताजमहालच्या खर्चाचा किमान आकडा सहा कोटी रुपये आहे देशोविदेशीचे नामांकित शिल्पकार, गवडी, कलाकार यांना पाचारण करण्यात आले होते त्यात पर्शिया, तुर्की, अरेबियाचे कारागीर होते जयपूरजवळील

मकराना येथील शुभ्र संगमरवरी दगडाचा मुबलक वापर करण्यात आला तेजाळणारे नामांकित हिरे, रत्ने हिंदुस्थानातील विविध भागातून, हिमालयाच्या बाजूच्या भागातूनच केवळ नव्हे तर पर्शिया अफगाणिस्तान इत्यादि जगाच्या कानाकोपऱ्यातून आणून बसविले गेले

पाहतापाहता आम्ही ताजच्या शंभर फूटी उंचीच्या भव्य अशा प्रवेशद्वाराजवळ आलो तांबड्या दगडाचा वापर केलेले प्रवेशद्वार आतील ताजमहालच्या भव्यतेला शोभेसेच आहे या द्वाराचे विशेष म्हणजे त्यावर कोरलेली कुराणातील वचने ! ऐंशी फूट उंचीवरील अक्षरे व सर्वात खालील डोळ्याच्या पातळीसमोरील वचने एकाच आकाराची, रुंदीची दिसतात वरील अक्षरे सर्वात मोठी, त्यानंतर लहान, लहान अशारीतीने अक्षरे कोरली आहेत वाचणाऱ्याला सर्व अक्षरे सारख्याच उंचीची दिसतात ! मूळ प्रवेशद्वार पूर्वी चांदीचे होते सुमारे सव्वा लाख किंमतीचा तो दरवाजा भरतपूरच्या जाटाच्या आक्रमणात लुटला गेला अशी माहिती मिळाली

ताजचे संपूर्ण प्रांगण भव्य असे १९००×१००० फूट लांब रुंद आहे त्यातील मधला बगीचा सुमारे हजार फूट लांबीचा चौकोनी आहे बगीचा दोन रांगात असून मध्ये पाण्याच्या शुभ्र संगमरवरी टाक्या, कारंजी आहेत नंतर ताजमहाल ज्यावर उभा आहे असा तांबड्या दगडानी बनविलेला प्रमुख चबुतरा आहे त्यावर पांढरा शुभ्र संगमरवरी चौकोनी चबुतरा असून बाजूच्या दोन जिन्यानी संगमरवरी पायऱ्या चढून गेल्यावर दिमाखाने उभा असलेला ताज एकदम दिसतो ताजचा मुख्य मकबरा १८६ फूट लांबीरुंदीचा चौकोनी आहे चारही कोपरे वळविल्यामुळे ताजमहाल चार मोठ्या बाजू व चार लहान बाजू असलेला अष्टकोनी आहे ताज उभा असलेल्या संगमरवरी शुभ्र चबुतऱ्यावर अष्टकोनी एकशे चाळीस फूट उंचीचे आतमध्ये गोलाकार जिना असलेले संगमरवरी मिनार आहेत

ताजच्या प्रवेश कमानीच्या आत दोन्ही बाजूला कुराणातील वचने अशा रीतीने कोरली आहेत की सर्वात उंचीवरील अक्षरे व सर्वात खालील अक्षरे एकाच रुंदीची दिसतात

ताजमहालचे दुसरे एक वैशिष्ट्य त्याच्या पन्नास फूट व्यासाच्या व तीस फूट उंचीच्या घुमटात आहे ! त्यावर पूर्वी सोन्याचा कळस होता निळ्या

आकाशाला गवसणी घालणारा हा संगमरवरी घुमट अद्वितीय असा आहे या भव्य कळसाची उंची बगीच्याच्या फूटपाथपासून अडीचशे फूट आहे

ताजमधील अष्टकोनी उत्कृष्ट, कलात्मक, अखंड, नाजूक संगमरवरी जाळीच्या आत चौकोनी चबुतऱ्यावर कबर आहे मुमताज महलची कबर घुमटाच्या बरोबर मध्यबिंदूखाली आहे व शहाजहानची बाजूला आहे मुमताजच्या व शहाजहानच्या कबरीवर उत्कृष्ट नक्षीकाम असून कुराणातील वचने कोरलेली आहेत तसेच दोघांच्या अनुक्रमे इ स १६२९, १६६६ या मृत्यूच्या वर्षांची नोंद आहे वरील कबरीखाली खऱ्या अस्सल कबरी तळ-मजल्यात असून तेथे जाण्यासाठी उताराचा मार्ग आहे

शहाजहानची आणखी एक कल्पना होती की यमुनेच्या पैलतीरी काळ्या संगमरवरी दगडाने स्वत साठी कबर बांधायची त्याप्रमाणे त्याने सुरू केलेल्या कामाचे अवशेष आजही पैलतीरी यमुनेकाठी आढळतात ती स्वतची कबर व मुमताजची ताजमधील कबर एका भव्य संगमरवरी सेतूने जोडायची अदाजे दहा कोटी रुपये खर्चाची ही योजना होती शहाजहानच्या दुर्दैवाने त्याला त्याच्या मुलाने औरंगजेबाने कैदेत ठेवल्यामुळे ही भव्य कल्पना मूर्त स्वरूपात येण्याऐवजी बारगळली ताजमहालच्या सौंदर्यात अधिक भर पाडणाऱ्या या कल्पनेला जग मुकले हे दुर्दैव ! मुमताजची कबर घुमटाच्या मध्यबिंदूखाली असून शहाजहानची काही अतरावर आहे त्याने जर अगोदरच ठरविले असते की स्वत लाही ताजमध्ये दफन करायचे तर मध्यबिंदूपासून समान अतरावर आखणी करून मुमताजची कबर तयार केली असती ! पण तसे दिसत नाही

ताज बाधून झाल्यावर काही वर्षांनतर इ स १६६६ मध्ये आग्र्याच्या लाल किल्ल्यात ताजकडे टक लावून पहात शहाजहानने लाडक्या मुलीच्या जहाआराच्या बाहूत शेवटचा श्वास सोडला दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचा मृत देह घाईघाईत साधेपणाने होडीत घालून यमुना नदीतून ताजमहालच्या काठावर आणण्यात आला त्याच्या मृत देहाला शाही दफनाचा मान मिळू नये यापेक्षा त्याचे आणखी काय दुर्दैव असणार ! एकोणीस वर्षांच्या वैवाहिक जीवनानतर ३६ वर्षांची ताटातूट झालेल्या त्याच्या चिरनिद्रीत लाडक्या राणीच्या शेजारी त्याचे चिरनिद्रेसाठी दफन करण्यात आले

ताजमहालची रचना शिल्पकाराने अशा कौशल्याने केली आहे की त्याच्या भव्यपणाला समोरील भव्य प्रागण, बगीचा यांनी उठाव यावा पाहुणाऱ्याला विशिष्ट अंतरावरून शुभ्र सगमरवरी ताज एकदम दिसावा अशीच त्याची आखणी केलेली आहे ताजमहालचे खरे वैशिष्ट्य नैसर्गिक जागेच्या अचूक निवडीत आहे यमुना काठच्या या रम्य जागेइतकी दुसरी कुठलीही भूमी त्याच्या भव्यतेसाठी अपुरी पडली असती

ताजमहाल केव्हाही न्याहाळा त्याचे अद्वितीय सौन्दर्य नेहमीच तजेलदार दिसते पहाटेच्या प्रकाशात सौम्य धूसर ताबूस रगात न्हाऊन निघणारा ! सध्याकाळी तेज पुज निळ्या लोलकासारखा दिसणारा–स्वयप्रकाशी ! आणि चद्रप्रकाशात–शीतल, आल्हाददायक, शोभिवत तेजस्वी ! कोजागिरी पौर्णिमा एकच आठवड्याने होती त्या रात्री चद्र किरणाच्या वर्षावातील ताज आपल्याला पाहता येणार नाही यामुळे रुखरुख लागली अधार पडू लागला होता टाग्यात बसून मोठ्या तृप्त मनाने लॉजकडे परत निघालो होतो नजरेसमोर नाचत होते शुभ्र सगमरवरी स्वप्न ताज ! आणि ताज ! !

आग्र्यातील दुसरा दिवस राहिलेली ऐतिहासिक स्मारके पाहून दुपारी फत्तेपूर सिक्रीला जायचे होते सकाळी टागा ठरवून 'सिकदरा' कडे मोर्चा वळविला सिकदरा गावी हा अकबराचा मकबरा आग्रा-दिल्ली रस्त्यावर आग्र्यापासून नऊ कि मी अतरावर आहे

खरे म्हणजे अकबराची जन्म कहाणी किती हृदयस्पर्शी आहे पराभूत झालेला हुमायून बादशहा दिल्ली सोडून आश्रयासाठी रानोमाळ हिंडत होता आज येथे तर उद्या तेथे असा त्याचा मुक्काम असे बरोबर थोडे नोकर चाकर होते, राणी हमीदाबानू होती ती गर्भवती होती प्रवासात तिचा कसा निभाव लागणार या विवचनेत बादशहा होता सिंध प्रातात मुक्काम असताना हमीदाबानू प्रसूत होऊन मुलगा झाला बादशहाला मुलगा झाला म्हणजे केवढा मोठा उत्सव करावयास हवा निराधार बादशहाला मुलगा झाल्याची बातमी प्रथम ज्या नोकराने सांगितली त्याला बक्षीस द्यायला कफल्लक हुमायूनजवळ काही नव्हते शेवटी आठवण होऊन त्याने जवळील कस्तुरीची डबी बाहेर काढली व तिच्यातील कस्तुरीची चिमूट नोकराला देत तो म्हणाला 'या कस्तुरीप्रमाणे मुलाच्या कीर्तीचा सुगध सगळीकडे पसरू दे !'

मोगल सम्राट अकबराच्या पन्नास वर्षांच्या कृतार्थ राजकीय जीवनाचा पूर्णविराम म्हणजे हा मकबरा !

अकबराने आपल्या जिवतपणीच हा मकबरा बांधायला सुरुवात केली व जहांगीरने तो पूर्ण केला एकशेवीस एकराच्या भव्य क्षेत्रात पधरा लक्ष रु. खर्चून चौदा वर्षे खपून बांधलेला हा मकबरा मोगल शिल्पकृतीचा खास नमुना आहे प्रवेशद्वार तांबड्या दगडाचे असून वर भव्य कमान आहे त्यावर नौबत खाना असून छतावर चार संगमरवरी मिनार आहेत

चौथरा ३२० फूट लांबी रुंदीचा चौकोनी, भव्य पिरॅमिडसारखा आहे. पहिले तीन टप्पे तांबड्या दगडातील असून वरचा संगमरवरी आहे अकबराच्या खऱ्या कबरीच्या खोलीतील छत आकर्षक आहे तेथील छत पूर्वी सोन्या चांदीने मढविलेले, कोहिनूर हिरा बसविलेले होते असे म्हणतात जाटांनी ही कबर लुटली होती या कबरीचे एक वैशिष्ट्य असे आहे की अकबराचा देह मक्केच्या दिशेला न पुरता उगवत्या सूर्याकडे डोळे असलेल्या स्थितीत ठेवण्यात येऊन दफन करण्यात आला, कारण सूर्य हा दिने इलाही या अकबराने सुरू केलेल्या पंथाचा मुख्य घटक होता अकबर आग्र्याच्या लाल किल्ल्यात मरण पावल्यावर तो सिकंदरा येथे चिरनिद्रा घेत असलेले हे ऐतिहासिक स्मारक, शांत वातावरणात, आकर्षक बगीचाच्या पार्श्वभूमीवर मनावर परिणाम करून जाते

ताजमहाल इतकी ख्याती नसलेल्या पण ताजमहालपेक्षा शिल्पकृतीत काकणभर सरस असलेल्या एतिमाद-उद-दौल या नूरजहान राणीच्या पित्याचा मकबरा पहायला यमुनेवरील प्रचंड पूल ओलांडून जावे लागते

नूरजहान राणीच्या जन्माची हकीकत एखाद्या कथा कादंबरीला लाजवील अशी विलक्षण आहे नूरजहानचा पिता धियासबेग हा इराणमधील तेहरानच्या एका सरदाराचा मुलगा पित्याच्या मृत्यूनंतर नशीब काढण्यासाठी म्हणून तो हिंदुस्थानात मोठे वाळवंट ओलांडून आला जवळपासची पुंजी संपलेली आहे, खायला, प्यायला, खर्चाला पैसे नाहीत, भुकेने व्याकूळ झाला आहे, अशा विमनस्क परिस्थितीत त्याच्या गरोदर पत्नीने एका मुलीला जन्म दिला हाल अपेष्टांच्या परिस्थितीला कंटाळून आवेगाने तिने या नवजात अर्भकाला झुडुपात टाकून दिले टाहो फोडणाऱ्या अर्भकाला एका वाटसरूने उचलून परत

व्यथित अंतःकरणाच्या आई-वडीलांच्या हवाली केली ही नवजात मुलगी म्हणजेच मेहरून्निसा (सूर्य स्त्री). जहांगीरबरोबर विवाह झाल्यावर हीच लावण्यालतिका नूरजहान (जगत्प्रभा) म्हणून ओळखली जाऊ लागली. तिनेच आपल्या पित्याचा हा मकबरा बांधला.

पुढे सम्राट अकबराच्या दरबारी मिर्झा घियासबेगची वरच्या जागेवर नेमणूक झाली, अकबराचा विषयासक्त राजपुत्र सलीम ऊर्फ जहांगीरची नजर लावण्यवती नूरजहानवर गेल्यावर तिची त्याजपासून सुटका करण्यासाठी अकबराने बरद्वानचा सुभेदार शेर अफगाणबरोबर तिचे लग्न लावून तिला तिकडे पाठवून दिले. अकबराच्या मृत्यूनंतर जहांगीर गादीवर आल्यानंतर त्याने शेर अफगाणला कपटाने ठार मारले व नूरजहानला तिच्या आईच्या समवेत आग्र्याला आणले. सहा वर्षेपर्यंत चाललेल्या जहांगीरच्या प्रियाराधनाला यश आले. जहांगीरशी लग्न करून नूरजहान त्याची सर्वात लाडकी राणी बनली.

जहांगीरने नूरजहानच्या पित्याला-मिर्झा घियासबेगला राज्याचे मुख्य खजिनदार बनविले, एकदा घियासबेगविरुद्ध तक्रार गेली की तो खजिन्यातील रक्कम आपल्या मूळ गावी इराणला नेतो. जहांगीरने जेव्हा त्याची समक्ष शहानिशा करण्यासाठी मोजदाद केली तेव्हा खजिन्यात रक्कम बरोबर आढळली. तेव्हा जहांगीरने मिर्झा घियासबेगला एतिमाद-उद दौला (विश्वासाचे प्रतीक) हा किताब बहाल केला.

नूरजहानने सहा वर्षे खपून बांधलेला पित्याचा मकबरा एतिमाद-उद दौला या नावाने ओळखला जातो. नूरजहानने काढलेल्या नकाशाबरहुकूम सत्तर फूट चौरस मापाचा हा दुमजली मकबरा खर्चाची पर्वा न करता तिच्या मार्गदर्शनाखाली बांधण्यात आला. मोगल शैलीच्या परंपरागत भव्य आकारावर भर देण्यापेक्षा या मकबऱ्यात कलात्मक दृष्टीवर भर देण्यात आला आहे. शुभ्र निर्मळ अशा संगमरवरी कबरीत नाजूक, रंगीत संगमरवरी पुष्पे, वेली, फळे, बेलबुट्या, चौकोन, पंचकोन, षटकोन इत्यादी आकृत्या, अखंड संगमरवरी जाळ्या यांचा मनमोहक संगम झाला आहे. नक्षीकाम करताना पांढऱ्या संगमरवराच्या खाचेत विविध रंगाचे संगमरवरी तुकडे चपखलपणे बसविले आहेत. यावरून नूरजहानच्या व्यक्तिगत कलात्मक दृष्टीची कल्पना येते.

जहांगीरची ख्याती आहे त्याच्या मद्यासक्तीबद्दल नूरजहान ते कसे विसरणार ? नूरजहानने या मकबऱ्यावर रंगीबेरंगी बेलपट्ट्याशिवाय सुरईही हुबेहूब कोरून घेतली आहे । नूरजहान ही एक लावण्यवती स्त्री तर होतीच पण कलात्मक दृष्टी असलेली कुशल रचनाकारही होती


हा मकबरा म्हणजे नूरजहानच्या सृजनशील व्यक्तिमत्त्वाचा व सौंदर्य भोक्त्या दृष्टीचा अपूर्व संगम आहे या मकबऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे मोगल शिल्पातील परंपरागत घुमटाचा त्यात अभाव आहे बाजूचे अष्टकोनी स्तंभ मूळ मकबऱ्याशी संलग्न असे असल्याने नक्षीकाम देखणे दिसते त्यामुळे सर्व मकबरा एकजिनसी दिसतो ताजमहालमध्ये असलेल्या चार कोपऱ्यातील स्वतंत्र मिनारांमुळे एकजिनसीपणाचा अभाव आहे

मकबऱ्याच्या आतमध्ये नूरजहानच्या पित्याची व आईची कबर आहे तपकीरी पिंगट रंगाचा इटालियन आजही चमकतो ! शिवाय तिच्या मानलेल्या पित्याची-ज्याने तिला उचलून आई वडीलांच्या हवाली केले होते त्याचीही कबर आहे आपल्या पित्याच्या मकबऱ्यात त्याला स्थान देऊन नूरजहानने त्याचे अशंत ऋण फेडले । त्याशिवाय तिच्या भावाच्या कबरी व नूरजहानला पहिल्या नवऱ्यापासून-शेर अफगाणपासून झालेल्या मुलीचीही कबर आहे कृतज्ञ भावनेने आपल्या सर्व आप्तांना या मकबऱ्यात चिरनिद्रा दिली त्या नूरजहानची धन्य आहे

आजूबाजूचा बगीचा, टाक्या, कारंजी, आकर्षक प्रवेशद्वार मकबऱ्याच्या सौंदर्यात भर टाकतात दागिन्याच्या सुबक पेटीसारख्या अप्रतिम कलेने भरलेल्या एतिमाद-उद-दौलाचे सौंदर्य ह्यांनी प्रवासाला निघण्यापूर्वी नगरला जेव्हा समजावून सांगितले तेव्हा कळले नव्हते पाहिल्यावर प्रचिती आली होती । या मनोहारी मकबऱ्याच्या निर्मातीची-सौंदर्यवती नूरजहानचा व तिच्या जोडीदाराचा-जहांगीरचा मकबराही अशाच कलावैभवाने नटलेला असेल नाही? या उत्कंठेने माहिती विचारल्यावर कळले की, नूरजहानच्या मृत्यूनंतर तिच्या अंतिम इच्छेनुसार तिला अगदी सामान्य माणसाप्रमाणे लाहोरला रावी नदीच्या काठी दफन केले गेले व तेथे अत्यंत साधा मकबरा उभारला त्यावर एक उर्दू शेर कोरला आहे त्याचा मथितार्थ असा आहे



अबर-आमेर किला, जयपुर
एतिमाद्-उद् दौला, आग्रा अतभाग





नूरजहानच्या कलात्मक दृष्टीचा आविष्कार - एतिमाद् - उद् - दौला, आग्रा

"एकान्तमे बनी इस कब्रपर
कोई गुलाब न उगाए जाए।
कोई बुलबुल न गाए
कोई दीया न जलाए,
कोई पतगा न फडफडाए।"

जहांगीरचा मृत्यू काश्मीरहून दिल्लीकडे परतताना वाटेत झाला त्याच्या सकबऱ्यावर नूरजहानने खालील शब्द कोरून ठेवले

"हरी घासके सिवाय यहाँ कुछ न हो,
क्यों कि यह एक नश्वर निरीह प्राणीकी कब्र है,
और सदा कबही रहेगी।"

वरील माहिती ऐकून नूरजहानच्या काव्यात्म अतःकरणाची कल्पना आली एतिमाद् उद दौला पाहून दयाल बागेतील मदिराकडे वळलो.

दयाल बागेत पजाबकडील राधास्वामी सप्रदायाच्या मार्गदर्शनाखाली या अनेक मजली सगमरवरी मंदिराचे काम सुमारे सत्तर वर्षापूर्वी सुरू झाले त्यावेळच्या कारागिरांची मुले आज वयस्कर झाली असून त्याची मुलेही छिन्नी हातोडी घेऊन त्यांना मदत करीत आहेत थोडक्यात पिढ्यान् पिढ्या चालणारे हे एक अखंड काम आहे सध्या कारागिरांची तिसरी पिढी काम करते आहे आमचा चिमुकला उदय मोठा होईपर्यंत या मदिराचे बाधकाम पुरे होईल अशी आम्ही मनात आशा धरली.

या मदिराचा बराचसा भाग बांधल्यावर तो पसत न पडल्याने परत पाडण्यात आला होता अशी माहिती येथे मिळाली सध्या मदिराच्या तळमजल्याचे वरील एका मजल्याचे काम पूर्ण झाले आहे तळ मजल्यात नियोजित मदिराचे सपूर्ण दृश्य दाखविणारे रेखाचित्र लावले आहे त्यावरून त्याच्या भव्यतेची कल्पना आली मदिराजवळ उच उच सगमरवरी खाब घडवायचे काम चालू होते तसेच गोलाकार खाब कापण्याचेही काम चालू होते निरनिराळ्या कामासाठी स्वतत्र वर्कशॉपही आहे या नव्या शिल्पकृतीचे काम अप्रतिम करण्याचा सयोजकाचा प्रयत्न आहे पूर्ण झाल्यावर हे मदिर कसे दिसेल याचे चित्र रगवीत आम्ही दयाल बागेचा निरोप घेतला

□

# कहाणी लाल पत्थरांची–फत्तेपूर शिक्री

आग्र्यापासून फक्त चाळीस कि मी अतर असलेल्या फत्तेपूर शिक्रीला बस अथवा रेल्वेने जाता येते दुपारी दोनला बसने निघून तासाभरातच फत्तेपूरला पोहोचलो ऑक्टोबर महिन्याच्या उष्णतेने बस तापून निघाली होती. गावात शिरता शिरता लाल पत्थरांनी स्वागत केले।

शिक्रीच्या परिसरात मोगल बादशहा बाबर याने राजपूत राणा सगाचा इ स १५२७ च्या युद्धात पराभव केल्याने मोगलांची शिक्रीत फत्तेह झाली तेव्हापासून शिक्रीचे नाव फत्तेपूर शिक्री पडले

फत्तेपूर शिक्री म्हणजे मोगल सम्राट अकबराच्या साकारलेल्या वैभवशाली स्वप्नाचे प्रतीक आहे त्याने इ स १५६९ मध्ये प्रथम फत्तेपूर शिक्रीला भेट दिली त्यावेळी तेथील शेख सलीम चिस्ती या मुसलमान साधूची ख्याती अकबराच्या कानावर पोहोचली होतीच वयाच्या २७ व्या वर्षापर्यंत एकही मुलगा न जगल्याने निःसतान असलेला अकबर दुःखी होता तेव्हा शेख सलीम चिस्ती या सताचे दर्शन घेऊन अकबराने आशीर्वादाची प्रार्थना केली अकबराच्या इच्छेप्रमाणे गुरुकृपा होऊन त्याची राणी गरोदर राहिली अकबराने लगेच शिक्रीला रगमहल नावाचा महाल राणीच्या वास्तव्यासाठी बांधला

तेथे १५७० मध्ये राजपुत्र सलीमचा (जहांगीर) जन्म झाला त्यावेळी अकबराला अवर्णनीय आनंद झाला व त्याने अगणित दानधर्म केला कैद्याची सुटका केली राजपुत्राचे नाव त्याने गुरूचा प्रसाद म्हणून सलीम असे ठेवले टोपण नाव 'शेखुबाबा' ठेवले असे म्हणतात की, शेख सलीम चिस्तीने स्वत च्या सहा महिन्याच्या बालेसियाँ या मुलाच्या आत्म्याचा त्याग करून अकबराच्या मुलाच्या रूपाने त्याला सचेतन केले! गुरूच्या स्मरणार्थ अकबराने हे शहर वसवायचे ठरवून केवळ पाच वर्षाच्या अल्पावधीत हे नवे शहर वसवले व आग्र्याहून राजधानी फत्तेपूर शिक्रीला हलविली फत्तेपूर शिक्री टेकडीच्या कडेला असून तीन बाजूंना तट आहेत व चौथ्या बाजूला तळे आहे फत्तेपूर शिक्रीला तांबडा दगड विपुल आहे बहुतेक सर्व महाल तांबड्या दगडातील आहेत

फत्तेपूर शिक्रीने अकरा वर्षे राजधानीचे वैभव उपभोगल्यानंतर पाण्याच्या अभावाने राजधानीचे परत आग्र्याला स्थलांतर झाले काहींच्या मते राज्यकारभाराच्या दृष्टीने माझ्या भजनी येथे न लागता आग्र्याला राहणे उचित असा सल्ला गुरु शेख सलीम चिस्तीने दिल्यामुळे अकबर परत आग्र्याला गेला. चुणचुणीत पोरसवदा गाईड उर्दू मिश्रित हिंदी भाषेत फत्तेपूर शिक्रीचा इतिहास डोळ्यासमोर उभा करीत होता

जगप्रसिद्ध बुलंद दरवाजाच्या पायऱ्या चढताना त्याच्या भव्यतेची कल्पना येत होती इ स १६०२ मध्ये अकबराने दख्खन प्रदेशावर मिळविलेल्या विजयाचे प्रतीक म्हणून बुलंद दरवाजा उभारला केवळ हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगातील उंच दरवाज्यात त्याची गणना होते तळपायरीपासून त्याची उंची १७६ फूट आहे तर चौथऱ्यापासून १३४ फूट आहे त्यावर अरेबिक भाषेत दख्खन व खानदेश विजयाची नोंद कोरली आहे हा बुलंद दरवाजा जणू जोम, शक्ती, शौर्य सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे या प्रवेशद्वारावरील छोट्या छोट्या घुमटाची रांग तांबड्या भिंतीच्या प्रचंड विस्तारावर एका रांगेत पक्षी बसावेत तशी दिसत होती.

बुलंद दरवाजातून प्रवेश केला सुमारे पाच लाख रुपये खर्च करून बांधलेल्या विस्तीर्ण जामा मशिदीत तीन दालने असून एक दालन संपूर्णत हिंदू पद्धतीचे आहे जामा मशिदीचे प्रांगण भव्य आहे


अकबर दररोज मशिदीतून राजवाड्याकडे परतत असे त्या पूर्वेकडच्या दरवाजाला 'अकबरी ' दरवाजा म्हणतात. दुसरा दरवाजा म्हणजे बुलंद दरवाजा

शेख सलीम चिस्तीचा मकबरा ही फत्तेपूर शिक्रीमधील खास उल्लेखनीय अशी वास्तू होय तांबड्या दगडांनी घडविलेल्या फत्तेपूर शिक्रीतील पांढऱ्या शुभ्र मोत्यासारखी चमचमणारी एवढी एकच संगमरवरी वास्तू आहे केवळ ४८ फूट चौरस आकाराचा लहान घुमटधारी असा हा मकबरा संगमरवरी असल्याने एखाद्या कोरलेल्या हस्तीदंती कलात्मक दागिन्यांच्या पेटीसारखा नाजूक दिसतो या मकबऱ्याला खरी शोभा आणली आहे चारी बाजूला असलेल्या नाजूक संगमरवरी अखंड जाळ्यांनी, बाहेरील प्रकाश किरणे आतमध्ये हळूवारपणे जाळ्यातून प्रवेश करतात प्रवेशद्वारी नागमोडी ब्रॅकेट असलेले संगमरवरी स्तंभ आकर्षक आहेत शेख सलीम चिस्ती यांची कबर भरजरी वस्त्राखाली झाकलेली असून त्यावर शिसवी लाकडाची आकर्षक मखर चमकणाऱ्या शंख, मोती, शिंपल्याच्या भौमितीक आकारांनी सजविली आहे कबरीभोवतीच्या नाजूक संगमरवरी जाळीला हिंदु मुस्लिम निपुत्रिक भाविक स्त्रिया गंडा बांधून पुत्रप्राप्तीसाठी नवस करतात

प्रतिवर्षी तेथे रमझान ईदला यात्रा भरते कव्वालीचाही कार्यक्रम होतो आम्ही गेलो तो ईदचा दुसरा दिवस होता तेथे मुस्लिम स्त्री-पुरुषांची चिक्कार गर्दी होती या मकबऱ्या शेजारीच जहांगीरचा बंगालचा सुभेदार इस्लामखान (शेख सलीम चिस्तीचा नातू) याचा तांबड्या दगडातील मकबरा आहे या मकबऱ्याच्या दाराची झडपही अखंड दगडाची आहे हे एक वैशिष्ट्य आहे हाताने वाजविल्यावर झडपेचा खणखणीत आवाज आला मकबऱ्याभोवती प्रशस्त व्हरांडा व जाळी बसविलेली आहे

फत्तेपूर शिक्रीमधील सर्वात मोठा महाल म्हणजे जोधाबाईचा महाल. मोठे प्रांगण असलेल्या या तांबड्या दगडाने बांधलेल्या महालात ठायी ठायी हिंदू शिल्पकृतीचा आविष्कार दिसून येतो महालाच्या महिरपीत कमलपुष्पे, घंटा कोरल्या आहेत पटांगणात तुळशी वृंदावन पाहून जोधाबाईच्या धार्मिकतेची कल्पना आली आतील भागात हिंदू देवतांच्या मूर्तींचे कोनाडे आढळतात

फत्तेपूर शिक्रीमधील आगळ्या शैलीची वास्तू म्हणजे दिवाणे–खास सकृत्-दर्शनी दिवाणे-खास दुमजली दिसतो प्रत्यक्षात तो एक मजली आहे इमारतीच्या अर्ध्या उंचीवर–बारा फूटावर गॅलरी भितीच्या आतील बाजूला सभोवार ब्रॅकेटस्‌च्या आधारावर पेललेली आहे जाड रुंदीच्या भितीतील दोन जिन्यांच्या मार्गाने या गॅलरीत जाता येते या खांबाचा माथ्याचा भाग हिंदू पद्धतीच्या उत्कृष्ट शिल्पाने कमळे कोरून सजलेला आहे एका खांबावर आधारित म्हणून 'एकखंबा' नावानेही हे दालन प्रसिद्ध आहे खांबाच्या मध्यभागाच्या गोलाकार माथ्याभोवती व बाजूच्या चारही कोपऱ्यांना जोडणाऱ्या नाजूक सेतूच्या दोन्ही बाजूला उत्तम दगडी जाळयांचे कठडे बसविले



आहेत सम्राट अकबर खांबावरील गोलाकार तक्तावर बसत असे चारही कोपऱ्यात बसणारे मंत्री सल्लामसलत करीत असत चतुर्मुख ब्रह्मदेव आसनस्थ होऊन चारी बाजूला बसलेल्या विष्णु महेशादी देवांबरोबर विचारविनिमय करी या हिंदू धर्मांतील कल्पनेच्या प्रभावाखाली तर अकबराने नेहमीच्या पद्धतीच्या ऐवजी असे गोलाकार आसन केले नसावे ना ? खरोखरच दिवाणे-खास ही फत्तेपूर शिक्रीमधील 'खास' वास्तू होय अकबराच्या चतुरस्त्र बुद्धीचा परीपाक त्यात वाटतो !

पलीकडे लाल दगडामध्ये कोरीव काम केलेले एक दगडी आसन दिसले तेथे अकबराचा विश्वासू हिंदू राजज्योतिषी बसायचे स्थान होते अकबराची दुसरी बायको तुर्की बेगम हिच्या महालातले कोरीव काम सुंदर आहे महालाच्या छतातील विविध आकृती गालीच्यासारख्या दिसतात खिडक्या, दरवाज्याजवळ पोपट, वाघ, द्राक्षाच्या वेली कोरलेल्या मंहिरपी आढळतात या महालाजवळ एक लाल दगडाचा हौद आहे गाईड सांगत होता जहांगीरच्या जन्माच्या वेळी अकबराने हा हौद सोन्याच्या मोहरांनी भरून गोरगरिबाकडून लुटविला !


मरीयम झामनी ही अकबराची ख्रिश्चन बायको ! तिच्या वास्तव्यासाठी उभारलेल्या कोठीचे नक्षीकाम व रंगकाम सुंदर आहे. खांबावरील कोरीव काम वैशिष्ट्यपूर्ण आहे व्हरांड्याच्या एका खांबावर रामावतारांचे दृश्य कोरले आहे या महालाला 'सुनहरा मकान' म्हणून ओळखले जाई या महालाभोवतालच्या 'मरीयम बगीच्यात' छत्रीखाली भाशासाठी सुंदर टाकी आहे

राजा बिरबलाचा वाडा दुमजली आहे त्यातील आतील व बाहेरील शिल्पात हिंदु-मुस्लीम शिल्पकामाचा समन्वय साधला आहे विशेषतः छताचे कोरीव काम सुंदर आहे बाहेरील बाजूला ब्रॅकेटस व कमानी सुंदर दिसतात

हिरण मिनार ८० फूट उंचीचा भव्य असून त्यावर फणसाच्या काट्यासारखे दगडी खिळे कोरले आहेत त्यामुळे मिनार हत्तीच्या सुळ्यासारखा, काटे असलेला दिसतो हा मिनार तळाला अष्टकोनी, मध्ये गोलाकार व वर निमुळता असून आत गोलाकार जिना आहे. अकबराचा आवडता हत्ती हिरण जेथे पुरला तेथे हा 'हत्ती मिनार' किंवा 'हिरण मिनार' उभारला आहे

या मिनारावरून सम्राट अकबर व त्याच्या राण्या जनावराच्या झुजीचा खेळ पहात असत

फत्तेपूर शिक्रीची आणखी एक वैशिष्टयपूर्ण वास्तू म्हणजे पचमहाल पचमहाल पाच मजली असून त्याची रचना पिरॅमिडसारखी वाटते. पहिल्या मजल्याला ८४ खाब आहेत दुसऱ्या मजल्याला ५६, तिसऱ्याला २०, चौथ्याला १२ व पाचव्या मजल्याला ४ खांब आहेत व त्यावर कळस असलेला घुमट आहे प्रत्येक खांबावर तळापासून माथ्यापर्यंत कोणत्याही दोन खांबाच्या नक्षीकामात साम्य नाही हे पंचमहालाचे वैशिष्टय पचमहालात राजपरिवार सध्याकाळी ताज्या मोकळ्या हवेचा आस्वाद घेई. तसेच ग्रीष्म काळी रात्री आकाश दर्शन घेत चद्रप्रकाशाचा आनद लुटत भाविक जोधाबाई सकष्टीला चद्रदर्शन घेऊन बादशहा अकबराचे कल्याण होवो अशी प्रार्थना करायची !



पचमहालासमोर भव्य प्रांगणामध्ये बुद्धिबळाचा विशाल पट आखला आहे त्याचा प्रत्येक चौकोन दोन फूटाचा आहे. मध्यभागी तांबड्या दगडाचे कमी उंचीचे आसन असून तेथे अकबर बादशहा बसून विलासीपणे बुद्धिबळ खेळत असे सोंगट्या, प्यादी म्हणून शृंगाराने नटलेल्या सुंदर दिसणाऱ्या वेगवेगळ्या रंगाचा पोषाख केलेल्या जिवंत ललना हलत असत पंचमहाल समोरील विस्तीर्ण लालसर दगडी चौकाच्या कडेला छोट्या तळ्यात नक्षीदार कठडा असलेली बैठक आहे या बैठकीला जोडण्यासाठी पाण्यात चारी बाजूला अधांतरी ठेवलेले चार सेतू आहेत या बैठकीवर बसून तानसेनचा जलसा होई

दिवाणे-आमच्या भव्य प्रांगणाच्या पश्चिमेला उंचवट्यावर एक मंडप आहे तेथे राजाचे तख्त आहे तेथे अंतःपुरातील स्त्रियांना कामकाज पाहण्यासाठी जाळीदार खिडक्या बसविल्या आहेत

दिवाणे-खासच्या पश्चिमेला दोन खोल्याचे एक घर आहे तेथे अकबर अंतःपुरातील स्त्रियांबरोबर 'आँखमिचौली'-लपंडाव खेळत असे ख्वाबगाह उर्फ स्वप्ननगरी हे अकबराचे शयनगृह त्यातील दगडी पलंग थंडगार पाण्याने वेढलेला असे। अत्तराचे दिवे पेटलेले असत आणि बिनकठड्याच्या पायऱ्यांच्या कडेला उभ्या असलेल्या नग्न दासीचा आधार घेत बादशहा एक एक पायरी चढत असे।

फत्तेपूर शिक्रीतल्या स्मारकाचा इतिहास गाईडमार्फत ऐकताना अकबराचे ऐश्वर्य डोळ्यासमोर उभे राहिले ब्रिटिश प्रवासी राल्फ फिचने अकबराच्या वेळी राजधानी असताना व अकबराच्या मृत्यूनंतर पाचच वर्षांनी भेट दिलेल्या फत्तेपूर शिक्रीबाबत लिहून ठेवले आहे की, राजधानी असताना ज्या फत्तेपूरला १०० हत्ती, ३०,००० घोडे, १४०० हरीण, ८०० वारांगना होत्या तेथे नंतर जंगली पशु, ढाणेवाघ, तरस, चित्ते यांनी वास्तव्य केलेले आढळले वाघुळांनी वाड्यात घरटी केलेली दिसली, व्हराड्यात घुबडे बेधडक वावरत असत। कोल्हेकुईला इतका ऊत आला होता की रात्री-अपरात्री वावरणे मुष्कील। फत्तेपूर शिक्रीचा नाश चालूच राहिला मोठ्या आगी लावून छतांचे सोने वितळून लुटले। भित्तीचित्रांचा नाश केला संगमरवरी नक्षीदार जाळ्या काढून विकल्या ठिकठिकाणच्या चिनीमातीच्या टाइल्स उखडून टाकल्या आणि मातीमोल किंमतीने विकल्या

सध्याकाळ झाली होती ! हसू आणि आसूने भरलेली लाल पत्थराची कहाणी सपत आली होती भव्य बुलद दरवाज्याच्या पायऱ्या उतरत होतो बुडणाऱ्या सूर्याच्या सधीप्रकाशात फत्तेपूर शिक्रीचे चित्र दिसत होते—

" राजवैभवात डुबलेले, निखाऱ्यासारखे फुलणारे, अकबराचे साकार झालेले सुदर स्वप्न ! पण नतर क्षणभगुर ठरलेले ! उध्वस्त स्वप्नाची साक्षीदार असलेली आज फुफाट्यात वावरणारी उजाड राजधानी ! जोधाबाईच्या महालातून ईश्वराच्या, मरीयम झामनीच्या कोठीतून येशूच्या आणि तुर्की बेगमच्या महालातून जणू अल्लाच्या प्रार्थनेचे सूर ऐकू येत होते !

बुलद दरवाज्याच्या सपूर्ण पायऱ्या उतरून झाल्या होत्या सूर्य अगदी अस्ताला जाण्याच्या बेतात आला होता तांबड्या दगडाच्या फत्तेपूर शिक्रीचे महाल मद तांबड्या सूर्यप्रकाशात जणू दर्दभरी विराणीचे स्वर ऐकवीत होते. एकेकाळी गजबजलेल्या पण नंतर उजाड झालेल्या शिक्रीत भुकणाऱ्या कुत्र्यांमुळे अधिकच भीषणता वाटत होती ! भीषण शांततेतच अस्तगत होणाऱ्या सूर्याच्या साक्षीने राजवैभव उपभोगलेल्या लाल दगडांच्या उजाड राजधानीचा निरोप घेतला

आग्ऱ्याला फत्तेपूरहून पोहोचलो तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते दोन दिवस आग्रा व फत्तेपूर शिक्रीतली ऐतिहासिक स्मारके पाहण्यात कसे निघून गेले कळलेसुद्धा नाही

थोडीफार खरेदी करावी या हेतूने आग्ऱ्याच्या बाजारात चक्कर मारली आग्ऱ्याचा पेठा प्रसिद्ध आहे आग्ऱ्याच्या जामा मशिदीजवळील बाजारात इ स १८५० मध्ये तो प्रथम अग्रवाल नावाच्या हलवायाने विकायला आणला असे म्हणतात त्याबद्दल मजेशीर हकीकत अशी की पेठा तयार करण्याची पद्धत गुप्त रहावी म्हणून व्यापाऱ्याच्या घराला टागलेल्या टोपलीत पैसे टाकायचे व नतर पेठा पदार्थ पाठविल। जाई कोहळा फळ व साखरेचा पाक याधासून बनवलेला पेठा चवदार वाटला पेठ्याची खरेदी झाल्यावर सुबक मगच्या खरेदीसाठी क्रोकरी सामानाच्या दुकानात प्रवेश केला विविध नमुन्यातून एक सेट निवडून दुकानदाराला म्हटले, " बाबूजी अच्छा बाधके देना। बहुत दूर सफर करनी है।" त्याने चौकशी केली, " दूर कहाँ जानेवाले है ?" आम्ही सागितले की उत्तर भारताच्या सफरीवर निघालो असून थेट काश्मीर

पाहून हरिद्वार, वाराणसी, अलाहाबादमार्गाने परतणार आहोत. त्यावर तो म्हणाला, " बचपन से अब बुढेपन तक मेरी सब उम्र आग्रामे गयी। मुझे तो जवानी में इतना काम था की इस आग्रा के बाहर पाँव भी रख न पाया। अब लडके जवान हो गये है और बार बार तीर्थयात्रा करने के लिये आग्रहसे बोलते है। लेकिन अब आँखकी रोशनी कम हो गयी। यहाँ जमनाके किनारे एक दिन गुजरना पडेगा। आप भारत यात्रा करने निकले है। यही घुमने की उम्र है। आप हरिद्वार पहुचनेपर गंगामैयाको मेरा प्रणाम बोलना, भूलना नही।" भारतवासीयाच्या गंगेवरील प्रेमाच्या भावनेने मन उचंबळून आले

□

# व्रजभूमी मथुरा

आग्र्यापासून केवळ ४५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मथुरेला आम्ही आग्र्याहून सकाळी सातला निघून पाऊणतासातच ग्रँड ट्रंक या मद्रास-दिल्ली सुपरफास्ट गाडीने पोहोचलो पण सुपरफास्ट गाडीत बसल्याचा सरचार्ज माणशी एक रुपया याप्रमाणे मथुरा स्टेशनमध्ये टी सी ने वसूल केल्यामुळे झालेला आनंद 'फास्ट' मावळला! सध्याकाळी दिल्लीला मुक्कामाला जावयाचे असल्याने स्टेशनवरील क्लोकरूममध्येच सामान टाकले व टांगा करून शहराच्या मध्यभागाकडे-होलीगेटकडे निघालो

व्रजभूमी मथुरा पुराणकालापासूनच श्रीकृष्ण जन्मामुळे प्रसिद्ध आहे मथुरा शहर यमुनेच्या पश्चिम तीरावर वसले आहे भारतातील या जुन्या शहराची मौर्यकाळी खूप भरभराट झाली कुशाणकालात शिल्पकला खूप जोपासिली गेली त्या वेळचे शिल्पाचे अवशेष तत्कालीन धार्मिक, सामाजिक, चालीरितींवर प्रकाश टाकतात गुप्तकालामध्येही कला जोपासनेला खूप वाव मिळाला. मौर्य, कुशाण व गुप्तकालीन अवशेष, शिल्पे, ब्राँझ वस्तू, नाणी, मूर्ती इत्यादींचा उत्तम संग्रह मथुरेच्या म्युझियममध्ये केला आहे

महमूद गझनी, शिकंदर लोदी, औरंगजेब यांच्या काळात मथुरेवर

विध्वंसक हल्ले होऊन जाळपोळ, लुटालूट व अनेक हिंदू देवळांचा नाश झाला वारंवार आक्रमणे होऊनही हिंदूंनी मथुरेची 'मक्का' होऊ दिली नाही सम्राट अकबराच्या वेळी मात्र त्याच्या सहिष्णु धोरणामुळे मथुरा सोळाव्या शतकात संगीत, धार्मिक, कला, संस्कृती, विद्येचे प्रमुख केंद्र बनले सुप्रसिद्ध वैष्णव धर्मीय संत चैतन्य वल्लभ, माधव इत्यादींच्या वास्तव्याने मथुराभूमी पुनित झाली संगीत श्रेष्ठ हरिदास यांनी संगीताला शिखरावर नेऊन पोहोचवले व्रजभाषेच्या उत्कर्षाचा तो काळ होय

शहराचे प्रमुख प्रवेशद्वार होलीगेट ओलांडून द्वारकाधीश मंदिरात प्रवेश केला १९ व्या शतकाच्या सुरुवातीला बांधलेल्या या मंदिरातील मूर्ती देखणी आहे सभामंडपही मोठा आहे बाजूच्या भिंतीवर श्रीकृष्णाच्या आयुष्यातील प्रसंग चितारले आहेत छतावरील पेंटींग सुंदर आहे

कृष्णाची जन्मभूमी असलेल्या कटरा केशव देव नावाने ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी औरंगजेबाने तांबड्या दगडात मशिद बांधली यमुनेकाठी भव्य असा चौकोनी लाल दगडाचा स्तंभ लक्ष वेधून घेतो जयपूरचा राजा बिहारीमल याच्या सती गेलेल्या राणीच्या स्मरणार्थ हा ५५ फूटी सती बुरुज तिच्या मुलाने बांधला

यमुनेचा प्रसिद्ध घाट म्हणजे विश्राम घाट येथे यमुना स्नान करणे हिंदू धर्मीय पवित्र मानतात कंसदमनानंतर तेथेच कृष्णाने विश्रांती घेतली होती होडीत बसून यमुना नदीत फेरफटका मारताना यमुनेने या भूमीवरील पाहिलेली कितीतरी दृश्ये नजरेसमोर तरळत होती यमुनेने कृष्णाच्या लीला पाहिल्या, तसेच कंसाचा वधही पाहिला कृष्णाच्या बासरीचे मधूर सूर ऐकले वसुदेव मथुरेत जन्मलेल्या कृष्णाला गोकुळात घेऊन जात होता यमुनेचे पाणी वाढत होते तेव्हा पाटीतील कृष्णाच्या पायाच्या स्पर्शाने ते ओसरू लागले यमुनेचे सारे वाळवंट, डोह, घाट, तीर आणि नीर सर्व कृष्णमय आहे म्हणून यमुना नदी म्हणजेच कृष्णाच्या लीलांनी पावन झालेली अमृत वाहिनी एका कवीने तर म्हटले आहे की, काठावर उभ्या असलेल्या कृष्णाचे सावळे प्रतिबिंब पडले म्हणूनच ही यमुना नदीच सावळी झाली

यमुनेच्या घाटावरून बसस्टँडवर परतलो तेथून जायचे होते वृंदावनला कृष्णाने आपल्या रासक्रीडांनी बेजार केलेल्या गौळणींचे गाव पाहायचे होते.

मथुरेपासून केवळ दहा कि मी अंतरावर, उत्तरेला असलेल्या वृंदावनला जाण्यासाठी सकाळी साडेअकराला बस मिळाली अर्ध्या तासातच तेथे पोहोचलो वृदावन म्हणजे श्रीकृष्णाने किशोरावस्थेत जेथे विविध लीला केल्या ती भूमी सुप्रसिद्ध हिंदी भक्तकवी संत सूरदास यानी म्हटलेले आहे की—

माधो मोहि करो वृन्दावन रेनु ।

' हे माधवा, जिथे नित्य गायी चारताना तुझे चरण विहरतात त्या वृंदावनच्या भूमीतील एक रेणु मला कर

पड्याच्या नादी न लागता आम्ही कॉलेजच्या एक तरुण विद्यार्थ्याला गाईड करून महत्त्वाची मदिरे पाहायला सुरुवात केली अधूनमधून व्रजभाषेतील कवने म्हणून तो वृदावनचा इतिहास डोळ्यासमोर उभा करी. त्याने वृदावन नाव कसे पडले ते सागितले वृदा म्हणजे तुळस पूर्वी तेथे तुलसीवन होते म्हणून याला वृदावन म्हणत राधेच्या सोळा नावापैकी एक नाव वृद असे होते म्हणून वृदावन नाव पडले असे पुराणात म्हटले आहे वृदावनात चार हजारांवर मंदिरे आहेत वृदावनात जेव्हढी घरे तेव्हढी मदिरे अशी म्हण आहे

तेथील गोविंददेव, मदनमोहन, गोपीनाथ, जुगलकिशोर, राधावल्लभ ही मदिरे अकबराच्या काळात बांधली गेली गोविंददेव मदिराची गणना उत्तर हिंदुस्थानातील प्राचीन भव्य अशा मदिरात होते जयपूरचा राजा मानसिंह याने सोळाव्या शतकात हे लाल दगडातील सात मजली मदिर बांधले आज मात्र दोनच मजले दिसतात पाच मजले औरंगजेबाने पाडले असे कळले. मदिरातील मूळ मूर्ती औरंगजेबाच्या आक्रमणाच्या भीतीने जयपूरला नेण्यात आली होती ती मूर्ती आम्ही जयपूरला राजवाड्यासमोरील गोविंददेवजी मदिरात पहिली होती

गोपीनाथ मंदिर, मदनमोहन मदिर , जुगलकिशोर मदिर, राधावल्लभ मदिर या मदिराची शिल्पकला प्रगत हिंदु शिल्पकलेची प्रतीके आहेत दाक्षिणात्य पद्धतीने बाधलेल्या सगमरवरी रगजीमदिरात आलो सोन्याचा चकाकणारा स्तभ तेथे वैभवाने उभा आहे मंदिराबाहेर जवळच मिरवणुकीसाठी वापरण्यात येणारा प्रचड रथ दिसत होता

शाह बिहारीलाल या मंदिराच्या दर्शनी भागातील संगमरवरी चक्राकार स्तंभासारखे स्तंभ भारतात कुठेही आढळत नाहीत इतके त्याचे शिल्प अद्वितीय आहे या संगमरवरी मंदिरासाठी लखनौच्या एका व्यापाऱ्याने अमाप पैसा खर्च केला मंदिराचे सर्व सामान उंची आहे बांकेबिहारीजीचे मंदिरही असेच सुंदर असून त्यातील मूर्ती स्वामी हरिदासाना निधीवनात सापडली

चिरबिहारी अथवा नंदभवन मंदिर तांबड्या दगडात सतराव्या शतकात गणेश गिरीने बांधलेले आहे. या मंदिरात हिम्मतबहादुर गिरीचे चित्र पहायला मिळाले यानेच पानपतच्या तिसऱ्या युद्धात कामास आलेले मराठे योद्धे सदाशिवराव व विश्वासराव यांची प्रेते हिंदु पद्धतीने अंत्यसंस्कार करण्याच्या दृष्टीने अहमदशहा अब्दालीला तीन लक्ष रुपये देऊन घेतली होती मुसलमानी सत्तेच्या हातून वृंदावनाची मुक्तता करण्याचे काम मराठा वीर महादजी शिंदे यांनी केले याचा इतिहास आठवत होता

पन्नास वर्षे बांधकाम चाललेले जयपूर मंदिर भव्य कमानीमुळे आणि प्रेक्षणीय शिल्पकामामुळे प्रसिद्ध आहे चमकणारे काचेचे मंदिर आकर्षक आहे तसेच श्री लीलाबागेत पागलबाबाचे सहामजली मंदिर आहे

निधीबनात संगीत श्रेष्ठ स्वामी हरिदासांची समाधि आहे स्वामी हरिदास प्रख्यात कृष्णभक्त ! संत आणि भारतीय संगीताचे प्रवर्तक वैष्णव भक्तिसंप्रदायात हरिदास हे उच्चकोटीचे महात्मा समजले जातात त्यांचा शिष्य बैजू व संगीतसम्राट तानसेन यांची जुगलबंदी प्रसिद्धच आहे निधीबनातील जमिनीला झुकणारी झाडे पाहून आश्चर्य वाटले तेथेच 'एक प्राण दो देह' ही राधाकृष्णाची सुबक मूर्ती पाहिली निधीबनात माकडे मात्र खूप होती

वृंदावनच्या यमुनेच्या घाटाजवळील प्राचीन कदंब वृक्षाजवळ गेलो तेव्हा आठवला, यमुनेच्या डोहात कृष्णाने कालिया नागाचा स्वत: समाचार घेतला तेव्हाचा प्रसंग याच कदंबवृक्षाजवळ गोकुळातील गोपगोपी शोकाकुल मन:स्थितीत जमले होते आणि श्रीकृष्णाने कालियामर्दन केलेले पाहिल्यावर हर्षित झाले होते यमुनेत न्हाणाऱ्या गवळणीच्या साड्या, चोळ्या पळवून नटखट कृष्णाने याच वृक्षावर ठेवल्या होत्या आजही स्त्रियांनी कदंब वृक्षाला

भाविकतेने साड्या चोळ्या बांधून ठेवलेल्या दिसत होत्या डोळ्यासमोर रासक्रीडेचा प्रसग तरळत होता

दुपारी बारा ते चारच्या दरम्यान वृंदावनच्या महत्त्वाच्या देवळांचा फेर-फटका मारून वृंदावन बस स्टँडवर आलो मथुरेजवळील शाळेच्या सहलीला आलेले विद्यार्थी बस डेपोतून स्टँडवर आल्यावर पुढच्या व मागच्या दरवाजातून घुसले त्यामुळे सर्व प्रवाशाना दरवाजाजवळ अडकावे लागले वास्तविक ४०-५० विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र बस करायला हवी बसमध्ये आम्ही कसेबसे घुसलो

मथुरेला साडेचारला पोहोचून चहा वगैरे घेऊन मथुरेच्या पेढ्याची खरेदी करून तडक मथुरा स्टेशनवर आलो पाचला पजाब मेल मिळाली दिल्लीच्या प्रदर्शनाला उत्सुक झाल्यामुळे गाडीतील तीन तासाच्या गर्दीच्या प्रवासाची पर्वा केली नाही

रात्री साडेआठला नवी दिल्ली जक्शनवर आलो डब्यातूनच प्लॅटफॉर्मवर सामान काढेपर्यंत एक टी सी 'भक्ष्य' शोधण्यासाठी डब्याजवळ आला व तिकिटे तपासण्यासाठी मागणी केली तिकीटे दाखविल्यावर कोटाच्या खिशातून पावतीपुस्तक काढून म्हणाला, या मुलीचे (भाचीचे) पूर्ण तिकीट काढण्याऐवजी अर्धे काढले म्हणून अर्ध्या तिकीटाचे ६७ रु व दड ५० रु. असे पैसे काढा ! वास्तविक आमची भाची अकरा वर्षांची होती त्याला आम्ही 'साऊथ ॲव्हेन्यू 'मधील खासदाराचा पत्ता सांगितला यावर तो टी सी म्हणाला आपण जाऊ शकता, मी त्याना ओळखतो पैसे उकळण्याचा त्याचा डाव ह्याच्या दक्षतेने फसला

टॅक्सी करून आम्ही खासदार श्री विखे पाटील याच्या प्रशस्त ब्लॉकवर रात्री नऊला आलो त्यांच्या गैरहजेरीतच आम्ही उतरलो. आमची नगर, पुणे वरून आलेली पत्रे पाहून आनद वाटला नगर सोडल्याला आठ–दहा दिवस झाले होते पत्रामुळे हकीकत कळाली समोरच एम पी कँटीन आहे तेथे रात्रीचे जेवण उरकले तासाभराने खासदारसाहेब मुबईहून विमानाने आले, मोठ्या आस्थेने आमची विचारपूस करून अधिक ब्लँकेटस्ची सोय केली.

# भारताची राजधानी जुनी आणि नवी दिल्ली


सकाळचे सहा वाजले होते तेव्हा ध्यानात आले की आपण दिल्लीमध्ये मुक्कामाला आलो आहोत दिल्ली बघायला निघायला दोन तास अवकाश होता. दिल्लीला विशाल प्राचीन परपरा आहे

यमुनेच्या पश्चिम तीरावर वसलेल्या दिल्लीच्या महान ऐतिहासिक, सांस्कृतिक परपरेची आठवण तेथील लहान-मोठी हजारावर स्मारके करून देतात। दिल्लीचा इतिहास महाभारतकालीन पाडवांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या, युधिष्ठराने वसविलेल्या इद्रप्रस्थ या नगरीपासून होतो यमुनाकाठचे खांडववन जाळून पाडवानी श्रीकृष्णाच्या साहृयाने इद्रप्रस्थ राजधानी वसविली त्या ठिकाणी आज पुराना किल्ला भग्नावशेष अवस्थेत उभा आहे अनगपाल या सम्राटाने दिल्लीचा राजधानी म्हणून खूप विकास केला दिल्लीवर अधिपत्य गाजविणारा शेवटचा हिंदू राजा पृथ्वीराज चौहान होय

बाराव्या शतकात कुतुबुद्दीन ऐबकपासून मुस्लीम राजवटीला सुरुवात झाली नतर मोगल सम्राट आले. हुमायुनने जुना किल्ला बाधला आग्र्याच्या उष्णतेला व चढउताराच्या जमिनीला कटाळून शहाजहानने आग्र्याहून दिल्लीला राजधानी हलविली. लाल किल्ला, चांदणी चौक व त्याभोवतालची



सौंदर्यशाली गुणवती, नूरजहान



राष्ट्रपतीभवन, नवी दिल्ली

ढाई दिनका झोपडा, अजमेर



शहाजनाबादची उभारणी त्याचवेळी झाली मराठे सरदार महादजी शिंदेनीही दिल्लीच्या तख्तावर अठराव्या शतकाच्या शेवटी राज्य केले

तैमूरलग, नादिरशहा व अहमदशहा दुराणी यांनी दिल्लीवर हल्ले करून गडगज जवाहीर, दौलतीची लूटमार केली शेवटी इ स १८०३ मध्ये ब्रिटिश जनरल लेकने दिल्लीचा कारभार ईस्ट इडिया कपनीकडे आणला १८५७ च्या स्वातत्र्य समरात ब्रिटिशानी शर्थीने दिल्लीचे रक्षण करून त्या वेळच्या ८० वर्षाच्या मोगल सम्राट बहादुरशहाला अटक करून लाल किल्ल्यात खटला भरून आमरण कैदेसाठी रगूनला पाठविले त्याबरोबरच मोगल साम्राज्याचा शेवटचा दुवा निखळला !

पचम जॉर्जनी दिल्ली दरबाराच्या वेळी इ स १९११ साली घोषणा केली की " अतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने, मध्यवर्ती स्थानामुळे व उत्तम प्रशासनाच्या सोईसाठी कलकत्त्याऐवजी दिल्लीला राजधानी स्थलांतरित करण्यात येईल " आणि मग राजधानीची पूर्वीची परपरा असलेल्या दिल्लीची उभारणी सुरू झाली एक लक्ष पंधरा हजार एकर भूमी सपादन करण्यात आली, सुमारे २९००० कामगार राजधानी उभारणीसाठी अहोरात्र खपू लागले नवी राजधानी उभारण्याचा अदाजे खर्च दहा दशलक्ष पौंड होता नव्या दिल्लीच्या शहर रचनेत लॉर्ड हार्डिग यांचा प्रामुख्याने भाग आहे प्रमुख आर्किटेक्ट सर एडविन ल्यूटन व त्यांचे सहकारी सर हर्बर्ट बेकर हे नव्या दिल्लीचे आद्य शिल्पकार ! इ स १९३१ साली अधिकृतपणे नवी दिल्ली या राजधानीचे उद्घाटन झाले

राष्ट्रपिता म गाधींच्या नेतृत्वाखाली विशाल स्वातत्र्य संग्रामामुळे १५ ऑगस्ट १९४७ साली दिल्लीवर युनियन जॅक ऐवजी प्यारा तिरगा फडफडला ! २६ जानेवारी १९५० ला या महान लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक भारताचे डॉ. राजेंद्रप्रसाद पहिले राष्ट्रपती झाले आणि पडित जवाहरलाल नेहरू आणि लाल बहादूर शास्त्री याच्या नेतृत्वाखाली राष्ट्राची आगेकूच चालू झाली

अशी ही दिल्ली ! तिने अनेक विजय पाहिले आणि पराजयही पचविले ! लूटमारही डोळ्यादेखत पाहिली स्थितप्रज्ञाप्रमाणे साम्राज्याची उलथापालथ पहात कालाचा ओघ चालूच आहे ! साम्राज्यशाहीपासून सध्याच्या महान

लोकशाही परंपरेपर्यंत घडलेल्या अनेक स्थित्यंतराची दिल्ली ही साक्षीदार आहे बाराव्या शतकापासून राजवैभव भोगणाऱ्या दिल्लीवर जवळजवळ सत्तर राजे व दोन राण्यांनी राज्य केल्यानंतर सध्या राज्य चालू आहे जनतेने निवडून दिलेल्या तिसऱ्या राणीचे—इंदिरा गांधींचे।

बरोबर सकाळी आठला साऊथ ॲव्हेन्यूतून बाहेर पडलो व रिक्षाने कॅनॉटप्लेसकडे आलो तेथून दिल्ली दर्शनासाठी लक्झरी बसने प्रथम कुतुब-मिनारकडे निघालो

कुतुबमिनार दिल्लीच्या नैऋत्येला दिल्लीपासून सोळा किलोमीटर अंतरा-वर गगनाला गवसणी घालीत दिमाखाने उभा आहे पूर्वी तो सात मजली असून तीनशे फूट उंचीचा होता असे म्हणतात. सध्या तो पाच मजली २३४ फूट उंचीचा असून त्याला ३७९ पायऱ्या आहेत पहिल्या तीन मजल्यात तांबड्या दगडाचा वापर केला असून, शेवटच्या दोन मजल्यात पांढरे संगम-रवरी दगड वापरले आहेत तळाला व्यास ४७ फूट असून सर्वात उंचावर नऊ फूट आहे पहिला मजलाच मुळी ९५ फूट उंच असून त्याला १५६ पायऱ्या आहेत पहिल्या मजल्याला बारा बाजू असून भिंती स्तंभांकित आहेत दुसरा मजला गोलाकार स्तंभाचा, तिसरा कोनांकित स्तंभाचा आहे या महान मिनारचा निदान पहिला मजला दिल्लीचा शेवटचा हिंदू सम्राट पृथ्वीराज चौहान याने आपल्या राणीच्या यमुना दर्शनासाठी बांधला असावा असे अनु-मान पहिल्या मजल्यावरील हिंदू शिल्पकृतीतील घंटा, फुले, इत्यादींमुळे निघते शिवाय त्याचा दरवाजा हिंदू परंपरेप्रमाणे पूर्वेला असून मिनार मुस्लिम शिल्पपरंपरेप्रमाणे उंच चबुतऱ्यावर नाही कुत्ब हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ जात्याच्या नळीची आरी किंवा आस व मिनार म्हणजे स्तंभ किंवा दीपगृह या मनोऱ्याचे खरे नाव कुत्बमिनार म्हणजे मध्यवर्ती स्तंभ

पाचही मजल्यावर कोरलेल्या लिखाणावरून बाराव्या शतकात दिल्लीचा सुलतान कुतुबुद्दीन ऐबक याने मुस्लिम धर्तीवर या मिनारचे रूपांतर केले कुराणातील वचने कोरली हिंदू राजपूत राज्यावर मिळविलेल्या विजयाचा उल्लेख केला आहे. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याची उभारणी सुलतान अल्त-मशने केली व बाकीच्यांची फिरोजशहा तुघलकने या मिनाराचा उपयोग शत्रू-टेहळणीसाठी प्रामुख्याने व्हायचा महमद तुघलकने लंगड्या तैमूरलंगचा कूच

करणाऱ्या सैन्याचा ताफा याच मिनारावरून प्रथम पाहिला

प्रत्येक मजला संपल्यावर गोलाकार बाल्कनी आहे तेथून दिल्लीच्या आजूबाजूच्या परिसराचे दृश्य दिसते सध्या फक्त तिसऱ्या मजल्यापर्यंत जाता येते

भव्य कुतुबमिनारला पाहताना प्राचीन हिंदु–मुस्लीम शिल्पतंत्रज्ञाच्या तंत्रविद्येचा अभिमान वाटला दोनदा भूकंपाच्या अपघातानंतरही कुतुबमिनार आपली शान दाखवीत डौलाने उभा आहे

कुतुबमिनारच्या परिसरातील दुसरे महत्त्वाचे दर्शनीय स्थान म्हणजे लोहस्तंभ आहे या लोहस्तंभाच्या तळाचा परीघ ६'–४" व वर २'–४" आहे लोहस्तंभ अत्यंत गुळगुळीत आहे त्यावर गंजाचा लवलेशही नाही हा लोहस्तंभ पाचव्या शतकातला असावा त्यावर चंद्रवर्मन राजाचा उल्लेख आहे हा लोहस्तंभ चंद्रगुप्त मौर्यकालीन असावा असे अनुमान निघते हा निमुळता लोहस्तंभ प्राचीन धातुशास्त्रातील प्रगत तांत्रिक ज्ञानाचा उत्कृष्ट नमुना आहे त्याचे वजन सुमारे सहा टन असून लोखंडाची शुद्धता ९९.७२% आहे ! हा स्तंभ जमिनीत पक्क्या सळयांनी रुतविलेला आहे वरील संस्कृत लिखाणावरून हा विष्णुमंदिरासमोर उभारला होता त्यावर विष्णूचे वाहन गरुडमूर्ती कोरलेली होती पूर्वी त्याला विष्णुस्तंभ म्हणत आजही तेथे समोर हिंदूचे जुन्या विष्णुमंदिराचे स्तंभ मोडून बांधलेली कुव्वत-उल-इस्लाम मशीद मौजुद आहे हा लोहस्तंभ नादिरशहाच्या वेळी उपटण्याचा विफल प्रयत्न झाला, या लोहस्तंभाकडे पाठ टेकून ज्याचे दोन्ही हात मागे एकमेकाला टेकतात तो भाग्यवान समजला जातो ! भेट देणारे प्रवासी आपले दोन्ही हात मागे टेकण्याची विफल धडपड करताना पाहून मौज वाटली !■

कुतुबुद्दीन ऐबकने हिंदू सम्राट पृथ्वीराज चौहानच्या पाडावानंतर मूळ विष्णुमंदिर असलेल्या जागी कुत-उल इस्लाम ही मशीद बाराव्या सनकात बांधली खांबावरील कोरलेले फुलांचे शिल्पकाम हिंदू शिल्पाची ग्वाही देते ३५ फूट उंचीचे सुंदर स्तंभ एका रांगेत दिसतात ही मशीद उभारताना हिंदूंच्या २५–२६ मंदिरांचा नाश केला होता !

कुतुबमिनार जवळील तांबड्या दगडात अल्लाउद्दीन खिलजीने बांधलेला

'अली दरवाजा 'चे आतील व बाहेरील शिल्पकाम सुंदर आहे नजीकची तांबड्या दगडांनी हिंदू पद्धतीने बांधलेली कबर सुलतान अल्तमशाची समजली जाते ती त्याच्या मुलीने-सुलताना रेझियाने बांधली असावी असे अनुमान निघते

कुतुबमिनारचा परिसर पाहून बसने हुमायूनच्या मकबऱ्याजवळ आलो हुमायूनचा मकबरा दिल्ली-मथुरा रोडवर दिल्ली शहरापासून सात कि मी अंतरावर आहे हुमायूननेच निवडलेल्या जागी त्याच्या मृत्युनंतर त्याच्या विधवा राणीने-हमिदा बेगमने पंधरा लक्ष रु खर्च करून तो इ स १५६५ मध्ये उभारला या मकबऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे मोगल शिल्पकृतीचे हे पहिले स्मारक तांबड्या व संगमरवरी दगडात बांधकाम केले असून चार बाजूला मिनार व अर्धवर्तुळाकार घुमट आहेत मकबऱ्यासमोर प्रमाणबद्ध बगीचा आहे मूळची ही कल्पना इराणची बगीच्यात पाण्यासाठी हौद, कारंजी आहेत उंच चबुतऱ्यावरील सुंदर कमानीचा हा मकबरा सुमारे १६५ फूट लांबी रुंदीच्या चौरसाचे कोपरे वळवल्यामुळे अष्टकोनी दिसतो

हा मकबरा अनेक दुःखद घटनांशी निगडित आहे हुमायून, त्याची बेगम व औरंगजेबाकडून मारला गेलेला शहाजहानच्या गादीचा वारस राजपुत्र दारा, दानधर्म करणारा प्रसिद्ध फरुख सियार या मोगल राजांना तेथे चिरनिद्रा दिली आहे दुसऱ्या एका महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनेशी हा मकबरा निगडीत आहे शेवटचा मोगल सम्राट बहादुरशहा याने आपल्या बेगमसह इ स १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळी याच मकबऱ्यात आश्रय घेतला होता येथेच त्याने ब्रिटिशासमोर बिनशर्त शरणागती पत्करली होती इंग्रजांनी त्याला व त्याच्या बेगमला माफी देऊन त्यांची रंगूनला रवानगी केली परंतु त्याचा वारस मुलगा व पुतण्या यांना याच मकबऱ्याच्या आवारात ब्रिटिश कॅप्टन हॉडसन याने त्याच्यादेखत पिस्तुलाने ठार मारले मोगल साम्राज्याच्या पहिल्या वारशाच्या-हुमायूनच्या साक्षीने शेवटच्या वारसाचा निघृण खून व्हावा हा केव्हढा दैवदुर्विलास ! अशा प्रकारे या मकबऱ्याने तैमूरवंशाचा अंत पाहिला

हुमायूनच्या मकबऱ्यानजीक चौदाव्या शतकातील मुस्लिम औलिया हजरत निझामउद्दीन व शेरशहाचा सरदार इसाखान यांचे दोन मकबरे आहेत

पहिल्याचे वैशिष्ट्य धार्मिक दर्शनीय स्थान तर दुसऱ्याचे शिल्पकला या दृष्टीने

शेरशहाचा मकबरा तांबड्या दगडानी बाधलेला असून हिंदुस्थान व अफगाणिस्थानच्या कलेचा समिश्र नमुना आहे मोगलकालीन शेवटचा मोठा मकबरा म्हणजे अवध—लखनौचा नवाब सफदरजग यांचा मकबरा कुतुब-मीनारच्या मार्गावर दिल्लीपासून दहा किलोमीटर अतरावर सफदरजग विमानतळाजवळ सुदर बगीच्यात तो वसवला आहे तुलनात्मक दृष्टया हा मकबरा खास नमुना नाही

दिल्लीचा पुराना किल्ला शेरशहाने पधराव्या शतकात बांधला या जागी पाडवकालीन जुना किल्ला होता युधिष्ठिराने वसविलेल्या इद्रप्रस्थ नगरीत म्हणजे आजच्या इद्रप्रस्थ भागात दिल्लीपासून तीन कि मी अतरावर पुराना किल्ला आहे किल्ल्याच्या एका दरवाजावरील सगमरवरी झडपेवर सिंहाची शिकार करणारा माणूस दाखविला आहे केवळ हाताने सिंहाची शिकार करणारा तो शेरशहा असावा पुराना किल्ल्यातल्या आतील भागात एक अष्टकोनी दुमजली मडप दिसला शेरशहाच्या कारकीर्दीत तो शेरमडल नावाने ओळखला जाई तेथे शेरशहाचा ग्रथसग्रह होता, याच वास्तूमध्ये वरच्या मजल्यावर असलेला मोगल बादशहा हुमायून प्रार्थनेची वेळ झाली म्हणून अरुद जिना उतरत असताना कोलमडून पडला व आजारी पडून मरण पावला किल्ल्याच्या भिंती भग्नावस्थेत आढळतात

लाल किल्ल्यासमोरील दिल्लीची जुम्मा मशीद फत्तेपूर शिक्रीच्या तोडीची लाल दगडात बांधलेली आहे शहाजहानने बाधायला सुरुवात केलेली ही मशीद औरगजेबने पूर्ण केली सुमारे सहा वर्षे पाच हजार कारागीरांनी खपून बाधलेल्या या मशिदीला दहा कोटी रुपयावर खर्च आला जुम्मा मशिदीच्या प्रार्थनागृहाची लांबी दोनशे फूट असून घुमटाची उची तेवढीच आहे व बाजूला दोन उच मीनार आहेत घुमट काळा व पांढरा सगमरवरी असून मीनार पाढरे व तांबडे दिसतात मशिदीतील चौकोनी प्रागणही विशाल आहे

चांदनी चौकाजवळील इतिहास प्रसिद्ध लाल किल्ल्यासमोरील आवारात बस सायकाळी पाचच्या सुमारास थाबली चांदनी चौकाच्या बाजूने असलेल्या

लाहोरी गेटने किल्ल्यात प्रवेश केला दरवाजावर दोन्ही बाजूला छत्रीदार बुरूज आहेत व मध्ये सात पायरे संगमरवरी बुरूज सुंदर दिसतात मोगल काळात त्या दरवाजाल्गतच मीनाबाजार भरत असे आत प्रवेश करताना दोन्ही बाजूला दुतर्फा रंगीबेरंगी दुकाने दिसली

किल्ल्यातील दुसरा प्राचीन दरवाजा आहे 'दिल्ली दरवाजा' चितोड-गडचे राजपूतवीर जयमल आणि फत्ता यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पूर्णाकृती हत्ती-वर स्वार असे त्याचे दगडी पुतळे अकबराने मूळ आग्र्याच्या किल्ल्यातील दरवाजावर कोरलेले होते कालांतराने ते या दरवाजावर आणले औरंग-जेबाने हिंदूंच्या तिडिकीने मूळ दगडी पुतळ्याचा नाश केला हत्तीचे तुकडे किल्ल्यातील म्युझियममध्ये जतन करून ठेवले आहेत लॉर्ड कर्झनने पूर्वीच्या मूळ हत्तीबरहुकूम दगडी हत्ती कोरून दरवाजावर बसविले आहेत

'छत्ता चौक' ओलांडल्यानंतर दुमजली 'नौबतखाना' दृष्टीला पडला मोगल काळात तेथे दिवसात पाच वेळा नौबत वाजविली जाई

नंतर दिसणारी वास्तू म्हणजे दिवाण-ए आम. तेथील खांबाच्या महिरपी कमानींवर फुले कोरलेली आहेत दिवाण-ए-आमच्या आतील भिंतीवर संगम-रवरी झरोका आहे त्या समोरील भिंतीवर फ्रेंच कारागिराने कोरलेले सुंदर पक्षी, पुष्प, फळे लक्ष वेधून घेतात बादशहाच्या सिंहासनावरील शामियान्याची झालर मोत्याची होती व रेलींग सोन्याचे होते

दिवाण-ए-आमच्या मागील मंडप म्हणजे रंगमहाल राजाराणीच्या या खाजगी महालाचे छत फुलांच्या वेलबुट्टीने सजविले आहे यमुना नदीच्या बाजूच्या असलेल्या संगमरवरी अखंड जाळ्या असलेल्या खिडक्यांतून जनान-खान्यातील स्त्रिया हत्तीच्या झुंजी पाहत मध्यभागी आकर्षक संगमरवरी हौद आहे त्यात उमललेल्या कमळाच्या फुलाचे चित्र कोरलेले आहे पूर्वी त्या हौदावरील छत आरशाचे होते त्यात फुलाचे मनमोहक प्रतिबिंब दिसायचे

दिवाण-ए-खास संगमरवरी उंच चबुतऱ्यावर असून त्याला सुंदर शिल्प-कृतीने सजलेले बत्तीस स्तंभ आहेत मोगल काळात त्याचे छत चांदीचे असून ते २९ लक्ष रु किंमतीचे होते पुढे ते जाटांनी लुटले एका कमानीवर पार्शि-यन भाषेत कोरले आहे–

'अगर फिरदौस बररूप जमीं अस्त
हमीं अस्तो हमीं अस्तो हमी अस्त।'

म्हणजेच–

पृथ्वीवर जर स्वर्ग असेल
तर तो येथेच आहे, येथेच आहे, येथेच आहे

शहाजहानच्या 'तख्त ए ताऊस' ची हकीकत गाईडकडून ऐकताना आश्चर्य वाटले. सहा फूट लांब चार फूट रुंद असलेले तख्त नऊ कोटी रु किमतीचे होते! ते एक लाख तोळे सोन्याने मढविलेले होते व त्यावर हिरे, माणके, पाचू, नीलम, पन्ना, रत्ने अगणित बसविली होती सोन्याच्या वृक्षावर आकर्षक मोर कोरले होते, या तख्ताला 'मयूरासन' म्हणत सिंहासनाचे छत मोतीजडीत होते सिंहासनावर चढायला चांदीच्या पायऱ्या होत्या पूर्वी हिंदुस्थानाला 'सुवर्ण भूमी' म्हणत याची प्रचीती वर्णन ऐकताना आली नादिरशहाच्या स्वारीत हे 'मयूरासन' लुटले गेले

दिवाण–ए–खास महत्त्वाच्या अनेक ऐतिहासिक घटनांचा स्थितप्रज्ञ साक्षीदार आहे येथेच मोगल सम्राट शहाजहानवर ब्रिटिश डॉक्टरानी यशस्वीरीत्या औषधपाणी केल्याबद्दल ईस्ट इंडिया कंपनीला जकात कर माफीची सवलत मिळाली येथेच औरंगजेबाने आपल्या मार्गातील भाऊ दारा याचा निर्घृणपणे शिरच्छेद केला नादिरशहाने तत्कालीन मोगल दिल्लीपती महमूदशहाला वश करून कोहिनूर हिरा, मयूर सिंहासन, शाही खजाना लुटला मराठा सरदार महादजी शिंदे यांनी येथेच सनद प्राप्त केली! शेवटचा मोगल सम्राट बहादुरशहाचा १९५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतल्याबद्दलचा खटला येथच चालविला गेला पंचम जॉर्जच्या इ स १९११ मधील हिंदुस्थान भेटीतला दरबार येथेच भरला गेला

'खास महल' हा संगमरवरी असून खाजगी कामासाठी पूजा, विश्रांतीसाठी वापरला जाई तेथील मधील दरवाजावर सुंदर मनमोहक जाळी कोरलेली आहे सम्राटाच्या समतोल न्यायाचे प्रतीक म्हणून त्यावर 'तराजू' कोरलेला आहे.

हमामखाने अथवा शाही स्नानघरे म्हणजे मोगल विलासाचा अलौकिक

नमुना आहे। या संगमरवरी स्नानघरात पूर्वी आरसे बसविलेले होते हमामचे तीन भाग आहेत. मधे पॅसेज आहे पहिला नदीच्या कडेच्या बाजूला आहे तो प्रसाधनासाठी वापरला जाई तेथे सुवासिक कारंजी रात्रंदिवस चालत। मधल्या भागात हौद आहे तेथे थंड अथवा गरम पाणी मिळायचे हौदामधे पूर्वी चांदीचा फवारा असे त्यातून गुलाबजल मिळायचे तिसऱ्या भागात केवळ गरम पाणी मिळायचे। हे मनमोहक 'हमाम' पाहून वाटते की असे विलासी जीवन जगायलाही भाग्य लागते हेच खरे। 'अरेबियन नाईट्स'मध्ये वर्णन केल्याप्रमाणे हे हमामखाने झगझगीत, सौंदर्यशाली आहेत

किल्ल्याच्या कडेला एक अष्टकोनी बुरुज दिसतो तो 'सुम्मन बुरुज' होय पूर्वी त्याचा घुमट तांब्याचा असून त्यावर सोन्याचा मुलामा दिलेला होता या अष्टकोनी बुरूजाचा सूर्यदर्शनासाठी उपयोग व्हायचा गाईड सांगत होता येथेच उभे राहून पंचम जॉर्जने राणी मेरीसह किल्ल्याखाली नदीच्या बाजूने उभ्या असलेल्या जनतेला दर्शन दिले होते

शुभ्र संगमरवरी मोती मशीद औरंगजेबाने शाही कुटुंबातील व्यक्तींसाठी बांधली त्याचे मूळ दरवाजे पितळी होते पूर्वी तेथे तांब्याचा घुमट होता सध्या तेथे संगमरवरी घुमट आहे

लाल किल्ल्यात दोन संग्रहालये आहेत पूर्वीच्या 'मुमताज महल' नावाने प्रसिद्ध असलेल्या हॉलमध्ये जुनी हस्तलिखिते, चित्रे, भरजरी कपडे, शाही हत्यारे यांचा समावेश आहे 'नौबत खाना'च्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या वॉर म्युझियममध्ये जुनी तिकिटे, फोटो, हत्यारे, नाणी, लष्करी साहित्य प्रेक्षणीय आहेत

किल्ल्याचा सर्व परिसर पाहून झाला होता सहा वाजून गेले होते अंधार पडायला थोडा अवकाश होता मन ध्वनिप्रकाश (Sound and Light) कार्यक्रम ऐकण्यास व पाहाण्यास अधीर झाले होते कार्यक्रमाला एक तास अवकाश होता म्हणून किल्ल्याजवळच्या गजबजलेल्या चांदनी चौकातील बाजारातून फेरफटका मारून आलो

रात्री बरोबर सात वाजता ध्वनिप्रकाश कार्यक्रम सुरू झाला मोगलांच्या शाही वैभवाचे यथार्थ मनोरंजक दर्शन घडविणाऱ्या ह्या प्रयोगाची सुरुवात जणू काळ बोलू लागतो अशी कल्पना करून ' ये वक्तकी आवाज है।' या

आवाजाने होते. मोगल सम्राट शहाजहान आग्न्याहून दिल्लीला प्रथम येतो त्यावेळी आज किल्ला असलेल्या या जागी जगलातील गिधाडे, तरस याचे वास्तव्य होते त्याचे चीत्कार ध्वनीच्या सहाय्याने ऐकू आले तेव्हा आपण खरेच जगलात तर नाहीना असे वाटू लागले नतर शहाजहानने किल्ल्याची दीड मैल लाबीची भित बांधली हे सांगताना भितीवर आकर्षक रगीत उजेड पसरू लागला नंतर शाही महल, रगमहल, दिवाणे खास, हमाम यांच्या वर रगीत प्रकाशाचे झोत टाकून त्याचा इतिहास सांगण्यात आला नऊ वर्षे नऊ कोटी रु खर्चून तांबड्या दगडाने हा किल्ला यमुनाकाठी उभारला

यानतरचा प्रसग म्हणजे शहाजहानने किल्ल्यात प्रवेश केल्यावर नऊ दिवस चालणारा भव्य जलसा ! त्यावेळी चादीची नाणी उधळली गेली तो आवाज ऐकू येतो नतर ऐकू येते किल्ल्यातील मीनाबाजारातील शहाजादींच्या, बेगमांच्या खरेदीच्या धमालीची गोड किलबिल ! औरगजेबाने मोती मशीद उभारली हे सांगताना तिच्यावर प्रकाशाचे झोत टाकले गेले शिवाय नमाज पढण्याचा आवाज ऐकू आला यानतर ऐकू आले मदिरा व मदिराक्षीत गुरफटलेल्या, नृत्य-सगीतात मग्न असलेल्या विलासी सम्राटांचे आवाज या नतर नादिरशहाने लोकाना लुटले त्यावेळी लोकानी मारलेल्या करुण किंकाळ्या ऐकू आल्या अंतिम मोगल सम्राट बहादुरशहा याच्या काळात चालणारी मिर्झा गालिब यांची शेरशायरी, उर्दू काव्याच्या मैफली केवळ आवाजांच्या साहाय्याने आपल्यासमोर साकार होतात

इ स १८५७ साली दिल्ली स्वातत्र्यसग्रामाचे केंद्र होते त्यावेळी ८० वर्षांच्या वृद्ध बहादुरशहाला जनसमुदायाने हिंदुस्थानचा ' शहेनशहा ' घोषित केले परतु ब्रिटिश अधिकाऱ्यांपुढे राजाला हार खावी लागते बहादुरशहावर तेथेच खटला भरून त्याची बेगम झीनतमहलसह रंगूनला कैदी म्हणून रवानगी करण्यात येते

नतर एका नव्या युगाची वाटचाल सुरू होते महात्मा गाधीच्या नेतृत्वाखाली परदास्यशृखला तोडण्यास भारतीय सज्ज होतात यानतर आझाद हिंद फौजेच्या दिल्लीवरील अयशस्वी मोर्चानतर त्यातील तीन अधिकाऱ्यावर भरलेल्या खटल्याचा इतिहासप्रसिद्ध प्रसग येतो त्यावेळी पडित नेहरू बचाव-पक्षाचे वकील होते

अंतिम प्रसंग १५ ऑगस्ट १९४७ चा आहे ज्यावेळी युनियन जॅक उतरून ध्वारा तिरंगा झेंडा फडफडला जातो त्यावेळी प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यानी लाल किल्ल्यान उभे राहून विशाल जनसमुदायासमोर केलेल्या भाषणाचा मूळ ध्वनिमुद्रित आवाज ऐकू येतो

ध्वनिप्रकाशाचा चतुराईने उपयोग केलेला हा सुंदर कार्यक्रम पाहून ऐतिहासिक लाल किल्ल्याचा निरोप घेतला व रात्री खासदार निवासात परतलो

दिल्लीतला पहिला दिवस मोगलकालीन ऐतिहासिक अवशेप– मकबरे, मशीदी, किल्ला पहाण्यात गेला होता मन उत्सुक झाले होते नव्या दिल्लीची जडणघडण पहायला

आम्ही जेथे उतरलो होतो त्या साऊथ अॅव्हेन्यू ब्लॉकपासून केवळ पाचच मिनिटाच्या अंतरावर असलेल्या नेहरू स्मारक संग्रहालयाकडे चालतच गेलो हेच पूर्वीचे तीनमूर्तीभवन प्रवेशद्वारासमोर एक स्मारक स्तंभ असून त्याच्या तीन बाजूला भारतातील तीन अनामिक लढवय्या जमातीच्या योद्धयाचे पुतळे आहेत त्यामुळेच या वास्तूचे नाव तीनमूर्तीभवन असे पडले प्रशस्त आवार असलेले हे भवन १९३० साली ब्रिटिशानी सरसेनापतीसाठी बांधले होते त्यानंतर भारताचे पहिले पतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांचे ते वास्तव्याचे ठिकाण होते त्याच्या मृत्यूनंतर तीनमूर्तीभवनचे नेहरु स्मारक संग्रहालयात रूपांतर करण्यात आले तीनमूर्ती भवन हे केवळ भारताच्या पहिल्या पतप्रधानाचे सोळावर्षांचे निवासस्थान नव्हे तर स्वातंत्र्यानंतर पंडिजींनी जगातील शांततेसाठी केलेल्या कामगिरीचे चिरंतन स्मारक आहे

भव्य पोर्चमधून प्रवेश केल्यावर प्रथम आहे स्वागतकक्ष तेथे प्रतिदिवशी सकाळी पंडितजी हसून आपल्या दर्शनासाठी आलेल्या लोकांचे स्वागत करीत असत त्याच्या भेटीला येणाऱ्या लोकात शेतकरी असत, मजूर असत, तरुण असत तसेच वृद्ध असत हातामध्ये बालके घेऊन येणाऱ्या माताही असत निरागस बालकेही असत भारताच्या कानाकोपऱ्यांतून सर्व थरातील लोकांची तेथे रीघ लागे तेथे आतील बाजूला पंडितजींच्या मृयुपत्रातील शेवटच्या इच्छेचा भारताच्या १४ भाषेत अनुवाद केला आहे त्यांनी लिहून ठेवले आहे की– 'त्याची रक्षा एका विमानातून आकाशात खूप उंचीवर नेऊन तेथून

भारतीय शेतावर पसरून द्यावी त्यामुळे रक्षा धूळ व मातीत मिसळून भारताचे एक अभिन्न अग बनून जाईल त्यांची आणखी एक इच्छा होती की, रक्षेचा काही भाग अलाहाबादला गगेत टाकावा त्यामागे त्यांची विशेष धार्मिक भावना नव्हती त्यांना बालपणापासून गगा–यमुनेचे आकर्षण होते गगामाई भारतीयावर निर्व्याज अव्याहत प्रेम करते, ती त्यांच्या आशा आकाक्षांचे आणि भारताच्या प्राचीन सस्कृतीचे प्रतीक आहे गगेसबधी पडितजीनी लिहून ठेवलेला हृदयस्पर्शी उतारा त्यांच्या इग्लिश भाषेच्या असामान्य प्रभुत्वाचा द्योतक आहे भारत व भारतीयांबद्दल पडितजीना वाटत असलेल्या दृढस्नेहाचे हे ' इच्छापत्र एक ज्वलत साक्ष आहे

तीनमूर्ती भवनच्या पिछाडीला प्रशस्त बगीचा आहे त्यात विस्तृत हिरवळ आहे पूर्वी तेथे गुलाबांच्या फुलाचे ताटवेच्या ताटवे असत एका पिंजऱ्यात वाघाचे पिल्लू असे हवा चागली असताना पडितजी या हिरवळीवर पाहुण्यांचे स्वागत करीत असत

एका दालनात पं नेहरूनी ७५ वर्षांच्या आयुष्यात जी सुमारे नऊ वर्षे (३२५१ दिवस) तुरुगात व्यतीत केली त्या विविध कालखडाच्या तारखाची नोंद आढळते

फिरता फिरता आम्ही पडितजी त्यांच्या शेवटच्या काळात एका झाडाखाली असलेल्या ज्या शिळेवर बसत असत तेथे पोहोचलो या दगडावर कोरलेल्या खालील शब्दानी मन हेलावून गेले

> " यदि कोई लोग मुझे याद करना चाहे तो मै चाहता हू कि वे यह कहकर याद करे; यह वह व्यक्ति था जिसने अपने समूचे मन और हृदयसे भारत और भारतीय लोगोंको प्यार किया और इसके बदले उन्होने भी इस व्यक्तिके सभी नाज–नखरे बर्दाश्त किये और उसे अपना भरपूर और असीम प्रेम प्रदान किया।

या शेजारीच जवाहरलालजीच्या ७५ व्या जन्मदिवसानिमित्त इ स १९६४ साली जवाहर ज्योत पेटविली गेली होती व भारताच्या काना-

कोपऱ्यात २५००० मैल वाटचाल करून मे १९६५ मध्ये ती येथे स्थापन केली होती येथील दर्शनीय स्थान म्हणजे पंडितजींची विदेश मंत्रालयाचा कारभार पाहाण्याची कचेरी त्यात सुंदर खुर्च्या, प्रशस्त मेज, आसनस्थ बुद्धाची मूर्ती, हस्तीदंती छबीवरील वाघाचे चित्र, महात्मा गांधींचे चित्र आणि कागद पत्रावर ठेवण्यासाठी पंडितजींनी जमा केलेले नदीच्या पात्रातील रंगीबेरंगी दगड आहेत आणखी मेजावर दिसत होते २७ मे १९६४ च्या डायरीचे पान जे दुर्दैवाने पुरे होऊ शकले नाही ! याच दालनात पं नेहरू यांच्या जीवनातील निरनिराळ्या विशेष प्रसंगांची छायाचित्रे आहेत त्यात नेहरू परिवाराचे आहेत तसेच स्वातंत्र्य संग्रामाशी निगडित व्यक्तींचेही आहेत

त्यानंतर दिसते पंडितजींचे ' अध्ययन कक्ष ' त्यात चारीही बाजूला विविध पुस्तके एकमेकांवर व्यवस्थित रचली आहेत त्यात इतिहास, अर्थ-शास्त्र, कविता, कादंबरी, विज्ञान इ सर्व विषयांची पुस्तके आहेत पंडित-जींच्या पुस्तकप्रेमाविषयी गमतीदार किस्सा ऐकायला मिळाला एकदा या भवनाची लिफ्ट बिघडल्यामुळे मध्येच अडकली त्यावेळी पंडितजी आपल्या शैलीदार पद्धतीने म्हणाले होते की–'माझ्या मनात सारखा हा विचार येतो की लिफ्टमध्ये पुस्तकांचा एक सेल्फ असायला हवा !' या अध्ययन कक्षातील भिंतीवर म गांधी, टागोर, मौ आझाद, अब्राहम लिंकन, बर्नार्ड शॉ यांची छायाचित्र आहेत पंडितजींचे पहाडावरील निरतिशय प्रेम प्रसिद्ध आहे अशाच एका भव्य पहाडाचे तेथे चित्र आहे

पंडितजींना देशातून व परदेशातून भेटीदाखल मिळालेल्या वस्तूत उत्कृष्ट कारागिरीच्या अनेक वस्तू आहेत त्यांचे व्यक्तिगत घड्याळही जपून ठेवले आहे शेवटी त्यांच्या शयनघराचे दर्शन होते त्यांच्या मृत्युदिनी असलेल्या स्थितीत ते ठेवले आहे शयनघरातही पंडितजींच्या आवडत्या पहाडाचा सुंदर फोटो आहे

संग्रहालय पाहिल्यावर पंडितजींच्या गहिऱ्या स्वभावाच्या पैलूचे दर्शन झाले ते केवळ राजनीतीज्ञ, राजकारणकुशल पुढारीच नव्हते तर कलासक्त, रसिक, गुणग्रहण करणारे होते म्युझियममधील निसर्ग चित्रे, पुस्तके, पुतळे इत्यादी विविध वस्तूंशी निगडित असलेल्या पंडितजींच्या आठवणींनी मन

औत्सुक्य, शोक, गौरव आणि श्रद्धा यांच्या समिश्र भावनेने ओतप्रोत भरून गेले आणि मूकमनाने पंडितजींना श्रद्धांजली अर्पण करून निरोप घेतला

बसने हार्डींग रेल्वेपुल ओलांडून जनपथवरील आंतरराष्ट्रीय बाहुल्यांच्या संग्रहालयात आलो जगातील विविध देशाच्या सुव्यवस्थित मांडून ठेवलेल्या सुंदर बाहुल्या पाहून उल्का-उदय तर आनंदाने नाचू लागले विशेषत आयर्लंड, स्वित्झर्लंड येथील खानदानी, लांब लांब झगे घातलेल्या राजेशाही बाहुल्या पाहून खूप करमणूक झाली या संग्रहालयात पाकिस्तानच्या बाहुल्या आहेत तशा नवीन उदयाला आलेल्या बांगला देशाच्याही आहेत प्रगत अशा रशिया अमेरिका या देशाच्या बाहुल्यांबरोबर अविकसित अशा आफ्रिकन देशाच्याही बाहुल्या आहेत जपानी बाहुल्या वैशिष्टयपूर्ण वाटल्या, आजारी बाहुली व तिची शुश्रुषा करणारी सखी पाहून मजा वाटली. हे संग्रहालय म्हणजे अखिल विश्वातील चिमुकल्या जगताचे राजकारणापासून अलिप्त असे आगळे प्रदर्शन होय खरोखर हे संग्रहालय वैशिष्टपूर्ण व संग्रहालयाच्या परंपरागत कल्पनेपासून वेगळे आहे शेवटच्या दालनात बहुभाषी भारतातील विविध प्रदेशातील बाहुल्या आहेत केरळपासून काश्मीरपर्यंतच्या आणि गुजरात राजस्थानपासून बंगालपर्यंतच्या विविध देखण्या बाहुल्या त्या त्या प्रदेशाची ओळख करून देतात पं नेहरूंच्या 'विविधतेतून एकात्मता' या कल्पनेचा या दालनात प्रत्यय आला

जनपथ व राजपथ या रस्त्याच्या क्रॉसिंगजवळ राष्ट्रीय संग्रहालयाची भव्य इमारत आहे तेथे प्राचीन कला, शिल्पपुतळे, रंगकाम, हस्तलिखिते, धातुवरील नक्षीकाम, जुनी वस्त्रागरे याचा उत्कृष्ट संग्रह आहे गांधर्व कला, मथुरा कला तसेच राजपूत मोगल कलाकृती यांचे नमुने आहेत गुप्ताच्या सुवर्ण काळातील बुद्धाचा पूर्णाकृती पुतळा विलोभनीय आहे शिवाचा नाचणाऱ्या हावभावातील ब्रॉंझचा पुतळा सुंदर आहे मोहोंजोदाडो (सिंध) कालीन ब्रॉंझची नाचणारी मुलगी आहे तसेच हडाप्पा (पंजाब) कालीन वस्तू आहेत

बाहुल्यांच्या म्युझियम शेजारीच काही अंतरावर 'बालभवन' आहे प्रशस्त बागेत वसलेल्या या बालभवनात विविध वयाच्या मुलामुलींनी रंगविलेली चित्रे पाहून करमणूक झाली या बालभवनातील विविध वक्र आरशात

दिसणाऱ्या स्वतःच्या उंच, बुटक्या, जाड, पातळ अशा विविध प्रतिमा पाहून हसता हसता बेजार झालो !

मथुरा रोडवर न्यायाचे प्रतीक असलेल्या तराजूच्या आकाराची सुप्रीम कोर्टाची भव्य चार मजली शानदार इमारत आहे सुमारे एक कोटी रुपये खर्च करून चार वर्षांत ती पूर्ण केली गेली कोर्टाला दसऱ्याची सुट्टी असल्याने वर्दळ कमी होती छोटासा पण इमारतीला साजेसा बगीचाही छान वाटला

यमुनेकाठी असलेल्या राजघाट, शांतीवन, विजयघाट या भारताच्या तीन आद्य शिल्पकाराच्या स्मारकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आलो

राजघाट भोवती असलेला बगीचा व प्रशस्त हिरवळ राष्ट्रपित्याच्या स्मारकाच्या शांत व पवित्र वातावरणात भर घालीत होती ओटयावर 'हे राम' हे गांधीजींचे अखेरचे शब्द कोरले आहेत समाधी भोवती असलेल्या गुळगुळीत गोटयांपैकी एक दोन गोटे आठवण म्हणून मुलांनी आणले

शांतीवनातील पं नेहरूंच्या समाधीवर त्यांची आवडती गुलाबाची फुले पसरलेली होती समाधी साधी असून आजूबाजूला बगीच्याचे काम चालू होते पंडितजींच्या आवडत्या गुलाबाच्या फुलाचा हार अर्पण केला

विजय घाटातील स्वर्गीय लालबहादूर शास्त्री यांच्या समाधीवर त्यांनी दिलेली व लोकप्रिय केलेली '**जय जवान जय किसान**' ही हाक कोरलेली आहे

मोगल सम्राटाच्या कबरींच्या तुलनेने ही तीन स्मारके भव्यतेपासून अलिप्त अशी साधी आहेत पण हे तिघे भारताचे आद्य शिल्पकार असून त्यांच्याबद्दल जनतेच्या हृदयात सम्राटापेक्षाही अधिक स्थान आहे !

आदल्या दिवशी ठरवून घेतलेल्या वेळेप्रमाणे संध्याकाळी बरोबर सात वाजता आम्ही ना श्री अण्णासाहेब शिंदे यांच्या मोतीलाल नेहरू मार्गावरील निवासस्थानात दाखल झालो श्री अण्णासाहेब व सौ हिराबाई यांच्याशी गप्पा गोष्टी करताना नगरच्या जुन्या आठवणींना खूप उजाळा मिळाला सौ हिराबाई आग्रह करून मुद्दाम खास बनविलेले पालक पकोडे बशीत वाढत होत्या तासभर गप्पा मारता मारता आमच्या पुढील प्रवासाची ते माहिती घेत होते त्यांनी आस्थेवाईकपणे श्रीनगर, चंदीगड बाबत मार्गदर्शनपर माहिती दिली मंत्री महोदयाकडील ही अल्पशी भेट दीर्घकाळ स्मरणात राहील इतकी

औपचारिकपणाचा लवलेशही नसलेली, खास कौटुंबिक स्वरूपाची झाली भेट आटोपून तासाभराने आम्ही परत मुक्कामी आलो

दिल्लीतील वास्तव्याचा शेवटचा दिवस 'राष्ट्रपती भवन' च्या भेटीने सुरू झाला या महान राजप्रासादतुल्य वास्तूला भेट देण्यासाठी तेथील स्वागत विभागाकडे ओळखपत्र दाखविल्यावर त्यानी बरोबर मार्गदर्शक दिला तांबड्या दगडाने बांधलेले हे भवन स्वातंत्र्यपूर्व काळात व्हाईसरॉय याचे निवासस्थान होते जागतिक कीर्तीचे ब्रिटिश वास्तु शिल्पकार सर एडविन ल्यूटन व सर हर्बर्ट बेकर यानी पाश्चात्य व पौर्वात्य शिल्पकृतीचा संगम करून प्रमाणबद्ध अशी आखणी केली सुमारे ३३० एकराच्या भव्य आवारात राष्ट्रपतीभवन आगळ्या रुबाबाने उभे आहे

प्रथम 'दरबार हॉल' मध्ये प्रवेश केला या गोलाकार घुमटधारी हॉल-मधील राष्ट्रपतींच्या आसनावरून दूरवर सरळ रेषेत असलेल्या राजपथा-वरील इंडिया गेटच्या कमानीपर्यंतचे दृश्य टिपले जाते राष्ट्रपती पारितोषिक वितरणाचे कार्यक्रम तेथे होतात दुसरा भव्य हॉल 'अशोक हॉल' विविध देशांच्या राजदूतांचा स्वागत-समारंभ तेथे होतो तसेच मंत्र्यांचा शपथ ग्रह-णाचा कार्यक्रम तेथे होतो, छतावरील उंटाच्या कातड्यावरील चित्र आकर्षक आहे

राष्ट्रपती भवनातील 'डायनिंग हॉल' अप्रतिम आहे ऐंशीच्या लांब अस-लेल्या या हॉलमधील मधल्या लांबलचक चकचकीत मेजाच्या दोन्ही बाजूला उंची खुर्च्या मांडून ठेवल्या आहेत छतावरील झुंबरे हॉलला सौंदर्य प्राप्त करून देतात देशी-विदेशी पाहुण्याना या हॉलमधील राजशाही खाना खचि-तच आनंदित करीत असेल भिंतीवर माजी राष्ट्रपतींची तैलचित्रे आहेत

जिन्यातून परतताना मार्गदर्शकाने काचेच्या खिडकीतून आवारातील मोगल उद्यान दाखविले फुलांचा सीझन नसल्याने बगीचा फुललेला नव्हता डिसेंबर जानेवारीत हा बगीचा फुलानी बहरलेला असतो खास मोगल शैलीचा बगीचा व त्यातील कारंजी राष्ट्रपतीभवनाच्या शोभेत भर टाकतात उंच उंच स्तंभ, भव्य घुमट, लांबरुंद कॉरीडॉर, जिने, लॉबीज, बाल्कनी यानी राष्ट्रपती भवन सजले आहे

राष्ट्रपतीभवनानजीकच सेंट्रल सेक्रेटरीएटचे नॉर्थ ब्लॉक व साऊथ ब्लॉक

असे दोन भव्य ब्लॉक आहेत प्रत्येकाचे गोलाकार घुमट जमिनीपासून २१७ फूट उंच म्हणजे कुतुबमिनारापेक्षा केवळ सतरा फूट कमी उंचीचे असे आहेत जवळजवळ हजार दालने व आठ मैलाचे कॉरीडॉर आहेत ? यावरून या सेक्रेटरीएटच्या भव्यतेची कल्पना येईल ब्लॉकचा आतील भाग आकर्षक पद्धतीच्या भारतीय शैलीच्या सजावटीने नटलेला आहे सेंट्रल सेक्रेटरीएटमधील पंतप्रधान इंदिरा गांधीची कचेरी दुरूनच पाहिली

संसदभवनच्या गोलाकार वास्तूतील सभोवतीच्या व्हरांड्यातील सतरा फूट उंचीचे तांबड्या रंगाचे १४४ स्तंभ या वास्तूच्या आकर्षकतेत भर घालतात संसदभवन जवळजवळ अर्धा मैल लांबीचे गोलाकार आहे ओळखपत्र दाखविल्यावर बरोबर गाईड देऊन आत प्रवेश मिळाला लोकसभा सभागृहाच्या प्रेक्षकांच्या गॅलरीतून स्पीकरचे सीट, त्यांचे चेंबर, प्रेसगॅलरी पाहिले राज्यकर्त्यांच्या व विरोधी पक्षाच्या बसण्याच्या जागा पाहाताना संसद चालू नव्हते याची हळहळ वाटली- प्रत्येक सभासदाच्या आसनासमोर माईक असून पाहिजे त्या भाषेत कामकाजाचे भाषांतर ऐकण्याची पण सोय आहे यांत्रिक पद्धतीने मत नोंदविण्याची व मोजण्याची अत्याधुनिक सोयही पाहिली याच संसदभवनात राज्यसभेच्या कामकाजासाठी अलग हॉल व गॅलरी आहे बंगलोरच्या ' विधान सौध ' या वास्तूच्या मानाने संसदभवनचा रुबाब कमी वाटला फर्निचर जुने वाटले या संसदभवनासभोवातीचा जलमार्ग, कारंजी, बगीचा झाडी सौंदर्यशाली आहे

राष्ट्रपती भवनापासून सरळ रेषेत जाणाऱ्या राजपथावरील दुसऱ्या टोकाच्या बाजूला पूर्वेला इंडिया गेट ही दगडी कमान पहिल्या महायुद्धात कामास आलेल्या भारतीय युद्ध सैनिकांच्या स्मृतीसाठी उभारली आहे तेथे अखंड ज्योत तेवत ठेवली गेली आहे. या गेटच्या वरील भागावरून दिल्लीचे विहंगमय दृश्य दिसते बेचाळीस मीटर उंचीचे हे स्मारक पूर्वी ' वॉर मेमोरियल ' म्हणून ओळखले जाई

२६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी होणारे संचलन या गेटच्या मार्गाने सरळ राजपथमार्गे राष्ट्रपती भवनाच्या दिशेने जाते व दुतर्फा असंख्य प्रेक्षक अभिमानाने ते दृश्य पाहतात त्या दृश्याची मजा प्रत्यक्ष चाखायला एखाद्या २६ जानेवारीला हजर राहावे अशी मनात खूप इच्छा झाली

कॅनॉट प्लेसजवळील 'जंतरमंतर' ही खगोलशास्त्रविषयक वेधशाळा जयपूर नरेश राजा जयसिंहाने सव्वादोनशे वर्षांपूर्वी बांधली विटा आणि चाळूत बांधलेली ही वेधशाळा भारतातील जुन्या पाच वेधशाळांपैकी एक आहे जयपूरच्या मानाने येथे यंत्रांची संख्या कमी म्हणजे फक्त पाचच आहे सूर्य-चंद्र आणि नक्षत्रे यांच्या स्थिती व गतीविषयक अध्ययनाला उपयुक्त अशी रचना केली आहे सामान्य माणसाला आकलन न होणाऱ्या या यंत्रांची गाईडकरवी माहिती कळल्यानंतर प्राचीन प्रगत भारतीय खगोलशास्त्र-विषयक ज्ञानाची प्रचीती येते येथील प्रचंड सौर तबकडी प्रेक्षणीयच मध्ये पायऱ्या असलेल्या बदामाच्या अथवा पिंपळाच्या पानासारख्या आकाराच्या यंत्राच्या पार्श्वभूमीवर सुंदरसा फोटो काढला त्यानंतर बिर्ला मंदिर पाहण्यास आलो इ स १९३८ साली उभारलेल्या या मंदिरात लक्ष्मीनारायण, शिव, दुर्गादेवी यांच्या स्वतंत्र शोभिवंत मूर्ती आहेत म. गांधींनी हे मंदिर सर्वांसाठी खुले केले लगतच गीता मंदिर आहे तेथे भगवान कृष्णाची आकर्षक मूर्ती असून महाभारतकालीन प्रसंगावर आधारित चित्रे आहेत मंदिराला भेट मिळालेली काळ्या रंगाची चिनी घंटा आहे तसेच बुद्धाची मूर्ती आहे गुलाबी रंगाचे हे मंदिर जणू सर्व धर्म समभाव सहिष्णुतेचे प्रतीक आहे मंदिराच्या आवारात हत्ती, वाघ, सिंह यांच्या प्रतिकृती असून कृत्रिम गुहा, पाण्याचा छोटा कॅनॉल आहे

नव्या दिल्लीतील फॅशनेबल वस्तूंची आधुनिक बाजारपेठ आहे कॅनॉट प्लेस सर ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या भेटीनिमित्त हे गोलाकार मार्केट बांधण्यात आले कॅनॉट प्लेसच्या मध्यभागी गोलाकार हिरवळ, बँड स्टँड व उंचच्या उंच कारंजे आहे मार्केटचा बाह्य रस्ता १६० फूट रुंदीचा विशाल आहे या गोलाकार मार्केटचे स्तंभ शोभिवंत आहे

नव्या दिल्लीतील विविध देशातील राजदूतांच्या कचेरीच्या वसाहतींचा भाग 'चाणक्यपुरी' नावाने प्रसिद्ध आहे वास्तुशिल्पाचे विविध नमुने तेथे दिसतात प्रत्येक देशाचे ध्वज त्या त्या कचेरीवर फडकत होते अमेरिकन राजदूताची कचेरी आकर्षक आहे तेथील उंच उडणारी कारंजी व लीली पाँड शोभिवंत आहे नजीकच अशोक हॉटेलची डौलदार इमारत उभी आहे

दिल्लीतले तीन दिवसांचे वास्तव्य संपत आले होते लांबच्या लांब सरळ

प्रशस्त हमरस्ते, दुतर्फा गर्द झाडी, भव्य गोलाकार ट्रॅफिक आयलंड व सुंदर शहर रचनेमुळे दिल्ली शहर अत्याधुनिक वाटते विशेषत: पार्लमेंट हाऊस, राष्ट्रपती भवन, इंडिया गेटपर्यंत सरळ जाणारा राजपथ हा सर्वभाग कोरा चकचकीत वाटतो ब्रिटिशांनी कलकत्त्याहून दिल्लीला राजधानी हलविल्या-पासूनच या शहराच्या सलुलीत, रेखीव आखणीकडे कटाक्षाने लक्ष दिले आहे स्वातंत्र्याच्या वेळी सात लाख लोकसंख्या असलेल्या दिल्लीची लोक-संख्या सत्तर लाखावर पोहोचली दिल्लीत हिंदू मुसलमान सर्व धर्मपंथाचे लोक आहेत आजची दिल्ली आहे 'कॉस्मोपॉलिटन' राजधानीचे शहर असल्याने देशोदेशीचे आंतरराष्ट्रीय संस्कृतीचे लोक दिसतात विभाजनानंतर पाच लाखावर शीख, पंजाबी निर्वासित आल्याने पंजाबी संस्कृतीची गहरी छाप पडली आहे दिल्लीच्या गजबजलेल्या रस्त्यात सायकलवरून सर्व कुटुंबासह जाणारा पंजाबी हमखास दिसणारच बसस्टँडवर रांग वगैरे प्रकार नाही बस आली की सर्वजण धक्काबुक्की करून बसमध्ये घुसणार तसेच टपावरही चढणार कॅनॉट सर्कस मॉड संस्कृतीचे दर्शक, नर शहाजहानने वसविलेल्या चांदनी चौकमध्ये फेरफटका मारताना जुन्या जमा-न्याची याद येते मुस्लीम काळात दिल्लीची प्रसिद्धी होती अमीर खुसरो, मिर्जा गालिब, मीर, बहादूरशाह जाफर या कवींसाठी मीरने म्हटले आहे—

**दिल्ली जो एक शहर था,**
**आलममे इंतेखाब ।**

शेरशायरीत रमून जाण्याची दिल्लीची परंपरा आहेच दिल्लीवर उर्दूचा खास प्रभाव पडला आहे स्वातंत्र्यानंतर दिल्ली शहराने जुनी कात टाकून दिली आहे दिल्लीचा दसरा रामलीला व रावण प्रतिमा दहनासाठी प्रसिद्ध आहे गणतंत्र दिवस तर उत्साहाने सणासारखा साजरा होतो जुन्या ऐति-हासिक पार्श्वभूमीवर नव्या दिल्लीची वाटचाल चालू आहे. पण एवढे मात्र खरे की—

**दिल्लीको देखा नही जा सकता ।**
**उसे खोजाही जा सकता ।**

☐

# काश्मीरच्या नंदनवनात–श्रीनगरकडे

रात्री सव्वानऊ वाजता श्रीनगर एक्सप्रेसने नवी दिल्ली स्टेशन सोडले वर्फ पडण्यापूर्वीचा शिल्लक राहिलेला काश्मीर सहलीसाठी एक आठवडा, दुर्गापूजा (दसरा) निमित्ताची सुट्टी आणि जम्मू जवळील वैष्णव देवीची यात्रा यामुळे गाडी खचाखच भरली होती आमच्या डब्यातील पंजाबी सरदारजी डब्यात गर्दी खूप असूनही दार बंद असल्याने खिडकीतून पंजाबी दोस्तांना आत घेत होते व गर्दी वाढवायला मदत करीत होते ! आम्हाला त्यातल्या त्यात बसायला बरी जागा मिळाली होती गर्दीमुळे डोळ्याला डोळा लागणे तर शक्य नव्हते रात्री अकराच्या सुमाराला पानिपत स्टेशन आले, तेव्हा थोडी गर्दी कमी झाली पानिपतच्या या रणभूमीवर पौराणिक कालापासून जय आणि पराजयाचा जो इतिहास घडला, त्याची आठवण झाली रात्री दोनच्या सुमाराला अंबाला कॅन्टोन्मेंट स्टेशन आले तोपर्यंत झोप लागली नाही मग मात्र निद्रेच्या आधीन झाल्यावर सरहिंद, लुधियाना जालंदर ही स्टेशने केव्हा येऊन गेली कळले नाही पहाट झाली, फटफटायला लागले, तेव्हा गाडी नदीच्या भव्य पुलावरून चालल्याचे कळले अगदी थोड्याच वेळात सकाळी सातच्या सुमाराला गाडी पठाणकोट स्टेशनच्या

प्लॅटफॉर्मवर थांबली आजच्या पठाणकोटचे पूर्वीचे नाव होते औदुम्बर किंवा प्रतिष्ठानपूर आमच्या सर्क्युलर तिकिटाचे शेवटचे ठिकाण पठाणकोट होते तिकिटावर टी सी करून प्रवास खंडित झाल्याची नोंद करून घेतली काश्मीरची सफर करून एक आठवड्याने पठाणकोटला परतायचे होते पुढे ओझे वाळगायला नको म्हणून अनावश्यक सामानाची एक बास्केट व एक सूटकेस क्लोकरूममध्ये ठेवली स्टेशन लगतच बसस्टँड आहे पठाणकोट–श्रीनगर बस तयार होती बस लक्झरी असल्याने दीडपट भाडे प्रत्येकी ३० रु होते शिवाय लहान मुलानाही पूर्ण तिकिट यामुळे मुलाची तीन व प्रौढ माणसाची तीन अशा एकूण सहा तिकिटासाठी १८० रु खर्च आल्यावर काश्मीरमध्ये पैशाची उधळण चिकार करावी लागणार याची जाणीव झाली

गडबडीत चहा घेतला बस सकाळी ठीक आठला सुटली रेल्वेच्या रात्र-भराच्या प्रवासाच्या कचाटयातून तासाभरापूर्वीच सुटलो होतो आणि आता सुरू झाला होता ४०० कि मी लांबीचा १४ तासांचा बस प्रवासाचा मोठा टप्पा पठाणकोट सोडताना जवळपास लष्करी छावण्या दिसत होत्या थोड्याच वेळात लखनपूर नजीक रावी नदीचा प्रचंड पूल पार करून जम्मू विभागात प्रवेश केला नदीच्या भव्य पात्रात पाण्यापेक्षा दगडगोटेच जास्त दिसत होते। उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर हिवाळ्यापेक्षा नदीला पाणी अधिक असते अशी माहिती बसकंडक्टरकडून कळली लखनपूरला तपासणीसाठी फार वेळ गेला पठाणकोटला घाईघाईने घेतलेल्या चहामुळे तल्लफ न गेल्याने परत एकदा चहा घेतला गाडी सुरू झाल्यावर वाटले की जम्मू पहायला मिळेल परंतु पठाणकोट-जम्मू-उधमपूर-श्रीनगर या राजमार्गाने न जाता ड्रायव्हरने झालेला उशीर भरून काढण्याच्या हेतुने शॉर्ट कटने जम्मू टाळून सांभा–मन्सार–मानवल–उधमपूर या नवीन मार्गाने गाडी काढली सांभा येथे मोठा लष्करी तळ दिसला प्रचंड डोंगराच्या कडेकडेने घाट रस्ता सुरू झाला. वळणामागून वळणे घेत गाडी मन्सार गावाजवळून गेली तेव्हा एक निसर्ग-रम्य तळे दिसले तळ्यात कमळाची पाने खूप दिसली. सीझन नसल्याने फुले मात्र दिसली नाहीत मागाहून कळले की मन्सार तळे कमळासाठी प्रसिद्ध आहे. पाहता पाहता भर दुपारचे बारा वाजले, पण उन्हाचे चिन्ह नाही उलट बसमध्ये गार वाऱ्यामुळे थंडी वाजत होती डोंगरामागून डोंगर

ओलाडले तरी गावाचा पत्ता नव्हता शेवटी दुपारी दीडच्या सुमारास उधमपूर गाव आले तेथे लष्कराच्या प्रचड छावण्या दिसल्या बस परत पठाणकोट–श्रीनगर राजमार्गावर आली पोटात भुकेने कावळे कोकायला लागले होते प्रवासी दमले होते पण ड्रायव्हर दमला नव्हता तो म्हणाला, "पाऊण तासातच कूद गाव येईल तेथे जेवण घेऊ !" दुपारी अडीचच्या सुमाराला कूदला बस आली कूद समुद्रसपाटीपासून जवळजवळ ५७०० फूट उचीवर आहे झोबणारे वारे भर दुपारी हैराण करीत होते याच गावी पूर्वी काश्मीरचे मुख्यमत्री शेख अबदुल्ला यांना कैदेत ठेवले होते अशी माहिती मिळाली.

काश्मीरच्या खोऱ्यातील पहिल्या जेवणासाठी रस्त्याच्या बाजूच्या एका बऱ्यापैकी रेस्टॉरटमध्ये गेलो 'गरम क्या क्या है ?' नेहमीची सुरुवात झाली "आलूमटार, आलूगोबी, आलूपालक, पालकपनीर और चावल साथमे राजमा" वरणाऐवजी राजमा काय भानगड आहे म्हणून मागवले घेवडयाच्या बियासारखी तांबडया बियाची उसळ वरणाऐवजी भातावर प्रथम 'टेस्टी' वाटली कूद गावी मागे लागलेला हा 'राजमा' नतर आठवडाभर सतत ध्यावा लागल्यामुळे पुढे पुढे 'बोअर' झाला ! भात चागला लाब बासमती होता आलूमटारचा रस्सा चमचमीत होता रोटचा मात्र तव्यावरच्या नसून तदुरी होत्या ! जाड रोटयांची सवय करायला सुरुवात झाली. बरोबर लोणच्याची (जाहिरात नव्हे पण बेडेकरचे ) बाटली होती जेवणावर ताव मारला जेवण आटोपून लोणच्याची बरणी पिशवीत ठेवताना पाहिले तर पिशवीत ठेवलेल्या खोबरेल तेलाच्या बाटलीतले तेल पूर्ण गोठले होत ! भर दुपारी बोचणाऱ्या थडीची ही झलक होती तर !

तीन वाजता बसने कूद सोडले व बस डोगराची शिखरामागून शिखरे चढू लागली काश्मीर खोऱ्यातील खऱ्या निसर्ग दर्शनाला सुरुवात झाली. घनदाट वनराजीतून वळणे घेत घेत प्रवास मजेत चालला होता एका प्रदीर्घ वळणावरील फलकावर लिहिले होते

Stop the vehicle for a while,
Enjoy the beauty of the curve

खरोखर अत्यत विलोभनीय असे दृश्य होते डोंगराच्या माथ्यावरून कूद कडून येणारा रस्ता केसात घालायच्या हेअर पिनसारखा दिसत होता.

वेडीवाकडी वळणे नागमोडी होती दुपारची साडेतीनची वेळ पण सूर्याचे ऊन सकाळच्या कोवळ्या उन्हासारखे वाटत होते उंच उंच झाडांच्या रांगा सूर्याला झाकून टाकत होत्या व त्यातून सूर्यकिरणे डोकावत होती

'पटणी टॉप' या माथ्यावर बस पोहोचली तेव्हा निसर्गाचे सुंदर दृश्य दिसले उंच उंच झाडी, डोंगरामागे डोंगराच्या रांगा, दऱ्याखोऱ्या, गर्द झाडी गोलाकार वळणाचे रस्ते! छोट्या छोट्या टूरिस्ट हट्स् पाहून मुक्काम करण्याचा मोह व्हायला लागला

घाटमाथा ओलांडून बस वेगाने बटोटकडे धावू लागली तेथेही टूरिस्ट हट, बंगले आहेत या छोटेखानी ५११६ फूट उंचीवरील निसर्ग सुंदर गावात पूर्वी पठाणकोट--जम्मू--श्रीनगर प्रवास दोन दिवसात पूर्ण करताना एक दिवस रात्रीचा मुक्काम करायचे बटोटला ड्रायव्हरने उशीर होईल म्हणून गाडी थांबवली नाही संध्याकाळचे पाच वाजले होते चहाची आवश्यकता वाटत होती

बटोट ओलांडल्यानंतर रामबनजवळ काश्मीरच्या खोऱ्यातील दुसरी नदी-चिनाबचे दर्शन झाले हिरव्या रंगाचे पारदर्शक पाणी डोळ्यांना सुखवीत होते नदीचा पूल ओलांडला आणि नदीला रस्त्याने कुंपण घातले की रस्त्याला नदीने कुंपण घातले कळेनासे झाले कारण नदी व रस्ता जणू एकमेकांचा पाठलाग करीत होते उंच उंच डोंगर दऱ्यातून जाणारे वीजवाहक मनोरे दाखवून त्याची आखणी कशी झाली असेल? याबाबत यशवंत यांची कटाळवाणी वडबड चालू होती मी मात्र कृत्रिमपणे होकार देत निसर्ग सौंदर्याची मजा चाखीत होते

संध्याकाळचे सहा वाजले सूर्यास्ताची वेळ झाली होती आम्ही प्रसिद्ध बनिहाल खिंडीतले निसर्गदृश्य लुटीत जगप्रसिद्ध 'जवाहर' बोगद्यात आलो समुद्रसपाटीवर ७२५० फूट उंचीवर असलेला हा बोगदा स्थापत्यशास्त्र कुशलतेचा नमुना आहे पूर्वी या ठिकाणी घाटरस्ता डोंगरावर वळणामागून वळणे घेत जाई असे म्हणतात की, तो घाट रस्ता इतका गोलाकार होता की जर चारपाच बसेस त्या मार्गाने चढावर जात असतील तर दुरून एका-वर एक अशा चार बस जाताना दिसायच्या! तीन किलोमीटर लांबीच्या या बोगद्यामुळे ३३ कि मी अंतराचा वळसा वाचला, जाणाऱ्या वाहना-

साठी अलग, येणाऱ्या वाहनासाठी अलग, स्वतंत्र पादचारी मार्ग असा हा भव्य बोगदा म्हणजे काश्मीर खोऱ्याला उर्वरीत भारताशी जोडणारा दुवा होय जर्मन तत्रज्ञाच्या मार्गदर्शनाखाली भारतीय तंत्रज्ञ, कारागीर, असख्य मजूर यानी अहोरात्र खपून या बोगद्याचे काम लवकरात लवकर व्हावे, म्हणून दोन्ही दिशेने खोदकामाला सुरुवात केली व शेवटी नकाशा बरहुकूम दोन्ही बाजू शेवटच्या सुरुगाने जोडल्या गेल्या तेव्हा तत्रज्ञाच्या उत्साहाला, आनदाला सीमा राहिली नव्हती ! बोगद्यामध्ये भरपूर उजेडासाठी दिव्याची सुरेख व्यवस्था होती जवाहर बोगद्यातील सहा–सात मिनिटाचा रोमहर्षक प्रवास कायमचा आठवणीत राहील बोगद्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दोन्ही बाजूला लष्करी पक्का बदोबस्त आहे शिवाय फोटो काढायला बदी आहे बोगदा ओलांडल्यावर फुटलेला उजवीकडील रस्त्याचा फाटा आठ कि. मी असलेल्या वेरीनाग या जेहलम नदीच्या उगमस्थानाकडे जातो

कुदहून दुपारी तीनला निघालेली बस जवाहर बोगदा पार करून काझि-गुडला एकदाची सध्याकाळी सातच्या सुमाराला पोहोचली थडीमुळे प्रवासी गारठलेले होते बस थाबल्यावर प्रवाशांची हॉटेलमध्ये चहासाठी एकच गर्दी झाली होती भूकही लागलेली होती गरम गरम मोठे परोटे व चहाने ताजे-तवाने झालो सफरचदेही भरपूर दिसत होती परतु थडीत नकोशी वाटत होती

काझिगुड ते श्रीनगर ७० कि मी दोन तासाचा रस्ता होता रस्त्याच्या दोन्ही बाजूची सरळसोट झाडे उजेडात चमकत होती डोंगराळ प्रदेश सप-वून बस त्या मानाने सपाटीच्या प्रदेशावरून धावत होती बसमध्ये बसून बारा तास होऊन गेले होते सूटकेसमधून काढलेल्या शाली लपेटून श्रीनगरची प्रतीक्षा करता करता दिवे दिसू लागले होते उच मनोऱ्यावर दिवे दिसल्यावर कडक्टर म्हणाला, श्रीनगरचा विमानतळ आला नतर उच टेलिव्हिजन टॉवर-वरील दिवा दिसला जो तो प्रवासी सामानाची आवराआवर करू लागला

बरोबर रात्री साडेनऊ वाजता भव्य निऑन साईन बोर्डवरील शब्द दिसले

Kashmir Valley Welcomes to you

श्रीनगरच्या सरकारी टूरिस्ट रिसेप्शन सेटरच्या प्रवेशद्वाराच्या प्रशस्त आवारात बस थांबली श्रीनगरचे हे प्रवासी केंद्र भारतातीलच केवळ नव्हे

तर आशियातील अद्ययावत् अशा स्वरूपाचे प्रवासी केंद्र समजले जाते रात्रंदिवस २४ तास ते उघडे असते आलेल्या प्रवाशाचे स्वागत करायला व जाणाऱ्या प्रवाशाना बिदा करायला। मोठे मोठे ओव्हरकोट घातलेल्या हमालानी सामानाची उतराउतर केली ट्रूरिस्ट सेंटरच्या काउंटरवर चौकशी करता, दिल्लीहून कळविल्याप्रमाणे आमची तेथील फॅमिली ब्लॉकमध्ये सोय केल्याचे कळल्यावर रूमची चावी घेतली सेंटरमधील हॉल प्रशस्त आहे बऱ्याचशा प्रवाशांनी सकाळ उजाडल्यावर कुठे उतरायचे बघू या विचाराने तेथेच रात्री तळ दिला भव्य दुमजली अशा टूरिस्ट सेंटरमधील आमची रूम मोठी होती तीन बेडस् होते मध्ये उबदार गालीचा अथरलेला होता पडदे, टी पॉय, ड्रेसिंग टेबल होते शिवाय बाथरूम, स्वच्छतागृह जोडलेला स्वयपूर्ण असा तो ब्लॉक होता

खोलीत गेल्यावर थंडीमुळे चूळही भरावीशी वाटेना दिल्ली सोडल्यापासून एक सपूर्ण रात्र व दिवसाचा प्रवास झाल्याने शरीर भरगळले होते नुकत्याच खाल्लेल्या परोट्यामुळे विशेष भूक नव्हती थंडीमुळे बाहेर पडायला नकोसे वाटत होते ज्याने त्याने उबदार दुलईत स्वत:ला झोकून दिले पडल्यापडल्या काश्मीरबद्दलची पौराणिक कथा आठवली फार प्राचीन काळी तेथे एक जलाशय होता त्यात सती (पार्वती) नौकाविहार करी त्यावरून त्यास सतीसरोवर नाव पडले त्या जलाशयात जलोद्भव नावाचा एक राक्षस रहात असे आसपास राहणाऱ्या नाग लोकाना तो खूप पीडा देत असे त्याच्या विनतीस मान देऊन काश्यप ऋषीने पर्वतांची राग फोडून त्या सरोवरातील पाणी बाहेर सोडले जलाशयातील पाणी जसजसे कमी होऊ लागले तसतसे क्षणोक्षणी वाढणाऱ्या पर्वताखाली राक्षसाचे सामर्थ्य नष्ट होऊन तो गाडला गेला मीर म्हणजे पर्वत काश्यपाने सरोवर आटवून तयार केलेली भूमी म्हणून काश्यपमीर या नावाने पुढे 'काश्मीर' नाव प्रचलित झाले

काश्मीर खोरे ८० मैल लांब रुंद, समुद्रसपाटीपासून पाच ते सहा हजार फूट उचीवर, आकाराने ब्रिटन राज्यापेक्षा लहानच आहे इ स च्या तिसऱ्या शतकापूर्वीपासून काश्मीर सम्राट अशोकाच्या अधिपत्याखाली होते कनिष्क राजाच्या काळी ते बौद्ध धर्माचे केंद्र होते प्रवरसेन, ललितादित्य, अवतीवर्मन हे प्रसिद्ध राजे होऊन गेले १५ व्या शतकानतर ते मोगल अधिपत्याखाली

आले स्वातंत्र्यपूर्व एक शतक ते पंजाबचा शीख राजा रणजितसिंहाचा सरदार महाराजा गुलाबसिंह याच्याकडे होते काश्मीरच्या खोऱ्यातील नैसर्गिक सौंदर्याचा खरा आस्वाद मोगल सम्राटांनी भरपूर घेतला दिल्ली, आग्रा येथील उष्णतेला कटाळून मोगल सम्राट काश्मीरला वारवार भेट द्यायचे अकबरानें कित्येक वेळा भेट दिली

जहांगीर नूरजहानने वारवार भेट देऊन काश्मीरमध्ये प्रसिद्ध शालीमार, वेरीनाग, अच्छाबल येथे उत्कृष्ट बागा तयार करून घेतल्या ! जहागीर तर मरणोन्मुखी असताना " काश्मीर, दुसरे काही नाही " असे उद्‌गारला !

सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू एनत्सग याने काश्मीर खोऱ्यात सातव्या शतकात दोन वर्षे वास्तव्य केले त्याने काश्मीरमधील विपुल फुले, फळे व सुंदर दिसणाऱ्या नागरीकांचे वर्णन केले आहे

चिनाब, रावी, सिंध, लिदर, जेहलम नद्यांच्या झुळझुळ वहाणाऱ्या प्रवाहाने काश्मीर खोऱ्याला तजेलदार रूप दिले आहे तर दल, नागिन, वुलर मानसबल ही सरोवरे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहेत नद्या व सरोवराप्रमाणेच येथील पिरपजाल, नगा, अफर्वत शेषनाग अमरनाथ या निरनिराळ्या पहाडाची मोत्यासारखी चमकणारी हिमशिखरे यांच्या प्रेमात पडून पर्यटक काश्मीर खोऱ्यात रमून जातो चष्मेशाही, निशात, नसीम, अच्छाबल, शालीमार या येथील प्रसिद्ध बागा देवदार, सफेदा, चीड, फर, पाईन या वृक्षराजींची शोभा अद्‌भुत आहे पण काश्मीरचे खरे वैशिष्ट्य आहे चिनार काश्मीरच्या विचारतरंगात रात्री निद्रेच्या आधीन केव्हा झाले कळले नाही

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२५
२३५०८
प्रवास १२५८

# जेहलम नदीतील फेरफटका, मोगल उद्याने

सकाळची आठची वेळ, "नळाला गरम पाणी सुटले आहे चला लवकर लवकर आंघोळी करून घ्या." ह्यांच्या आवाजाने उठले, तेव्हा कळले की— आपण श्रीनगरच्या टूरिस्ट सेंटरमध्ये आहोत उठून मुलांच्या आंघोळी आटोपल्यावर नळाला गरम ऐवजी गार पाणी येऊ लागले बहुधा तोपर्यंत सेंटरमधील निरनिराळ्या खोल्यातील सर्व प्रवाशांनी गरम पाण्यावर हल्ला मारायला सुरुवात केल्यामुळे वरच्या विजेच्या बॉयलरमधील गरम पाणी संपुष्टात आले होते गरम पाण्याच्या नळातून बर्फतुल्य थंड पाण्याचा झरा वाहू लागला ! त्यामुळे आंघोळीचा नाद सोडून दिला हातपाय धुतल्यावर केसांना तेल लावावे म्हणून तेलाच्या बाटलीला हात लावला तर सकाळी गरम पाण्यात ठेवून वितळवलेले तेल परत गोठलेले ! शेजारच्या कॅंटीनमधून ट्रेमध्ये आलेल्या चहाने 'बेड टी' ची हौस करून घेतली चहाने थोडाबहुत तरतरीतपणा आला सेंटरमधून बाहेर पडल्यावर छोटयाशा कांगडीने (वेताची परडी) शेकत बसलेला एक टांगेवाला दिसला त्याला गावातील प्रसिद्ध लाल चौकाकडे चलण्यास सांगितले लगेच त्याने कांगडी कोटाआड पोटाजवळ ठेवली उदय म्हणाला— "टांगेवाल्यांना चटका बसत नाही का

आई ?" कां गडीने शेकणाऱ्या टांगेवाल्याची सर्वांना मौज वाटली

टांग्यातून मैलभर अंतरावरील श्रीनगरच्या प्रख्यात लाल चौकात आलो. लाल चौक म्हणजे शहराचा आत्मा! तेथे बाजारपेठ आहे. बसस्टँडही आहे. सकाळचे नऊ वाजले होते. थंडीमुळे दुकाने उघडली नव्हती. फूटपाथवर उन्हात उभ्या असलेल्या गोऱ्यापान काश्मीरी लोकांचे दर्शन झाले. गरम गरम पुऱ्या व भाजीवर ताव मारला व पायीच चौकापासून नजीक असलेल्या जेहलम नदीवरील तिसऱ्या पुलाजवळ आलो. श्रीनगरला वेढा घालणाऱ्या जेहलमला नऊ पूल (कदल) आहेत. पहिला अमीर कदल, दुसरा बडशाह—हा नवा पूल आहे. तिसरा फतेह कदल इत्यादि. एक शिकारा ठरवून त्यातून जुन्या श्रीनगर शहराचा फेरफटका मारण्यास सुरुवात केली.

काश्मीर महाराजाचा राजवाडा, असेंब्ली हॉल, रघुनाथजीचे मंदिर नदीकाठीच आहे. नदीकाठी लाकडाने बांधलेली आयताकृती आकार असलेली शाह हमदानची मशीद आहे. मशिदीचे कळस ब्रह्मी पगोड्यासारखे असून, उंच लाकडी खांबांवर व छतावर नक्षीयुक्त कोरीव काम आहे. मशिदीत आकर्षक झुंबरे व सुन्दर गालीचे आहेत. नदीकाठी असलेल्या शाह हमदानच्या मशिदीखालीच ॐ लिहिलेले हिंदूंचे छोटे मंदिर आहे. शेजारी महाकालीचे मंदिर आहे. नदीच्या डाव्या तीरावर जुन्या श्रीनगरमध्ये गुळगुळीत दगडांची मशीद नूरजहान राणीने बांधलेली आहे. ती पाहून नूरजहानच्या धार्मिक अंगाबद्दल कौतुक वाटले. असे म्हणतात की एका स्त्रीने ही मशीद बांधली म्हणून तथाकथित धर्मगुरु त्यामध्ये प्रार्थना करण्यास नाखूष होते. मशीदी शेजारीच उंच कट्टा बांधलेला आहे. तेथून शेख अब्दुल्ला भाषण करीत.

शिकाऱ्यात बसून तीन तास जेहलमच्या हिरव्यागार पाण्यात सफर केली होती. नदीकाठी असलेल्या लाकडावरील कोरीव कामाच्या एका कारखान्यात अक्रोडाच्या लाकडावर कलापूर्ण काम केलेल्या विविध वस्तू होत्या. लाकडी हाऊसबोटचा सेट आठवण म्हणून खरेदी केला. तसेच सिल्क व वुलन कापडाची अनेक दुकाने होती. वुलन कोट, लेडीज केप (फुलांची एम्ब्रॉयडरी केलेली ओव्हर कोटसारखी शाल) व काश्मीर सिल्कची साडी पसंत करून अॅडव्हान्स दिला. नगरला परतल्यावर व्ही. पी. ने आलेल्या मालात काही गफलत नसल्याचे पाहून समाधान वाटले! सिल्कची साडी इतकी तलम होती

की–बागडीतून आरपार जायची एव्हाना दुपारचा एक वाजला होता पुला नजीकच्या हॉटेलमध्ये जेवण घेताना पुन्याचा बेत आढळला दसऱ्याच्या सणाच्या दिवशी काश्मीरच्या दऱ्याखोऱ्यांत सीमोल्लघन करायला मिळाल्या-बद्दल आनद वाटला

जेवण आटोपून लाल चौकाजवळ असलेल्या स्टॅंडवर येऊन काश्मीरमधील भेट द्यावयाच्या तीन गावांचे गुलमर्ग, सोनमर्ग, पहलगाम असे तीन दिवसाचे बुकींग केले श्रीनगर पाहाण्यासाठी एक दिवस राखून ठेवून पाचव्या दिवसाचे जम्मूचे परतीचे तिकीट काढून ठेवले पुढच्या प्रवासाची चारीही तिकीटे काढून ठेवल्यामुळे निर्धास्त झालो अगोदर तिकीटे काढल्याने सीट्स पुढची मिळतात प्रवासाची आखणी केली नाही तर तिकीटासाठी वेळ वाया जातो, निराश व्हावे लागते काही प्रवासी सांगत होते की काय पाहायचे ठरवायला व तिकीटे मिळवायला दोन दिवस वाया गेले त्यामुळे ते हळहळत होते

दुपारचा कार्यक्रम होता मोगल उद्याने पाहाण्याचा मोगल सम्राटांनी पधराव्या व सोळाव्या शतकात श्रीनगर शहराच्या परिसीमेच्या बाहेर दल सरोवरच्या तिन्ही बाजूला ती उभारली आहेत या बागा मोगल सम्राटाच्या रसिकतेच्या व त्याच्या सौंदर्य दृष्टीच्या द्योतक आहेत या मोगल उद्यानांपैकी श्रीनगरच्या सर्वात जवळ आहे–चश्मेशाही श्रीनगरपासून नऊ कि मी अतरा-वर असलेला हा बगीचा शहाजहानने उभारला आहे पुढे आहे नूरजहानच्या भावाने–आसफखानने उभारलेली निशात बाग. निशात बागेच्या विरुद्ध दिशेला दल सरोवराच्या पश्चिम तीरावर आहे, अकबराने उभारलेली नसीमबाग शेवटी निशात बागेच्या पुढे श्रीनगरपासून पधरा कि मी. अतरावर आहे जहागीरने उभारलेली शालीमार !

उच उच हिरव्यागार डोंगराच्या पार्श्वभूमीवर दल सरोवराचे सपूर्ण दृश्य टिपणाऱ्या या सदा बहरलेल्या बागा म्हणजे सौंदर्याचा अमोल खजिनाच कलापूर्ण जागेची निवड हे पहिले वैशिष्ट्य दुसरे म्हणजे डोंगराच्या उतरणीचा फायदा घेऊन उतरणीवर टप्प्या टप्प्यात बाग उभारावयाची कारजी, धबधबे-यांनी बहार आणायची या मोगल उद्यानात 'बारादरी' हमखास आढळते. बारादरी म्हणजे चारी बाजूला बारा दरवाजे असलेला सुबक मंडप चहू-बाजूनी येणाऱ्या ताज्या हवेचा आस्वाद घेण्याचा दृष्टीने किंवा पावसाळ्यात

आडोसा या दृष्टीने बारादरीचा उपयोग होतो बारादरीचे बांधकाम प्रातिनिधिक हिंदू पद्धतीचे वाटते या उद्यानाचा फेरफटका दल सरोवराच्या काठी असलेल्या रस्त्याने बगने जाऊन मारता येतो अथवा दल सरोवरात शिकाऱ्याने जलविहाराची मजा चाखीत सफर करीत सुद्धा तेथे जाता येते

श्रीनगरपासून सर्वात जवळ असलेल्या चश्मेशाही बगीच्यात प्रथम प्रवेश केला चश्मा म्हणजे झरा हा शाही झरा असलेला बगीचा शहाजहानने चारशे वर्षांपूर्वी वसविला श्रीनगरजवळ असलेल्या बगीच्यांमध्ये आकाराने हा सर्वात लहान आहे उंच उंच डोंगराच्या उतरणीवर बर्फतुल्य थंडगार पाण्याच्या नैसर्गिक झऱ्याभोवती हा बगीचा वसविला आहे या झुळझुळ वाहणाऱ्या नैसर्गिक झऱ्याचे पाणी पाचक व औषध गुणांनी युक्त असे आहे डोंगराच्या उतारावर दहा टप्प्यात ही बाग कल्पकतेने वसविलेली आहे कारंजांमुळे बागेच्या शोभेत अधिकच भर पडली आहे खूप उंचीमुळे समोरच्या दल सरोवराची व आजूबाजूची निसर्गशोभा अवर्णनीय दिसते

निशात बाग म्हणजे आनंदोद्यान पहिल्या टप्प्यावर जेव्हा पायऱ्यांनी चढून आलो तेव्हा निशात बागेतील रंगीबेरंगी फुलांनी डोळ्यांचे पारणे फेडले नूरजहानचा भाऊ आसफखान याने सोळाव्या शतकात तयार केलेली ही बाग अनुपम, सुंदर आहे दहा टप्प्यात असलेली ही बाग शालीमारपेक्षा वयाने लहान असून आकाराने मोठी आहे रंगीबेरंगी फुलांच्या रांगा, बगीच्याच्या मध्यभागातून झुळझुळ वाहणारा पाण्याचा झरा, सुंदर गोलाकार छत्रीसारखे कापलेले वृक्ष अशा प्रकारे संगळ्या बागेची आखणी कलात्मक वाटते मागील उंचच्या उंच पहाडाच्या नैसर्गिक पार्श्वभूमीसमोरील विस्तृत दल सरोवराचा संपूर्ण देखावा ही बाग जणू कबजात आणते ! सर्वात उंच टप्प्यावरून दल सरोवराचे मनोहारी दृश्य दिसते टप्प्यामागून टप्पे ओलांडले तरी रंगीबेरंगी फुले पाठ सोडीनात ! इतके दिवस ख्याती ऐकलेल्या टपोऱ्या टपोऱ्या, निरनिराळ्या रंगाच्या —केशरी, गुलाबी, फिकट आणि गडद, तांबड्या गर्द, पिवळ्या धमक गुलाबांच्या फुलांच्या अजब स्वर्गीय दुनियेत आपण वावरत आहोत याचा आनंद झाला हातात मावत नव्हती एवढी टपोरी फुले काश्मीरी टपोरे गुलाब वेणीत घालायला आणि कोटावर अडकवायला स्त्रीपुरुष यांची अहमअहमिका लागली होती प्रवाशांना गुलाबाची फुले पाहून होणाऱ्या

आनंदाचा पीक् पॉइंट ध्यानात घेऊन बागेतील माळी एक रुपयाला दोन दराने प्रवाशांच्या आवडीनिवडीप्रमाणे गुलाब फुले तोडून द्यायचे चिमुकले उदय, उल्का तर गुलाबाच्या फुलांसाठी भांडू लागले समग्र बगीचाभर दिमन होते गुलाब आणि गुलाब हातात न मावणारे गुलाबाचे फूल घेऊन उदय हौसेने मिरवीत होता खरोखर 'निशात बाग' दृष्ट लागण्याइतकी अप्रतीम आहे बगीच्यातून परतण्यासाठी पाय निघता निघेना! तेव्हा आठवले की– जेव्हा जहांगीरने या बागेला प्रथम भेट दिली, तेव्हा आपण वसविलेल्या शालीमार बागेपेक्षा ही बाग अधिक सुंदर आहे हे त्याने आश्चर्याने मान्य केले

दल सरोवराच्या पश्चिमेला निशात बागेच्या विरुद्ध दिशेला आहे अकबराने वसविलेले '**नसीम बाग**' नसीम बाग म्हणजे प्रातःकालीन झुळझुळवाहणाऱ्या सुगंधी शीतल वायूची बाग चिनार वृक्षांची रेलचेल हे या बागेचे वैशिष्ट्य! पूर्वी त्यात असणाऱ्या हजार बाराशे चिनार वृक्षामुळे पहाटे झुळझुळणारा सुगंधी वारा वाहायचा सध्या फुलझाडांपेक्षा चिनार वृक्षांनी हा बगीचा भरलेला आहे

दल सरोवरातील विस्तीर्ण पाण्याच्या पार्श्वभूमीवर सूर्य अस्ताला जाण्यासाठी कलायला लागला होता त्यावेळी आम्ही श्रीनगरपासून सर्वात दूर शेवटच्या शालीमार बागेत पोहोचलो होतो मोगल सम्राट जहांगीरने चारशे वर्षांपूर्वी शालीमार बागेची म्हणजे प्रीतीच्या निवासस्थानाची आखणी केली होती डोंगराच्या उतरणीवर चार टप्प्याच्या बागेच्या जागेची निवड करण्यात मोगल सम्राटाच्या कल्पकतेचे कौतुक करावेसे वाटते हिरव्यागार उतरणीवरील या बागेत पडणारे निर्झराचे स्फटिकशुभ्र पाणी सौंदर्यात अधिक भर घालते या बागेत कारंजांची भरपूर रेलचेल आहे तशीच चिनार वृक्षांची! निशात बागेच्या मानाने रंगीबेरंगी फुलांचा बहर कमी असल्याने मात्र निराशा वाटली बागेमध्ये काळ्या संगमरवरी मंडपाभोवती शे–दीडशे कारंजी आहेत

अंधार पडायला लागला होता ध्वनिप्रकाशाच्या सहाय्याने नूरजहान जहांगीर यांच्या गुलाबी, रोमांचकारी प्रणयाचे वर्णन ऐकायला मन आतुर झाले होते बरोबर सात वाजता निवेदकाच्या ध्वनिमुद्रित केलेल्या उर्दू भाष्याने कार्यक्रमाला सुरुवात झाली

जहांगीरने इ स १६१८ मध्ये जेव्हा प्रथम सम्राटाची सूत्रे हातात घेतली

त्या वर्षी काश्मीर खोऱ्यातील या रम्य ठिकाणी प्रथम आल्यावर निसर्ग सौंदर्याने तो मोहित झाला घोड्याच्या टपटप अशा ध्वनिमुद्रित आवाजा-मुळे प्रत्यक्ष घोड्यावर स्वार झालेला जहांगीर डोळ्यासमोर तरळला मग ऐकू आला मलिका नूरजहानचा गोड आवाज लावण्यसुंदर नूरजहान ही केवळ जहांगीरची हृदयस्वामिनी नव्हती, तर ती एक चतुर, काव्यामध्ये रस घेणारी, उंची उंची अत्तराचा शौक असलेली, उंची वस्त्राचे कलात्मक डिझाईन करण्यात निपुण अशी असामान्य प्रतिभाशालिनी, रसिकपणे गुण-ग्रहण करणारी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची गुणवती प्रेमिका होती एकदा नूरजहान राणी बादशहाजवळ इच्छा प्रदर्शित करते की–दल सरोवरानजीकची उंच, हिरव्यागार सफेदा वृक्षांच्या दोन्ही बाजूला रांगा असलेली ही हिरवो-गार भूमी शाही प्रणयलीला करण्यासाठी नितांत सुंदर आहे तेव्हा तेथे बगीचा वसविला जावा राणीची इच्छा आणि सम्राटाचा हुकूम, मग कसला अवकाश ? पूर्वी तेथे दाट झाडी असलेल्या जंगलातील झाडे तोडण्याचा ध्वनिमुद्रित आवाज ऐकू आला मग प्रकाशाने चमकला एक संगमरवरी मंडप जो हसण्या खेळण्यासाठी तर बनविला होता ! तेथे उडणाऱ्या शे-दीडशे कारंजाच्या व झुळझुळ वाहणाऱ्या धबधब्याच्या साक्षीने रम्य चांदण्या रात्री आनंद लुटीत न जाणो कितीतरी मधुर क्षण नूरजहान–जहांगीर या प्रणयी युगुलाने घालविले असतील ! नंतर प्रकाशाच्या झोतात दिसले नूरजहानने आवडीने लावून घेतलेले चिनार वृक्ष ! याच चिनारवृक्षाच्या छायेत त्यांच्या प्रणयलीलांना बहर यायचा दल सरोवरातून डामडौलाने जेव्हा हा शाही काफिला शालीमार बागेत प्रथम आला, तेव्हा हसत खेळत गाऊन उठलेली शालीमार नजरेसमोर दिसली ! शालीमारने तेव्हा पाहिला होता, सदा बहरलेल्या फुलांचा मेळा !


नंतर कुशलतेने टिपलेला एक भावप्रसंग नूरजहान आणि जहांगीर यांचे एकदा भांडण झाले आणि नाही म्हटले तरी गोड प्रणयाला भांडणावाचून मजा नाही ! दोघांत बोलणे–चालणे एकदम बंद–अबोला ! नूरजहानची विश्वासू दासी राणीची पदोपदी विनवणी करते की– मला शहेनशहाकडे तुझ्यासाठी रदबदली करण्याची एकमेव संधी दे त्यावर नूरजहान उत्तरली, तो फार जिद्दी आहे तरी ती परत विनवणी करते, तेव्हा राजाकडे जायला

नूरजहान परवानगी देते दासीच्या पायातील घुगरांचा लयबद्ध ध्वनिमुद्रित आवाज ऐकून वाटते की– जणू दासी आपल्या नजरेसमोरून जात आहे. आणि मग ऐकू येतो मद्यात डुबलेल्या जहांगीरच्या सुरई आणि ग्लासाचा आवाज विरहावर मद्यासारखे दुसरे कुठले औषध असणार ? दासीला पाहून जहांगिराने रागाने फेकलेल्या ग्लासाचा आवाज ऐकू आला दासी परत येऊन सांगते तुमची नक्की खात्रीने दिलजमाई होणार कारण शहेनशहाने मला फक्त ग्लास फेकून मारला ! गळा दाबला नाही !! ती किमया असते दासीने नूरजहानच्या शृंगारासाठी खास गुंफलेल्या जादुभरी फुलाच्या गजऱ्याची ! आणि मग दुसरा दिवस शालीमारने पाहिला, सुगंधित संधिप्रकाशात दोन रुसलेल्या प्रेमिकांच्या पुनर्मीलनात धुंद फुंद झालेला, शराब आणि शरबत यात डुबलेला, मखमली मैदानावर संगीताने न्हालेला !


शेवटच्या दर्दभरी प्रसंगाची सुरुवात होते, जेव्हा जहांगीर प्रियेला सांगतो की या काश्मीर खोऱ्याला माझ्या हयातीत आठ वेळा भेट दिल्यानंतरची ही भेट ढासळल्या प्रकृतीमुळे शेवटचीच तर ठरणार नाही ना ? त्याची लाडकी राणी त्याच्या तोंडावर हात ठेवून म्हणते अल्लाजवळ मी प्रार्थना करते हे अशुभ खर ठरणार नाही ! जहांगीर म्हणतो मी आग्ऱ्याला परत जाताना जर काश्मीर खोऱ्यात दिवंगत झालो तर मला जेहलमच्या उगम-स्थानी वेरीनागला दफन कर हीच माझी शेवटची इच्छा !

ध्वनिप्रकाशाचा कार्यक्रम संपला होता जहांगीर नूरजहान यांच्या अमर प्रेमाचे प्रतीक असलेल्या शालीमारमधील या आगळ्या कार्यक्रमाने आम्हाला पोहोचवले होते, अशा एका जगतात की जेथे कारंजी थुई थुई करून मोरा-प्रमाणे बेफामपणे नाचत होती ! निर्झराचे झुळझुळणारे पाणी गात वहात होते ' उमललेली ताजी फुले बहरून सुगंधाचा खजाना लुटीत होती ! चिनार जहांगीर नूरजहानवर प्रेमाचा वर्षाव करीत होते ! शालीमारची साद–एक न विसरणारी सुनहरी याद होती...

□



श्रीनगर येथील नूरजहान राणीने बांधलेल्या मशिदीचे प्रांगण - श्री शेख अब्दुला भाषण करीत असताना.



दल सरोवराच्या पार्श्वभूमीवरील निशात बाग, श्रीनगर

लिदर नदीच्या खोऱ्यातील शांत पहलगाम



## सोनमर्गच्या सोनेरी कुरणात

बरोबर सकाळी नऊ वाजता सोनमर्गला जाण्यासाठी बसने श्रीनगर सोडले सिंधू नदीच्या खोऱ्यात वसलेले सोनमर्ग श्रीनगरपासून ईशान्येला समुद्र सपाटीपासून जवळजवळ ९००० फूट उंचीवर आहे गांधारबल सोडल्यावर वेळूल जवळ नदी ओलांडल्यावर नदी आणि रस्ता याचा पाठलाग सुरू होतो तो शेवटपर्यंत। स्फटिकासमान नितळ झुळझुळ वाहणाऱ्या पाण्याचा प्रवाह शेवटपर्यंत प्रवासाचा साथी होता वाटेत 'कंगन' गाव लागले आणि आम्हाला बर्फाने आच्छादिलेल्या डोंगराचे चकचकीत शिखर प्रथमच दिसले! सगळे प्रवासी आनंदित झाले तेथे कळले की दोनच दिवसांपूर्वी ह्या वर्षातला पहिला हिमवर्षाव झाला बसमधून जाताना ते बर्फाच्छादित हिमशिखर मोत्यासारखे चमकत होते वाटेत त्या नदीवरील एका धरणाचे काम चालू होते कॅनॉलमध्ये बंदिस्त केलेल्या नदीच्या पाण्याला नैसर्गिक अवखळपणे झुळझुळ वाहणाऱ्या प्रवाहाची सर कशी येणार? एका बाजूला फर व पाईन वृक्षराजीने झाकलेले डोंगर व दुसऱ्या बाजूने नदीचा खळखळाट हे मनोहारी दृश्य संपूच नये असे वाटे!

शेवटची अवघड खिंड आली सर्व प्रवासी जीव मुठीत धरून बसले होते

एका बाजूला डोंगराच्या कडेकडेने पोखरून काढलेला वेडावाकडा रस्ता होता, तर दुसऱ्या बाजूने नदीचा प्रवाह गाडीचे चक्र थोडेबहुत हुकले तर जलसमाधी मिळायची ! तरबेज ड्रायव्हरने कौशल्याने दुपारी बाराच्या सुमाराला सोनमर्गच्या सोनेरी कुरणात आणून सोडले

बसचा मुक्काम तेथे चार तास होता सोनमर्गच्या दक्षिणेला तीन कि मी अंतरावरील ताजवा या प्रसिद्ध ग्लेसियरला भेट द्यावयाची होती बस स्टॅंडजवळच तट्टूवाले मागे लागले होते तसेच ओव्हरकोटही भाड्याने मिळतात तेथील लोक ग्लेसियरजवळ खूप थंडी आहे, गारठून जाल तेव्हा ओव्हरकोट भाड्याने घेणे किती जरूर आहे पटवून सांगत होते मुले बसस्टॅन्ड वरच थांबणार असल्याने तट्टू न करता पायीच प्रवास करायचा ठरविले मात्र ओव्हरकोट भाड्याने घेतले मोठ्या उत्साहाने चढण चढायला हौसेने सुरुवात केली वाटेत तट्टूवाले प्रवाशांना गप्पात गुंगवून चढ किती अवघड आहे थंडी किती जहाल आहे, सांगून बक्षिसीचे सूतोवाच करीत होते निम्मा चढ संपल्यावर दहा मिनिटे विश्रांती घेतली व ताजेतवाने होऊन परत चढ चढायला सुरुवात केली वाटेत येणाऱ्या प्रवाशाजवळ चौकशी केली अजून किती अंतर बाकी आहे ? यावर 'बहुत दूर' ऐकल्यावर धसका बसायचा वेड्यावाकड्या पाऊल वाटेने जाऊन नदीचा छोटासा लाकडी पूल ओलांडून आम्ही त्या ग्लेसियरच्या पायथ्याजवळ आलो तेव्हा डोंगराचा निम्म्यापेक्षा अधिक भाग बर्फाने आच्छादिलेला पाहून अवघड चढ चढून आल्याचे सार्थक वाटले तेथे चहाची दोन छोटी दुकाने होती गरम गरम चहाने त्या कडाक्याच्या थंडीत ऊब मिळाली पर्वताच्या पायथ्याला भर दुपारी दाट सावली पडली होती. सूर्याचे दर्शन नव्हते आणि थडगार वारा अंगाला झोंबत होता !

तेवढ्यात ह्यानी एक दृश्य दाखविले एक पांगळा मध्यमवयीन प्रवासी कुबड्याचा आधार घेऊन हिमशिखरे न्याहाळत होता ! एक सरदारजी सहप्रवासी त्या कुबड्याधारी प्रवाशाला म्हणाला– "कमाल है आपकी भाईसाहब । आप तो जवानोंके जवान है ।" त्यावर तो कुबड्याधारी प्रवासी म्हणाला– "पाँव कमजोर है लेकिन दिल कमजोर नही है ।" हा सवाद ऐकल्यावर तट्टावर बसून आलेल्या या प्रवाशाची जिद्द पाहून कौतुक वाटले नाही तर बसमधले निम्मे प्रवासी थंडीच्या व चढाच्या धास्तीने बसखाली

उतरले नाहीत व या अवीट आनंदाला मुकले !

काही हौसी तरुण प्रवासी थेट बर्फाच्छादित डोंगराच्या मध्यापर्यंत गेले व त्यांनी बर्फाचे तुकडे लोकरीच्या टोपीत घालून आणले सोनमर्गच्या या डोंगरापासून नजीकच चीनची हद्द असल्याने सोनमर्गला मिलीटरी कँप होता आमच्या प्रवासाने चीनची सरहद्द गाठली होती तर !

स्टँडकडे परतताना सोनेरी कुरणासाठी प्रसिद्ध असलेल्या डोंगराने वेढलेल्या सोनमर्गच्या खोऱ्यात मेंढपाळ शांतपणे मेंढ्याना चारीत असल्याचे दृश्य दिसले। परतताना नवविवाहित दांपत्य एकमेकाना आधार देण्यात गुग असलेली पाहून मजा वाटली तिला वाटायचे तो घसरतो आहे, नि त्याला वाटायचे ती घसरते आहे घसरत कोणीच नव्हते पण एकमेकांना जवळ यायला गर्दीपासून दूर अशी गिर्दीत दुसरी कुठली जागा असणार ?

हरमुख, गंगा इत्यादि शिखरे नजीकच आहेत। आम्ही गेलो तेव्हा थंडीला नुकतीच सुरुवात झाली होती कडाक्याच्या थंडीत बर्फ खाली पसरत पसरत पार डोंगराच्या पायथ्याच्या खाली रस्त्यापर्यंत येते हिमशिखरे, हिमनद्या इतक्या जवळून पहाण्यात एक विलक्षण आनंद झाला

स्टँडवर परतल्यावर ओव्हरकोट परत केला काही प्रवासी यायचे बाकी होते बस निघायला अर्धा तास अवकाश होता दुपारचे चार वाजले होते दमून आल्यामुळे गरम भात, आलू मटारवर भरपूर ताव मारला मुले बर्फ पाहिले का ? बर्फ पडले होते का ? बर्फ आणला का ? अशी चौकशी करीत होती त्याचे शकासमाधान करताना नाकी नऊ आले परंतु तेवढ्यात आमच्या बरोबरच्या तरुणानी शिखरावरून लोकरी टोपीत आणलेले व कडाक्याच्या थंडीमुळे स्टँडपर्यंत येईपर्यंत न वितळलेले बर्फ मुलाना दाखविले. बर्फ पाहून मुलांनी व त्यांच्याप्रमाणेच डोंगरापर्यंत न आलेल्या बसमधील प्रवाशांनी त्या बर्फाच्या तुकड्यावर हौस भागवून घेतली

मोठ्या समाधानाने सोनमर्गला अलविदा करून परत पाठलाग सुरू केलेल्या नदीच्या संगतीत श्रीनगरची वाट धरली

□

# पहलगा मतुझ्या पुनर्भेटीसाठी आतुर !

सकाळी ठीक साडे आठ वाजता श्रीनगरच्या लाल चौकातून बस पहल-गामच्या दिशेने निघाली श्रीनगर सोडले आणि पधरा किलोमीटर अतरा-वरील जेहलमच्या उजव्या तीरावरील पाम्पूर गावाजवळील शेतात केशरात जांभळी फुले चमकू लागली. भारतात फक्त काश्मीरमध्ये होणाऱ्या व काश्मीरमध्येही फक्त पाम्पूरच्या चार-पाच मैलाच्या परिसरातच होणाऱ्या केशराच्या मळ्याचे दृश्य अविस्मरणीय असे आहे बस ड्रायव्हरला विनती केल्यावर त्याने आग्रहास्तव दोन मिनिटे बस थांबविली नाजूक सहा जांभळ्या पाकळ्यामध्ये पिवळा पराग आणि तीन बाजूला तीन केशराच्या काड्या व शुभ्र देठ असे हे केशराचे जाभळे फूल निसर्गाचा चमत्कार चद्रप्रकाशात ही फुले चमकतात हे ऐकून आश्चर्य वाटले

पापूरनतर चौदा किलोमीटर अंतरावर अवतीपूर येथे बस थावली. तेथील नवव्या शतकात बांधलेल्या व आता उत्खनन करून दिसणाऱ्या प्राचीन दगडी म दिरावरील शिल्पकृती दिसल्या मदिराचे कोरलेले उच उच स्तभ, त्यावरील मूर्ती इत्यादीवरून ते राजा अवतीवर्मनच्या काळातील विष्णुमदिर असावे असे अनुमान निघते काळाचा महिमा अगाध आहे ! उत्खनन केल्यावर गाडल्या


गेलेल्या स्मृती आपल्या अवशेष रूपाने पूर्वीच्या ऐश्वर्यसंपन्न राजवटीवर प्रकाश टाकीत होत्या !

अवंतीपूरनंतर बस थांबली श्रीनगरपासून ६२ किलोमीटर अंतर असलेल्या अच्छाबल येथे अच्छाबल म्हणजे उत्कृष्ट झरा जहांगीरने व सजविलेल्या या बागेत शहाजहानची मुलगी जहाँआरा बेगमने मंडप व कारंजाची भर घातली ही बाग आजही सुस्थितीत आढळली ही बाग नूरजहानची खूप आवडती होती तेथील नैसर्गिक झऱ्याचे पाणी बागेत कल्पकतेने खेळवले आहे पाईन वृक्षांनी झाकलेल्या उंच डोंगराच्या पार्श्वभूमीवरील या छानशा बगीच्यात स्फटिकशुभ्र पाण्याचे झरे, रंगीबेरंगी फुले, चिनार वृक्ष, कारंजी यांची रेलचेल आहे बगीच्याजवळ असलेल्या मत्स्यालयात ट्राऊट जातीचे मासे आहेत येथील नैसर्गिक झऱ्यावर पोसलेले जाडजूड मासे प्रवाशांच्या आकर्षणाचे केंद्र आहेत

श्रीनगरपासून ऐंशी कि मी अंतरावर असलेल्या कोकरनागला बस थांबली डोंगराच्या पायथ्याशी सात वेगवेगळ्या दिशेने झिरपणाऱ्या झऱ्याचा आकार कोंबडीच्या पंजासारखा असल्याने हा निर्झर 'कोकरनाग' नावाने प्रचलित झाला समुद्रसपाटीपासून ६४७० फूट उंचीवर हिरव्यागार चीड वृक्षराजींनी आच्छादिलेल्या डोंगराच्या पार्श्वभूमीवरील त्या बगीच्यातील जिवंत पाण्याचा झरा औषधी गुणांनी युक्त असा आहे बगीच्यात प्रवासी हौसेने पाणी पीत होते ! बगीच्यात टपोऱ्या टपोऱ्या गुलाबाच्या फुलांचे ताटवेच्या ताटवे होते

जवळच जेहलम नदीचे जन्मस्थान असलेले वेरीनाग सृष्टीसौंदर्याने नटलेले आहे जेहलमचे पुराणातील मूळ संस्कृत नाव 'वितस्ता' असून ' नीलनाग याही नावाने पूर्वी ओळखली जाई गडद निळ्या रंगाच्या पारदर्शक थंडगार जिवंत पाण्याच्या झऱ्यावर जहांगीरने विशाल आकाराच्या अष्टकोनी कुंडाचे काम सुरू केले व शहाजहानने ते पूर्ण केले. प्रत्येकी अठरा फूट उंचीचे तीन टप्पे असलेल्या या कुंडात दोनपेक्षा अधिक टप्प्यापर्यंत पाण्याची पारदर्शकता दिसते कुंडात अगणित मासे होते पूर्वी नूरजहानने माशांच्या नाकात सोन्याच्या रिंगा घालून त्यांना शोभिवंत केले होते ! जेहलम इतक्या उत्कटेने उडी घेत असताना दिसते की तिचा पाण्याचा स्रोत सात-आठ फूट उंचीचा

उडत असतो! तेथून काढलेल्या जेहलमच्या कॅनॉलभोवती सुंदर सुंदर चिनार वृक्ष व रंगीबेरंगी फुलझाडांनी आगळी शोभा आणली आहे. बेरीनागच्या पूर्वेला मोगलकालीन मंडप, ग्रीष्मकालीन वास्तव्यासाठी महाल, हमाम आहेत. काश्मीर खोऱ्याला सौंदर्याने नटविणाऱ्या जेहलमच्या उगमस्थानाच्या— बेरीनागचे सौंदर्य अपूर्वच!



वाटेत अनतनागला बस थोडयाच वेळ थाबली तेथील झरा गधकाने युक्त अशा पाण्यासाठी प्रसिद्ध आहे अनतनाग श्रीनगरच्या खालोखाल मोठे शहर असून लाकडावरील नक्षीकाम, कापडावरील कशिदाचे, कलाबूतीचे काम व कागदाच्या लगद्यापासून केलेल्या विविध कलापूर्ण वस्तूसाठी प्रसिद्ध आहे

अनतनागचा झरा पाहून झाल्यावर बस मटन या गावी थांबली अमरनाथ यात्रेच्या मार्गावर हे एक पवित्र स्थान आहे तेथे प्रसिद्ध सूर्यमदिर आहे बस थाबल्यावर उतरणाऱ्या प्रवाशाजवळ उपाध्याय लोकांची एकच गर्दी झाली त्यांनी चौकशी केल्यावर त्यांना आम्ही महाराष्ट्रातले आहोत असे सांगितल्यावर महाराष्ट्रीयन लोकासाठी असलेला एकच उपाध्याय थांबून बाकीचे पागले त्याने नाव विचारल्यावर "चौकशी केली की पुण्याचे की साताऱ्याचे ? आणि मग सागायला सुरुवात केली की माझ्या वहीत श्री वसतदादा पाटील, सौ शालिनीबाई, आचार्य अत्रे, मत्री श्री खाडिलकर, पुण्याचे प वसत गाडगीळ याची नावे आहेत हा सगळा महाराष्ट्रीयन नावाचा इतिहास ऐकून महाराष्ट्रापासून दीड हजारावर मैल अतर असलेल्या छोटयाशा गावी मराठी लोकाचे नाव जतन करून ठेवणाऱ्या सोमनाथ डोंगरे या उपाध्यायाचे कौतुक करावेसे वाटले लाघवी गोड बोलून त्यांनी जणू छाप पाडली होती मदिराचा फेरफटका मारल्यावर मत्र उच्चारून त्यांनी आम्हाला आशीर्वाद दिले मदिरातील घोडयाच्या रथातील सगमरवरी मूर्ती मोहक वाटली मदिरासमोरील कुडात भरपूर जाडजूड ट्राऊट माशाना प्रवासी हौसेने खाद्य टाकीत होते दक्षिणा दिल्यावर उपाध्यायाने आमच्या नावाच्या नोंदी केल्या त्याशिवाय चिमुकल्या उदय, उल्काची नावेही त्याच्या डायरीत नोंदल्यावर मनात विचार आले की उल्का, उदय मोठे झाल्यावर आपापल्या जोडीदारासह मधुचद्राला काश्मीरला येतील तेव्हा त्यांना आपल्या पपा आणि आईने आपल्याला बालपणी या ठिकाणी आणले होते याची आठवण येईल का ?

मटन गावापासून जवळच मूळच्या मार्तंड मदिराचे भग्नावशेष आढळतात. तेथे मूळ सूर्यमदिर होते त्याच्या मजबूत भिंती व कलापूर्ण खांब या प्राचीन सुदर शानदार मदिराच्या भव्यतेची कल्पना करून देतात अमरनाथ यात्रेचे भाविक प्रवासी मटनच्या प्रख्यात सूर्यमंदिराला भेट देऊन पुढच्या प्रवासाची

सुरुवात करतात !

पापूर, अवंतीपूर, अच्छावल, कोकरनाग, मटन गावाचे दर्शन घेऊन बस लिदर नदीच्या खोऱ्यातून पहलगामकडे निघाली वाटेत भेटतात दगड गोटयातून झुळझुळ वाहणारे प्रवाह, नाचणारे निर्झर, फर वृक्षांनी झाकाळलेले डोंगर, घनदाट वनराज व छोटे छोटे लाकडी सेतू ! हिरव्या रंगाचा पाण्याचा प्रवाह व हिरव्यागार फरवृक्षानी झाकळलेले डोंगर यांची जणू जुगलबंदी चालू होती !

समुद्रसपाटीपासून सातहजार फूट उंचीवर असलेले पहलगाम पूर्वी मेंढपाळाचे गाव होते. उपजत निसर्गसौंदर्याने नटलेल्या या गावात एकच एक सरळ बाजाराचा रस्ता आहे छान टुमदार हॉटेल, बंगले, टूरिस्ट हटस्, प्रवाशाच्या सोईसाठी वसवले आहेत रम्य लिदर नदीवरील छोटे लाकडी पूल हे एक वैशिष्टच ! तट्टावर बसायच्या हौसेसाठी दोन तट्टू ठरवून मुलासह बसल्यावर मोठी मौज वाटली तट्टूवाले एवढे चलाख की जरी दिसायला अनाडी असले तरी प्रवाशाचे कॅमेरे चालवून ते फोटोही व्यवस्थित काढतात प्रथम त्यानी पहलगामच्या खोऱ्यातील दर्शनासाठी वनराजीच्या कुशीत नटलेल्या रम्य ठिकाणी नेले नंतर त्यांनी नदीपलीकडील टेकडीवरील प्राचीन शिवमंदिरावर नेले तेथून पहलगामचे सुंदर दृश्य टिपता आले. नदीच्या पात्रात दिसत होते दगड गोटे व वाहणारे लाकडी ओंडके दूरवर पहालगामचा क्लबही दिसत होता मंदिरातून परतताना हातपाय धुण्यासाठी नदीच्या पाण्याजवळ गेलो पाणी थंडगार बर्फासारखे होते उंच अशा अमरनाथ जवळून वहात येणाऱ्या बर्फाच्या डोंगरदऱ्यातले पाणी ' फ्रीज ' पेक्षा कल्पनातीत थंड होते ! हवा इतकी उत्साहवर्धक होती की वाटायचे या हवेत माणूस चिरतरूणच राहील प्रवासाचा अजिबात थकवा आला नाही संपत आलेल्या सीझनच्या प्रवाशाची गर्दी गावच्या लोकसंख्येपेक्षा जास्त वाटली नदीच्या पात्रात लाकडी पुलाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढण्यात नवोदित जोडपी मशगूल होती

दुपारचे चार वाजले तेव्हा सूर्य उंच हिमशिखराआड मावळू लागला ! स्टॅंडजवळील पंजाबी हॉटेलमध्ये जेवण आटपेपर्यंत दिवस मावळला देखील ! थंडगार वारे अधिकच तीव्र वाटू लागले घड्याळ तर बंद नाही ना, अशी

शंका वाटली ! पहलगाममधला चारच तासाचा वेळ कसा भर्रकन निघून गेला त्या अवधीत निसर्गसौंदर्य लुटून आता परतावे लागत आहे या जाणीवेने हुरहुर वाटू लागली. वास्तविक येथील निसर्गसौंदर्याचा मनमुराद आस्वाद घ्यायचा असेल तर तेथे कमीतकमी एक–दोन दिवस मुक्काम करणे जरूर आहे उंच उंच डोंगरावर वेढलेल्या व गर्दीपासून दूर दूर अशा पहलगामला "खुदा हाफिज" करीत खिन्नतेने निरोप घेतला ! पहलगामच्या पुनर्भेटीची ओढ लागली होती

□

# दल सरोवरातील जलविहार

सकाळी नऊला गुलमर्गला जाण्याच्या तयारीने स्टँडवर आलो तेव्हा कळले की बस ड्रायव्हर आणि टॅक्सी ड्रायव्हर याचा मोटार ड्रायव्हींग कायद्यातील अन्यायकारक तरतुदीबाबत एक दिवसाचा लाक्षणिक संप आहे मन क्षणभर निराश झाले आखलेला दिनक्रम चुकणार या जाणीवेने अनेक प्रवासी हळ-हळत होते काश्मीर प्रवासातले शेवटचे दोन दिवस उरले होते गुलमर्गचा कार्यक्रम दुसऱ्या दिवसावर ढकलला, त्याप्रमाणे तिकीटे बदलून घेतली दल-सरोवरात फेरफटका, जलविहार व श्रीनगरच्या सुप्रसिद्ध शंकराचार्यांच्या टेकडीवर जाण्याचे ठरविले

स्टँडवरून परत पायी निघून दल सरोवराच्या शिकाऱ्याच्या अड्ड्याजवळ आलो एक शिकारा ठरविला शिकारा मोठा आकर्षक वाटला बसण्यासाठी मऊ गाद्या, टेकायला उशा, रंगीबेरंगी चादरी, सावलीसाठी वर रंगीत छत व बाजूला पडदे । आम्ही लहानमोठे प्रवासी असे आरामात टेकून बसलो. दल सरोवर काश्मीरची शान आणि जान आहे पाण्याची खोली तीस फूटापर्यंत आहे या रम्य सरोवराच्या तीनही बाजूना उंच उंच डोंगर व मोगलउद्याने आहेत. सरोवराच्या पूर्वेला इतिहासप्रसिद्ध शंकराचार्यांची टेकडी आहे तर

पश्चिमेला हारीपर्वत व अकबराने बांधलेला जुना किल्ला आहे ऐन हिवाळ्यात ते सरोवर पूर्ण गोठते व उत्साही लोक त्या बर्फावरून पायी जातात अशी शिकारा चालविणाराकडून माहिती कळली उन्हाळ्यात सभोवतालच्या डोंगरावरील बर्फ वितळते व तलावात पाणी येते

शिकाऱ्याने प्रथम दलगेटमधून दल सरोवरात प्रवेश केला दरवाजा थोडा उघडल्याबरोबर शिकारा वरवर तरगू लागला! कारण पाण्याची उची वाढत होती डाव्या बाजूला सजलेल्या रगीबेरगी हाऊस बोट दिसत होत्या उत्कंठा म्हणून आम्ही मुद्दाम एका भारी हाऊसबोटमध्ये प्रवेश केला आतमध्ये सजवलेले दोन स्वतंत्र बेडरूमस्, स्वयपाकघर, स्नानघर आणि बसण्याच्या प्रशस्त खोलीत भारी कोच, टी पॉय, टी व्ही होते हाऊसबोटच्या वर जाऊन कोवळ्या उन्हाचा आस्वाद घेण्यासाठी छानसा लाकडी जिना होता. सावलीसाठी रगीबेरगी छत्र्याही होत्या ! हाऊसबोटचा आकार साधारण शभर फूट लाब व पधरा फूट रुद असतो स्पेशल क्लास, फर्स्ट क्लास, एकॉनॉमी क्लास असे साधारण तीन वर्ग असतात पहिल्या दोघांना स्वच्छता गृह जोडूनच असतात एक दिवसाचा राहण्याचा, चहा, भोजनादी खर्च प्रतवारी प्रमाणे तीनशे रुपयापासून शभर रुपयापर्यंत असतो हाऊसबोटचे एक वैशिष्टच म्हणजे सोनमर्ग, पहलगाम इत्यादी गावासाठी सफर करणाऱ्या प्रवाशांना सकाळी हाऊसबोटमधून निघताना टिफीन भरून देतात आम्ही पाहिलेली हाऊसबोट तर सनमायकाने चकाकत होती तिची किंमत लाख-दीड लाखाच्या आसपास होती हाऊसबोटी पाण्यात उभ्या असल्याने थडी खूप वाजत असेल अशी चुकीची कल्पना असते उबदारपणासाठी हिटरची सोय असतेच तसेच दुसरी एक समजूत की हाऊसबोट तलावात फेऱ्या मारीत असते वास्तविक तसे नसून हाऊस बोट एकाच जागेवर स्थिर उभी असते प्रत्येक हाऊसबोटच्या मालकाजवळ एक शिकारा – छोटी नाव असतोच त्यातून प्रवाशाची तळच्या कडेला ने आण केली जाते हाऊसबोटला सुदर सुदर नावे दिलेली असतात लैला मजनू, मेनका इत्यादि रगीबेरगी सजविलेल्या हाऊस बोटींचा दल सरोवरातील ताफा मनोवेधक दिसतो तेवढ्यात ह्यानी शिकाऱ्यात बसलेली काश्मीरी ललना दाखविली गोऱ्यापान नितळ, आरसपानी सौंदर्याची ती खाण होती!

शिकारा चालविणाराने प्रथम पोहोचविले रम्य नेहरू पार्कमध्ये स्वातंत्र्यानंतर वसविलेल्या या बेटावरील बगीच्याच्या सौंदर्यात त्याच्या तरंगत्या स्थानामुळे भर पडली आहे भव्य रेस्टॉरंट व फार आकर्षक आहे. दल सरोवरात डोंगराचे प्रतिबिंब पहाताना मजा वाटते

नंतर दिसतात तरंगते बगीचे हे एक आगळे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. तळ्यातील पाणी संथ असल्यामुळे तरंगणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या वेलींच्या जाळ्यावर मातीचे थर घालून वाफे तयार करतात कोबीचे हिरवेगार गड्डे, मुळे असा तरंगणारा भाजीपाला पाहून आश्चर्य वाटले

दुरून तळ्यातील बेटावर दिसत होते चिनार वृक्ष शिकारावाला म्हणाला, ' जनाब यही है श्रीनगरके मशहूर चार चिनार ! " चिनार हे काश्मीरचे खास वैशिष्ट्य कोणी म्हणतात नूरजहानने हा चिनारवृक्ष इराणमधून प्रथम आणला कोणी म्हणतात अकबरकालीन हा वृक्ष होता काश्मीरच्या जंगलात आजही चार-पाचशे वर्षांपूर्वीचे जुने, पन्नास फूट रुंदीचे खोड असलेले, शंभर फूट उंचीचे प्रचंड चिनार वृक्ष आढळतात या चिनारवृक्षाची पाने आकाराने हाताच्या पंज्याएवढी असतात चिनार वृक्षाच्या छायेत थकवा जाऊन माणूस परत उल्हसित होतो ! हिवाळ्यात चिनारची पाने रक्ताळल्यासारखी लाल होऊन संथपणे गळतात दल सरोवरातील चार चिनारची कल्पना नूरजहानची. सूर्य कोठेही असला तरी त्याच्या उन्हाची तिरीप कुठे लागू नये या दृष्टीने चार बाजूला चार चिनार लावायचे उंच उंच चार चिनारानी ते छोटेखानी बेट व्यापले होते भर दुपारीही सूर्य दर्शन होणे मुष्कील ! चिनार वृक्षाखालून मंद मंद झुळझुळ वारा वहात होता

शंकराचार्यांच्या टेकडीवरून पाहिले असता बेटातले हे चिनार चार दिसतात तर चष्मेशाही बगीच्यातून तीन दिसतात आणि बाजूने पाहिले तर दोन दिसतात. खरे आहेत चार ! दल सरोवराप्रमाणेच नागिन सरोवरातही चार चिनार आहेत दल व नागिन सरोवरातील चार चिनार 'सोनलंका' व 'रूपालंका' या बेटावर वसले आहेत या चार चिनाराच्या बेटांना चंदेरी बेटे म्हणतात शिकाऱ्यातून नंतर फेरी मारली " कबूतरखाना ' भोवती काश्मीर महाराजांच्या मालकीचे हे विश्रांतीस्थान आहे दल सरोवरातच ते बेटासारखे वसले आहे. पाण्याभोवती खांब उभे करून काटेरी जाळी लावली असल्याने

प्रवाशांना भेट देता येत नाही नंतर आमचा शिकारा कमळाच्या बागेनजीक गेला सीझन नसल्याने कमळाची फुले विशेष दिसली नाहीत त्यामुळे निराशा झाली अधूनमधून उमललेली फुले दिसली

दल सरोवराच्या एका खोल भागालाच नागिन सरोवर असे नाव दिले आहे ते आकाराने छोटेसेच आहे, वॉटर स्पोर्टस्‌साठी नागिन सरोवर प्रसिद्ध आहे

तेवढ्यात एका शिकाऱ्यामध्ये विक्रीसाठी ठेवलेली फळे, फुले, भाजीपाला दिसला जणू ती तरती दुकानेच दुसऱ्या एका शिकाऱ्यातून एक जण काश्मीरी केशर विकण्यासाठी आला एका शिकाऱ्यातून फुले विकणारी गोड काश्मीरी छोकरी आली दल सरोवरातील जलविहार हा आगळा अनुभव होता.

दल गेटच्या शिकारा स्टँडजवळ परतलो पोटात भूक भडकली होती. ती शमवून थोडी विश्राती घेऊन टॅक्सीने शंकराचार्यांच्या टेकडीकडे निघालो टेकडी चढायला पायवाटही आहे व दीड तास वेळ लागतो मुलाच्यामुळे पायी चढण्याचा बेत सोडून दिला टेकडीच्या उंचीचा फायदा घेऊन तेथे अलीकडे टेलिव्हिजन टॉवर उभारला आहे लहान-मोठ्या चार टेकड्या पार करून शहरापासून हजार फूट उंचीवर पोहोचलो दोन चिनार वृक्षाच्या छायेत श्रमपरीहारासाठी पायी चढून आलेली मंडळी भेटली

मंदिरामध्ये सुंदर शिवलिंग आहे तसेच जगद्‌गुरू शंकराचार्य यांची मोहक मूर्ती आहे मूळ शिवाचे मंदिर असलेल्या या प्राचीन मंदिरास जगद्‌गुरू शंकराचार्य यांनी बौद्ध धर्माने ग्रासलेल्या हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी भेट दिल्यानंतर हे मंदिर 'शंकराचार्य मंदिर' म्हणून ओळखले जाऊ लागले वेळोवेळी डागडुजी करून जतन केलेल्या या प्राचीन मंदिराची दुरुस्ती ललितादित्य राजाने आठव्या शतकात केली

शंकराचार्यांच्या टेकडीवरून दिसणारे श्रीनगर शहराचे व परिसराचे मनोवेधक दृश्य पाहून भान हरपून टाकणारे होते दिसत होती नागमोडी जेहलम, मनोवेधक लाजवाब दल सरोवर व त्याची सखी नागिन सरोवर ! दिसत होत्या हाऊसबोटच्या रंगीबेरंगी रांगा, चमकत होते दल सरोवरातील चिनार, दिसत होता सरोवराच्या पार्श्वभूमीवर उभा असलेला हारी पर्वत व त्यावरील अकबराने बांधलेला किल्ला !

शंकराचार्य टेकडीची भेट आटोपून मुक्कामी परतलो ☐

## गुलमर्गची सफर

लाल चौकातील बसस्टँडवरून सकाळी नऊला बस गुलमर्गकडे श्रीनगरच्या पश्चिमेला चाळीस कि मी अंतरावर आहे बस तगमर्गपर्यंत जाते पुढे सहा कि मी. प्रवास पायी अथवा तट्टावर करावा लागतो. श्रीनगर सोडल्यावर थोड्याच वेळाने बस रम्य पॉपलर वृक्षाच्या दुतर्फा असलेल्या रांगांमधून चालू लागली सरळ लांबच्या लांब रस्ता व दुतर्फा उंच झाडांच्या रांगा याचे मनोहारी दृश्य दिसले

दीड तासातच बस तगमर्गला पोहोचली स्टँडजवळच तट्टूवाल्याचा अड्डा आहे तेथे सरकारी दरपत्रक असलेला बोर्ड आहे. सीझन कमी असल्याने प्रवाशाजवळ तट्टूवाले एकच एक गर्दी करू लागले नंबरप्रमाणे तट्टू ठरवायचे काम चालले होते. आम्ही ठरविले होते की पायी प्रवास सुरू करावा मध्ये भेटेलच एखादा तट्टूवाला त्याप्रमाणे चढ चढायला निघालो थोड्याच अंतरावर ' दबा ' धरून बसलेला एक म्हातारा तट्टूवाला मागे लागला सांगू लागला, सरकारी दर गुलमर्गला पोहचविण्याचा ७ रु व उतरविण्याचा ७ रु असा जाऊन येऊन १४ रु. आहे मला फक्त १२ रु. द्या ! आम्ही त्याला सांगितले. दहा रु. देऊ. चोवीस मैल बसने यायला २–५० रु आणि

तुला चार मैलासाठी ५ रु. जायचे , असा दुप्पट दर पडतो. दहा रुपयात जाऊन येण्यासाठी ठरविल्यावर स्वारी खूष झाली ! वास्तविक गुलमर्गपर्यंत वर चार मैल डांबरी रस्ता तयार झाला असून तेथे टॅक्सी, कार वगैरे वाहनें जातात तट्टूवाल्याचा धंदा चालू राहावा म्हणून बस गुलमर्गपर्यंत नेत नसावेत

तनमर्ग ते गुलमर्ग सहा कि मी अंतराची चढण निसर्ग रम्य डोंगरावरील फर व पाईन वृक्षांनी भरलेली आहे घोडे न बिचकता दगडगोट्याच्या खाचखळग्याच्या वाटेने चालत होते बसणारा मात्र पडण्याच्या धास्तीनें बिचकत होता ! तट्टूवाले प्रवाशाच्या हातात लगाम देऊन निर्धास्तपणे त्यांच्या इतर धंदेवाल्यांशी गप्पा मारीत चालत होते छोट्या उदयला पुढे घेऊन मी घोड्यावर स्वार झाले होते पदोपदी धास्ती वाटत होती घोड्याने उतारावर मान खाली टाकली की वाटायचे आपण वाकून आयाळ धरावी घोड्याने चढावर डोके वर केले की वाटायचे मागच्या मागेच आपण सटकणार वाटेत दोन घोड्यावर स्वार अशी प्रणयी युगुले दिसायची त्यांच्या चेहऱ्यावर धास्ती दिसायची अर्थात जो तो आव आणा-यचा आपण घाबरत नाही ! वाटेत पाठीवर सामान घेऊन चढ चढणारा जवान दिसला तो पाकिस्तानच्या सरहद्दी नजीकच्या ठाण्यावर चालला होता त्याला पोहोचायला आठ दिवस लागणार होते मागाहून घोड्यावरून रेशनची वाहतूक होणार होती प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीत कडाक्याच्या थंडीला न जुमानता, बायको, मुलांपासून, मुलखापासून दूर कर्तव्यतत्परपणे जीवन जगणारा जवान पाहून त्याच्या खडतर जीवनाची कल्पना आली

निम्मा चढ चढून झाल्यावर चहा पाण्यासाठी डोंगरावरच छोटा टी स्टॉल आहे पायी चढून येणाऱ्या मंडळींची मी वाट पाहत थांबले होते ते पोहचेपर्यंत तट्टूवाल्याची बडबड चालू होती त्याने हळूच सूतोवाच केले. वर पोहचल्यावर तेथे पहाण्यासारखे असलेले तीन 'पॉइंटस्' तुम्हाला दाखवीन प्रत्येक पॉइंटसाठी दर फक्त तीन रुपये म्हणजे जाऊन यायचे दहा रुपये व वर नऊ रुपये असे १९ रुपये त्याला पाहिजे होते शिवाय त्याने पुस्ती जोडली 'बहनजी जो सस्ता देखता है उसे हमेशा महँगा पडता है।" मी त्याच्या बडबडीकडे दुर्लक्ष करून नुसते हं हं म्हणत होते तेवढ्यात बाकीची

मडळी पायी आली. परत राहिलेला प्रवास सुरू झाला व दाट झाडी पार करून शेवटची खिड ओलांडून गुलमर्गच्या रम्य पठारावर प्रवेश केला तेव्हा दुपारचे साडेबारा वाजले होते

समुद्रसपाटीपासून ८५०० फूट उंचीवरील गुलमर्ग म्हणजे फुला, कुरणाचे पठार ! गुलमर्गची ख्याती जगात दूरवर पोहचली आहे ती त्याच्या विस्तृत नैसर्गिक गोल्फ क्रीडागणामुळे हिवाळा सुरू झाल्यावर सारे मैदान बर्फाच्छादित बनते त्यावेळी स्केटींग खेळाची लज्जत औरच असते या पठाराभोवतालच्या उंच उंच डोंगर व टेकड्यामुळे गुलमर्ग एखाद्या गवताळ वाटीसारखे दिसते. आजूबाजूला सुदर टूरिस्ट बगले विखुरलेले दिसत होते अशाच एका बगल्यात सुमारे पस्तीस वर्षापूर्वी विवाहानतर मधुचद्रासाठी वास्तव्यालाआलेले इंदिरा गांधी व फिरोज गांधी अलहाबादच्या आनद भवनात प्रेमळ कमला नेहरूच्या मृत्यूनतर एकाकी जीवन व्यतीत करणाऱ्या पडित जवाहरलालजींना विसरू शकत नव्हते त्यानी गुलमर्गहून पडितजींना अलाहाबादला तार पाठविली ' Wish we could send you some cool breeze from here " त्यावर पडितजींनी आपल्या शैलीदार विनोदबुद्धीने उत्तर पाठविले, " Thanks, but yon have no mangoes. "

गुलमर्गला पोहोचल्यावर तट्टूवाल्याने विचारले, चलणार का सर्व पॉईंटवर ? आणखी पैसे देण्याची इच्छा नव्हती आम्ही म्हटले आम्ही पायीच जाणार आहोत त्यावर तो म्हणाला, ठीक आहे, आपकी मर्जी तुम्ही सगळे पॉईंट बघून तीन वाजेपर्यंत परत या म्हणजे आपण तासभरात खाली पोहचू म्हणजे तुम्हाला साडेचार वाजता बस मिळेल तीनपर्यंत मी घोड्याला नाल लावायचे काम करून येतो, पैसे द्या त्यावर आम्ही म्हटले हे घे पाच रुपये तो अजीजीने म्हणला, महागाई वाढली. सात रुपयाखाली नाल बसवून मिळत नाही. आम्ही म्हटले सकाळपासून तुला कमाई झाली असेलच ना ? पाच रुपयावर पैसे मिळणार नाहीत शेवटी फार कळवळून बोलल्याने त्याला आम्ही अजून दोन रुपये दिले त्याचे सात रुपये पुरे झाल्यावर खूष होऊन सलाम ठोकून तो निघाला. त्याला आम्ही ठीक तीन वाजता यायला बजावले !


प्रथम आम्ही गुलमर्गपासून मैलभर अतरावरील रोप वे मध्ये बसण्यासाठी



गुलमर्ग


चार चिनार





प्रती सुवर्णमंदिर दुर्गामंदिर, अमृतसर

लक्षावधी आशा आकांक्षाचे प्रतीक भाक्रा धरण



गेलो प्रवाशाना आकर्षण्यासाठी टूरिस्ट खात्याने कल्पकतेने रोपवेची योजना केली सुमारे दोन मैल लांब अतरावर उच उच टॉवरवर आधारित जाड लोखडी तारावर हे वीजेवर चालणारे पाळणे बसविले आहेत माणशी तीन रुपये दराचे तिकीट काढून एका पाळण्यात मी व शेजारी उदय, मागच्या पाळण्यात उल्का व यशवत असे बसलो. वाटेत खोल दरीवर पाळणा क्षणभर थांबवून मुद्दाम सस्पेन्स निर्माण करतात उच उच डोंगर व खोल दऱ्या असलेल्या घनदाट वनराजीच्या पार्श्वभूमीवर रोपवेमध्ये बसण्याचा अनुभव रोमाचकारी होता

दूरवर नगा प्रभात पर्वताची बर्फाच्छादित शिखरे चमकत होती पूर्ण बर्फ पडल्यावर तर काश्मीर खोऱ्यातील सौंदर्याची अपूर्वाई चाखण्यात और मजा असेल ! कोवळ्या उन्हाचे कवडसे चोर पावलानी लपतछपत उच फर व पाईन वृक्षाच्या वनराजीतून डोकावत होते

गुलमर्गचे आवडते पर्यटन केद्र– आधुनिक 'तीर्थस्थान' (!) झालेल्या 'बॉबीका कमरा' येथे पोहोचलो 'बॉबी' नसलेला हा 'बॉबीका कमरा' पहायला तेथे गुलहौशी प्रवाशांची एकच गर्दी झाली होती राजकपूरने या 'कमऱ्यात' चित्रीत केलेल्या 'हम तुम एक कमरेमे बद हो, चाबी खो जाय' या धमाल गाण्याने भारतात लोकप्रियतेचे किती 'एव्हरेस्ट' शिखर गाठले आहे याची कल्पना या कमऱ्याचे दर्शन घेण्यास येणाऱ्या प्रवाशाच्या गर्दी-वरून दिसत होती त्यात प्रांतोप्रांतीचे प्रवासी होते बगाली प्रवासी होते, दाढीवाले शीख होते, मद्रासी होते, राजस्थानी होते ! म्हातारे होते तसेच तरुण नौजवान होते, अल्लड युवती होत्या, तसेच त्यांच्या मागे मागे फिरणारे कॉलिजकुमार होते ! लग्न झालेले होते, लग्न न झालेले आशुक माशुक होते थोडक्यात आमच्यासारखे बालबच्चेवाले होते व तरुणीही होत्या, एका सुसज्ज हॉटेलचा हा कमरा चावी नसल्याने बद होता ! भेट देणाऱ्यांना वाटायचे की चावी खो गयी व आत बद आहेत बॉबी, ऋषि !

दुपारी तीनला ठरल्याप्रमाणे गुलमर्गच्या तट्टू अड्ड्यावर आलो. पण तट्टूवाल्याचा पत्ता नाही ! साडेतीनपर्यंत वाट पाहून कटाळलो. दुसऱ्या तट्टूवाल्याजवळ चौकशी केल्यावर कळले की तुमचा तट्टूवाला दुसरा धदा करायला गेला असणार. येथून पुढे 'खिलन मार्ग' आहे तसेच 'बाबाऋषीची'

समाधी आहे तिकडे तो गेला असेल नाहीतर सात रु. रवून परत खाली तगमर्गला उतरला असेल पुढे त्याने सांगितले–" यहाँके तट्टूवाले हमेशा नाल लगाना है बताकर अॅडव्हान्स पैसे लेते है और दुसरा धंदा करने जाते है।" सुरुवातीला आपण १४ रु ऐवजी १० रुपयात घोडा ठरविला हा आनंद वरील संवाद ऐकून मावळला! तट्टूवाल्याने नाल लावायचे कारण सांगून युक्तीने चढण्याचा सरकारी दर सात रु पंदरात पाडून घेतला होता नाईलाजाने दुसरा घोडा परतण्यासाठी सात रुपयात ठरवला। गुलमर्गवरून उतरताना सारखे वाक्य आठवत होते–" बहनजी जो सस्ता देखता है उसे हमेशा महँगा पडता है।" वाटेत ज्याच्याकडून नाल मारण्यासाठी सात सात रुपये उपटले असे प्रवासी भेटल्याने समदुःखे शीतलता या न्यायाने थोडे बरे वाटले तरी पण पैसे गेल्याचे दुःख वाटत नव्हते तर खंत वाटत होती– फसविले गेल्याची।

सगळा उतार पार करून तगमर्गच्या अड्ड्यावर पोहोचलो तेव्हा साडेचार वाजले होते बसमध्ये प्रवाशांच्या गप्पा चालल्या होत्या 'बॉबीका कमरा' बाबत। अंधार झाला त्या दरम्यान संध्याकाळी सातच्या सुमाराला श्रीनगरच्या लाल चौकात येऊन पोहोचलो

□

# श्रीनगर सोडताना

सकाळी आठ वाजता जम्मूला जाण्यासाठी बसने श्रीनगर सोडले । काश्मीर खोऱ्यातला एक आठवडा संपुष्टात आला या जाणीवेने हुरहुर वाटत होती पठाणकोटहून श्रीनगरला गेल्या आठवड्यात आलो होतो, तेव्हा रात्रीची वेळ झाल्याने श्रीनगरच्या आसपासची शोभा दिसली नव्हती बसने श्रीनगरचा परिसर सोडला आणि मी मागे वळून पाहिले तर दिसत होती शंकराचार्यांची उंच टेकडी व जवळचा टेलीव्हिजनचा टॉवर !

जेहलमच्या हिरव्या पाण्याने पाठलाग सुरू केला होता काझिगुडजवळ उंचच्या उंच सफेदा वृक्षाच्या (पॉप्लर) रांगांनी रस्त्याला अवर्णनीय शोभा आणली होती मोगल काळापासून वेळोवेळी हे वृक्ष लावलेले आहेत काझिगुडला बस थांबली आणि थंडीमुळे चहासाठी प्रवाशाची एकच झुंबड उडाली

रम्य दऱ्याखोऱ्यातून वाटचाल करीत बस जवाहर टनेलजवळ आली तेव्हा कळले की एक बोगदा रिपेअरसाठी बंद आहे, म्हणून एकेरी वाहतूक चालू होती त्यामुळे बराच वेळ मोडला जवाहर टनेल ओलांडला आणि मिलिटरी गाड्यांचा ताफाच्या ताफा दोन्ही दिशेने जाणाऱ्या येणाऱ्या इतर वाहनांच्या

वाहतुकीत खोळंबा करू लागला. आमचा बस ड्रायव्हर म्हणाला, मिलिटरी मुव्हमेंट सुरू झाली, एकाच वेळी मिलिटरी कॅम्पचे जुने सैनिक हलतात व नवे सैनिक त्यांची जागा घेतात. रामबनजवळ दुपारी बस पोहोचल्यावर परत एक तास खोळंबा झाला. बटोटला दुपारी अडीचला पोहोचलो व दोन घास पोटात ढकलले. काश्मीर खोऱ्यातले शेवटचे जेवण! भातावरचा राजमा बेचव वाटत होता. दही मिळाल्यामुळे मुलांना हायसे वाटले.

पटणी, कूद, उधमपूरपर्यंत मिलिटरी गाड्यांच्या तांड्यामुळे बस वेग घेत नव्हती. उधमपूरला आलो तेव्हा सहा वाजून गेले होते. आठवड्यापूर्वी पठाणकोटहून श्रीनगरला जाताना गाडी जम्मूवरून न जाता सरळ उधमपूरला आली होती. आता मात्र परतताना उधमपूरहून बस डाव्या फाट्याकडे न वळता सरळ जम्मूकडे वेगाने निघाली होती. कारण रस्त्यावरील मिलिटरी वाहनांची वाहतूक थडावली होती.

रात्री आठच्या सुमाराला जम्मू स्टॅंडवर बस आली. दोन तास उशीर झाला होता. थंडीने मुले कुडकुडत होती. त्यात दिवसभराच्या प्रवासाने शिणून गेलो होतो. जम्मू तावी स्टेशन चार मैलावर होते. रात्री सव्वानऊच्या श्रीनगर-दिल्ली एक्स्प्रेसने पठाणकोटला पोहोचायचे होते. बस लेट झाली नसती तर जम्मू गावातील श्री रघुनाथजी मंदिराला भेट द्यायची होती. ती राहिल्यामुळे चुटपूट लागली.

टॅक्सीने जम्मू तावी स्टेशनवर आलो, तेव्हा तेथे अंधाराचे पूर्ण साम्राज्य होते. चौकशीअंती कळले की भाक्रा नानगल धरणात पाणी कमी असल्यामुळे विद्युत् निर्मिती कमी होते. त्यामुळे विद्युत् पुरवठा कमी होतो. प्लॅटफॉर्मवर गर्दीच गर्दी! तसेच गाडी लागलेली होती तीही पूर्ण भरलेली होती. तिकिटाच्या खिडकीजवळ तोबा गर्दी! त्यात अंधाराची भर! कसे बसे स्त्रियांसाठी असलेल्या वेगळ्या खिडकीतून पठाणकोटपर्यंतचे तिकीट काढले, कारण आमचे रेल्वे प्रवासाचे तिकिट पठाणकोटपासून पुढचे होते. स्त्रियांच्या राखीव डब्यात चिक्कार गर्दी होती. डब्यात स्त्रियांपेक्षा पुरुषांचीच गर्दी फार होती! टी. सी. आल्यावर त्याने डब्यातून पुरुषांना 'हात जोडून' बाहेर काढले. टी. सी. गेल्यावर पुरुषांनी परत प्रवेश केला! आम्ही डब्यात प्रवेश केल्यावर सामानाची लावालाव केली तेव्हा थोडे

निर्धास्त झालो डब्यात चर्चा केल्यावर कळले की जम्मूजवळ ५८ कि. मी अंतरावर ५३०० फूट उंचीवर असलेल्या गुफेत श्री वैष्णोदेवीच्या नवरात्रा-तील चाललेल्या यात्रेनिमित्त परतणाऱ्या यात्रेकरूंच्या व काश्मीरमधील संपत आलेल्या सीझनमुळे परतणाऱ्या प्रवाशांच्या दुहेरी गर्दीत आम्ही सापडलो होतो

गाडीने रात्री साडेनऊला जम्मू स्टेशन सोडले तरी स्टेशनात दिवे आले नव्हते ! खाजगी हॉटेल किंवा दुसरे ठिकाण असते तर गॅसबत्तीची सोय केली असती, पण हा सरकारी कारभार ! कोण कोणाची चिंता करतो ? गाडी हलल्यावर ध्यानात आले की आमचे सामानामधील थंडी-साठी बाहेर काढलेले ब्लँकेट जम्मू स्टेशनच्या अंधारात राहिले जम्मूला एक दिवस मुक्काम करायचा खर्च वाचला होता पण ब्लँकेट गमावले होते मनातल्या मनात गुलमर्गच्या तट्टूवाल्याचा 'महामंत्र' आठवत होता, 'जो हमेशा सस्ता सोचता है, उसे हमेशा महँगा पडता है ।' न जाणो जम्मू स्टेशनच्या अंधारात कोणाकोणाला कसा फटका बसला असेल ? खिशाला अथवा सामानाला !

रात्री साडेअकराच्या सुमाराला पठाणकोटला गाडी आली, अमृतसरला जाण्यास गाडी पहाटे साडेतीनला होती चार तास अवधी होता खूप उशीर झाल्यामुळे जेवण्याची इच्छा नव्हती गरम दूधावर भागवले आठवड्या-पूर्वी क्लोकरूममध्ये ठेवलेले सामान परत घेतले तिकिटावर नोंद करण्या-साठी टी सी महाशयांची गाठ घेतली मध्यरात्रीमुळे ते पेंगुळले असल्याने झोपेतच त्यांनी सह्या केल्या ! अमृतसरला जाणारी गाडी पकडण्याच्या विचाराने व आणखी काही सामान गहाळ होते का ? या धास्तीने झोप येत नव्हती थंडीतच कुडकुडत प्लॅटफॉर्मवर वेळ काढला !

पहाटे साडेतीनला गाडीने अमृतसरसाठी पठाणकोट सोडले बरोबर आठ-वड्यापूर्वी याच पठाणकोटला पहाटे पोहोचलो होतो—श्रीनगरला जाण्यासाठी ! बर्थवर पडल्या पडल्या मनात विचार तरळत होते काश्मीरच्या रम्य खोऱ्या-तील एक आठवड्याच्या सुखद आठवणींचे ! नागमोडी गडद रंगाची जेहलम नजरेसमोरून जात नव्हती पापूरची जांभळ्या रंगाची केशराची फुले नाचत होती दल सरोवरात मनमुराद केलेला जलविहार डौलदार 'चार चिनारला'

भेटायला परत या म्हणून साद घालीत होता सोनमर्गला हिमशिखराची मजा चाखणाऱ्या कुबड्या प्रवाशाची जिद्द नजरेसमोर तरळत होती. गर्दीपासून दूरदूर, दगडगोट्याच्या लिदर नदीच्या खोऱ्यातले शांत पहलगाम लाकडी पुलावर उभे राहून निसर्ग सौंदर्याची लज्जत चाखायला जणू पुनर्भेटीला बोलावीत होते—आठवत होता गुलमर्गचा ' बॉबी ' नसलेला ' बॉबीचा कमरा' डोळ्यासमोर दिसत होती जहांगीर नूरजहानच्या प्रणयाने धुंदलेली शाली-मार, शालीमार ! हृदयावर कोरली होती शालीमारची साद !

□

## दणकट प्रकृती कणखर जिद्द–अमृतसर

सूर्योदयाबरोबरच शिखांच्या पवित्र भूमीत–अमृतसरमध्ये प्रवेश केला. स्टेशनसमोरच चांगल्यापैकी लॉज आहेत हमालाजवळ सामान देऊन लॉज-मध्ये एक खोली ताब्यात घेतली स्नान आटोपून आदल्या दिवसभरचा व संपूर्ण रात्रीचा प्रवासाचा शीण घालविण्याच्या दृष्टीने विश्रांती घेण्याचा प्रयत्न केला पण सकाळीच झोप येईना लॉजच्या आवारातच पंजाब सरकारचे पर्यटन केंद्र आहे तेथे गेल्यावर तेथील सरदारजी पर्यटन अधिकाऱ्याने हसून स्वागत केले आम्ही महाराष्ट्रातले सांगितल्यावर ते सांगू लागले माझा जन्म शिवाजी महाराजांच्या पुण्याचा! मला पुण्या-मुंबईच्या महाराष्ट्रातल्या लोकांबद्दल फार आत्मीयता वाटते त्यांनी आम्हाला केवळ अमृतसरचीच माहिती दिली नाही तर आम्ही पंजाबमधील भेट देणार असलेल्या चंदीगड, भाक्राबद्दल उपयुक्त माहिती व सूचना दिल्या.

अमृतसर हे भारताच्या वायव्य सरहद्दीवरील सर्वांत महत्त्वाचे शेवटचे शहर ग्रँड ट्रंक रोडने दिल्लीपासूनचे अमृतसर अंतर आहे ४४५ कि मी फाळणीपूर्व अखंड पंजाब राज्यात लाहोर खालोखाल अमृतसरचे खास मध्यवर्ती व्यापारी महत्त्वाचे स्थान होते इ स १९४७ साली फाळणी झाली व पाकिस्तानात

गेलेल्या लाहोरपासून अमृतसर केवळ पन्नास कि मी अंतरावर व वाघा बॉर्डर पोस्ट सरहद्दीपासून केवळ पचवीस कि मी अंतरावर आहे सरहद्दी-जवळचे शेवटचे महत्त्वाचे लष्करी ठाणे म्हणून अमृतसरचा उल्लेख करणे जरूर आहे

सरकारी पर्यटन केंद्र सोडून लॉजवर आलो तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते तेथे जवळच पंजाबी 'ढाबा' म्हणजे खानावळ होती तेथे तंदुरी रोटी, चिकन करी, बिर्याणीवर ताव मारला जेवण खास पंजाबी पद्धतीचे मसालेदार होते जेवणानंतर तासभर विश्रांती घेऊन दुपारी एकच्या सुमाराला एका सरदारजींचा टांगा ठरवून अमृतसर शहर पाहायला निघालो

रेल्वेचा ओव्हरब्रीज ओलांडून शहरातल्या गजबजलेल्या बाजार पेठेतून टांगा चालला होता गडद लिपस्टिक लावलेल्या, सलवार कमीज घातलेल्या उंच गोऱ्यापान पंजाबी स्त्रिया आकर्षक दिसत होत्या धिप्पाड उंचपुरे दाढी-वाले सरदारजी निरनिराळ्या व्यवसायात गुंग दिसत होते, सायकल रिक्षा-वाले, फुले विकणारे, औषध विक्रेते, होजियरीवाले एवढेच काय स्टेशनवर भेटलेला टी सी ही सरदारजी होता।

प्रथम आम्ही अमृतसरच्या पवित्र सुवर्ण मंदिराजवळ येऊन पोहोचलो मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच पाय धुण्यासाठी संगमरवरी कट्टा आहे तेथे पाय ठेवल्यावर कारंज्यासारख्या शिंपडल्या जाणाऱ्या पाण्याच्या अखंड प्रवाहाने आमचे पाय धुतले गेले पाय स्वच्छ धुवून निर्मळ होऊन मंदिरात प्रवेश करण्याची प्रथा फार चांगली वाटली डोक्यावर रुमाल टाकून तळ्या-भोवतालच्या संगमरवरी चकचकीत फरशीवरून आम्ही मंदिराकडे निघालो मूळ मंदिर तळ्यात मध्यभागी वसवले आहे तळ्याच्या कडेला संगमरवरी फरशा बसविल्या आहेत सुवर्ण मंदिराचे आवार विस्तीर्ण तीस एकर क्षेत्र असलेले आहे.

शिखांचा चौथा गुरु रामदासने सोळाव्या शतकात सम्राट अकबरापासून देणगीने मिळालेल्या या जागेत प्रथम तळे बांधले या तलावाचे नाव त्याने अमृत सरोवर ठेवले हे नाव ठेवण्यामागे एक कथा आहे श्रीरामचंद्राने अश्वमेध करायचे ठरवले दिग्विजयासाठी घोडा सोडला लव-कुश यांनी तो पकडला घोड्याच्या मुक्ततेसाठी राम लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांनी लव-

कुशाशी युद्ध केले पण त्या कुमारानी सर्वांना मूर्च्छित पाडले पुढे त्यांना उठविण्याचा प्रयत्न झाला तेव्हा लव-कुशानी स्वर्गातून अमृत आणून त्यांच्यावर शिपडले व उरलेले तेथेच जमिनीत पुरले ज्या ठिकाणी हे अमृत पुरले त्याच ठिकाणी गुरु रामदास यांनी हा तलाव खोदला आहे असे म्हणतात तळे जणू अमृताचे म्हणून त्यास अमृत सरोवर म्हणू लागले व आजूबाजूला गाव वसू लागले तेच आजचे अमृतसर !

गुरु रामदासाच्या मृत्यूनतर पाच वा गुरु अर्जुनदेव यानी तेथे मदिर बाधले हे मदिर 'दरबार साहेब' अथवा 'हरीमदिर' म्हणून ओळखले जाऊ लागले.विशेष म्हणजे या मदिराची पायाभरणी लाहोरचा मुस्लीम सत मिया मीर यांच्या हस्ते झाली इतर धर्माबद्दल सहिष्णुता बाळगण्याबद्दल हे साक्षात उदाहरणच! मदिरात जाण्यासाठी तळ्याच्या पश्चिमेला दोनशे चाळीस फूट लाबीचा सगमरवरी पूल आहे पुलाच्या दोन्ही बाजूला कठड्यावर सोनेरी चमकणाऱ्या दिव्यानी पूलाला शोभा आणली आहे पूर पार करून मदिरात आलो. हे मदिर ६५ चौरस फूट मापाचे असून तीन मजली आहे या मदिराला इतर गुरुद्वाराप्रमाणे चार दरवाजे आहेत चारी दिशांकडून येणाऱ्या सर्व दर्शकाच्या स्वागताला मदिर तयार असते

पजाबच्या महाराजा रणजितसिंहाने इ. स १८२३ मध्ये मदिराच्या वरच्या भागाला ताब्याचा कळस वगैरे करून हे मदिर निम्म्यापर्यंत सोन्याच्या पत्र्याने मढविले व त्यामुळे ते सुवर्णमदिर म्हणून ओळखले जाऊ लागले खालील भागावर सगमरवरी उत्कृष्ट कोरीव काम आहे द्राक्षवेली, फुले विविध रगात मोहकपणे कोरली आहेत

शिखांच्या पवित्र ग्रथाला ' ग्रथसाहेब ' म्हणतात आम्ही मदिरात गेलो तेव्हा ग्रथसाहेबाचे वाचन अखडपणे चालू होते भोवती भरजरी वस्त्रे आच्छादिली होती पुलाच्या पश्चिम भागात असणाऱ्या ' अकालबुग ' या स्थानी हा ग्रथ रोज रात्रीच्या वेळी ठेवला जातो रोज सकाळी तो तेथून आणून मदिरातल्या एका छत्रीखाली ठेवतात दिवसभर हा ग्रंथ तेथे असतो ग्रथी नावाचा माणूस त्याच्यावर सतत चवरी वारीत असतो देवस्थानचे गायक त्याच्यापुढे बसून ग्रथसाहेबातली गीते रागदारीत गातात. त्याच्यासमोर वस्त्र पसरलेले असून भाविक लोक स्वखुशीने तेथे दक्षिणा ठेवतात परतु येथे

पैसे ठेवा तिथे पैसे ठेवा असे म्हणून दर्शनाला आलेल्याकडून बळजबरीने पैसे उपटण्याचा प्रकार येथे दिसला नाही देणगी देण्यासाठी स्वतंत्र पेटीही मंदिरा बाहेर पुलाजवळ दूर होती मंदिराच्या आत वरच्या बाजूला छतावर सोनेरी नक्षीकाम उत्कृष्ट होते तसेच शीख संप्रदायाचे पेंटींगचे कामही उत्कृष्ट होते मंदिरातील भित्तीचित्रे अप्रतिम आहेत मंदिरातील वातावरण पवित्र, प्रसन्न, शांत व स्वच्छ वाटले दर्शन घेऊन मंदिराभोवती प्रदक्षिणा घालताना हाताच्या ओंजळीत गव्हाच्या रव्याचा स्वच्छ ताजा प्रसाद दिला गेला संगम-रवरी पुलावरून परतू लागलो तेव्हा पाण्यामध्ये चकाकणाऱ्या सुवर्णमंदिराचे प्रतिबिंब नयनमनोहारी दिसत होते

मंदिराजवळच शीख संप्रदायाचे सामाजिक, धार्मिक निर्णय घेण्याचे सर्वोच्च तख्त–' अकाली तख्त ' आहे सहावा गुरु हरगोविंदने त्याची स्थापना केली तेथे काही जुनी ऐतिहासिक महत्त्वाची शस्त्रास्त्रे व देणगीदाखल मिळालेले अमूल्य जडजवाहीर सुरक्षित ठेवले आहे काही महत्त्वाच्या प्रसंगी त्याचे दर्शन दिले जाते सुवर्णमंदिराच्या आवारातच सेंट्रल शीख म्युझियम आहे. त्यात विविध चित्रांचा समावेश आहे त्यात शिखांनी धर्माच्या रक्षणासाठी सोसलेल्या अतोनात हालाचे, मुसलमानांनी केलेल्या जुलमाचे प्रसंग चित्रीत केले आहेत महाराजा रणजितसिंहाच्या पराक्रमाचे प्रसंग, शिखांच्या शौर्याचे प्रसंग डोळ्या समोर उभे राहतात पंजाबी सुभ्यासाठी शिखांनी दिलेल्या लढ्याचीही चित्रे तेथे आहेत सुवर्णमंदिरासून २०० मीटरवर दुसऱ्या कोपऱ्याला बाबा अटल-राय हा नऊ मजली टॉवर आहे गुरु गोविंदच्या नऊ वर्षाच्या पण असामान्य बुद्धिमत्तेच्या अटलरायच्या स्मृतीप्रित्यर्थ तो बांधला आहे त्यावरून शहराचे विहंगम दृश्य दिसते

सुवर्णमंदिरापासून पाचच मिनिटाच्या अंतरावर इतिहास प्रसिद्ध जालियन-वाला बाग आहे १३ एप्रिल १९१९ ची काळीकुट्ट सायंकाळ खर तर तो होता पंजाबमधील बैशाखी हा सणासुदीचा दिवस सुवर्ण मंदिराचे दर्शन आटोपून स्वातंत्र्याच्या कल्पनेने भारावलेली मंडळी या बागेतील पटांगणात शांततेने राजकीय सभा घेत होती प्रवेशासाठी एकच निरुंद वाट त्या ठिकाणी होती जुलमी ब्रिटीश जनरल डायरच्या हुकमानुसार वीस हजारांच्या जमावावर अचानक गोळीबार सुरू झाला. सुमारे दीड ते दोन

हजार भयभीत असहाय जमाव गोळयाना बळी पडला अनेक जखमी झाले भेदरलेल्या काही लोकांनी जीव वाचविण्यासाठी बागेच्या कडेला असलेल्या विहिरीत उड्या मारल्या त्याच्यावरही निघृणपणे गोळया चालवल्या गेल्या. विहीरीचे पाणी लाल झाले. त्या विहिरीतून नतर शे–दोनशे प्रेते काढली ती विहीर आजही स्मारक म्हणून जतन करून ठेवली आहे व 'शहीदकुँवा' नावाने ओळखली जाते तसेच बागेतील जुन्या भिंतीवरील बुलेटमार्क–बंदुकीच्या गोळयाच्या जतन करून ठेवलेल्या खुणा आजही जुलमाची साक्ष देतात ब्रिटिशाच्या या अमानुष हत्येनतर त्याच्या दडपशाहीविरुद्ध खुद्द अमृतसर व सर्व हिंदुस्थानात तीव्र प्रतिक्रिया होऊन राजकीय जागृती झाली अमृतसरमध्ये तर त्यावेळी मार्शल लॉ पुकारण्यात आला होता पूर्वी खाजगी मालकीची असलेली ही जागा विकत घेऊन तेथे प्रशस्त हिरवळ व बगीचा केला आहे हुतात्म्यांचे स्मारक म्हणून तांबड्या दगडात भव्य ज्योत उभारली आहे। भपक्यापासून अलिप्त असे पवित्र स्मारक ज्योतीच्या स्वरूपात उभारण्यात मोठे औचित्य साधले आहे. हुतात्म्यांच्या बलिदानाने पुनित झालेले हे स्थान धार्मिक स्थानाइतकेच पवित्र वाटत होते

अमृतसरमधील सुवर्णमदिराच्या तोडीच्याच असलेल्या हिंदूच्या पवित्र दुर्गामदिरात टांग्यातून पोहोचलो या मदिराचा पाया प मदनमोहन माल–वीय यांनी घातला तळ्यातील या मदिराला जोडण्यासाठी सुदर सगम–रवरी सेतू आहे या मदिराचे विभ्रमण पहावे तळयात। मदिरामध्ये इ स. १९२५ मध्ये लक्ष्मीनारायण, राधाकृष्ण, रामसीता यांच्या सुबक मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली घुमटाकार सोनेरी कळस तळयात चमकत होता तुलनेनें दुर्गामदिर शीख सुवर्णमदिरापेक्षा आकाराने लहान आहे पण सौंदर्यात उणे नाही हिंदूचेही अमृतसरला शीख धर्माप्रमाणे सुवर्ण मदिर आहे, हे पाहिल्याशिवाय कळत नाही। किंबहुना पजाब–अमृतसर मधील हिंदूनी शिखांशी स्पर्धेने या मदिराची धडाडीने उभारणी केली या दुर्गा मदिरालाही शीख सुवर्णमदिराइतकी प्रसिद्धी मिळणे जरूर आहे

अमृतसरचा फेरफटका मारून झाला होता थडीसाठी वूलनचे कपडे खरेदी करण्यासाठी मेन मार्केटमध्ये आलो लोकरी कपडे तुलनेने स्वस्त वाटले कारण जवळपासच धारीवाल, लुधियाना येथे लोकरी कापडाच्या

गिरण्या आहेत दुकानातील शीख विक्रेता मिठ्ठासपणे बहनजी म्हणून कौशल्याने विक्री करीत होता त्याच्या विक्रयकलेचे कौतुक करावेसे वाटले आपल्याकडे सरदारजीच्या ग्रहणशक्तीबाबत काहीसे विकृत चित्र रंगविले जाते उलट अमृतसरला भेटलेल्या प्रत्येक सरदारजीने—टांगेवाल्यापासून ते दुकानदारापर्यंत सर्वांनी आपल्या बोलण्या चालण्याने एक वेगळी वैशिष्ट्य-पूर्ण छाप पाडली होती. दीर्घोद्योग, चिकाटी हे त्याचे उपजत गुण. शीख भिकारी दिसले नाही हे त्याचे उदाहरण होय पाकिस्तान सरहद्द अगदी जवळ असूनही अमृतसरमधील या लोकाचे नीतीधैर्य फाळणीच्या वेळच्या जखमा, रक्तपात, नंतरची दोन वेळा पाकिस्तानची भारतावर झालेली आक्रमणे यामुळे कमी न होता आजही शाबूत आहे त्याच्या दणकट प्रकृतीप्रमाणे त्याची कणखर जिद्द वाखाणण्यासारखी आहे

□

# सुजला सुफला भूमी–पंजाब

सकाळी नऊ वाजता अमृतसर– मुंबई एक्सप्रेसने अमृतसरचा निरोप घेतला गाडीला विशेष गर्दी नव्हती आमच्या मराठी गप्पा ऐकून शेजारी बसलेला लष्करातला जवान गप्पात सामील झाला ! आटपाडी जवळील खेड्यात त्याचे मूळ गाव सध्या जालंदर कँपला नोकरीला होता दिवाळी दोन आठवड्यावर आली. " गावाकडील म्हातारी, पोराबाळांची लई सय येते " असे तो सांगत होता. पंजाबी लोक कसे कामसू, मेहनती, जिद्दी आहेत याचे तो वर्णन करून सांगत होता पंजाबी लोकांचा मूळचा पिंड लष्करी बाण्याचा प्रत्येक घरचा एखादा माणूस तरी लष्करात हमखास भरती होणारच पंजाब–पंच आब आब म्हणजे नदी रावी, सतलज बियास, जेहलम, चिनाब या नद्यांनी समृद्ध केलेला प्रदेश आजूबाजूला पळणारी हिरवी-गार शेते पंजाबी लोकांच्या मेहनतीची ग्वाही देत होती. शेतामध्ये ठायी ठायी दिसत होत्या कूपनलिका व त्यावर बसविलेले पंप पंजाब हरित-क्रांतीचा अग्रणी आहे हे पटले भारताच्या फक्त दोन टक्के लोकसंख्या व भूमी असलेला पंजाब प्रदेश भारताच्या एकूण गव्हाच्या उत्पादनापैकी पंच-वीस टक्के गहू पिकवतो ! भारताच्या राष्ट्रगीतातील ' सुजलाम् सुफलाम् '

या ओळींची सार्थकता ही भूमी पाहून पटते.

जालंदर स्टेशन आले आणि त्या मिलिटरी जवानाने निरोप घेतला दुपारी बाराच्या सुमारास लुधियाना स्टेशनवर गाडी आली आजूबाजूला लोकरी कापडाच्या व मशिनरी सामानाच्या कारखान्यानी लुधियाना शहर गजबजलेले आहे स्टेशन गेल्यावरही दूरपर्यंत कारखाने दिसत होते घरोघर लहानमोठ्या प्रमाणात मशिनरीचे सामान तयार होते पंजाबच्या औद्योगिक प्रगतीचा लुधियाना हा कणा आहे. घरोघरच्या कुटिरोद्योगात पुरुषाच्या बरोबर खांद्याला खांदा लावून पंजाबी स्त्रिया काम करतात, त्यात त्याना कमीपणा वाटत नाही, उलट अभिमान वाटतो डब्यात बसल्या बसल्या आम्हाला याचा अनुभव आला. सकाळचे कॉलेज लुधियानाला आटोपून रेल्वेने परतणाऱ्या तीन चार मुली गप्पा मारीत हाताने लोकरी विणकाम करण्यात गर्क होत्या ! मोठ्या कौशल्याने त्याचे लोकरी विणकाम चालले होते पंजाबी स्त्री, पुरुषाच्या उद्योगप्रियतेपासून शिकण्यासारखे खूप आहे

सरहिंद जंक्शनला दुपारी दोन वाजता गाडी पोहोचली भाक्रा-नानगलला जाण्यासाठी तेथूनच फाटा फुटतो लगेच गाडी नसल्याने स्टेशनवरील वेटींगरुममध्ये सामान ठेवले एक गाडी सध्याकाळी सातला होती ती रात्री नानगलला पोहोचल्यावर तेथे मुक्काम करावा लागला असता, कारण रात्री काही पाहता येणार नव्हते म्हणून पहाटे साडेपाचच्या गाडीने जाण्याचे ठरविले.

प्रथम गावात जाऊन जेवणासाठी वैष्णव ढाब्यात गेलो कारण पंजाबी ढाब्यातील पदार्थांचा कंटाळा आला होता तेथे तव्यावरची पोळी मिळाली पंजाबी तंदूरी रोटी प्रथम बदल म्हणून बरी वाटली होती, पण आता नावडे-नाशी झाली होती. वैष्णव ढाब्यात वाढणारा दहा वर्षांचा बालमसिंग नावाचा छोकरा चुणचुणीत वाटला सारखा विचारायचा ' और क्या चाहिये बहनजी ! ' भरपूर जेवण घेऊनही बिल फार कमी आले याबद्दल आश्चर्य वाटले दुकानदाराकडे चौकशी केल्यावर त्याने सांगितले –" इस गाँवकी ' अनाजकी मंडी ' पंजाबमे सबसे बडी है । " जेवण झाल्यावर गावात फेर-फटका मारल्यावर त्याची प्रचीती आली मंडीत गव्हाचे ढीगच्या ढीग लागले होते सिमला, कुलूकडील सफरचंदेही तेथे स्वस्त होती स्टेशनवर

परत आलो, तेव्हा तेथील सरदारजी टी सी ने सल्ला दिला की वेळ आहे, तर जवळील फत्तेगड साहेब गुरुद्वार बघून या स्टेशनजवळील बस स्टँडवर बसमध्ये बसून वीस मिनिटातच आठ कि मी अतरावरील या गुरुद्वाराला पोहोचलो

गुरुद्वाराच्या प्रवेशद्वाराजवळ पाय धुऊन डोक्यावर पदर घेऊन आत प्रवेश केला पवित्र शांत वातावरणात मन प्रसन्न झाले ह्या गुरुद्वाराच्या स्थापनेचा इतिहास तेथील एका शीख भक्ताकडून ऐकल्यावर अगावर रोमांच उठले ! शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंग यांच्या सहा व आठ वर्षाच्या दोन मुलांना धर्मवेड्या औरंगजेबाने कपटाने अटक करून ठेवले. त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे त्या दोघा कोवळ्या मुलांना ठार मारण्याची आज्ञा दिली प्रथम लहान मुलगा भिंतीत चिणल्यामुळे ठार झाला मोठ्या मुलाला मुसलमान झाल्यास प्राण वाचेल असे सांगितल्यावर त्याने उत्तर दिले—

“ मौत हो सम्मुख खडी सरपर, खडा तो काल भी ।
सर तो क्या झुकता भला न झुके सरका बाल भी । ’

त्यानतर मोठ्या मुलालाही तत्काळ भिंतीत चिणून ठार मारले. या दोन कोवळ्या बच्च्यांच्या हौतात्म्याच्या प्रित्यर्थ स्मारक म्हणून हा ‘ फत्तेगड साहेब ’ गुरुद्वारा उभारण्यात आला धर्मत्यागाऐवजी यातनामय मरण हसतमुखाने स्वीकारणाऱ्या तेजस्वी संभाजी महाराजांची प्रकर्षाने आठवण झाली

फत्तेगडसाहेब गुरुद्वारानजीकच ‘ रोझा शरीफचा दर्गा आहे सुन्नी पंथीय मुस्लीम त्याला ‘ प्रती मक्का ’ मानतात. दर्ग्याची इमारत सुबक कलाकुसरीने भरलेली आहे आम्ही गेलो तेव्हा दर्ग्याच्या आवारातील मशिदीत नमाज पढण्याचा आवाज ऐकू येत होता. दर्गा पाहून स्टेशनवर परतलो रात्रभर वेटींगरूममध्ये आराम करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला कारण धावणाऱ्या गाड्यांच्या कर्कश आवाजाने शांतता लाभली नाही पहाटे साडेपाचला दिल्ली नानगल एक्सप्रेसमध्ये बसून सतलज तीराकडे भाक्रा पाहण्यासाठी सरहिंदचा निरोप घेतला

☐

## भारताचे आधुनिक मंदिर—भाक्रा नानगल

पहाटे साडेपाचला सरहिंद ते नानगल १०४ कि मी अंतराचा प्रवास सुरू झाला भाक्रा-नानगल धरण बांधण्याचे काम सुरू करण्याच्या वेळीच मालाची वाहतूक करणे सुलभ जावे यासाठी हा लोहमार्ग टाकण्यात आला त्यावेळी वाटेत असणाऱ्या सतलजच्या उपनद्यामुळे पुष्कळ लहान-मोठे पूल बांधावे लागले वाटेत मोठे स्टेशन रुपार लागते रुपार येथे सिंधू नदीच्या खोऱ्यातील प्राचीन संस्कृतीचे अवशेष दर्शनीय आहेत तेथून चंदीगड जवळ पडते व बस सर्व्हिस सतत सुरू असते गाडी सकाळी साडेआठच्या सुमाराला नानगलला पोहोचली

नानगल स्टेशनवरच क्लोकरुममध्ये सामानाची व्यवस्था केली प्लॅट-फॉर्मवरच एका गोडबोल्या सरदारजी टॅक्सीवाल्याने गाठले तो म्हणू लागला की, मी तुम्हाला पस्तीस रुपयात भाक्रा दाखवून आणतो ओळखी असल्याने पास वगैरे लवकर मिळवून चांगल्या प्रकारे सर्व दाखवतो. शेवटी तीस रुप-यांत तो तयार झाला टॅक्सीने प्रथम एक किलोमीटर अंतरावरील गावातील स्टॅंडवर आलो. चहापाणी उरकून घेतले. धरणाचे बांधकाम सुरू झाल्या बरोबरच नानगलचा नवा भाग वसायला सुरुवात झाली व आजचे छोटे

नानगल गाव अस्तित्वात आले

गावापासून दीड कि मी अतरावर असलेल्या पब्लिक रिलेशन ऑफिस-मध्ये गेल्यावर यशवत यानी प्रथम ऑफिसचे ओळखपत्र दाखवल्यावर 'व्हाईट परमिट' मिळाले त्यावर लिहिले होते धरणाच्या फक्त भितीवर जाण्यास मुभा त्यानी पुष्कळ सागितले की, वीजखात्यात इजिनिअर आहे, दूर महाराष्ट्रातून आलो पण तो पब्लिक रिलेशन ऑफिसर काही दाद देईना म्हणाला की एवढेच परमिट मिळेल शेवटी दिल्लीच्या मत्रीमहोदयांचे ओळखपत्र दाखविल्यावर मात्रा लागू पडली व्हाईट परमिट काढून घेतले व रेड परमिट व्ही आय पी दिले गेले. धरणाच्या पायथ्याजवळचे पॉवर हाऊस कट्रोल रुम पहायला मिळणार म्हणून आनद झाला

धरणापर्यंत दहा किलोमीटर रस्ता खूप वळणाकार घाटाचा आहे चढ चढून उतरल्यावर एकदम दिसली हिरव्यागार रगाची सथ सतलज !

'शभर धारानी वहाणाऱ्या ह्या नदीला पूर्वी शतद्रु किंवा शतद्रि असे म्हणत असत आज तिला सतलज नावाने ओळखले जाते सतलज नदी समुद्र सपाटीपासून सुमारे पधरा हजार फूट उचीवर असलेल्या हिमालयाच्या मानस सरोवरात उगम पावते वेदपूर्व काळापासून शतसहस्त्र अमृतधारांनी हिमालयाच्या दुर्गम प्रदेशातून वहात हिमाचल प्रदेशात ती येते. वहात वहात सतलजचा प्रवाह हिमाचल प्रदेशातील शिवालिकच्या पहाडी प्रदेशात येतो इ स १९०८ मधली हकीगत त्यावेळी पजाब प्राताचे युरोपियन गव्हर्नर सर लुई शिवालीकच्या पहाडात शिकारीला गेले असताना दोन उच निमुळत्या पहाडामधून वहाणाऱ्या सतलजच्या प्रवाहाने त्याना स्तिमित केले ! त्यांच्या मनात कल्पना चमकून गेली की धरण बाधायला ही अत्यत योग्य अशी नैसर्गिक भूमी आहे. धरणामागे भव्य जलाशय तयार होईल. त्याप्रमाणे त्यानी ही कल्पना नोंदून ठेवली व त्या दृष्टीने प्राथमिक पहाणी केली गेली स्वातत्र्य प्राप्तीनतर फाळणीमुळे पजाबचा सुपीक भाग पाकिस्तानात गेल्यामुळे उर्वरीत पूर्व पजाबच्या विकासाची अत्यत निकड भासू लागली सतलजच्या प्रवाहाने पूर्वी पावसाळ्यात महापूर येऊन पजाबात हाहाकार माजायचा तसेच हे पाणी सतलज मधून पुढे सिंधू नदीला मिळून शेवटी अरबी समुद्रात वाया जायचे स्वातत्र्यानतर सतलज खोऱ्याची पुन्हा सखोल पहाणी करण्यात आली

व त्या दृष्टीने नियोजनाची पावली पडू लागली भाक्रा जवळचे सतलजचे निरुंद व बाजूला उच्च डोंगरानी वेढलेले पात्र धरण बाधण्यास सर्वोत्कृष्ट स्थान ठरले गेले

खास दूरदृष्टी ठेवून भाक्रा नानगल ही बहुविध फायदे होणारी योजना आखण्यात आली इ स १९५२ मध्ये प नेहरुच्या शुभ हस्ते या प्रचड धरणाचा पायाभरणी समारभ झाला धरणाचा पाया खोदणे सुलभ व्हावे म्हणून प्रथम ५० फूट व्यासाचे अर्धा मैल लाबीचे दोन बोगदे बाजूला खोदण्यात आले त्यातून सतलजचा प्रवाह वळवला गेला भाक्राची कथा आहे १३००० कामगार, ३०० भारतीय तत्रज्ञ व ३० विदेशी तत्रज्ञ यानी ट्रक, क्रेन व सुरुग घेणाऱ्या मशिनरीच्या साहाय्याने हिमालयाच्या कुशीतील सतलजचा प्रवाह अडविण्यात आठ वर्षे अव्याहत घेतलेल्या झुजीची ! श्री स्लोकम हे भाक्राचे प्रमुख विदेशी तत्रज्ञ ! धरणाचा पाया जमिनीपासून १९० फूट खोल पक्का दगड लागेपर्यंत घेतला असून, धरणाची आकाशाला गवसणी घालणारी ७४० फूट उची कुतुबमिनाराच्या तिप्पट आहे ! हे सांगत होते की इतके दिवस अमेरिकेतले 'हूवर' धरण जगात सर्वात अधिक उचीचे (७२६ फूट) समजले जाई त्याचे रेकॉर्ड भाक्राने मोडले व आज भाक्राची सर्व जगात उच्च धरण म्हणून गणना होते. आम्ही धरणाच्या तळापासून वर मान केली तर नजर भिडत नव्हती सिमेंट कॉक्रीटमध्ये बाधलेल्या या धरणाच्या बाधकामाला लागलेल्या सामानाचा हिशेब 'लाखात' आहे !

एकूण बांधकाम केलेले कॉक्रीट— ५५ लाख घनयार्ड

एकूण वापरलेले सिमेंट— ८ लक्ष टन (१ कोटी ६० लक्ष बॅगा)

एकूण वापरलेले लोखड— १ लक्ष टन

१९५५ साली सुरू झालेले कॉक्रीटचे काम १९६३ साली आठ वर्षांनी पूर्ण झाले ताशी ४०० टन कॉक्रीट अव्याहतपणे आठ वर्षे ओतले जात होते ! हे सागत होते की, एवढी आकडेवारी तुम्हाला समजणार नाही म्हणून सोप्या भाषेत सांगायचे म्हटले तर जर या कॉक्रीटचा आठ फूट रुदीचा रस्ता केला असता तर पृथ्वीचा विषुववृत्ताचा एक फेरा पूर्ण झाला असता ! धरण पाहिल्यावर भव्य आणि भव्य असे उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडले ! भाक्राची

ही यशोगाथा मानवाच्या भगीरथ प्रयत्नाचे प्रतीक आहे धरणाच्या तळाला शेतीसाठी पाणी सोडण्यासाठी एका उचीवर आठ व दुसऱ्या उचीवर आठ अशा नालाकार आकाराचे एकूण सोळा दरवाजे दिसले तसेच पूर नियत्रणासाठी खास चक्राकार दरवाजे आहेत

भाक्रा धरणाची लांबी रुंदी तळाला ६२५ फूट आहे धरणाच्या डाव्या तीरावर एक व उजव्या तीरावर एक अशी दोन केंद्रे दिसली विद्युत्निर्मिती साठी डाव्या विद्युत् केंद्रात नव्वद मेगावॅटची पाच विद्युत् जनित्रे आहेत. तर उजव्या विद्युत केंद्रात एकशेवीस मेगावॅटची पाच विद्युत् जनित्रे आहेत एकूण विद्युत निर्मिती क्षमता १०५० मेगावॅट म्हणजे कोयनेच्या दुप्पट आहे

प्रथम आम्हाला 'मॉडेल रुम' मध्ये नेण्यात आले, तेथे टरबाईनच्या मॉडेलच्या सहाय्याने माहिती दिली धरणाला भेट दिलेल्या विविध देशी विदेशी पाहुण्यांचे तेथे फोटो होते तसेच धरणाच्या पाया खोदणीच्या कामापासून तरगेट बसविण्याच्या कामापर्यंतच्या विविध बांधकामाच्या वेळचे अनेक फोटो तेथे होते डोक्यावर हेलमेट घालून सूक्ष्मपणे बांधकाम पहातानाचे पडितजींचे फोटो आढळले. टरबाईन हाऊसमध्ये आल्यावर तेथे पाच पैकी फक्त दोन जनित्रे चालू असलेली दिसली चौकशीअती कळले की, धरणात पाणी कमी असल्याने व दुरुस्तीसाठी, देखभालीसाठी बाकीची चालू नव्हती या भव्य हॉलमध्ये अवाढव्य क्रेन बसविली असून त्याची वरखाली हालचाल चालू होती नतर तेथील गाईडने वातानुकुलीत भव्य कट्रोल रूममध्ये आणले. तेथील ऑपरेटींग स्टाफ निरनिराळे चार्ट भरण्यात मग्न दिसला विविध विद्युत् वाहक फीडरच्या क्षमतेची नोंद घेणारे उचच्या उच पॅनेल बोर्ड दिसत होते मला त्यातले काही कळत नव्हते ह्यांची ऑपरेटरबरोबर चाललेली चर्चा मला 'बोअर' वाटत होती

नतर धरणाच्या इन्स्पेक्शन गॅलरीच्या प्रवेशद्वाराजवळ गाईडने आणून सोडले आम्हाला व्ही. आय. पी. पास मिळाल्याने या गॅलरीत प्रवेश मिळू शकला धरणाच्या आत झिरपणाऱ्या पाण्याला धरणाच्या भितीतून बाहेर काढण्यासाठी ते निरनिराळ्या ड्रेनेज गॅलरीत उताराने गोळा केले जाते व नतर धरणाबाहेर काढले जाते या ड्रेनेज गॅलरी व इन्स्पेक्शन गॅलरीची धरणामध्ये एकूण लाबी ५ कि. मी आहे यावरुन या गॅलरीचे जाळे धरणात

किती ओवले गेले याची कल्पना येईल ! वातानुकूलीत गॅलरीज मधला हा फेरफटका म्हणजे एक चित्तथरारक अनुभव होता भाक्राच्या अजस्त्र भिंतीतून आपण वावरतो आहोत या कल्पनेनेच रोमांचित होऊन गेलो ! तंत्रज्ञांच्या अगाध किमयेचे कौतुक वाटले

इन्स्पेक्शन गॅलरीतून फेरफटका मारल्यावर गाईडने आम्हाला एका मोठ्या क्षमतेच्या लिफ्टमध्ये आणले बटण सुरू केले आणि आम्ही मजल्या-मागून मजले चढून काही क्षणातच धरणाच्या माथ्यावरील रस्त्यावर आलो. धरणाच्या माथ्यावरील रुंदी तीस फूट असून सतराशे फूट लांबीच्या रस्त्याने धरणाच्या दुसऱ्या टोकाकडे जाता येते गोविंद सागरचा विशाल जलाशय शंभर कि मी दूरवर पसरला आहे गोविंद सागरच्या विशाल जलाशयातील हिरव्या रंगाच्या पाण्यामधील मंद लाटा पाहून अहाहा ऽ असे उत्स्फूर्त उद्गार बाहेर पडले जलाशयातील पाण्याची क्षमता आठ दशलक्ष एकर फूट इतकी प्रचंड आहे ! सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे ८० लक्ष एकर क्षेत्रावर एक फूट उंचीचा जर पाण्याचा थर दिला, तर जो साठा होईल तो आठ दशलक्ष एकर फूट ! यंदा कमी पावसामुळे पाण्याची उंची गतवर्षीपेक्षा १५० फुटाने कमी होती

या जलाशयातील दूरवरच्या टोकाकडील जंगलात तोडलेले लाकडाचे अजस्त्र ओंडके वहात वहात धरणाच्या एका बाजूला येत असून तेथून उंच क्रेनने उचलले जातात धरणापासून नानगल स्टेशनपर्यंत उंच उंच टॉवरवर रोपवे तयार करून त्या अजस्त्र पाळण्यातून लाकडी ओंडक्यांची वाहतूक अव्याहतपणे चालू होती ओंडके भरलेले पाळणे स्टेशनकडे जात होते व रिकामे परत भरण्यासाठी धरणाकडे परतत होते. ही अखंड वाटचाल चालू होती आम्ही गुलमर्गला माणसांची वाहतूक करणारा रोपवे पाहिला होता. भाक्राला हा होता लाकूड वाहतूकीचा प्रचंड रोपवे !

धरणावर एक फलक दिसला त्यावर लिहिले होते

Dedicated to Nation-Pandit Nehru

'राष्ट्राला अर्पण– प नेहरू '

धरण पाहिल्यावर, पंडित नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे भारताचे भवितव्य

उज्ज्वल करणारे सतलजवरील भाक्रा धरण हे महान आधुनिक तीर्थक्षेत्र आहे, ते अभिमानाचे केन्द्र आहे, भारताच्या शक्तीचे व समृद्धीचे प्रतीक आहे हे पटले

मध्यान्हीचा सूर्य माथ्यावर आला होता परत एक कटाक्ष विशाल गोविंद सागरावर टाकला. त्या प्रचंड जलाशयाचे एक टोक उच डोंगराला पायथ्याला भिडले होते अडवलेल्या सतलजमाईचा जलाशय पंजाबला सुजलाम्, सुफलाम् करण्यासाठी तयार होता मुलांना तहान लागली होती धरणावरील नळा-मधून वाहणाऱ्या सतलजच्या पाण्याने तृप्ती झाली धरणावर शेवटचा फेर-फटका मारून खाली डोकावले तर तळाजवळची माणसे मुंगीसारखी दिसत होती ! ही किमया धरणाच्या प्रचंड उंचीची ! लिफ्टने आम्ही धरणाच्या तळाजवळ आलो, तेव्हा टॅक्सीवाला सरदारजी वाटच पहात होता

भाक्रा धरण संपूर्ण पाहण्याचे समाधान मिळाल्याच्या आनंदात टॅक्सीने परत निघालो होतो आम्ही सरदारजी टॅक्सीवाल्याला म्हटले आता नानगल बघू व नंतर स्टँडवर परतू यावर तो म्हणाला तीस रुपयात फक्त भाक्रा बघायचे ठरले होते नानगल पहायला अलग दहा रुपये चार्ज पडेल इतक्या दूरवरून आल्यावर नानगल न पहाता परतणे योग्य वाटेना आप-ल्याला सगळे दाखवतो म्हणून कबूल केले होते आणि आता अलग चार्ज कसला ? शेवटी पाच रु अधिक घेण्याचे कबूल करून त्याने बस स्टँडकडे टॅक्सी न वळवता नानगल धरणावर जाण्यासाठी गाडी वळविली जाताना वाटेत एक मोठे वर्कशॉप लागले

भाक्रा धरणाचे शेतीसाठी सोडलेले पाणी या ९५ फूट उंचीच्या १००० फूट लांबीच्या नानगल धरणात सोडले आहे या जलाशयातून काढलेल्या कॅनॉलचा प्रवाह एखाद्या अजस्त्र नदीसारखा वाटत होता इतक्या रुंदीचा हा मोठा कॅनॉल आहे पाण्याचा शुभ्र फेसाळ प्रवाह उडणाऱ्या हिमराशी-सारखा वाटत होता. ४० मैल लांबीच्या या कॅनॉलमधून प्रती सेकंदी १२५०० क्युसेक्स्/घनफूट इतका पाण्याचा प्रचंड प्रवाह वहातो तुलनाच करावयाची झाली तर भाक्राचा मुख्य कॅनॉल आपल्याकडील मुळा धरणाच्या उजव्या कालव्याच्या सुमारे बारा पट क्षमतेचा आहे त्या पाण्याचा उपयोग करून गंगवाल व कोटला येथे प्रत्येकी तीन विद्युत् जनित्रे बसवून १५४ मेगावॅट विद्युत्निर्मिती

केली आहे भाक्राचा मुख्य कालवा १०८ मैल लांबीचा असून व ६९० मैल लांबीचे उपकालवे असून एकूण ३००० मैल लांबीचे कालव्याचे जाळे पंजाब, हरियाना, राजस्थानपर्यंत पसरले आहे एकूण दहा दशलक्ष एकर क्षेत्राला पाणी मिळते त्यामुळे वर्षाला २५० कोटी रु अन्नधान्याची पैदास वाढली, शिवाय ७५०० गावांना वीज मिळाली

नानगल धरण पाहून पाचच मिनिटात बस स्टँडवर आलो तेव्हा कळले की, नानगल धरण पहायला मुद्दाम दूर जावे लागत नाही उलट शॉर्टकटने स्टँडच्या जवळ नानगल धरण पाहून आलो होतो टॅक्सी ड्रायव्हरने स्टेशन-वर प्रथम् सांगितल्याप्रमाणे ३५ रु पदरात पाडून घेतले होते. पण आता उपयोग काय? प्रवासात अशा चलाखीला केव्हा केव्हा बळी पडावे लागते

दुपारचा एक वाजला होता स्टँडनजीक जेवण आटोपले वेळ नसल्याने तेथे असलेला हिंदुस्थान रासायनिक कारखाना पहाण्याचा विचार सोडून दिला स्टेशनवर परतायला गाडी तयारच होती डब्यात बसल्या बसल्या मनात विचार तरळत होते भगीरथ प्रयत्न करून सतलज अडवून मानवाने निर्माण केलेल्या आधुनिक मंदिराचे !

□

## ला कार्बुझरचे स्वप्न–चंदीगड

दुपारी अडीचला रेल्वेने नानगल स्टेशन सोडले. एक स्टेशन सोडल्यावर आनंदपूर साहेब स्टेशनवर गाडी थांबली डब्यामध्ये बरेच शीख प्रवासी शिरले त्यांच्याकडून कळले की सतलजच्या डाव्या तीरावरील नानगलहून २१ कि मी अतरावरील आनदपुरसाहेब शिखाचे महत्वाचे धार्मिक केंद्र आहे हे शहर नववे शीख गुरु तेज बहादूर यांनी वसविले परंतु त्याला खरे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले दहावे गुरु गोविंदसिंग याच्या कारकीर्दीत ! शिखांच्या अस्मितेचे प्रतीक असलेले केस, कगवा, कृपाण, कच्छ, कर या 'क' युक्त पाच वस्तूना धारण करण्यास त्या वेळेपासून सुरुवात झाली औरगजेबाने तेजबहादूरचा वध केला तेव्हा त्याचा मुलगा गोविंदसिह अवघा नऊ वर्षांचा होता त्यानी धर्म रक्षणासाठी आनदपूरला शीख बाधवाना हाक दिली व शीखांना सैनिकी बाण्याची दीक्षा घेऊन त्याच्या सघटनेला 'खालसा सघटना' नाव दिले आनदपूर स्टेशनवरून गुरुद्वाराचे कळस चमकत होते दूरवरूनच शिखांच्या या गुरुला मनोमन अभिवादन केले महर्षी वाल्मिकींनी रामायणाची रचना येथे केली असे मानले जाते

रुपार स्टेशनला गाडी साडेचारच्या सुमाराला पोहोचली तसेच पुढे सर-

हिंदला जाऊन अंबाल्याला येऊन गाडी बदलून चंदीगडला पोहोचायचे म्हणजे रेल्वेचा वेडावाकडा द्राविडी प्राणायामाचा मार्ग वेळेची बचत व्हावी या उद्देशाने आम्ही रुपार स्टेशनला उतरलो तेथे चंदीगडकडे जाणाऱ्या बसेस धावत होत्या, आम्हांला लगेच बस मिळाली व संध्याकाळी सातच्या सुमाराला चंदीगडच्या मध्यवर्ती बस स्टँडवर पोहोचलो तेव्हा रिक्षावाल्यांनी एकच गिल्ला केला

बस स्टँडच्या वरच्या मजल्यावरच चंदीगडच्या पर्यटन अधिकाऱ्याची कचेरी आहे. सहज चौकशी करावी म्हणून वर चक्कर टाकली तेव्हा तेथील शीख अधिकाऱ्याने हसतमुखाने स्वागत केले त्यांनी प्रथम आम्हाला चंदीगडचा इतिहास सांगायला सुरुवात केली १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला परंतु अखंड पंजाबची राजधानी असलेले लाहोर शहर पाकिस्तानात गेले भारतातील उर्वरीत पूर्व पंजाबमध्ये लाहोरच्या तोडीचे शहर होते अमृतसर ! परंतु त्याची सरहद्द पाकिस्तानपासून केवळ पंचवीस किलोमीटर असल्यामुळे भौगोलिकदृष्ट्या ते असुरक्षित होते तेव्हा पंजाबसाठी नव्या राजधानीच्या शहराचा शोध सुरू झाला चंदीगडची निवड पंजाबची राजधानी म्हणून झाली चंदीगड दिल्लीच्या उत्तरेला २५० किलोमीटर अंतरावर दिल्ली–अंबाला–कलका–सिमला रोडवर आहे येथील परिसरातील एका टेकडीवर असलेल्या मंदिरातील चंदा देवीच्या वास्तव्यामुळे चंदीगड नाव रुढ झाले त्यावेळी अपरिचित खेडेगाव असलेल्या चंदीगडच्या आखणीची मुख्य जबाबदारी सोपविली गेली विश्व विख्यात फ्रेंच वास्तुशिल्प तज्ञ ला कार्बुझर यांच्यावर त्याप्रमाणे इ स. १९५१ साली या नगराच्या उभारणीचे काम सुरू झाले पाश्चिमात्य कला व कल्पकतेचे आणि पौर्वात्याच्या जीवनप्रवाहाचे चंदीगडच्या आखणीत जणू संमिश्रण केले गेले चंदीगड होते ला कार्बुझर यांचे 'स्वप्न' !

पर्यटन अधिकाऱ्याने नंतर चंदीगडची माहिती नकाशाच्या सहाय्याने सांगायला सुरुवात केली चंदीगड म्हणजे ३० सेक्टरनी तयार झालेले शहर प्रत्येक सेक्टर आयताकृती $३\frac{१}{२} \times १\frac{१}{२}$ मैलाचा आहे प्रत्येक सेक्टरला एक मार्केट, शाळा, मोकळे खेळाचे पटांगण आहे सर्व सेक्टर रुंद रस्त्याच्या जाळ्याने विणले आहेत सेक्टर १७ हा शहराचा मध्यविभाग आहे तेथे


बस स्टँड, मेन मार्केट आहे चंदीगडमधील दर्शनीय स्थाने कोणती याची माहिती घेऊन आम्ही त्याचा निरोप घेतला

आम्हाला जायचे होते सेक्टर आठमध्ये । तेथे पजाब सरकारच्या मार्केटींग फेडरेशनच्या गेस्टहाऊसमध्ये आमची उतरण्याची सोय झाली होती. रिक्षा करून तेथे पोहोचल्यावर सामान व्यवस्थित लावून गीझर सुरू करून हातपाय धुतले सर्व आवरून जवळच्या मार्केटमधील खानावळीत निवांतपणे जेवण केले पजाबी पद्धतीची भजी घातलेली कढी – कढी पकोडे चवदार वाटली जेवण आटोपून गेस्टहाऊसवर परतलो तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते. बिछान्यावर हातपाय ताणून दिले झोपेत स्वप्नेसुद्धा पडत होती चदीगडची

सकाळचे नऊ वाजले रिक्षाने आम्ही निघालो होतो सेक्टर एकमध्ये चदीगडचे सरळ, रुद प्रशस्त हमरस्ते, त्याला काटकोनातून छेदून जाणारे उपरस्ते व गोलाकार भव्य ट्रॅफीक आयलड, रस्त्याच्या दुतर्फा लावलेली झाडे, रात्रीच्या वेळी प्रकाशासाठी केलेली रेखीव रचना हे सर्व उत्तम आखणीचा ठसा उमटवीत होते

सेक्रेटरीएट बिल्डींगसमोरील प्रशस्त आवारात रिक्षा थांबली होती या उत्तुंग नऊ मजली इमारतीत आधुनिक वास्तुशिल्पकलेचा सुरेख सगम आहे. या इमारतीची लाबी नजरेत भरते त्याचे पोर्चही आकर्षक आहे प्रवेशद्वाराजवळच स्वागतकक्ष आहे तेथे परवानगी काढल्यावर तेथील अधिकाऱ्यानी आमच्यासमवेत गाईडही दिला लिफ्टने आम्ही क्षणातच वरच्या मजल्यावर आलो तेथून चदीगडच्या परिसराचे दृश्य दिसते शेजारच्या असेंब्ली हॉलचे चित्रविचित्र शिल्प मजेशीर वाटत होते दुसऱ्या बाजूला आमदाराचे निवासस्थान व बाजूला दूरवर मत्र्याचे बंगले दिसत होते सेक्रेटरीएटच्या वरच्या मजल्यावर कँटीन आहे तेथील गुलाबजामची लज्जत औरच होती सेक्रेटरीएटच्या आकर्षक जिन्याने उतरताना रविवार असल्याने बद असलेल्या मत्र्याच्या व सेक्रेटरींच्या कचेऱ्या बाहेरूनच पाहिल्या सध्या पजाब आणि हरियाना दोन्ही राज्याच्या कचेऱ्या तेथे आहेत रविवार असल्याने सेक्रेटरीएट शेजारी असलेला आगळ्या वास्तुशिल्पाचा असेंब्ली हॉल आतून पहाता आला नाही हॉलच्या छतावर शकूसारखा विचित्र भाग दिसत होता तेथे साऊडप्रूफ मशिनरी बसविल्याचे कळले

काही अलरावर असलेल्या हायकोर्ट बिल्डींगमध्ये शिरताना प्रथम तेथील दर्शनी तीन भव्य, उच स्तभ चित्त आकर्षून घेतात. या तीन स्तभाना तांबडा' पिवळा, हिरवा रग दिलेला आहे या बिल्डीगचा जिना मोठा मजेशीर आहे पायऱ्यांऐवजी चढ उताराचा अवलब केल्याने वरच्या मजल्यावर चढायला सुखद वाटते मनात विचार आला की स्कूटर अथवा सायकल या वाहनाच्या सहाय्याने बसून वरच्या मजल्यावर जाता येईल खाली डाव्या बाजूला चीफ जस्टीस याच्या कोर्टाचा हॉल आहे. तेथील आसनामागील भितीवरील अखड काश्मिरी कारपेट शोभेत भर घालते बाजूला चीफ जस्टीस याचे चेंबर आहे ते देशी विदेशी वस्तूनी सजविलेले आहे टी पॉयची काच व घडयाळ परदेशी असून सुदर आहे हायकोर्टाच्या लायब्ररीत व्यवस्थित भरपूर पुस्तकांची माडणी केली आहे हायकोर्ट ते असेंब्ली हॉलपर्यंत रस्त्यावर सपूर्ण कॉंक्रीट पेव्हींग केलेले आहे प्रजासत्ताक दिनी त्या ठिकाणी सचलन मानवदना कार्यक्रम होतात हायकोर्टचे प्रतिबिंब समोरच्या तळयात विलोभनीय दिसत होते



गाधी भवन

तेथून बसने निघून आम्ही पोहोचलो सेक्टर १४ मध्ये. पंजाब विद्यापीठाचा परिसर पहाण्यासाठी आत प्रवेश केल्यावर तेथे या परिसरातील विविध वास्तु कोठे आहेत याची माहिती असलेला फलक दिसला. प्रथम आम्हाला उत्सुकता होती 'गांधी भवन' पहाण्याची. छोटयाशा तळयात उमललेल्या कमळ पुष्पाच्या आकाराचे 'गांधी भवन' वैशिष्टयपूर्ण वाटले. गांधी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी हा हॉल बांधलेला आहे. मुख्य प्रशासकीय इमारत, वाचनालय, पदव्युत्तर केंद्र सर्व इमारती आकर्षक आहेत. विद्यार्थी करमणूक केंद्र गोलाकार तीन मजली असून सभोवताली गोलाकार जिना आहे. मधल्या मजल्यावरील हॉलचा उपयोग बैठ्या खेळासाठी होतो. सर्वात वर कँटीन आहे. आम्ही विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थी आनंदाने उत्तरे देत होते. कॉलेजमधल्या पंजाबी तरुणी धीट, न बुजणाऱ्या अशा वाटल्या. चंदीगडचा विद्यापीठाचा हा परिसर रम्य व रेखीव आखणीचा सुंदर नमुना आहे. तेथून आमचा पाय निघता निघेना. वाटत होते वयाने लहान होऊन परत कॉलेज जीवनाचा अनुभव घ्यायला या सुरम्य परिसरात यावे! विद्यापीठाच्या आवाराबाहेरील छोटया हॉटेलमध्ये सर्वांनी जेवण आटोपले. उपास असल्याने मला साबुदाण्याचे इतर काही पदार्थ मिळाले नाही. त्यामुळे केळी, सफरचंद या फळांवरच भागवावे लागले.

विद्यापीठासमोरच भव्य जनरल हॉस्पिटल आहे. त्या इमारतीचेही वास्तुशिल्प वेगळे वाटत होते. बसने निघून आम्ही पोहोचलो सेक्टर पंधरामध्ये संग्रहालय पहाण्यासाठी. चंदीगडचे संग्रहालय व आर्ट गॅलरी इ. स. १९६८ मध्ये या प्रशस्त १६५ फूट चौरस मापाच्या इमारतीत आले. तेवीस लक्ष रुपये खर्चून बांधलेल्या या इमारतीतील निरनिराळया अमोल कलाकृतींची किंमत चाळीस लक्ष रुपयांहून अधिक आहे. इमारत तीन मजली असून खाली तळमजल्याला स्वागतकक्ष, उपहारगृह, यंत्रशाळा व सभागृह आहे. नंतर मधल्या मजल्यावर प्रमुख आर्ट गॅलरी आहे व वरच्या मजल्याला क्युरेटरचे ऑफिस, प्रशासनविभाग आहे. आर्ट गॅलरीत गांधर्व कालीन शिल्पकृती, पुतळे तसेच मोगल, राजस्थानी, अजंता, मालवा, कांगडा या पेंटींगचे उत्कृष्ट नमुने आहेत. मालवा पेंटींगमधील उल्लेखनीय चित्र म्हणजे राणी रुपमती स्नान करीत असताना बाजबहादूर पहात आहे. द्रौपदी वस्त्रहरण व राधाकृष्ण ही

चित्रे आगळ्या शैलीची वाटली पहाडी कांगडा वधूचे लोभसवाण्या नजरेचे चित्र अविस्मरणीय आहे

संग्रहालयाजवळ सेक्टर सोळामध्ये डॉ जाकीर हुसेन 'रोझ गार्डन' आहे या गुलाबाच्या बगीच्यात हजारावर गुलाबाच्या जाती आहे एवढ नमुने एकाच बागेत असणे ही विशेषता आहे आमच्या दुर्दैवाने गुलाबांच्या ताटव्याचे कटींग केलेले असल्याने आणि तेव्हा सीझन नसल्याने फुले पहायला मिळाली नाहीत फक्त तुरळक गुलाबाची फुले दिसत होती तेथील माळ्याने दिलेली दोन टपोरी फुले उल्का–उदयने आनंदाने घेतली बगीच्यातील हिरवळ दूरवर पसरली होती बगीच्याचा परिसर रम्य व शांत वाटत होता चंदीगडच्या उत्तरेला पूर्व कोपऱ्यात छानसे तळे आहे चंदीगडच्या सौंदर्यात त्याने भर घातली आहे

चंदीगडच्या भेटीत आवर्जून पहावे असे आणखी एक ठिकाण म्हणजे सेक्टर पाचमधील 'रॉक गार्डन' सार्वजनिक बांधकाम खात्यातील रोड इन्स्पेक्टर श्री नेकचंद सैनी यांच्या कल्पनेतून दोन एकर क्षेत्रात हा अद्वितीय बगीचा साकार झाला आहे श्री नेकचंद यांच्या नदी आणि शिवालीक पहाडातील दगडगोटे जमविण्याच्या छंदातून हा अद्भुत बगीचा उभारला गेला रंगीबेरंगी दगडगोटे, चिनी मातीचे तुकडे, मोझॅक यांचा कौशल्याने वापर करून गणपती, गरुड, पोपट, घोडा, नंदी, वाघ, उंट, हत्ती, शिवलिंग, योद्धा, चुंबन घेणारे प्रेमी युगुल, नर्तिका तसेच कौरव–पांडव यांचे युद्धाचे दृश्य साकार केले आहे बगीच्यातील एका मोठ्या विभागाला दिवाण–ए–आम तर लहानाला दिवाण–ए–खास अशी नावे दिली आहेत खरोखर, रॉक गार्डन चंदीगडचे आकर्षण आहे

चंदीगडच्या सेक्टर सतरामधील मुख्य बाजार पेठेत फेरफटका मारताना बँकेच्या रांगाच्या रांगा दिसल्या रस्त्यात गजबजाट नाही सार कस शांत शांत चंदीगड केवळ ला कार्बुझरचे सुखस्वप्न ठरले नाही तर ती एक सत्य प्रतिमा ठरली हा प्रत्यक्ष अनुभव चंदीगडचा फेरफटका मारताना आला

सध्याकाळचे पाच वाजले होते तेव्हा आम्ही चंदीगडच्या मध्यवर्ती बस स्टँडवरून सिमला रोडवर कलका नजीक २५ कि मी अंतरावर असलेल्या पिंजोर बगीच्याकडे बसने निघालो होतो. तासाभरातच तेथे पोहोचलो

पिंजोरचा हा बगीचा उत्तर भारतातील सर्वांत जुना व अत्यंत सुंदर मानला जातो तेथून हिमालयाच्या कसौली आणि शिवालिक टेकड्यांचे मनोहारी दृश्य दिसते महाभारतकालीन पिंजोर 'पंचपुर' नावाने ओळखले जाई वनवासात असतांना पांडवांनी वेळोवेळी या बगीच्यात वास्तव्य केले होते असा उल्लेख आहे त्यांचे अंतिम वास्तव्य होते–हिमालयातील स्वर्गारोहण करण्याच्या अगोदरचे। सतराव्या शतकात मोगल बादशहा औरंगजेबाचा विश्वासू सेनापती फिदाईखान याने बगीच्याची उत्तम आखणी केली नंतर पतियाळा महाराजांनी ग्रीष्मकालीन वास्तव्यासाठी तेथे राजवाडा बांधला

आम्ही बगीच्यात पोहोचलो तेव्हा अंधार पडू लागला होता रविवारचा दिवस असल्याने रोषणाईचा दिवस होता हे आमचे भाग्य होते डोंगराच्या उतरणीवर सात टप्प्यात ही बाग वसविली आहे या उलट काश्मीरमधल्या निशात, शालीमार या बागा चढत्या टप्प्यावर वसल्या आहेत हा मुख्य फरक आहे उतरणीच्या पहिल्या टप्प्याच्या शेवटी 'शीशमहाल' आहे ते महाराजांचे राहण्याचे निवासस्थान असे. दुसऱ्या टप्प्याच्या शेवटी दुमजली रंगमहाल आहे तेथे महाराजांचे 'अतिथीभवन' आहे रंगीबेरंगी कारंजांनी बगीचा खुलला होता हरीयाना राज्य पोलीस बॅंडचे मधुर स्वर आनंददायी वाटत होते धबधब्यासारखे टप्प्याने पडणारे पाणी सौंदर्यात भर घालीत होते प्रशस्त हिरवळ, रंगी–बेरंगी फुले, कारंजी यांची मनोहर पखरण झाली होती. सगळीकडे धुंद वातावरण होते.

मोठ्या अनिच्छेने बगीच्यातून बाहेर पडलो तेव्हा मनासमोर मात्र तरळत होते नियतीच्या कचाट्यात सापडलेले शूर पांडव व त्यांची दुर्दैवी स्वाभिमानी द्रौपदी !

रात्री आठला बस मिळाली व तासाभरात चंदीगडला पोहोचलो. चंदीगडच्या दिवसभरच्या पाहिलेल्या वास्तुशिल्प सौंदर्याला सध्याकाळी पिंजोरच्या बगीच्याच्या नैसर्गिक सौंदर्याने जणू मुलामा चढवला होता रात्री केव्हा निद्रेच्या स्वाधीन झाले कळले नाही !

☐

# चंदीगड ते हरिद्वार

सकाळी नऊला चंदीगड स्टेशनकडे रिक्षाने निघालो. स्टेशन गावापासून दूर आठ कि. मी. अंतरावर आहे. चंदीगडच्या मार्केटींग फेडरेशनच्या गेस्ट-हाऊसमधील दोन दिवसांचा सुखद मुक्काम संपला होता. चंदीगड स्टेशनची इमारत आधुनिक आहे. ठराविक साच्याच्या स्टेशनच्या इमारती पहाण्याची सवय झाल्याने स्टेशनची सुबक इमारत पाहून आनंद वाटला. कलकाहून आलेली कलका दिल्ली पॅसेंजर चंदीगडला साडेनऊला आली आणि थोड्याच वेळात आम्ही चंदीगडला बाय बाय केले.

अंबाला स्टेशनला अकरा वाजता गाडी आली. तेथे आम्हाला टाइमटेबल-वरून वाटले की पुढे जाण्यास तासभराने गाडी आहे म्हणून सामान प्लॅटफॉर्म वर उतरून घेतले. नंतर कळले की दुसरी वेगळी गाडी जात नसून हीच गाडी तासभर थांबून पुढे जाते. उतरविलेले सामान पुन्हा डब्यात चढविले. मुलांना पाणी हवे म्हणून वॉटरबॅग भरण्यासाठी खाली उतरले. पाणी भरून परत डब्यात आले तर बाकावरील माझी पर्स गायब ! मुले खिडकीजवळ बसून प्लॅटफॉर्मवरची गंमत पहात होती तर हे नेहमीप्रमाणे पेपरात डोके खुपसून बसले होते ! चोराने बरोबर फायदा घेतला. लगेच स्टेशनवरील पोलीस इन्स्पे-

बटरला कल्पना दिली डब्याजवळ लोक गोळा झाले. एकाने सांगितले की दहा-बारा वर्षांचा एक मुलगा हातात बॅग घेऊन पळत जाताना दिसला होता. त्याप्रमाणे पोलीस इन्स्पेक्टर लगेच पळत सिग्नल केबिन रुमच्या दिशेने गेला अर्ध्या तासाने तो परत आला पण व्यर्थ ! तपास लागला नाही खिडकीतून विमनस्क स्थितीत पहाताना दूरवर रुळाच्या पलीकडील भिंतीवर लिहिलेले वाक्य दिसले-' एक क्षण की असावधानता खतरे मे डालती है।'

दुपारी बाराच्या सुमारास गाडीने अंबाला स्टेशन सोडले वाटेत यमुना-नदीचा पूल लागला दुपारी दोनच्या सुमाराला गाडी सहरणपूर जक्शनला पोहोचली डेहराडूनकडे जाणारी पॅसेंजर तयारच होती अडीचच्या सुमाराला तेथून गाडी निघून लक्सर जक्शनला संध्याकाळी पोहोचली. दिवसभरच्या प्रवासाने कटाळून गेलो स्टेशनवर माकडे माणसासारखी राजरोस वावरताना पाहून मौज वाटली स्टेशन वरच्या भिकार चहाने तिडीक आली लक्सरहून सहाच्या सुमाराला गाडी निघाली


हरिद्वार स्टेशनवर पोहोचलो तेव्हा अंधार झाला होता. रिक्षावाल्या-जवळ धर्मशाळेची जेव्हा चौकशी केली तेव्हा त्याने सांगितले की सध्या बंगाली, गुजराती प्रवाशाची गर्दी असल्याने धर्मशाळा मिळणार नाही लॉजच बरे पडेल स्टेशनजवळील एका लॉजमध्ये सामान हलविले चौकशी अंती कळले की रिक्षावाल्याना लॉजमध्ये प्रवाशी आणल्यावर कमिशन मिळते म्हणून ते प्रवाशांना धर्मशाळेत जागा शिल्लक नाहीत म्हणून मुद्दामच दिशाभूल करतात हरिद्वारमध्ये यात्रेकरूसाठी काही स्वच्छ व चागल्या धर्मशाळा आहेत. लॉजमध्ये सामान लावून जेवणासाठी रात्री नऊच्या सुमाराला बाहेर पडलो गार वारे झोंबत होते काश्मीरनतर परत थंडीचा अनुभव आला गगानदीचा प्रवाह व डोंगराचा परिसर यामुळे थंडी खूप होती जेवण आटोपून लॉजवर परतलो. दुसऱ्यादिवशी सामानाची हलवाहलव न कर-ण्याच्या दृष्टीने प्रथम हरिद्वारजवळील हृषिकेश पाहून येणे सोयीचे पडेल या विचाराने हृषिकेश पहाण्याचे ठरवून पहुडलो दिवसभरच्या थकव्यामुळे झोप केव्हा लागली कळलेसुद्धा नाही

□

## लक्ष्मण झुल्याचे हृषिकेश


हरिद्वार स्टेशनहून सुटणारी हृषिकेशची गाडी सकाळी ठीक नऊला सुटली २५ किलोमीटर अंतराच्या रेल्वे प्रवासात आजूबाजूला रम्य डोंगर, हिरवीगार वनराजी, झुळझुळणारे प्रवाह असे नयनमनोहारी दृश्य दिसत होते हृषिकेश स्टेशनवर उतरल्यावर लक्ष्मण झुला पहाण्यासाठी टांगा ठरवला त्याप्रमाणे पाच कि. मी अंतरावर असलेल्या लक्ष्मण झुल्याकडे निघालो वाटेत पहिल्या मैलावर 'मुनीकी रेती' स्थान लागते तेथे शत्रुघ्नाचे मंदिर आहे जवळच स्वामी शिवानंदाचा आश्रम आहे गंगेच्या पैलतीरावर 'स्वर्गाश्रम' स्थान आहे

लक्ष्मण झुल्याकडे जाणारा रस्ता एका बाजूला डोंगराच्या कडेकडेने चढ चढत व दुसऱ्या बाजूला गंगा नदीचा झुळझुळ वाहणारा प्रवाह यामधून जातो टांगेवाल्याने लक्ष्मण झुल्याच्या अलीकडील बाजूला उतरून दिले व सांगितले की पूल ओलांडून गंगेच्या पैलतीरावरील घाट, मंदिरे, आश्रम पाहून दुपारी चारपर्यंत घाटावरून सुटणाऱ्या होडीतून बसून आश्रमाच्या बाजूला या तीरा-वर या तुम्हाला स्टेशनकडे परत नेऊ लक्ष्मण झुल्यावरून सभोवतालचे दृश्य रमणीय दिसत होते वरच्या बाजूला उंच उंच पहाड, त्यावर हिरवीगार झाडेच झाडे, खाली झुळझुळणारी गंगा मैय्या. पाय जोरात आपटले की पूल



चंदीगडचे हायकोर्ट - एक विलोभनीय प्रतिबिंब

आधुनिक वास्तुशिल्प - असेंब्लीहॉल, चंदीगड





काशी - गंगेचा घाट

पिंजोर बगीचा



मद हलायचा चौदा वर्षांच्या वनवासात लक्ष्मणाला मेघनादाच्या केलेल्या हत्ये- मुळे ब्रह्महत्त्येचे पाप लागले होते यासाठी प्रायश्चित्त म्हणून गगा तटावर घोर तपश्चर्या केल्यामुळे श्री शकर प्रसन्न होऊन लक्ष्मण पापमुक्त झाल्याची पौरा- णिक कथा आहे श्री लक्ष्मणजीचे तेथे प्राचीन मंदिर आहे हा लक्ष्मण झूला चारशे पन्नास फूट लांब असून नदीतील पाण्याच्या पातळीपासून सत्तर फूट उचीवर आहे पूर्वी तो दोरखडाचा होता नतर तो लोखडी तारानी पक्का करण्यात आला या तरगत्या बिनखांबी पुलावर उभे राहिल्यावर पुलाच्या धनुष्याकार ताण दिलेल्या तारा व त्याला छेदणाऱ्या उभ्या तारा मजेशीर दिसत होत्या दूरवर दिसत होत्या गगेच्या पात्रातील होडया आणि एकदम नजरेसमोर दिसू लागला 'जिस देशमे गगा बहती है' मधला होडीत बसून लक्ष्मण झुल्याखाली गाणारा 'राजू' !

लक्ष्मण झूला पार करून गेल्यावर पलीकडे दहा-बारा मजली मोठे मदिर आहे हिंदूच्या सर्व देवाचे दर्शन त्या एका मदिरात होते मजल्या मागून मजले चढताना पाय थकले होते, मात्र पायऱ्या सपत नव्हत्या ! सर्वात वरच्या मजल्यावर शिवजींची पिंड आहे सर्वात वर कैलासाची कल्पना अभिप्रेत असावी ! तेथून लक्ष्मण झूला, आजूबाजूचे पहाड, गगा नदी यांचे विहगम दृश्य दिसते

नदीच्या कडेकडेने स्वर्गाश्रम येईपर्यंत रस्त्याच्या बाजूला बसलेले भिकारी, महारोगी पाहून उबग आला या पवित्र व रम्य ठिकाणी त्यामुळे विरस होतो वास्तविक अशा वृद्ध, रोगी लोकांसाठी वृद्धाश्रम, आरोग्याश्रम काढा- यला हवे वाटेत माणसाळलेली माकडे दिसतात लक्ष्मण झूल्यापासून स्वर्गा- श्रम येईपर्यंत वाटेत प्रवाशाना बसण्यासाठी जवळ जवळ दोनशे-अडीचशे सगमरवरी बाकाची राग लागते हे बाक धर्मादाय केलेले आहेत ज्यानी देणगी दिली त्यांची नावे त्यावर कोरली आहेत

स्वर्गाश्रम, परमार्थ आश्रम, गीता भवन पाहून मन प्रसन्न होते. तेथे रामायण-महाभारतातील प्रसगावर आधारीत चित्रे व श्लोक कोरलेले आहेत मदिरात मूर्तींच्या मागे व बाजूला कौशल्याने लावलेल्या आरशामुळे मूर्तींच्या अगणित प्रतिमा दिसत होत्या या आश्रमात राहण्यासाठी नाममात्र आकार लावला जातो. फक्त अट असते की तेथील भजने, भक्तीप्रद कीर्तने

ऐकलीच पाहिजेत. थोडक्यात म्हणजे केवळ हौस म्हणून प्रवाशानी न राहता भक्तीमार्गाची कास धरायला हवी या आश्रमातील प्रसन्न पवित्र वातावरण पाहून वाटते की सर्व काही विसरून भक्तीमार्ग आचरण्यासाठी याखेरीज कुठली पवित्र भूमी असणार ?

घाटावर पोहोचलो तेव्हा भर दुपारचे अडीच वाजले होते गगामैयाच्या पाण्यात हात घातला तर बर्फासारख्या थड पाण्याने हाताला झिणझिण्या आल्या गगेचा अत्यत स्वच्छ, निर्मळ पाण्याचा प्रवाह पहावा तो हृषिकेश मध्येच ! छोटया उदय उल्कांनीही थड पाण्यात आघोळ केली स्नान आटोपल्यावर नदीच्या कडेला असलेल्या प्रसिद्ध ' चोटीवाला खानावळीत ' जेवण केले जाहिरातीसाठी दुकानासमोर तुळतुळीत डोक्याचा पण उभी शेंडी असलेला, तोंड रगवलेला, गध लावलेला, फक्त रगीत धोतर नेसलेला व बाकीचे शरीर उघडेच असलेला छोकरा पाहून मजा वाटली येणाऱ्या जाणाऱ्यांना तो ' आईये ', ' आईये ' म्हणून मोठ्या अगत्याने बोलावत होता

हृषिकेशचा फेरफटका मारून झाला होता टागेवाल्याने दिलेली चारची वेळ झाली होती गगेच्या पैलतीरावर जाण्यासाठी होडी तयार होती होडी-तून पैलतीरावर जाण्यासाठी पैसे घेत नाहीत प्रवाशांची अशी सोय करणाऱ्या धार्मिक, दातृत्ववान लोकांबद्दल धन्यता वाटली हीच खरी जनसेवा ! परतताना होडीतून प्रवाशांनी टाकलेले खाद्य टिपणारे मासे पाहून मौज वाटत होती होडीतून हृषिकेशच्या घाटावरील मदिरे मोठी आकर्षक दिसत होती, आणि पाण्याचा प्रवाहही ! नितळ स्फटिकासमान असणारे हे पाणी डोंगर दऱ्या दगडधोंड्यातून, वाळूतून नैसर्गिकरित्या जणू फिल्टर होऊन येते

पैलतीरावर पोहोचल्यावर टागा तयार होताच चहा घेऊन गावाकडे परतताना दक्षिणात्य तिरुपती बालाजीचे मदिर पाहिले तसेच भरताने तपस्या केलेल्या जागी बुद्ध मदिरासारखे असलेले प्राचीन भरत मदिर पाहिले

स्टेशनवर पोहोचलो तेव्हा सहा वाजले होते गाडीतील बगाली प्रवासी गप्पा मारता मारता एक अनुभव सागत होते– आम्ही टांगा करून गगा-स्नानाला घाटावर आलो बरोबरचे सूटकेस, बॅगा हे सामान टांगेवाल्याला

वजावून टांग्यातच ठेवले इकडे स्नानासाठी शरीर गंगेच्या थडगार पाण्यात झोकून दिले खरे पण सर्व लक्ष नदीकडेच्या दूरवर दिसणाऱ्या टांग्यातील बॅगाकडेच ! परत एक पाण्यात डुबी, परत डोळे टांग्याकडे आमची ही अवस्था पाहून नदीत डुब्या मारणारा एक स्थानिक रहिवासी शेवटी म्हणाला, " भाईजी, हृषिकेशके तांगेवाले धोखा नही देंगे। चाहे तो ज्यादा किराया माँग लेंगे। ये तांगेवाले उस देशके रहिवासी है जिस देशमे गगा बहती है भाईसाव।" वगाली प्रवाशाच्या अनुभवाने डब्यात एकच खसखस पिकली सर्व प्रवासी हसण्यात सामील झाले कारण सर्वांनाच केव्हा ना केव्हा या प्रकारचा अनुभव आला होताच मंदिरात दर्शन घेताना लक्ष मंदिराबाहेरच्या चपलेकडेच असते ना ! एकूण सर्वांचाच वीक पॉईंट होता तो हसनखेळत हृषिकेश-हरिद्वार हा तासाभराचा प्रवास कसा सपला ते कळले नाही बगाली प्रवाशांनी कलकत्त्याचे आमंत्रण दिले तर आम्ही पुण्याचे !

हरिद्वारच्या स्टेशनवरून बाहेर पडताना तिकीटासाठी टी सी ने हटकले आमचे तिकीट पाहिल्यावर त्याच्या ' लोभी ' नजरेत वेगळीच चमक दिसली तो म्हणाला, आपने बिगर तिकीट प्रवास किया है, निकालो पेनल्टीके पचास रुपये !' आमचे सर्क्युलर तिकीट हरिद्वार-हृषिकेश-डेहराडून असे होते आमच्या समजुतीप्रमाणे हरिद्वारहून हृषिकेश पाहिल्यावर परत हरिद्वारहून डेहराडूनला जावे लागेल रेल्वेच्या नकाशावरून तशी समजूत झाली प्रकार असा होता की, हरिद्वारचे मागचे स्टेशन ' रायवाला ' येथून डेहराडूनला गाडी जाते तेव्हा रायवाला ते हरिद्वार हा केवळ बारा कि. मी चा पन्नास पैसे तिकीट असलेला प्रवास विनातिकीट झाला टी सी ने तर लगेच दंडाची भीती दाखवली त्याला पुष्कळ सांगितले की १३३ रुपयाचे संपूर्ण तिकीट काढणारा केवळ पन्नास पैशासाठी कसा फसवील ? नकाशा पाहण्यात थोडी चूक झाली पण तो ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता आमच्याकडून पैसे उकळून पावती न देता साळसूदपणे आम्हाला त्याने सल्ला दिला की डेहरा-डूनला जाण्यासाठी गाडीत बसल्यावर हरिद्वारहून बसलो असे न सांगता हृषिकेशहून बसलो असे सांगा निदान गंगेच्या काठी तरी होटोंपे सचाई' असलेला टी. सी भेटेल ही आशा व्यर्थ ठरली

☐

# जय गंगे भागीरथी–हरिद्वार

उत्तर प्रदेशातील सहरणपूर जिल्ह्यात हिमालयाच्या शिवालीक पहाडाच्या पायथ्याशी समुद्र सपाटीपासून हजार फूट उंचीवर पवित्र गंगेच्या उजव्या तीरावर हरिद्वार वसले आहे हरिद्वार म्हणजे उत्तरखंड यात्रांचे प्रवेशद्वारच। श्री बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री, जमनोत्री येथे जाण्यासाठी येथूनच सुरुवात होते श्री शंकराचे एक नाव 'हर' असल्याने हरिद्वार असे नाव पडले पूर्वी ऋषीमुनी, तपस्वी यांचे ध्यानसाधनेचे हे स्थान असल्याने त्यास स्वर्गद्वारही म्हणतात मायानगरी, तपोवन, कपिलाष्ठान ही आणखीही नावे आहेत तसेच गंगोत्रीत उगम पावल्यावर गंगेचे येथे प्रथम दर्शन होते म्हणून गंगाद्वारही म्हणतात हिमालयात उगम पावलेल्या गंगेचा प्रवाह डोंगराळ प्रदेशातून वहात येतो मैदानी प्रदेशातला तिचा प्रवाह हरिद्वार येथूनच सुरू होतो

गंगावतरणाची लहानपणापासून ऐकलेली पौराणिक कथा परत नजरेसमोर तरळली चक्रवर्ती राजा सगर याने अश्वमेध यज्ञाचा संकल्प केला होता नव्व्याण्णव यज्ञ पूर्ण झाल्यावर शंभराव्या यज्ञासाठी शामकर्ण अश्व सोडला देवांचा राजा इंद्र याला वाटले की सगराने अश्वमेध पूर्ण केला की तो इंद्रासन हस्तगत करील म्हणून त्याने यज्ञाचा अश्व चोरला व तप करावयास

बसलेल्या कपिल मुनींजवळ बांधला राजा सगराचे साठ सहस्त्र पुत्र अश्वाचा शोध करीत करीत तप करीत बसलेल्या कपिल मुनींजवळ आले मुनींचा तपोभग झाल्याने क्रोधाने त्यांनी सर्वांना भस्म केले सगरराजाचा आणखी एक मुलगा अशुमान याने कपिलमुनींची सेवा करून अश्व परत आणला व यज्ञ पूर्ण केला यज्ञ पूर्ण झाला पण साठ सहस्त्र राजकुमार भस्म झाले त्यांना मुक्ती मिळाली नाही कपिल मुनींनीच यासाठी सांगितले की जर स्वर्गातील गंगा पृथ्वीवर आली तर त्यांचा उद्धार होईल यासाठी भगीरथाने आपल्य पित्राना तारण्यासाठी केलेल्या कठीण तपावर प्रसन्न होऊन गंगा पृथ्वीवर अवतरली खरी पण गंगेचा प्रचंड वेग थोपविण्यासाठी श्री शंकराने ती मस्तकावर धारण केली जेव्हा जटेतून एक थेंब गळाला तेव्हा गंगा पृथ्वीवर अवतरली व पवित्र गंगाजल स्पर्शाने राजा सगरचे पुत्र मुक्त झाले म्हणून गंगेचे नाव भागीरथी असेही पडले कपिलमुनींच्या आश्रमातील भगीरथाच्या पूर्वजाना तारून डोंगर तोडत फोडत गंगेचा प्रवाह पुढे गंगासागराजवळ बंगालच्या उपसागराला मिळतो

सकाळी नऊ वाजता आम्ही पायीच हरिद्वारच्या रस्त्याने फेरफटका मारावयास सुरुवात केली स्टेशनपासून सरळ असलेल्या एकच एक रस्त्याने गंगेच्या काठी साठ पायऱ्या असलेली ' हरकी पैडी–' हरीच्या पायरीजवळील कुंडाजवळ आलो मृत्युलोकात गंगा आल्यावर राजा श्वेताने जेथे ब्रह्मदेवाला प्रसन्न करून वर मिळविला ते स्थान ' ब्रह्मकुंड ' नावाने हरीच्या पायरीजवळ हरकी पैडी ओळखले जाते हरिद्वारची हरकी पैडी म्हणजे मुक्ती मार्गा-वरील सौख्य सोपानाची पायरीच । असंख्य साधू संत, तपस्वी त्या ठिकाणी येतात पवित्र गंगाजलाने पावन होतात गंगेचा काठ गुलाबाच्या पाकळ्यांनी व झेंडूच्या फुलांनी भरलेला होता दररोज संध्याकाळी तेथे गंगामाईची आरती होते तेव्हा भाविकाच्या मेळ्याने गंगाकिनारा फुलून जातो तेथे ' गंगाद्वार ' हे पवित्र प्राचीन मंदिर आहे गंगाजलात तीर्थस्नान करण्यासाठी भाविकांची नुसती झुंबड उडाली होती स्त्रियांसाठी अलग बंदिस्त घाट हे एक वैशिष्ट्य दिसले त्यामुळे स्त्रियाही निर्धास्तपणे भाविकतेने स्नान करताना दिसल्या नदीत पोसलेले मासे यात्रेकरुनी दिलेले खाद्य खात होते तेथील घाटावर कुंभ व वैशाखी मेळे भरतात व गंगेचा हा किनारा लाखो यात्रेकरुनी फुलला

जातो त्यात हत्तीवर बसून येणारे साधूही असतात राजा भर्तृहरीने मुक्तीसाठी येथेच तप केले होते ।

कुभमेळा बारा वर्षातून एकदा हरिद्वारला भरतो त्याची पौराणिक कथा तेथील पडधामार्फत ऐकायला मिळाली. ती अशी–समुद्रमथनातून निघालेल्या ' अमृतकलशासाठी देव आणि दानव याच्यामध्ये घनघोर युद्ध झाले । देवापेक्षा अधिक शक्तीमान असणाऱ्या दानवापासून अमृतकलशाचे रक्षण करण्याचे काम बृहस्पती, सूर्य, चद्र व शनी यांच्यावर सोपविण्यात आले वरील चार देव अमृत कलश घेऊन दानवांपासून लपविण्याच्या दृष्टीने पळून गेले बारा दिवस आणि रात्रीच्या घनघोर युद्धाच्या वेळी अमृत कलशातील अमृत हरिद्वार, प्रयाग, नाशिक, उज्जैनी येथे शिपडले गेले म्हणून वरील चार ठिकाणी बारा वर्षांतून एकदा कुभमेळा भरतो

हरीच्या पायरीजवळील दोन सुदर पूल आहेत तेथे रामकिशोर बिर्लांनी बांधलेले घटाघर दिसले तसेच राजा अकबराने सेनापती मानसिंहाच्या स्मृतीप्रीत्यर्थ बांधलेली गोलाकार छत्रीही तेथे आहे. हरकी पैडीच्या मागे पर्वत शिखरावर अर्धा मैल चढावर मन्सादेवीचे मंदिर आहे आणखी अर्ध्या मैलावर सूर्यकुड आहे तेथून गगाकाठचा देखावा छान दिसत होता

हरिद्वारपासून तीन कि मी अतरावर गगेच्या किनाऱ्यावर नीलधारा व भागीरथीच्या सगमावर कनखल वसले आहे कनखल हे दक्ष प्रजापतीच्या राजधानीचे ठिकाण असून तेथे दक्ष प्रजापतीचे मदिर आहे. श्रावण महिन्यात तेथे मेळा भरतो कनखलच्या दुसऱ्या किनाऱ्यावर भगवान शकराची अर्धांगिनी सती हिने आपले वडील दक्ष प्रजापती ह्यांनी यज्ञामध्ये सर्व देवाबरोबर भगवान शकराला न बोलावून केलेल्या अपमानाप्रीत्यर्थ कुडात जेथे आहुती दिली ते सती कुड ' आहे नदी पार करून गेल्यावर दगडधोंड्याची चढण चढून गेल्यावर श्रीचडादेवीचे प्राचीन मदिर लागते तेथून हरिद्वार व कनखल याचे रम्य दृश्य दिसते ।

हरिद्वार स्टेशनपासून हरकी पैडीकडून हृषिकेशकडे जाणाऱ्या रस्त्यावर नजीकच भीमगोडा मदिर व कुड आहे त्याची पौराणिक कथा अशी आहे की पाडव अज्ञातवासात असताना द्रौपदीला तहान लागली तेव्हा गुडघा टेकून भीमाने कुड प्रगट केले पलीकडे दहा फुटी गुंफा आहे

हरकी पैंडीच्या दुसऱ्या बाजूला नील पर्वतावर गंगेची धार वाहते तसेच सप्तर्षींनी जेथे तप केले तेथे गंगा अलग अलग सात धारात वाहते ती 'सप्तधारा'। सप्तसरोवरात सात धारा एकत्र येऊन मोठ्या धारेत वहातात ते दृश्य अद्‌भुत् दिसते

हरिद्वारचे प्रसिद्ध घाट आहेत नेताजी सुभाषचंद्रचा पुतळा असलेला सुभाष घाट, गोहत्त्या पाप जेथे नष्ट होते तो गऊघाट, दत्तात्रयाने जेथे एका पायावर दहा हजार वर्षे तपस्या केली तो होळकरांनी बांधलेला कुशावर्त घाट, विष्णूने तप केलेला विष्णुघाट, श्रवण घाट इत्यादि

पवित्र गंगामाईला फुले अर्पण करून आम्ही भावपूर्ण निरोप घेतला. निरोप घेताना आम्याला भेटलेल्या वृद्ध दुकानदाराचे प्रणाम पोहचते करायला विसरलो नाही त्याचे शब्द आठवत होते "गंगामैयाको मेरा प्रणाम पहुँचा देना, भूलना नही।"

नदीकाठची बोळाबोळातली दुकाने आपल्याकडील पंढरपूर क्षेत्राची आठवण करून देत होती स्टेशनकडे परतताना ललतारा पुलाच्या उजव्या बाजूला असलेल्या बिल्व पर्वतावरील बिल्वकेशव मंदिराचे दर्शन घेतले तेथे बेलाचा वृक्ष, शिवजीची पिंड व गौरीकुंड आहे

पौराणिक प्रकृतीच्या हरिद्वारजवळ सहा कि मी अंतरावर ज्वालापूर येथे भारत सरकारने पंचाहत्तर लक्ष रुपये खर्चून बांधलेल्या विजेच्या सामानाचे उत्पादन करणाऱ्या 'भारत हेवी इलेक्ट्रीकल्स'चा कारखाना पाहाण्याची ह्याची खूप इच्छा होती परंतु वेळेअभावी तो सोडून दिली. लॉजवर परतताच भोजन उरकून घेतले व लॉजवर जाऊन सामान घेऊन स्टेशनवर दुपारी तीनच्या सुमाराला आलो स्टेशनवर भगवे कपडे परिधान केलेले हिप्पी स्त्री पुरुष 'हरेराम हरे कृष्ण' पंथाच्या प्रभावाखाली वावरत होते।

☐

# हिमालयाच्या पायथ्याशी-डेहराडून

दुपारी साडेतीनला हरिद्वार स्टेशनवर मुंबईहून आलेली डेहराडून एक्स्प्रेस आली डेहराडूनच्या दिशेने प्रवास सुरू झाला आणि आम्ही आस्ते आस्ते हिमालय व शिवालीक या दोन पर्वतांच्यामध्ये असलेल्या सुपीक डूनच्या खोऱ्यात प्रवेश केला सध्याकाळी सहाच्या सुमाराला गाडी डेहराडून स्टेशनवर पोहोचली डेहराडून हे उत्तरीय रेल्वेचे शेवटचे स्टेशन डेहराडूनचा इतिहास महाभारत कालीन द्रोणाचार्यांच्या वेळेपासून सुरू होतो डेहरा म्हणजे 'डेरा' व डून म्हणजे 'द्रोण' याच्यापासून हे नाव बनले. डेहराडून म्हणजे महाभारतकालीन गुरु द्रोणाचार्य यांचा आश्रम असलेले ठिकाण। डेहराडून म्हणजे शिवाच्या वास्तव्याचा केदारखंडाचा भाग राम लक्ष्मण तसेच पांडवांच्या पदकमलांनी पुनित झालेला गढवाल भाग शिख गुरु रामराय यांनी पजाबातून येथे येऊन गुरुद्वार उभारले, नतर गुरख्यांनी कब्जा केला फाळणीनतर गढवाली, गुरख्यांप्रमाणे पजाबी येऊन स्थानिक झाले डेहराडून प्रसिद्ध आहे बासमती तादूळ, लिची फळ यासाठी

आम्हाला डेहराडूनला दीर डॉ प्रतापराव यांचेकडे कर्झन रोडवरील घरी जायचे असल्याने कोठे उतरायचे, जेवायचे अशा स्टेशनवरील चौकशीची

गरज नव्हती रिक्षाने त्याच्याकडे पोहोचलो, तेव्हा वीज कपातीमुळे अंधारानें आमचे स्वागत केले त्यांना आम्ही नगरहून निघताना टाकलेले पत्र मिळाले असल्याने ते दिवसभर वाट पहातच होते दुपारी अमृतसर-डेहराडून गाडीने आम्ही येतो की काय या कल्पनेने ते स्टेशनवर येऊन गेले होते इतक्या दूरवर सर्वांची गाठभेट झाल्याने खूप आनंद झाला गप्पाटप्पात वेळ कसा गेला कळले नाही रात्री जेवण आटोपून भरपूर विश्रांती घेतली

दुसऱ्या दिवशी सकाळची डेहराडूनची हवा मोठी आल्हाददायक वाटली चहापाणी आटोपून सकाळी बाजारपेठेकडे चक्कर मारली गावातील रस्ते खास लांब, रुंद नाहीत रस्त्यावरील ट्रकवाले, स्कूटरवाले, टांगेवाले, सायकलवाले आणि लष्करी गाड्या यांच्या वर्दळीतून पादचाऱ्याने जीव मुठीत धरून चालले तरच बचाव व्हायचा गावातील मुख्य बाजारांमधील फलटण बाजाराचा भाग गर्दीने फुललेला होता उत्तर प्रदेशातील शहरात आढळणारे घटा घर डेहराडूनच्या बाजारपेठेतही मौजूद होते डेहराडूनची वस्ती संमिश्र वाटली–पंजाबी, शीख, गढवाली ! डेहराडूनचे वैशिष्ट्य म्हणजे मोठमोठ्या कंपाऊंडमधील प्रशस्त आवारात गर्द झाडी व त्यातील छोटेखानी बंगले बरेचसे लष्करी अधिकारी सेवानिवृत्तीनंतर रहाण्यासाठी डेहराडूनची निवड करतात त्यामुळे डेहराडूनला उत्तरेतील ' पेन्शनरांचे पुणे ' म्हणायला हरकत नाही

इंडियन मिलिटरी ॲकॅडमीमुळे डेहराडूनच्या रुबाबात भर पडली आहे आपल्याकडे खडकवासल्याला मिलीटरी ॲकॅडमी स्थापन होण्यापूर्वीपासून डेहराडूनची ही हिंदुस्थानातील जुनी परंपरा असलेली एकमेव ॲकॅडमी आहे पासिंग आऊट परेडच्या वेळी येथे उत्साहाला उधाण आलेले असते

दुपारी घरी परतल्यावर मटणाच्या खास बेतावर सर्वांनीच भरपूर ताव मारला महिनाभर ठराविक साच्याच्या जेवणाला सर्वचजण कटाळलो होतो. स्टेशनवर येणाऱ्या तळकट वासामुळे तर उल्का अगदी हैराण झाली होती घरगुती जेवणामुळे बरे वाटत होते भोजनोत्तर विश्रांती घेऊन सुप्रसिद्ध फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये चक्कर मारली या केंद्राचे भव्य आवार उंच उंच वृक्ष व बगीचे यांनी सुशोभित केले आहे इ स १९२९ मध्ये रोमन शिल्पकृतीच्या धर्तीवर या केंद्राची उभारणी झाली येथील भव्य हॉल

म्हणजे 'कॉनव्होकेशन हॉल'–मौल्यवान तुकतुकीत सागवानी लाकडानी मढवलेला, भरपूर लांबीचा, रुंद आणि उंच ! तेथील संग्रहालय लाकडाची शास्त्रीय माहिती सोप्या भाषेत सांगते. एका दालनात विविध वृक्षांचे छेद घेतलेले नमुने ठेवलेले होते. त्यात सातशे वर्षांपूर्वीचा जुना नमुना होता. तेथील आकर्षक दालन म्हणजे 'झाडाचे शत्रू' अशी पाटी लिहिलेले दालन. त्यात दिसले रंगीबेरंगी सुबक कीटक, हातभर रुंदीची फुलपाखरे ! त्यांच्या अंगावरील रंगांची पखरण पहातच रहावी इतकी अप्रतिम. पण ते लाकडाचे शत्रू ठरतात. वृक्ष पोखरून त्यातील जीवनरस शोषून फस्त करतात. तेथे एक प्रयोगशाळाही आहे. त्यात लाकडाच्या विविध तुलनात्मक कसोट्या घेण्यासाठी यंत्र सामुग्री बसवली आहे. संग्रहालय पाहून घराकडे परतलो.

□

# हिमराणी मसुरी

सकाळी साडेआठची वेळ उबदार कपडे अंगावर चढवून डेहराडूनच्या स्टँडवर आलो मसुरीसाठी बस तयारच होती. मसुरीकडे जाणाऱ्या गाड्या कमी लांबीच्या होत्या कारण घाटात वळायला हव्या ना! ड्रायव्हरने ब्रेक वगैरे व्यवस्थित आहेत का नाही तपासून मसुरीकडे कूच केले डेहराडून-मसुरी तसा ३५ कि. मी चा प्रवास प्रथम राजपूर गाव लागले आणि बसने मसुरीच्या डोंगराचा चढ चढायला सुरुवात केली बस डोंगराच्या कडेकडेने वळणे घेत चढत होती वळणे एवढी गोलाकार, नागमोडी होती की वाटायचे रस्ता जणू सर्परुप घेऊन अस्ताव्यस्त पडला आहे, आणि त्या वळणामुळे वाटायचे की परत आपण डेहराडूनला तर जात नाही ना! अर्थात रस्ता चढाचा असल्याने डेहराडूनला परतण्याचा प्रश्न नव्हता मसूरीच्या या नागमोडी प्रवासाची मौज काही औरच आहे. दूर उंचीवर डोंगराच्या उतरणीवर गर्द वनराजीच्या कुशीत घरांची तांबडी, उतरती छपरे उठून दिसत होती या चढाच्या रस्त्याने साडेचार हजार फूट उंचीचा चढाचा टप्पा गाठला होता

सकाळच्या सव्वादहाच्या सुमाराला आम्ही अवघड चढण संपवून 'लायब्ररी बाजार' या मसुरीच्या स्टँडजवळ आलो. प्रवासी लगबगीने उतरून मसुरीच्या

लायब्ररी बाजारात दाखल झाले कॅमेऱ्यात फिल्म घालायची म्हणून आम्ही फोटोच्या दुकानात गेलो. फिल्म घालताना वयस्कर दुकानदाराला विचारले, "कैसा हुवा मसुरीका सीझन ?" यावर उसासे टाकीत तो म्हणाला, "क्या कहना बहनजी, पच्चीस साल पहले अंग्रेज गये और तबसे मसुरीकी शान हर दिन कम हो रही है। लोक सुबह आते है और शामको वापस डेहराडून जानेके लिये भागते है। इधर दिल भरके दो चार दिन रहनेवाले टूरीस्ट कम हो गये हैं।" बरोबर आहे धावते पर्यटक सर्वत्र दिसतात हौशी युरोपियन लोकानी मसुरीचा विकास केला या भागात विपुल प्रमाणात आढळणाऱ्या मसूर वृक्षामुळे मसुरी हे नाव पडले असावे कॅप्टन यंग हा पहिला धाडसी मिलिटरी ऑफिसर सुमारे दीडशे वर्षांपूर्वी तो हा डोंगर चढून आला व तेथल्या निसर्ग सौंदर्याने बेहोष झाला ! 'कॅमल बॅक' या उंटाच्या पाठीसारखा आकार असलेल्या टेकडीवर त्याने एक झोपडी बांधली कशासाठी, तर गोळीबार करण्यास बंदूक ठेवण्यासाठी ! आज ती टेकडी 'गन हिल' म्हणून ओळखली जाते कॅप्टन यंगने इ स १८२७ साली पाया घातलेल्या या निसर्गरम्य मसुरीच्या भूमीची खरी लज्जत ब्रिटिशांच्या काळात हौशी युरोपियनानी चाखली हिमालयाच्या दक्षिण उतरणीवरचे मसुरी समुद्रसपाटीपासून सुमारे ६५८० फूट उंचीवर आहे

मसुरीचे वैशिष्टच म्हणजे बाजाराचा एकच एक सुमारे पाच कि मी लांबीचा रस्ता एका बाजूला लायब्ररी बाजार, मध्ये उंचावर लांडोर बाजार व तिसरा कुलरी बाजार लायब्ररी बाजारातून फिरत फिरत माणूस दुसऱ्या टोकाच्या कुलरी बाजारात दाखल होतो तेथेही बसस्टँड आहे म्हणजे परत बस गाठायला पाच कि मी परत यायला नको समजा बसने कुलरी बाजार स्टँडवर आणून सोडले तर फिरत फिरत लायब्ररी बाजारपर्यंत यायचे व जाताना लायब्ररी बाजार स्टँडवरून गाडी पकडायची

लायब्ररी बाजार चौकातून आम्ही मसुरीचा फेरफटका सुरु केला मसुरीच्या रस्त्यावर दिसत होते हातातील काठ्या टेकवीत, रंगीबेरंगी स्वेटर, मफलर, कोट घालून फिरणारे गुलहौशी पर्यटक ! छोटेखानी मसुरीची मजा ते चाखीत होते धावपळ नाही, गर्दी नाही, उंच अवघड चढ नाही तरी फेरफटका धाडसी, चित्तथरारक वाटायचा जणू प्रत्येक प्रवाशाला एक प्रका-

रची धुंदी चढली होती हाताने रिक्षा ओढणारे ठेंगणे पहाडी कुली वेगळे दिसत होते गढवाली वेषातली गोरीपान पहाडी स्त्री प्रवाशाचा कलिजा खलास करीत ठुमकत जायची थंडीला नुकतीच सुरुवात झाली असल्याने सीझनची आवराआवर चालू होती. मोठमोठी गजबजलेली हॉटेल्स ओसाड पडलेली दिसली सीझनमध्ये या छोटेखानी मसुरीला धमाल चालू असते बॉलरूम्स, डान्सिंग क्लब गच्च भरलेले असतात सगळे वातावरण डान्स, ड्रिंक आणि डिनर यात बेहोश, धुंदफुंद असते

चालत चालत आम्ही पर्यटन कचेरीपर्यंत पोहोचलो तेथून चारशे मीटर लांबीच्या रोपवेवरून 'गनहिल' या उंचीवरच्या पॉइंटवर जायचे होते. रिपेअरसाठी रोपवे बंद असल्याने छोट्या उदयची निराशा झाली रोपवेच्या प्रवासाची मजा गुलमर्गला तर चाखली होतीच म्हणा तेव्हा गनहिलवर जाण्यासाठी एक मैलाच्या पायी प्रवासाची सुरुवात केली काही ठिकाणी पायऱ्या आहेत तर काही ठिकाणी तिरपा चढ आहे काठी टेकवीत टेकवीत प्रवासी चढ चढताना हिमालयाच्या एव्हरेस्ट शिखरावर चढत असल्याचा आव आणीत होते एव्हढे खरे की गनहिलपर्यंतचा प्रवास एक अविस्मरणीय अनुभव आहे गमतीची गोष्ट ही की उतरणारे प्रवासी दमछाकीमुळे धापा टाकीत चढणाऱ्या प्रवाशाची मौज बघत होते गनहिलच्या निनावी शांत टेकडीच्या माथ्यावर आलो आणि तोंडातून उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडले— अहाहा ऽऽ सुंदर आणि सुंदर ! दूरवर दिसत होती नगाधिराज हिमालयाची बर्फाच्छादित उंच उंच हिमशिखरे टेकडीवर बसवलेल्या टेलिस्कोपमधून दिसणारी बद्रीनारायण, केदारनाथ, गंगोत्री, जमनोत्री, नंदादेवी ही हिमशिखरे पाहून गनहिलची चढण चढताना झालेल्या श्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटले गनहिलवर खालून वर येणाऱ्या रोपवेचे वरचे टोक आहे. दुरुस्तीनंतर हा तांबड्या रंगाचा पाळणा चाचणीसाठी खाली उतरताना दिसला गनहिलवरून दिसणारा देखावा मोठा निसर्गरम्य होता. गर्द झाडीतील तांबड्या छपराची घरे डौलदार दिसत होती हिमालयाची निळ्या आकाशाला भिडणारी धवल शिखरे पुन्हा पुन्हा पाहूनही समाधान होत नव्हते गनहिलवरील छोट्या कँटीनमध्ये अद्रक युक्त मस्त चहाने तल्लफ भागवली व उत्साह आला त्या उत्साहाच्या भरातच खाली उतरू

लागलो दीडशे वर्षांपूर्वी धाडसाने येथे पाय रोवलेल्या कॅप्टन यंगची खरोखरच धन्य !

रस्त्याला वळसा घालून शांत व गर्दीपासून दूर अशा कॅमल बॅक रोडवर वाटचाल सुरु केली रस्त्याच्या एका बाजूला असलेल्या उच डोंगरावर नजर टाकली असता तेथे उंटाच्या पाठीच्या आकाराचा एक खडक दिसला हाच तो प्रसिद्ध कॅमल बॅक मसुरीची दुसरी भेट देण्यासारखी दर्शनीय ठिकाणे म्हणजे म्युनिसिपल बगीचा व चार कि मी अंतरावरील लाल टिब्बा बगीचा दुसऱ्या बगीच्यातून हिमालयाची हिमशिखरे दिसतात मसुरीजवळील आठ कि मी अंतरावरील पाच प्रवाहात सहाशे फूटावरून पडणारा केमटी धबधबा प्रसिद्ध आहे

मसुरीचा फेरफटका मारून झाला होता आम्ही दुसऱ्या टोकाकडील कुलरी बाजारात येऊन पोहचलो होतो मॅटॅडोर गाडीने नासिकहून काश्मीरकडे निघालेल्या ओळखीच्या प्रवाशांबरोबर मसुरीच्या बाजारात मराठीत गप्पा टप्पा मारल्या खरेदीसाठी स्त्रियानी चालविलेल्या लोकरी सामानाच्या दुकानात गेलो तेथील पंजाबी स्त्रीचे विक्रमकलेचे नैपुण्य वाखाणण्यासारखे होते उल्कासाठी विणलेल्या खूबसुरत त्रिकोणी शालीची खरेदी केली एका पंजाबी हॉटेलात अंडाकरी रोटीवर ताव मारून दुपारी चारच्या सुमाराला टॅक्सीने मसुरीचा निरोप घेतला व तासाभरातच डेहराडूनला पोहोचलो.

सामानाची राहिलेली थोडीफार आवराआवर करून संध्याकाळी साडेसहाला डेहराडून स्टेशनवर आलो डेहराडून-हावरा जनता एक्स्प्रेसचे तिकीट आदल्या दिवशी आरक्षण करून ठेवल्यामुळे जागा मिळाली होती बरोबर सात वाजता गाडीने डेहराडून सोडले स्टेशनवर पोहोचवायला दीर, सौ वहिनी, मुले आली होती त्याचा निरोप घेतला दोन दिवस घरगुती वातावरणात छान गेले होते.

डब्यातून बाहेर डोकावले तेव्हा दूरवरच्या पहाडावर लुकलुकणाऱ्या दिव्यांची, निद्रेची तयारी करणारी, हिमालयाच्या कुशीत पहुडलेली हिमराणी-मसुरी दिसत होती !

☐

## नबाब नसलेले–लखनौ

आदल्या दिवशी रात्री सातला डेहराडूनहून सुरू झालेला प्रवास सबंध रात्र डोक्यावर घेऊन सकाळी नऊला लखनौच्या स्टेशनमध्ये गाडी शिरल्यावर संपला पहाताक्षणीच लखनौचे ' राजस्थानी शैलीने बांधलेले अत्यंत भव्य असे " चारबाग " रेल्वे स्टेशन नजरेत भरले ! लखनौत मुक्काम करायचा नसल्याने स्टेशनवर क्लोकरूममध्ये सामान ठेवले तब्बल दिवस लखनौत घालवायचा होता स्टेशनजवळील हॉटेलमध्ये चहापाणी, फराळ आटोपला शहर बघण्यासाठी एक टांगेवाला ठरवला टांगेवाल्याच्या बोलण्यात अजीजी होती. टांग्यात बसताना टांगेवाल्याला विचारले, " तुम्हारे लखनौमे क्या क्या देखनेलायक है ?" त्यावर तो म्हणाला– "बिलकूल फिक्र मत करना, पूरा लखनौ शहर घुमाऊँगा । खुश हो जाओगी बेगम साहिबा ।'

अयोध्येचा राजा प्रभू रामचंद्राचा भाऊ लक्ष्मण याने लखनौ वसविले होते पुराणकालात ते ' लक्ष्मणपूर ' म्हणून ओळखले जाई शहराच्या मध्यभागी असलेले टेकाड आजही ' लक्ष्मण तिळा ' म्हणून ओळखले जाते. औरंगजेबाने तेथे मशीद वसविली ! लखनौच्या नवाबाचा मूळ पुरुष नबाब सादतखान अलीखान. दिल्लीच्या मोगल सम्राट मोहमदशहाने इ स १७३९


मध्ये फैजाबाद राजधानी असलेल्या अवध राज्याचा पहिला नबाब म्हणून त्याची नेमणूक केली नबाब-आसफ-औंद-दौला हा नव्या लखनौचा आद्य शिल्पकार ! त्याच्याच काळात फैजाबादहून लखनौला राजधानीचे स्थलांतर झाले त्याचप्रमाणे मुस्लीम कलासंस्कृतीचा वारसा दिल्लीहून लखनौला स्थलांतरित झाला त्या काळात लखनौची ख्याती केवळ शिल्पकलाकृतीं-साठीच नव्हती तर अनेक बागबगीच्यांमुळे लखनौला तजेलदार स्वरुप प्राप्त झाले होते लखनौ दरबारात विविध कवी, कलाकार, संगीततज्ज्ञ, हस्तकला कुशल कारागीर, नृत्यविशारद यांना मानाचे स्थान मिळत होते नंतरच्या नबाबाच्या कारकीर्दीत लखनौ गजबजलेले होते शेरशायरी, प्रणयप्रधान रंग-ढंग, गाणे बजावणे, नृत्य यांनी मदिर आणि मदिराक्षी यांच्या ते आहारी गेलेले होते केवळ श्रीमंत विलासी नव्हते तर फकीरही मिळालेल्या कमाईतून रोटी न घेता अफू व इतर मादक पदार्थ सेवन करून झिंगलेले असत । लखनौचा शेवटचा नबाब वाजिद आली शाह.या शेवटच्या नबाबाची कारकीर्द सुखदु खांनी भरलेली आहे संगीत, कला, नृत्यनाटय यातला तो दर्दी कोंबडयाच्या झुंजी, पतंगाच्या शर्यती, बुद्धीबळाचे डाव यात तो तासन् तास रमून जाई स्वत ला कृष्ण समजून तो स्त्रियांशी रासक्रीडा करीत असे । स्त्रियांचे पोषाख करून अंत पुरात वावरे त्याच्या चैनबाजीत अवध खालसा झाले ब्रिटीशांनी त्याला इ. स १८५६ मध्ये गादीवरून बडतर्फ केले असे सांगतात की इंग्रज पलटणी जेव्हा त्याला अटक करायला आल्या तेव्हा प्रतिकार न करता पायात जोडे ढकलण्याची त्याने नोकराला सूचना केली । सुप्रसिद्ध हिंदी कथाकार मुन्शी प्रेमचंद यांनी 'शतरंजके खिलाडी' या कथेत वाजिदअली शहा कालीन राजापासून रंकापर्यंत विलासात डुबलेल्या लखनौचे बहारदार वर्णन केले आहे

लखनौचे प्रमुख आकर्षण म्हणजे इमामबारा लखनौत एकूण तीन इमाम-बारा आहेत बडा इमामबारा, छोटा इमामबारा व शहाजनफ इमामबारा प्रथम पोहोचलो 'बडा इमामबारा' मध्ये हा इमामबारा नबाब आसफ-औंद दौलाचा इमामबारा आसफी इमामबारा म्हणून ओळखला जातो इ स १८७४ च्या भयानक दुष्काळात एक दुष्काळी काम म्हणून या इमामबाऱ्याचे काम झाले त्यावेळी एक कोटी रुपयांवर खर्च झाला असे सांगतात की दुष्का-ळाने हैराण झालेले श्रीमंत रात्रीच्या अंधारात काम करीत व अब्रू बचाव-



मसुरीचा सर्पाकार रस्ता


रुमी गेट-लखनौ





लखनवी अदाकारी - कथ्थक

बड़ा इमामबारा - लखनौ



ण्याचा प्रयत्न करीत या इमामबाऱ्याचा मुख्य शिल्पकार इराणी कैफियत उल्ला ! मुख्य दरवाजातून आत गेल्या गेल्या ही लांबच्या लांब वास्तु दिसते यातील प्रमुख हॉल १६३ फूट लांब, ५३ फूट रुंद व ५० फूट उंच असा आहे तो बिनखांबाचा आहे जगातला सर्वात मोठा हॉल अशी ख्याती असलेल्या या हॉलच्या भिंतीची जाडी सोळा फूट आहे वरच्या बाजूला अरुंद गॅलरी आहे सर्व बांधकाम भरीव असून लाकूड अजिबात वापरलेले नाही

हॉलमध्ये दोन कबरी दिसल्या एक नबाब असफ-औद-दौलाची व दुसरी त्याच्या बेगमची नबाबाच्या कबरीभोवती चांदीचे रेलिंग व वेलवेटचे आच्छादन आहे हॉलमध्ये रंगीबेरंगी झुंबरे दिसत होती मोहरमच्या वेळी रोष-णाई करुन ती प्रकाशमान केली जातात सकाळ-संध्याकाळ कुराण पठण चालू असते इमामबारा तीन मजली असून त्याला अनेक दरवाजे आहेत खालच्या मजल्यापासून वरच्या मजल्यापर्यंत जायला एक गुप्त जिना आहे नव्याने भेट देणारा गोंधळून जातो हा गुप्त जिना 'भुलभुलैया' म्हणून ओळखला जातो अनेक पर्यटक तो शोधण्याची व्यर्थ धडपड करताना पाहून मौज वाटली. आमचेच पहाना, बऱ्याचवेळा चकरा मारुनही तो रस्ता सापडेना तेव्हा गाईडजवळ आम्ही पराभव मान्य केला. हॉलचे बांधकामाचे तंत्र इतके अचूक आहे की हॉल संपूर्ण साऊंडप्रूफ आहे. एका टोकाला बोललेले दुसऱ्या-कडेला बिनचूक ऐकून येते गाईडने एका टोकाला कागद फाडून प्रात्यक्षिक करुन दाखवले दुसऱ्या टोकाला उभ्या असलेल्या आम्हाला कागद फाडल्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला विजापूरच्या गोलघुमटची आठवण झाली. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे हॉलच्या मध्यबिंदूपासून दूर नजर टाकली तर दरवाजा मधून रस्त्याचा मध्यबिंदू एकाच रेषेत दिसतो. इतके तंत्रशुद्ध काम झाले आहे त्यामुळे हॉलच्या गॅलरीत मध्यभागी उभे राहिल्यावर बाहेरून येणारा माणूस दृष्टीत अचूक टिपला जातो बडा इमामबाऱ्याच्या वरील गच्चीवरून लखनौ गावाचे विहंगम दृश्य दिसते तेथून लक्ष्मणटिळा हा शहराचा प्राचीन मध्यभाग दिसत होता

बडा इमामबाऱ्याच्या एका बाजूला पूर्वी 'समर पॅलेस' नावाने ओळखला जाणारा पडक्या अवस्थेतला तीन मजली राजवाडा आहे त्याच्या मध्यभागी

मोठी गोल विहीर आहे. गोमती नदीच्या पात्रातील पाणी नैसर्गिक-रीत्या गाळून या विहीरीत येते. नदीचे पाणी वाढले की विहीरीचेही पाणी वाढते विहीरीतील पाणी अत्यंत पारदर्शक, स्वच्छ, नितळ दिसत होते वरून नाणे टाकले की खाली तळाला नाणे दिसते इतके ते स्फटिकासमान आहे विहीरीमुळे हे समर हाऊस उन्हाळ्यात शीतल हवेने व्यापून जायचे. या वाड्यातील मधल्या मजल्यावरून पाहिले की समोरच्या दरवाजातून येणारा माणूस सरळ रेषेत दिसतो पण त्याला वाड्यातून न्याहाळणारा माणूस मात्र दिसू शकत नाही कारण तो वाड्यात असल्याने त्याच्यावर प्रकाश पडू शकत नाही आजही विहीर व वाडा बऱ्याच ढासळलेल्या स्थितीत आहे वेळच्या वेळी डागडुजी झाली नाही तर हे ऐतिहासिक स्मारक जमीनदोस्त होण्याचा संभव आहे बडा इमामबाराच्या दुसऱ्या बाजूला दोन मिनार असलेली भव्य मशीद आहे फक्त मुसलमानानाच तेथे प्रवेश मिळतो त्यामुळे त्याच्या उंच उंच लांबच्या लांब पायऱ्या दुरूनच पाहून परतावे लागले बडा इमामबाऱ्यातून बाहेर पडताना खंत वाटत होती की एवढे मोठे ऐतिहासिक स्मारक डागडुजीअभावी ढासळणार व नवाबांची उरली सुरली शान घालवून स्मृतीआड जाणार काय ?

रुमी दरवाजा —तुर्कीशगेट हे बडा इमामबाराचे पश्चिमेकडील प्रवेश-द्वार आहे साठ फूट उंच कमान असलेली हा दरवाजा स्थापत्य कलाकुसरीचा नमुना आहे

रुमी दरवाजाबाहेर असलेला 'छोटा इमामबारा' हुसैनाबाद इमामबारा या नावानेही ओळला जातो नबाब मोहमद अली शाहने इ स १८३९ मध्ये बगीच्यामध्ये तो बांधला मुख्य प्रवेशद्वार फुलांचे नक्षीकाम व कलाकुसरीने भरलेले आहे इमामबाराच्या समोर असलेल्या हौदावर लोखंडी पूल असून आजूबाजूला कुंड्या शोभा आणतात पश्चिम बाजूला ताजसारखा पांढरा शुभ्र मकबरा आहे त्यात नबाबाची मुलगी झीनत हिची कबर आहे. इमामबारामध्ये नबाब व त्याच्या आईची कबर आहे आतमध्ये चांदीचे ताजीये आहेत काळ्या व पांढऱ्या संगमरवरी फरशीवर कलात्मक पेंटींग आहे मध्यभागी चमकणारा घुमट आहे भिंती कलाकुसरीने सजविल्या असून अरेबिक भाषेत वचने कोरली आहेत आकाराने नावाप्रमाणे लहान असलेला

'छोटा इमामबारा' कलागुण दृष्ट्या 'बडा इमामबारा' पेक्षा सुबक, देखणा आहे

छोटा इमामबाराच्या पश्चिमेला लखनौची सर्वात मोठी जामा मशीद आहे दोन मिनार व तीन घुमट असलेली ही भव्य मशीद चबुत्र्यावर उभारली आहे भिंतीच्या दोन्ही बाजूना आत व बाहेर रंगीबेरंगी नक्षीकाम केलेले आहे लखनौची ही शानदार मशीद समजली जाते

छोटा इमामबारानजीक तांबड्या विटांनी बांधलेल्या राजवाड्यात सध्या 'पिक्चर गॅलरी' उघडली आहे तेथील अवध व लखनौच्या नवाबांची पूर्णाकृती तैलचित्रे ऐतिहासिकदृष्ट्या पहाण्यासारखी आहेत नजीकच दोनशे एकवीस फूट उंचीचे हुसैनाबाद घंटाघर आकर्षक आहे

गोमती नदीपासून जवळ असलेल्या रेसिडेन्सीच्या प्रशस्त आवारात शिरलो, तेव्हा सन १८५७ च्या स्वातंत्र्य समरात प्राणाची बाजी लावून उडी घेतलेल्या सेनापती तात्या टोपे, झाशीची राणी, नानासाहेब पेशवे यांचे बलिदान आठवले. इ स १८०० साली ब्रिटिश रेसिडेंटच्या निवासासाठी नबाब सादत अलीखानने बांधलेल्या या आवारातील भूमीवर १८५७ साली रक्ताचे पाट वाहिले. आज त्या भूमीवर बगीचा उभा आहे जणू दुखावलेल्या भावना आणि जखमी झालेल्या प्रेरणावर फुंकर घालण्यासाठी! सुसज्ज अशा ब्रिटिश सेनेशी स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी ८९ दिवस निकराने झुंज दिली बंदुकीच्या फैरीवर फैरी उडत असत उभ्या असलेल्या काही भिंतीवर आजही गोळ्याची निशाणी दिसून येते तत्कालीन बेसमेंट हॉल, बँक्वेट हॉल व रिसेप्शन रूम पूर्वीच्या रेसिडेन्सीची कल्पना देते मॉडेल हॉलमध्ये जुन्या वस्तू जतन करून ठेवल्या आहेत ब्रिटिशांनी युरोपियन अधिकाऱ्यांच्या गौरवार्थ उभारलेले स्मारकस्तंभ हलवून एखाद्या म्युझियममध्ये ठेवले तर बरे होईल, असे मनात येऊन गेले. रेसिडेन्सी एरीयातील बहुतेक वास्तु ढासळलेल्या अवस्थेत आहेत ब्रिटिशांच्या क्रौर्याची व भारतीयांच्या स्वातंत्र्याप्रेमाची ती जणू साक्ष देतात दिल्लीच्या हुमायूनच्या कबरीत मोगल साम्राज्याच्या शेवटच्या वारसाला ठार मारणाऱ्या ब्रिटिश कॅप्टन हॉडसनला लखनौने स्वातंत्र्य युद्धात ठार करून सूड उगवला

रेसिडेन्सीच्या आवारातून बाहेर पडल्यावर रस्ता ओलांडल्यावर गोमती

नदीच्या किनारी संगमरवरी 'शहीद स्तंभ' पहाताना कृतज्ञ भावनेने नतमस्तक झालो इ. स. १९५७ साली स्वातंत्र्य समर शताब्दीच्या वर्षात जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते हा स्तंभ उभारला गेला. १८५७ च्या स्वातंत्र्याच्या समरात बलीदान केलेल्या स्वातंत्र्ययोद्धयांच्या स्मरणार्थ हे शहीद स्मारक उभारले आहे स्मारकाच्या आवारातील बगीचा शांत, पवित्र वातावरणात भर घालीत होता हे स्मारक गोमती नदीच्या किनारी उभारण्यात मोठे औचित्य दाखविले आहे कारण याच किनाऱ्यावर अनेक हुतात्म्यांच्या रक्ताचे पाट वाहिले!

शहीद स्तंभ बघून टांगा लखनौच्या सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टीटयूटच्या आवाराजवळ थांबला पूर्वी 'छत्रमंझिल' नावाने ओळखला जाणारा हा राजवाडा राजवाडा नबाबकाळात ऐश्वर्याने तळपत होता असे म्हटले जाते की 'अरेबियन नाईट्स' मध्ये वर्णन केलेल्या बगदादाच्या खलीफांच्या राजवाड्यासारखा हा राजवाडा झगमगाटाने उजळून जायचा छत्रीच्या आकाराचा, मध्यभागी तांब्याच्या पत्र्याने मढवलेला चकाकणारा असा त्याचा घुमट आहे पूर्वीच्या काळात त्यातील शाही संगमरवरी स्नानघर उंची हिरे माणकांनी मढवलेले होते आवारात कारज्याची आकर्षकरीत्या पखरण केली होती तत्कालीन नबाबी वैभव आता कल्पनेने ऐकायचा विषय झाला आहे शेजारी लालबारादरी महाल आहे ह्या भव्य प्रासादात पूर्वी ब्रिटिश रेसिडेंटच्या हस्ते नवाबांना तख्तावर बसवण्याचा शाही दरबाराचा कार्यक्रम साजरा व्हायचा!

लखनौचा तिसरा इमामबारा 'शहानजफ इमामबारा' त्यात अवधचा पहिला राजा गाजीउद्दीन हैदर व त्याच्या बायकोची कबर आहे यातील कबरी आकाराने एक लहान व दुसरी मोठी आहे चौकशी केल्यावर तेथील मौलवी म्हणाला, नबाबाची एक बेगम मुबारक महल युरोपियन होती ती धर्मांतर करून मुसलमान झाली म्हणून तिचा मान अधिक म्हणून तिची कबर मोठी! संगमरवरी घुमटाकार छताला सोन्याचा कळस आहे संगमरवरी फरसबंदी आकर्षक आहे यातमध्ये झुंबरे खास प्रकारच्या परदेशी बनावटीची आहेत उत्तर व दक्षिण या दोन बाजूला कमानी प्रेक्षणीय आहेत

परतताना हजरतगंज भागात तपकिरी रंगाच्या दगडामध्ये बांधलेली

विधान सभा भवनाची आकर्षक इमारत पाहिली इ स १९२८ साली अठरा लक्ष रु. खर्चून बांधलेली कौन्सिल चेंबरची ही इमारत लखनौच्या वैभवात भर घालते।

लखनौच्या ऐतिहासिक स्मारकांचा फेरफटका पूर्ण झाला होता पहायचे राहिले होते नबाबाच्या विलासी जीवनाचे साक्षीदार-बगीचे कैसर बाग-मध्ये शेवटच्या विलासी नबाब वाजीद अलीशाहने बांधलेले प्रासाद आहेत. इ स १८५७ च्या स्वातंत्र्य समरात त्याचा बराचसा नाश झाला राजाच्या करमणुकीसाठी बांधलेल्या लहानमोठ्या अनेक बारादरी-मंडप आहेत. तेथील बगीच्यात छोटा कॅनॉल व पुल असून शेवटच्या विलासी नबाबाच्या काळात तो गुलाबजलाने भरलेला असे व ते गुलाबजल नबाबाच्या शाही स्नानासाठी वापरले जाई।

बनारसी बागेत मुंबईच्या राणीच्या बागेसारखे विविध प्राण्याचे संग्रहालय ब्रिटिश राजा प्रिन्स ऑफ वेल्सच्या लखनौ भेटीच्या स्मरणार्थ इ स १९२२ मध्ये सुरू झाले त्यातल्या विविध प्राण्यानी मुलांची चांगली करमणूक केली आवाराामध्येच एक म्युझियम असून त्यात लखनौच्या व आस पासच्या कारागीराच्या कलाकुसरीच्या विविध वस्तू आकर्षकरीत्या मांडून ठेवल्या आहेत तळमजल्यावर पेंढा भरलेले विविध वन्य पशुपक्षी नैसर्गिक-रीत्या मांडून ठेवले आहेत कॅंटोन्मेंट भागातील 'दिलखुष' बाग नबाब-कालीन शिकारीचे ठिकाण होते

आलम बागेत शेवटच्या नबाबाच्या आवडत्या बेगमचा दुमजली महाल होता महालाच्या कडेला चार अष्टकोनी मनोरे आहेत इ स १८५७ च्या स्वातंत्र्य समरात जखमी झालेल्या ब्रिटिश सैनिकांच्या देखभालीसाठी व शुश्रूषेसाठी या जागेचा वापर करण्यात आला हे त्याचे आणखी एक वैशिष्ट्य। शिकंदर बाग ही शेवटच्या नबाबाच्या शिकंदरबेगम या आणखी एका आवडत्या बेगमच्या स्मरणार्थ उभारली तेथे पूर्वी 'समर पॅलेस' होता हल्ली तेथे नॅशनल बोटॅनिकल गार्डन आहे शिकंदरा बागेत देश स्वातंत्र्यासाठी झालेल्या स्वातंत्र्य-संग्रामात किमान दोन सहस्र वीरानी बलिदान केले होते विलायती बाग ही शेवटच्या नबाबाच्या काळात खास अंतःपुरातील बेगमांच्या करमणुकीसाठी उपयोगात आणली जाई

बादशाहबागेमध्ये पूर्वी सुंदर बगीचा होता आज तेथे वापरात नसलेले हमाम स्नानघर व बारादरी मंडप अस्तित्वात आहे सावली देणारी दाट झाडी, हिरवळ ही तेथील खास वैशिष्ट्ये सध्या तेथे लखनौ विद्यापीठाचा परिसर आहे

कैसर बाग, बनारसी बाग, आलम बाग, शिकंदर बाग, विलायती बाग व बादशाह बाग हे बगीचे, राजवाड्याचे मिनार, घुमट असे अवशेष लखनौच्या लुप्त झालेल्या वैभवाचे जरी साक्षीदार असले तरी पौर्वात्य कलासंस्कृतीच्या भव्य वारसाचे प्रतीक आहेत जुन्या लखनौचा ढंगच वेगळा होता त्यावेळचे पोषाखही खास होते. पोषाखही खास होते त्यात डौल व नजाकत दोन्ही होती त्याकाळी अनेक स्वादिष्ट खाद्यपदार्थ केले जात नबाबाच्या दररोजच्या सहा परोठ्यासाठी पाच शेर साजूक तूप लागे ! नबाबाच्या मुलाच्या लग्नात वेगवेगळे सत्तर प्रकाराचे पुलाव होते दिल्ली बिर्याणीसाठी प्रसिद्ध तर लखनौसारखा पुलाव आख्या दुनियेत मिळणार नाही अशी प्रसिद्धी होती अत्यंत स्वादिष्ट जेवण करावे, खुश-बूदार तांबूल सेवन करावा, उंची अत्तर व उंची पोषाख करून संध्याकाळी बगीच्यात रमावे व रात्र मद्यसेवन करून गायिका व नर्तिका यांच्या कोठ्या-वर घालवावी असा हा काळ होता विलासप्रियतेला मर्यादा नव्हती लखनौची जुनी शान नाहीशी झाली असली तरी खानदानी चालीरीतींचा पीळ कायम आहे म्हणूनच आजही लखनौत झब्बा–कुडता, सलवार–टोपी घातलेले बुजुर्ग आणि डोक्यावर बुरखा घेतलेल्या स्त्रिया वावरताना दिसतात त्यांच्या चालण्यातही एकप्रकारच्या खानदानीपणाची झलक आहे, बोलण्यात अजीजी आहे मनात उगीचच वाटायचे जिचे मेहंदीने रंगवलेले गोरे पायच फक्त दिसतात अशा या बुरख्याआड 'चौदहवीका चाँद' तर लपला नाही ना !

नव्या हजरतगंज या मध्यवर्ती आधुनिक, फॅशनेबल बाजारात तसेच आलम गंज, जुन्या चौक बाजारात व अमीनाबाजारात फेरफटका मारून लखनौचे वैशिष्ट्य असलेल्या चिकन एम्ब्रॉयडरी कापडाची खरेदी केली पहाता पहाता सूर्य मावळू लागला होता. मावळत्या सूर्याची तांबूस पिवळी किरणे लखनौच्या जुन्या घुमटावर सोनेरी रंगाचा मुकूट चढवीत होती

मुन्शी प्रेमचदांनी आपल्या साहित्यात रंगविलेल्या गोमतीच्या किनारी सूर्य अस्ताला गेला टांग्यातून स्टेशनकडे परतताना लखनौच्या महालातील भरलेल्या मैफलीतील नर्तकींनी नेत्रात सुरमा घालून म्हटलेल्या, इष्काने भरलेल्या गाण्याचे सूर व बेहोषीने केलेल्या नृत्याच्या पदन्यासाची अदाकारी ऐकू येत होती।

स्टेशनवरच जेवण आटोपले रात्री नऊ वाजता दिल्ली–पाटणा एक्स्प्रेसने नवाब नसलेल्या लखनौचा निरोप घेतला

# काशी विश्वेश्वराचे--वाराणसी

लखनौ स्टेशन सोडल्यापासून डब्यात अंधारच होता दिवसभरच्या भ्रमणाने थकलो होतो मुले तर एव्हाना झोपली होती डब्यातील बहुतेक प्रवासी झोपेच्या आधीन झाले होते कारण कोणाचा बोलण्याचा आवाज ऐकू येत नव्हता मध्यरात्रीचा सुमार ! 'उठो, जागो' या आरोळीने व काठीच्या जोरात आवाजाने रेल्वेचा पोलिस प्रवाशांना उठवीत होता. तो म्हणत होता –" आपको रातमें नींद मिलेगी लेकिन चोरी हो गयी तो दिनभर रोना पडेगा।' हे ऐकून मात्र पेंगाळलेले प्रवासी खडबडून जागे झाले स्टेशनामागून स्टेशने जात होती वाराणसी स्टेशनची प्रतीक्षा करता करता सकाळी आठला गाडी स्टेशनमध्ये शिरली

पवित्र गंगेच्या डाव्या काठावर बसलेल्या काशी क्षेत्राची ऐतिहासिक परंपरा हजारो वर्षांची जुनी आहे लहानपणापासून प्रत्येक हिंदूच्या कानी काशी आणि गंगेचे नाव पडत असतेच जगातील जुन्या शहरात काशीची गणना होते सात मोक्षदायक पुऱ्यामध्ये हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. बारा ज्योतिर्लिंगामधील हे एक स्थान विश्वनाथाचे वास्तव्य व गंगेचे सान्निध्य या गोष्टीमुळे तिला श्रेष्ठत्व प्राप्त झाले आहे काशी हे शैवक्षेत्र ते

शिवाच्या त्रिशूलावर वसले असून प्रलयकाळीही त्याचा नाश होणार नाही अशी पुराणात कल्पना आहे शिवाच्या तेजाने ही नगरी प्रकाशित झाली आहे काश म्हणजे प्रकाशणे, तळपणे परब्रह्माचा किंवा मोक्षमार्गाचा प्रकाश देणारी ती काशी 'काश्या तु मरणात् मुक्ती' काशीत जो प्राणी मरण पावतो तो मुक्त होतो म्हणून अंतकाळी देहत्यागास कित्येक लोक हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून येथे येतात, ही हजारो वर्षांची परंपरा आहे

काशीचे दुसरे नाव वाराणसी वरुणा आणि असी या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले म्हणून वाराणसी असे दुसरे नाव बनारस हे आणखी एक नाव. या ठिकाणी गंगेने सुमारे चार मैल दक्षिणोत्तर धनुष्याकृती वळण घेतले आहे या वळणात हे शहर वसले आहे गंगा येथे उत्तर वाहिनी असल्याने पवित्र मानली जाते प्राचीनता, पवित्रता, प्रशस्तता यामध्ये काशीचे श्रेष्ठत्व जसे आहे तसेच धर्मपीठ व विद्यापीठ असेही दुहेरी आहे संस्कृत विद्येचे व तत्त्वज्ञानाचे ती माहेरघर आहे येथूनच वैदिक धर्म व बौद्ध धर्म भारतात प्रसार पावला काशी म्हणजे हिंदुत्वाचा आत्मा साधुसंन्याशी, योगी, तत्त्वज्ञ यांच्या अभ्यासाचे ठिकाण. पूर्वीच्या काळात चैतन्य, रामानुज, वल्लभ, तुलसीदास, कबीर, भारतेन्दु, हरिश्चंद्र व पं मदनमोहन मालवीय यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली भूमी ! असे हे प्राचीन सुसंस्कृत शहर मुसलमानांच्या आक्रमणापासून वाचले नाही अकराव्या शतकात महमद घोरी, कुतुबुद्दीन ऐबक व सतराव्या शतकात औरंगजेबाच्या तडाख्यात सापडूनही त्याने हिंदू संस्कृती जतन करून ठेवली आहे धार्मिक शिक्षणाप्रमाणेच काशी प्रसिद्ध आहे परंपरागत शास्त्रीय संगीताच्या अभ्यासासाठी व भरजरी शालूच्या विणकामासाठी !

काशीला उतरण्यासाठी गावातील मध्यवर्ती दोहोदिया या बाजार पेठेतील 'जैपुरीया भवन' या सुंदर संगमरवरी, स्वच्छ धर्मशाळेत जागा मिळाली होती धर्मशाळा म्हणजे घाणीचे, अस्वच्छतेचे आगर या रूढ कल्पनेला धक्का बसला ! कलकत्त्याच्या शेठ आनंदराम जैपुरीया या गिरणी मालकाने हे स्मृतीभवन उभारले आहे जिन्याचे संगमरवरी कठडे, मधला प्रशस्त संगमरवरी चौक सारखे पुसण्याचे काम चालू होते स्नानघर स्वच्छ होते दोन खाटा असलेल्या हवेशीर खोलीला प्रत्येक दिवसाचा दर फक्त सहा रुपये अत्यल्प वाटला तेथे पोहचल्यानंतर स्नान आटोपले जेवणाच्या हॉलमध्ये घरगुती

शुद्ध जेवण मिळाल्याने संतोष वाटला रात्रभरच्या प्रवासाचा शीण घाल विण्याच्या दृष्टीने विश्रांती घेऊन पायीच फिरत फिरत गंगेच्या प्रसिद्ध दशाश्वमेध घाटावर आलो घाटांची सफर करायला चला म्हणून होडी-वाल्यांनी एकच गलका केला एका चुणचुणीत छोकऱ्याची होडी ठरवून गंगेच्या घाटांची सफर सुरू केली

काशीला गंगेने धनुष्याकार वळण घेतले म्हणून प्रवाह स्थिर असल्याने कडेने विविध घाट बांधता आले याउलट अलाहाबादला गंगेचा प्रवाह सरळ असल्याने घाट बांधता आले नाहीत

बनारस हिंदू विद्यापीठाजवळ आसी ही उपनदी गंगेला मिळते तेथे पहिला आसी घाट सुरू होतो नंतर तुलसी घाट आहे तेथे तुलसीदासाचे मंदिर आहे नंतर आहे हनुमान घाट तेथे स्वामी बल्लवाचार्यांचे मंदिर आहे नंतरच्या शिवलीला घाटावरील किल्ल्यात बनारसच्या लपलेल्या राजा चेतनसिंहाला ब्रिटिशांनी पकडले होते नंतर आहे अयोध्येच्या सत्यवचनी हरिश्चंद्राचा हरिश्चंद्र घाट सध्या तो काशीचा प्रेते जाळण्याचा घाट आहे केदार घाटावर केदारेश्वर शिवमंदिर आहे शहाजहानच्या दरबारातील प्रसिद्ध ब्राह्मण जगन्नाथ पंडित याने गंगातटाकी उभे राहून 'गंगालहरी' हे महाकाव्य रचले त्या काव्यावर प्रसन्न होऊन चौऱ्याऐंशी पायऱ्या घाट चढून गंगेने त्याचे पाय धुतले तो चौऱ्याशीचा घाटही तेथे आहे आनंदमायी चौराही घाटानंतर काशीचा महत्त्वाचा मध्यवर्ती घाट आहे दशाश्वमेध घाट तेथे ब्रह्मदेवाने दहा अश्वांचा त्याग केला होता अहिल्या घाट होळकरांनी बांधला. मनमंदिर घाट अकबरचा राजा मानसिंह याने बांधला तेथे सवाई जयसिंहाने बांधलेली वेधशाळा आहे नेपाळ घाटावर नेपाळ नरेशांनी बांधलेले पॅगोडासारखे 'नेपाळी मंदिर' आहे मंदिराच्या लाकडी खांबावर मिथुनशिल्पे आहेत नंतरचा घाट आहे मनकर्णिका घाट तोही प्रेते जाळण्यासाठी आहे पचगंगा शिंदीया घाटा-नंतर मोठा मालवीय पूल येतो राजघाट येथे जुनी काशी होती पूर्वेकडून गंगेच्या तीरावरच्या विविध घाटांचे विहंगम दृश्य दिसत होते भाविक लोक पात्राच्या कडेला पायऱ्यावर उभे राहून 'जय गंगे जय भागीरथी' घोष देत स्नान करताना ओंजळीने गंधफुले वाहताना दिसत होते घाटावर दिसत होते केशरी कपड्यातील साधू, बैरागी, डोळ्यावर चष्मा चढवून कुडल्या चोपड्या

पाहून भविष्य सांगणारे ज्योतिषी ! गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घातलेले, भगवी वस्त्रे परिधान केलेले, मंत्र उच्चारून आशीर्वाद देणारे पंडेही दिसत होते. आयुष्यात केलेल्या पापातून मुक्त होण्यासाठी तर गंगास्नानाची धडपड प्रत्येक हिंदू आत्म्याची चालू असते ! गंगेच्या पात्रात मचव्याच्या मचवे तरंगताना दिसत होते सावलीसाठी रंगीबेरंगी छत्र्या घाटावर दिसत होत्या गंगेच्या घाटांचा दोन तासाचा फेरा संपवून होडी दशाश्वमेघ घाटाकडे निघाली होती नदीच्या पार्श्वभूमीवर बुडणाऱ्या सूर्याचे तेजस्वी बिंब चित्त हरपून टाकीत होते ! दूरवर हरिश्चंद्र घाटावर दोन चार चिता पेटलेल्या दिसत होत्या गंगेच्या काठी मुक्तीसाठी धडपडणाऱ्या हिंदू जीवांचा तो शेवट, गंगेचा स्थितप्रज्ञ प्रवाह हजारो वर्षांपासून अविचल नजरेने न्याहाळीत आहे

घाटावर परतल्यावर मन पवित्र विश्वनाथ मंदिराचे दर्शन घ्यायला आतुर झाले. अरुंद बाजाराच्या वाटेने जाताना आपल्याकडील पंढरपूरच्या गल्ली बोळाची आठवण झाली मंदिराच्या बाजूच्या अरुंद बोळातील दुतर्फा असलेली दुकाने झगमगाटाने उजळून निघाली होती लाकडी खेळणी, सोन्या चांदीचे दागिने, चमकणारे भरजरी शालू, नक्षीदार भांडी, कुंकू, प्रसाद यांच्या दुकानांच्या रांगाच्या रांगा होत्या काशीची बाजारपेठ चैतन्यमय वाटली काशीच्या विश्वनाथ मंदिरावर प्रथम आक्रमण झाले कुतुबुद्दिन ऐबकचे ! त्याने मंदिराचे रेझिया मशिदीत रुपांतर केले नंतर विश्वनाथ मंदिर सध्याच्या मंदिराच्या पलीकडील ग्यानवापी जागेत अकबराचा हिंदू मंत्री तोडरमल याने बांधले होते धर्मवेड्या औरंगजेबाने सतराव्या शतकात त्याचा नाश केला व मंदिराचे मशिदीत रूपांतर केले ही मशीद 'आलमगीर मशीद' नावाने ओळखली जाते मशिदीची मागील बाजू पाहिल्यावर त्या वरील दगडात कोरलेले हिंदू पद्धतीचे शिल्पकाम मूळ हिंदू मंदिराची साक्ष देते नंतर अहिल्यादेवी होळकरांनी अठराव्या शतकात नवीन जागी हे मंदिर उभे केले व श्री शिवाजी महाराजांचे अपुरे स्वप्न पूर्ण केले ! पंजाबचा महाराजा रणजित सिंहने सोन्याच्या पत्र्याने मढविलेला बावीस मणाचा घुमट बनवून घेतला म्हणून सोन्याचे मंदिर असेही म्हणतात मंदिराचे सभामंडप व घुमट सुंदर आकर्षक आहे. नेपाळच्या नरेशांनी दिलेली मोठी घंटा आकर्षक आहे मंदिरा-

तील शिवलिंगाच्या दर्शनाने काशी भेटीचे सार्थक झाले असे वाटले पिंड फुलानी माळांनी इतकी वेढलेली होती की दिसणे मुष्कील ! आजूबाजूला बेवारशी सुटलेली जनावरे माणसाळल्यासारखी हिंडत होती जवळच ग्यान-वापी विहीर आहे त्यात मूळ मूर्ती सापडली असे म्हणतात तेथे नदी आहे तसेच जवळच राममंदिर आहे त्याप्रमाणे अठराव्या शतकात बांधलेले अन्नपूर्णा मंदिरही नजीकच आहे

विश्वेश्वराचे मंदिर पाहिल्यानंतर टांगा करून प्रख्यात बनारस हिंदू विश्वविद्यालयाकडे निघालो वाटेत जुने दुर्गामंदिर व दुर्गाकुंड पाहिले दुर्गामंदिर बंगालच्या राणीने बांधले आजूबाजूला माकडे निर्धास्तपणे उड्या मारीत होती

जवळचे तुलसीमानसमंदिर हे काशीचे प्रख्यात आधुनिक संगमरवरी मंदिर पाहिले मंदिरातील भिंतीवर रामायणातील प्रसंग चित्रीत केले असून सम्यक् रामायणाचे दर्शन होते कलकत्त्याच्या व्यापाऱ्याने खर्चाचा हिशेब न करता हे मंदिर बांधले डॉ राधाकृष्णन् यानी मंदिराचे उद्घाटन केले होते मंदिरात राम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांच्या मूर्ती आहेत संत तुलसी-दासाचाही पुतळा आहे मंदिराच्या वरील बाजूला संग्रहालय आहे हे वैशिष्ट्य आहे त्यात पौराणिक प्रसंग हलत्या मूर्तींच्या सहाय्याने साकारले आहेत त्यामुळे प्रसंग ततोतत डोळ्यासमोर उभा रहातो आपल्याकडे गणेशो-त्सवाच्यावेळी आरास करून पौराणिक देखावा उभे करतात त्याच्याशी साम्य वाटले रंगीबेरंगी प्रकाशयोजनेमुळे प्रसंगातील सजीवतेत भर पडते थोड्याच अंतरावर झाडीत संकटमोचन हनुमानमंदिर आहे

बनारस हिंदू विश्वविद्यालय म्हणजे प मदनमोहन मालवीय यांचे साकार झालेले स्वप्न ! त्यानी विद्यापीठ रचनेस स्वतःला वाहून घेतले होते संस्था-निकांकडून देणग्या मिळवून विविध इमारती त्यानी उभारल्या ब्रिटीश राज्य-कर्त्यांना हिंदू विद्यापीठाचे महत्व पटवून देऊन त्यांचे सहाय्य घेतले प्रवेशद्वारा-जवळच स्वातंत्र्यप्रेमी प मालवीय यांचा पुतळा चित्त आकर्षून घेतो ब्रिटीश गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग यांनी या विद्यापीठाचा पायाभरणी समारंभ इ स १९१६ मध्ये केला इ स १९२१ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यानी उद्घाटन केले. बनारसचे महाराजा प्रभु नारायणसिंग यानी विद्यापीठ उभारणीसाठी उदारपणे

जागा उपलब्ध करून दिली. तेराशे एकराचा विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर उत्कृष्ट आखलेले रस्ते, विविध बेचाळीस विद्याशाखांच्या इमारती, संशोधन केंद्रे यांनी व्यापलेला आहे सुंदर गर्द झाडी रमणीय व शांत वातावरणात अधिकच भर घालते प्रथमात सयाजीराव गायकवाड लायब्ररी बडोद्यांच्या महाराजांच्या देणगीतून बांधली आहे नेहरू व टागोर कुटुंबियांकडून पुस्तकाच्या देणग्या मिळाल्या सध्या येथे सहा लाख पुस्तके असून बारा हजार हस्तलिखिते आहेत भारत कला भवन या येथील संग्रहालयात विविध अप्रतिम पेंटिंग्ज, कलाकृती, पुतळे यांचा संग्रह आहे याबाबत रविंद्रनाथ टागोर यांचे मार्गदर्शन लाभले या विद्यापीठाच्या नामवंत माजी विद्यार्थ्यांत डॉ दुर्गाबाई देशमुख, श्री कृपलानी, श्री श्रीमाळी यांचा समावेश आहे डॉ राधाकृष्णन् यांनी विद्यापीठात भारतीय संस्कृतीविषयाचे प्राध्यापकपद भूषविले होते तसेच सर जदुनाथ सरकार इतिहास विभागाचे प्रमुख होते प ओंकारनाथ ठाकूर यांनी संगीत व कलाविभागाचे प्राचार्यपद भूषविले होते डॉ राधाकृष्णन् १९३९–४८ मध्ये कुलगुरु होते सध्या चौदा हजारांवर विद्यार्थी लाभ घेत असून त्यात मॉरिशस, आफ्रिका, सिलोन, मलाया, थायलंड येथील परदेशी विद्यार्थ्यांचाही समावेश आहे पाश्चिमात्य व पौर्वात्य शिक्षणाचा समन्वय या विद्यापीठात उत्कृष्टरीत्या साधला आहे त्यामुळे प्राचीन अथांग वारसा असलेल्या हिंदू संस्कृतीचा व प्रगत युरोपियन तंत्रविज्ञानाचा अलौकिक मिलाफ झाला आहे

विद्यापीठाच्या आवारातील बिर्लांनी बांधलेले मंदिर भव्य व अप्रतिम आहे त्याची धाटणी दिल्ली, मथुरा येथील त्यांनी बांधलेल्या मंदिरांप्रमाणेच आहे मंदिराचा कोनशिला इ स १९३० मध्ये हिमालयातील एका तपस्वी महात्म्याच्या हस्ते झाला हे शिवमंदिर हिंदू कलाकृतीचे आधुनिक विश्वनाथ मंदिर होय हे संगमरवरी मंदिर सव्वाशे फूट रुंद व अडीचशे फूट उंच असून पूर्ण होण्यास वीस वर्षे लागली गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे प्रशस्त सभा मंडपामध्ये भिंतींना व खांबांना टेकून गणेश, रामचंद्र, लक्ष्मी नारायण इ. देव देवतांच्या संगमरवरी मूर्ती असून वचने कोरली आहे आजूबाजूचा बगीचा, रम्य हिरवळ, सुबक दगडी पुतळे, कारंजी मंदिराच्या रमणीयतेत भर घालतात मंदिर पहायला दररोज सहा हजार लोक येतात

बनारस विद्यापीठाचा सुंदर परिसर पाहून तृप्तीने स्टेशनकडे निघालो टांगेवाल्याने काशी विद्यापीठाच्या आवारात नेले तेथे आम्हाला पहायचे होते 'भारतमाता मंदिर' प्रवेशद्वारावरील संगमरवरावर वंदेमातरम् हे राष्ट्रगीत कोरले आहे या मंदिरात भारतमातेची मूर्ती असेल या कल्पनेचा मंदिरात प्रवेश केल्यावर भ्रमनिरास झाला मंदिरात मध्यभागी एक चौकोनी हौद आहे. त्यात संगमरवरी एक फूट चौकोनी मापाचे दगड घडवून बनवलेला भारतमातेचा सुंदर प्राकृतिक भौगोलिक नकाशा तयार केला आहे राजस्थानमधील मकरान्याचा पांढरा संगमरवरी दगड खास घडवून वापरला आहे १" = ६४ मैल लांब, रुंद या मापाने व १" = २००० फूट उंची या मापाने घडवलेले दगड जोडले आहेत पूर्व–पश्चिम तीस फूट व दक्षिण-उत्तर बत्तीस फूट मापात ७६४ चौकोनी फरशा घडवून हा भारतमातेचा त्रिमिती नकाशा मंदिराच्या मध्यभागी तयार केला आहे नकाशात हिमालय, सह्याद्री, सातपुडा या पर्वतांची शिखरे जशी दिसतात त्याप्रमाणेच नजीकचा अफगाणिस्तान, तिबेट, ब्रह्मदेश, लंका, मलाया हा भूभागही दिसतो या दुमजली मंदिराच्या भिंतीवर भारताचे विविध नकाशे काढलेले होते भारतमातेचे खरेखुरे स्मारक याखेरीज दुसरे कुठले असू शकणार ?

भारतमाता मंदिराचे निर्माते आहेत शिवप्रसाद गुप्त पुण्याच्या महर्षी कर्वे यांच्या आश्रमातील जमिनीवर पूर्वी मातीचे बनवलेले भारताचे मानचित्र पाहून भारताचे उठावदार मानचित्र संगमरवरात करण्याची प्रेरणा त्यांना झाली १९३० साली हे मंदिर उभारण्यास सुरूवात झाली. काशीच्या श्री दुर्गा प्रसाद यांची या कामी खूप मदत झाली. म गांधीनी इ स १९३६ साली या मंदिराचे उद्घाटन केले विशेष म्हणजे मंदिरातील शिलालेखावर मंदिरनिर्मात्याच्या नावाचा उल्लेखही नाही प्रसिद्धीसाठी हपापलेल्या आजच्या काळात हे लक्षणीय वाटते मंदिराची व्यवस्थित देखभाल न ठेवल्यामुळे आज मात्र भिंतीवरील नकाशावर ओरखडे ओढून भिंती खराब झालेल्या पाहून खंत वाटली दुसरे वैषम्य वाटले की–निर्जीव दगडी मूर्तींचे धक्काबुक्की करून दर्शन घेण्यात धन्यता मानणाऱ्या भाविकांचा या वास्तव मंदिराला भेट द्यावयाचा अभाव मंदिराला भेट देणाऱ्यांच्या अभावी तेथे शुकशुकाट शांतता होती भारतमाता मंदिर पाहून आम्ही जयपुरी या धर्मशाळेत परतलो.

☐

# बुद्धं शरणं गच्छामि–सारनाथ

काशीच्या बसस्टँडवर सारनाथला जाण्यासाठी सकाळी नऊला पोहोचलो तेव्हा बस तयारच होती काशीपासून केवळ दहा कि मी अंतर असलेल्या सारनाथला जाणारा रस्ता हिरव्यागार शेतातून, गर्द, झाडीतून जातो आजूबाजूचा परिसरही शांत, स्वच्छ व अल्हाददायक वाटत होता काशीच्या गजबजाट व बजबजपुरीच्या पार्श्वभूमीवर हे वातावरण वेगळे वाटत होते·

बसमध्ये जाताना मनात सारखे विचार तरळत होते भगवान बुद्धाचे ! गौतम बुद्धाच्या आयुष्यात चार गावांना अत्यंत महत्त्व आहे पहिले-लुम्बिनी येथे गौतमाचा जन्म झाला, सध्या ते स्थान नेपाळात आहे दुसरे–बुद्धगया तेथे गौतमांना दिव्यदृष्टी प्राप्त झाली. बुद्धगया बिहारमध्ये आहे तिसरे–इसिपत्न उर्फ हल्लीचे सारनाथ बुद्धगया येथे गौतमाना दिव्य दृष्टी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सारनाथला येऊन प्रथम पाच सहकाऱ्यांना बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रकाश दाखविला ! शेवटी कुसिनर येथे बुद्धाचे महानिर्वाण झाले ! शेवटची दोन गावे उत्तर प्रदेशात आहेत

सारनाथला पूर्वी घनदाट अरण्य व मृगवन होते सारंगनाथ म्हणजे 'हरणांचा राजा' असे गौतम बुद्धांबद्दल म्हटले जात असावे सारंग म्हणजे

शिव, तेव्हा महादेवाचे स्थान म्हणजे सारंगनाथ असाही अर्थ अभिप्रेत असण्याचा संभव आहे. सारनाथ येथे शिवाचे जुने मंदिर आहे. सारंगनाथचे पुढे 'सारनाथ' असे हल्लीचे रूपांतर झाले. याच मृगवनात बुद्धाची पाच सहकाऱ्यांशी भेट झाली. सारनाथ हे इ. स. पूर्वी सहाव्या ते इ. स. बाराव्या शतकापर्यंत बौद्ध धर्माचे केंद्र होते. बुद्धनिर्वाणानंतर अडीचशे वर्षांनी मौर्य राजा अशोकाने शंभर फूट उंचीचे धर्मराजिका स्तूप, अशोक स्तंभ व धमेख स्तूप बांधले. अशोककाळ सारनाथच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदू होता. चौथ्या व सातव्या शतकाचा गुप्तकाल सारनाथचे सुवर्ण युग समजले जाते. सारनाथवर प्रथम हूणांनी आक्रमण केले होते. नंतरच्या काळात महमूद गझनी, कुतबुद्दीन- ऐबक यांनी लूट केली.

बसने सारनाथमध्ये प्रवेश केला. प्रथम रेडिओ केंद्राच्या उंचच्या उंच मनोऱ्यानजीक जुन्या विटांचा अष्टकोनी आकाराचा प्रचंड ढीग दिसला. याच ठिकाणी बुद्धाला पाच सहकारी प्रथम भेटले. ही जागा म्हणजे चौखंडी स्तूप होय. सम्राट अकबराने आपल्या पित्याने या जागेला भेट दिल्याच्या स्मरणार्थ वरील अष्टकोनी मनोरा बांधल्याचा उल्लेख तेथील दगडी शिलालेखावर आहे अशीही माहिती मिळाली.

सारनाथला बस थांबल्यावर प्रथम उत्खननाच्या जागेकडे मोर्चा वळविला. शाळेत असताना वाचल्याप्रमाणे सिंधु खोऱ्यातील मोहेंजोदडो, हडप्पा संस्कृतीच्या अवशेषांच्या वर्णनाप्रमाणे या उत्खनन केलेल्या जागा वाटत होत्या. काळाच्या उदरात गडप झालेल्या प्राचीन संस्कृतीचे तेथे दर्शन होते. तेथे दिसतात जुने बुद्धविहार, स्तूप! तेथे उत्खनन विषयक चित्तथरारक हकीकत ऐकायला मिळाली. इ. स. १७९४ मध्ये बनारसचा राजा चेतनसिंह याचा दिवाण जगतसिंह याने सारनाथचा ११० फूट व्यासाचा स्तूप उखडून त्यातून निघालेल्या सामानाने बनारसचे जगतगंज मार्केट बांधले. त्यावेळी उत्खननात त्याला प्रथम एक दगडी पेटी मिळाली. त्यात दुसरी एक हिरवी संगमरवरी पेटी होती, तिच्यात हिरे, माणकांनी, सोन्याच्या पानांनी आच्छादिलेली हाडे मिळाली. ही बुद्धाची अवशेष समजली गेली व गंगेत बुडविली गेली! हा उखडलेला स्तूप म्हणजे सम्राट अशोकाने बांधलेला 'धर्मराजिका स्तूप' असे अनुमान काढले गेले. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संगने हा स्तूप सातव्या

शतकात पाहिल्याचे टिपण आहे उत्खननात बुद्धाची मूर्ती मिळाली नतर ब्रिटिशानी केलेल्या उत्खननात वेळोवेळी प्राचीन भाडी, शिजवलेला भात मिळाला यावरून असे अनुमान काढले जाते की आगीने ही विहारे भस्मसात झाली असावीत

बोलता बोलता आम्ही प्रचड अशा 'धमेख स्तूपा' जवळ आलो गुप्त काळात पाचव्या शतकात हा स्तूप बांधला गेला तळाला व्यास ९३ फूट आहे स्तूपाची उची १२८ फूट असून पायापासून १४३ फूट आहे इतका तो भव्य आहे खालचा ३७ फूटाचा भाग दगडी असून वर विटकाम आहे सगळे बाधकाम भरीव आहे तळ अष्टकोनी असून दक्षिण बाजू शिवाय सर्व बाजूला नक्षीकाम, भौमेतिक आकृत्या, कोरलेली फुले सुदर आहेत स्तूपावर अजस्त्र कमल पत्राच्या आणि कमल पुष्पांच्या महिरपी कोरल्या आहेत गत वैभवाची साक्ष देत ऊन, पाऊस, वारा यांचे आघात पचवून धमेख स्तूप उभा आहे शेजारीच अठराव्या शतकात बांधलेले दिगबर जैन मदिर आहे त्यात अकराव्या जैन तीर्थंकाराची काळ्या पाषाणाची मूर्ती आहे

प्रशस्त हिरवळ पार करून 'मूलगध कुटी विहार' या सुदर मंदिरात प्रवेश केला गौतम बुद्ध कालीन सापडलेल्या शिलालेखावरून गौतम बुद्धाच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या जुन्या कुटीच्या जागी इ स. १९३१ मध्ये हा नवा मूलगध कुटीविहार बाधला गेला महाबोधी सोसायटीचे अगरीका धर्मपाल यांनी आपल्या आईकडून देणगी घेऊन तो बांधला या बुद्ध मदिरातील बुद्धाचे अवशेष बुद्ध पौर्णिमेला दर्शनासाठी ठेवतात हा बौद्ध विहार अत्यत चकचकीत सुदर आहे भितीवर जपानी चित्रकार को सेत्सू नोसू यानी बुद्धाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसग खास जपानी शैलीने चितारले आहेत बुद्धाची प्रसन्न मूर्ती मनावर सात्विकतेचा ठसा उमटवते. मदिराचे प्रवेशद्वारही आकर्षक आहे मदिरासमोरच अगरीका धर्मपालचा सगमरवरी पुतळा आहे नजीकच दहा एकर क्षेत्रात मृगालय वसलेले आहे प्रसिद्ध बोधीवृक्ष बुद्ध विहारानजीक आहे या वृक्षाचे रोप सम्राट अशोकाच्या मुलीने सघमित्रेने सिलोनमधील अनुराधपुरामधून आणल्याचा उल्लेख आहे.

सारनाथची आणखी दोन प्रख्यात बुद्ध मदिरे म्हणजे चायनीज बुद्ध मदिर व दुसरे तिब्बत बौद्ध विहार. पहिले मदिर सिंगापूरचा बँकर लिचूनने

बाधले त्यात ब्रह्मदेशात घडविलेली संगमरवरी मूर्ती आहे आसनस्थ बुद्धाच्या मूर्तीचे नाक चपटे व डोळे बारीक आहेत दुसऱ्या तिबेटी मंदिरात तिबेटी पद्धतीची बुद्धाची मूर्ती आहे मंदिरात लामा धर्मगुरु होते

सारनाथची बुद्ध मंदिरे पाहिल्यावर मन संग्रहालय पहायला आतुर झालेले होते इ. स. १९१० साली बांधलेल्या या संग्रहालयात एक मध्यवर्ती दालन असून दोन्ही बाजूला दोन लांब दालने आहेत मधल्या दालनामध्ये डोळ्यात भरते विश्वविख्यात अशोक स्तंभाची मूळ दगडी मूर्ती—प्रजासत्ताक भारताच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक ! चार पूर्णाकृती सिंह असलेल्या या स्तंभावर हत्ती, घोडा, सिंह, बैल व चक्र तळाला कोरलेले आहेत तपकिरी रंगाच्या या दगडी स्तंभावर चकाकणारे गुळगुळीत पॉलीश आहे दगड चकचकीत करण्याच्या या प्राचीन कलेचे गुपित संशोधन केल्यानंतर अजूनही उकललेले नाही एखाद्या तपकिरी संगमरवरी दगडाप्रमाणे हा स्तंभ चमकत होता. अशोककालीन हा स्तंभ मूळ ७३ फूट होता त्याचा खालील भाग सारनाथच्या उत्खननात आढळतो चिनी प्रवासी ह्यूएन्त्संगने आपल्या प्रवास वर्णनात लिहून ठेवले आहे की, हा स्तंभ आरशाप्रमाणे चमकत होता संग्रहालयामधील इतर उल्लेखनीय वस्तू म्हणजे बुद्धाचा आसनस्थ पुतळा, तांबड्या दगडाचा छत्रीधारी बुद्ध व गुप्तकालीन विविध वस्तू चुनार दगडात कोरलेल्या जातक कथा हे आणखी एक वैशिष्ट्य !

सारनाथमधील शेवटचे भेट देण्याचे ठिकाण होते हिंदूंचे प्राचीन शिवमंदिर टेकडीवरील या मंदिराच्या पायऱ्या चढून गेल्यावर गाभाऱ्यात महादेवाची पिंड दिसली शेजारी कुंड होते. त्यात तुरळक कमळाची फुले दिसत होती मंदिराच्या टेकडीवरून आम्हाला पिवळ्या रंगाची बौद्ध विहाराप्रमाणे दिसणारी वास्तु दिसली चौकशीअंती कळले की बौद्ध शिल्पकृतीप्रमाणे बांधलेले, विहारासारखे दिसणारे हे सारनाथचे नवीन रेल्वे स्टेशन होय !

दुपारची वेळ झाली होती गौतम बुद्धाच्या पवित्र भूमीतील फेरफटका मारून झाला होता शांत वातावरण असलेल्या सारनाथची भेट आटोपून वाराणसीला परत निघालो.

□

## लालबहादूर शास्त्रीजींचे-रामनगर

सारनाथहून वाराणसीला दुपारी एकला पोहोचलो भोजन व थोडी विश्रांती घेऊन परत दशाश्वमेध घाटावर आलो आम्हाला जायचे होते रामनगर किल्ला व राजवाडा पहायला एका होडीवाल्याने आठ रुपयात रामनगरला जाऊन परतण्याचे कबूल केले रामनगर गंगेच्या पूर्व किनाऱ्यावर आठ कि मी वर आहे वाराणसीच्या घाटावर उभे राहिल्यावर दूरवर पैलतीरी रामनगरचा किल्ला दिसतो होडीतून गंगेचे घाट पहात पहात जाताना मजा वाटत होती होडीवाला सांगत होता गंगेच्या विशाल पात्रात यदा पाणी कमी आहे होडीतून दूरवर हिंदू विद्यापीठ व रामनगर यांना जोडणारा पिंपांचा कच्चा पूल दिसत होता त्यावरून बस जाऊ शकत नाही सायकल रिक्षा जाऊ शकते गंगेच्या अथांग पात्रातून दूरवरचा रामनगरचा, नदीकाठचा किल्ला दृष्टीक्षेपात येऊ लागला

हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे क्षत्रियावर राज्यकारभार व राज्य रक्षणाची जबाबदारी असल्याने हिंदुस्थानातील बहुतेक राजे क्षत्रिय आहेत त्याला अपवाद आहे बनारसच्या राजाचा- हा राजा ब्राह्मण होता त्यांची राजधानी रामनगरला ! राजा मसाराम हा बनारसच्या राजघराण्याचा मूळ पुरुष

त्यानतर राजा चेतसिंह व राजा वळवतसिंह याच्या कारकीर्दीत रामनगरचा हा प्रसिद्ध किल्ला व राजवाडा बाधला गेला त्यात नतरच्या राजानी वेळोवेळी भर घातली.

होडी किल्ल्याच्या पायथ्याजवळील घाटाजवळ थांबली मऊ रेतीचा रस्ता पार करून आम्ही रामनगरच्या राजवाड्यातील सग्रहालय पहाण्यासाठी तिकीट काढून प्रवेश केला प्रवेशद्वाराचा दगडी दरवाजा एवढा भव्य आहे की त्यातून हत्ती जाऊ शकतात या सग्रहालयातील वस्तू १८ व्या व १९ व्या शतकातील आहेत इतर सग्रहालयामध्ये हा कालखड वगळला गेला आहे. सुरुवातीच्या दालनात दगडी पुतळे आहेत त्यात नवव्या शतकातील शिवलिंगाची मूर्ती आकर्षक आहे विश्वनाथाचे प्रतीक अशा चतुर्मुखी शिवलिंगाच्या मूर्तींच्या चारीबाजूला हरगौरी, वराह, गणेश व सूर्य अशा मूर्ती कोरलेल्या आहेत एका दालनात जुन्या वस्त्रांचा विभाग आहे पत्रे (खलिते) ठेवण्यासाठी तयार केलेली वेलवेटची पिशवी कलाकुसरीने भरलेली आहे बनारसी कलाकुसरीचे जरीचे शालू, रुमाल काश्मिरी शाली तेथे आहेत हत्तीच्या अबारीचे हौदे विविध आहेत चांदीचा हौदा आहे, हस्तीदतावर काम केलेला आहे चादीचे विविध हुक्के अनुपम आहेत नारळाच्या आकाराचा चादीचा हुक्का खास खानदानी थाटाचा वाटला हस्तीदती कोरीव काम इतके नाजूक आहे की झाडावर बारीक पक्षीही कोरला आहे तो पहायला भिगाचा उपयोग करावा लागतो दसऱ्याच्या मिरवणुकीतील हत्ती, त्यावरील अबारी, रथ, गाड्या, उट इत्यादि हस्तीदती कलाकुसरीचे उत्कृष्ट नमुने आहेत हस्तीदती फुलदाणीही नाजूक आहे जुन्या विविध दिव्यामध्ये पचशाखा 'चादीची मशाल' आकर्षक आहे १६ व्या शतकात लिहिलेल्या सचित्र रामचरित मानसाचे हस्तलिखिताचे नक्षीदार लाकडी मुखपृष्ठ आकर्षक आहे त्यावर हस्तीदताचा शेषशायी विष्णु कोरला आहे शस्त्रागार विभागात जुन्या ढाली, तलवार, बदुका, बाण, कट्यार प्रेक्षणीय आहेत त्यातल्या प्रसिद्ध 'रामदानी कट्यार' वर रामसीताराम या बारीक सोनेरी शब्दांच्या रांगाच्या रांगा आढळतात सग्रहालयामधील आणखी एक प्रख्यात वस्तू म्हणजे 'रामनगर घड्याळ' ते इ स १७८२ मध्ये मूळचद या कारागिराने बनवले या भव्य घड्याळात वेळेबरोबर चद्रोदय, सूर्योदय, राशी कळतात ।

महाराजाचा 'दरबार हॉल' भव्य असाच आहे पण आता त्याची शान पूर्वीसारखी राहिली नाही. भारतातील व परदेशातील नरेशानी वेळोवेळी रामनगरला भेट दिलेल्या प्रसगांची छायाचित्रे भितीवर आहेत महाराजांनी शिकार केलेले वाघ पेंढे भरून दिवाणखान्यात ठेवले आहेत रामनगर राम-लीलेच्या वैशिष्टयपूर्ण कार्यक्रमासाठी प्रसिद्ध आहे एकेकाळी वैभवाने दिपलेल्या व आता परिस्थितीनुरूप ते वैभव लुप्त होत असलेल्या या राजवाड्याच्या आतील बाजूच्या दरवाजाने नदीच्या पूर्व काठावर आलो नदीपलीकडे विद्यापीठाच्या आवारातील बिर्लामदिराची शिखरे दिसत होती दूरवर गगेचे घाट दिसत होते नदीच्या काठाच्या पार्श्वभूमीवर अस्ताला जाणारा सूर्य जगरहाटीचे चक्र फिरवीत होता

रामनगरची भेट स्वर्गीय लालबहादूर शास्त्री याच्या पैतृक घराला भेट दिल्याखेरीज पूर्ण होणार नव्हती भारताच्या या दुसऱ्या पतप्रधानांचे बालपण रामनगरमध्ये गेले काशीला शिक्षणासाठी जाण्यासाठी एके दिवशी होडीवाल्याला द्यावयाला पैसे नसल्याने त्यानी पोहत गगा पार केली या आठवणीने ऊर भरून आला ! लालबहादूर हे खरेखुरे जनतेचे पतप्रधान त्यानी गरिबीचे चटके आणि व्यथा स्वत बालपणापासून अनुभवल्या होत्या 'जय जवान जय किसान' हा मत्र देऊन भारतीयाची अस्मिता जागृत करणारा हा पुरुषोत्तम या नगराच्या सान्निध्यात वाढला, केवढी भूषणाची गोष्ट ? रामनगरच्या नागरिकांनी वर्गणी गोळा करून उभारलेला शास्त्रीजींचा सगमरवरी पांढरा पुतळा शास्त्रीजीची स्मृती जागृत करून देतो

शास्त्रीजीच्या वडिलार्जित बैठ्या दुमजली घराला भेट देताना मन मात्र दुःखी कष्टी झाले दिल्लीच्या 'तीनमूर्ती भवन' अथवा अलाहाबादच्या 'आनंद भवन' या प नेहरु कालीन फोटो, हस्तलिखिते, विविध वस्तूनी सजविलेल्या घरांशी तुलना करता लालबहादूर शास्त्रीजींच्या या छोटेखानी घराची दुर्दशा पाहून मन व्यथित झाले टेबलावर शास्त्रीजींचा एका बालकाबरोबरचा एकच एक फोटो होता सरकारने वास्तविक एक राष्ट्रीय स्मारक म्हणून हे घर, आजूबाजूची जागा ताब्यात घेऊन जतन करायला हवे देशाला स्वावलबनाचा धडा देणाऱ्या लालबहादूर शास्त्रींच्या घराला भेट दिल्यावर त्याची अवस्था पाहून बाहेर पडताना देशातले विविध भागातील प्रवासी खेद प्रदर्शित

करीत होते

होडीने दशाश्वमेध घाटावर पोहोचलो, तेव्हा गंगेच्या प्रवाहात दीपज्योती सोडणाऱ्याची गर्दी दिसली नावाडी सांगत होता "बहनजी आज दीवालीका धनत्रयोदशीका दिन है। गंगापूजन का दिन है।" आम्हीही दिव्याच्या ज्योती विकत घेतल्या व पेटवून गंगामाईच्या पवित्र पात्रात सोडल्या घाटाच्या पायऱ्यांवर उभे राहून कितीतरी वेळ गंगेच्या प्रवाहात सरकणाऱ्या फुल-वातीच्या दीपज्योती पहात होतो नदीच्या पाण्यात ज्योतींची प्रतिबिंबे आकाशातील तारकांप्रमाणे चमकत होती धर्मशाळेकडे परतताना विश्वे-श्वराचे पुन्हा दर्शन घेतले भोजन आटोपले व दुसऱ्या दिवशी सकाळी अलाहाबादला जाण्याचे ठरवून निद्रेच्या आधीन झालो

☐

# आनंद भवन–अलाहाबादची शान

सकाळी सव्वा नऊ वाजता वाराणसी–मुंबई एक्सप्रेसने अलाहाबादला जाण्यासाठी वाराणसी स्टेशनचा निरोप घेतला डब्यात खिडकीजवळ समोरासमोर फॅशनेबल चष्मा घातलेले मध्यमवयीन सुखवस्तु जोडपे बसले होते गाडी सुरू झाली आणि गाडीचा वेग मंद असतानाच प्लॅटफॉर्मवरील दोघा भुरट्या चोरांनी चलाखीने त्या दोघांचे चष्मे एकदम काढून घेतले ! त्यांच्या आरडाओरड्याने डब्यात एकच गोंधळ माजला चोरीचा हा अजब प्रकार म्हणायचा ! त्यांच्या चष्मे नसलेल्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहून वाईट तर वाटत होतेच पण हसणेही आवरत नव्हते मी उठून डब्याच्या बाजूच्या बोळीत उभे राहून हसून मन मोकळे केले सोनेरी भारी फ्रेम असल्याने चोरट्यांनी ते चष्मे उडवले असावेत नशीब आमच्या ह्यांचा चष्मा सोनेरी नव्हता ! त्यामुळे हायसे वाटले चालायचेच. प्रवासातील बऱ्यावाईट अनुभवात ही एक मजेशीर भर पडली

वाराणसी–मुंबई एक्सप्रेस अलाहाबादपर्यंत साधी पॅसेंजर असून नंतर फास्ट एक्सप्रेस होते गाडी प्रत्येक स्टेशनवर थांबत थांबत मुंगीच्या गतीने चालली होती त्यामुळे प्रवास फारच कंटाळवाणा झाला व उशीर व्हायला

लागला डब्यातल्या प्रवाशाबरोबर गप्पा मारून मारूनही कटाळा आला होता अलाहाबाद स्टेशनवर पोहोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते १९५ कि मी प्रवासाला एवढा वेळ गेल्याने सकाळचा उत्साहाचा वेळ वाया गेला होता

गगायमुनेच्या सगमावर वसलेल्या प्रयागचा (अलाहाबादचे पूर्वीचे नाव) उल्लेख पुराणात, रामायणात आलेला आहे हिंदू सस्कृतीचे ते एक प्राचीन, पवित्र तीर्थस्थान आहे, प्रयाग पूर्वी प्रयागराज किंवा तीर्थराज म्हणून ओळखले जाई सुरुवातीला आर्य लोक गंगेच्या या खोऱ्यात वस्ती करून रहात कालातराने प्रयागला सम्राट अशोक, समुद्रगुप्ताने भेट दिली. हर्षाच्या काळात तर ते एक सांस्कृतिक भरभराटीचे केंद्र म्हणून ओळखले जाई मोगल सम्राट अकबराने यमुनेकाठी किल्ला बाधला आणि प्रयागला अलाहाबाद हे सध्याचे नाव दिले ब्रिटिश काळात आग्ऱ्याहून अलाहाबादला काही वर्षे राजधानी हलविली गेली होती. कालातराने उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ झाली अलाहाबादने भारताला तीन पतप्रधान दिले. पहिले प नेहरू, दुसरे शास्त्रीजी व विद्यमान इंदिराजी नेहरू कुटुंबाचे अलाहाबाद हे तर वडिलोपार्जित राहाण्याचे गाव अलाहाबादच्या त्रिवेणी सगमात तीन महिन्याचे छोटे शास्त्री सक्रात स्नानाचे वेळी आईच्या—अम्माजीच्या हातातून निसटून होडीवाल्याच्या टोपलीत अलगद जाऊन पडल्याने दैवयोगाने वाचले होते

अलाहाबादला मुक्काम करावयाचा नसल्याने स्टेशनवरील क्लोकरूममध्ये सामान टाकले थोडासा फराळ केला व टागा करून त्रिवेणी सगमाकडे निघालो वाटेतील यमुनाकाठी अकबराने बाधलेला किल्ला दिल्ली आग्ऱ्याच्या किल्ल्याइतका खास नाही सध्या हा किल्ला मिलिटरी प्रशासनाखाली आहे किल्ल्यातील दोन प्रेक्षणीय गोष्टी म्हणजे एक अशोकस्तभ व दुसरी पाताळपुरी मंदिर

वालुकाश्मातील दगडाचा अशोक स्तभ इ स च्या दुसऱ्या शतकात उभारला गेला असावा त्याचे पॉलीश मऊ चकचकीत आहे हा स्तंभ तळाला ७'–११" व्यासाचा व वर २'–२" व्यासाचा व ३५ फूट उंच आहे स्तभावर घटाकार माथा आहे अशोककालीन कोरलेली आज्ञा पत्रे स्तभाच्या इतिहासावर प्रकाश टाकतात अक्षरे सारख्या आकाराची व खोल कोरलेली आहेत

अकबरकालीन बिरबलाने प्रयागला दिलेल्या भेटीची नोंद कोरलेली आहे तसेच सोळाव्या शतकात जहांगीरने आपल्या पूर्वजांची नावे त्यावर कोरली आहेत.

पाताळपुरी मंदिर तळघरात असून चौकोनी आकाराच्या या प्राचीन मंदिराच्या छताला खांबांचा आधार दिलेला आहे प्रभु रामचंद्र व सीता वन-वासात असताना त्यांनी चित्रकूट पर्वतावर जाताना या मंदिराला भेट दिल्याचा पुराणात उल्लेख आहे मंदिराच्या एका बाजूला वृक्षाची कापलेली खोडे आहेत, हाच अमर 'अक्षय वटवृक्ष' असावा मोक्षप्राप्तीसाठी आसुसलेले भाविक या वृक्षावरून गंगेत बुडया घ्यायचे म्हणून तत्कालीन राजाने हा वृक्ष कापून टाकला. दुसरी उल्लेखनीय बाब म्हणजे जहांगीरच्या हिंदू आईने—जोधाबाईने किल्ल्यातील स्वत च्या महालापासून या मंदिरापर्यंत दर्शनासाठी गुप्त भुयारी मार्ग तयार करून घेतला होता

अलाहाबादचे उल्लेखनीय प्राचीन मंदिर म्हणजे महर्षी भारद्वाजाचे मंदिर भारद्वाज हे आश्रमाचे कुलपती होते व प्रभु रामचंद्राबरोबर झालेल्या संवा-दाचा वाल्मिकी रामायणात उल्लेख आहे हे मंदिर नदीकडेला उंचवटयावर असून भारद्वाज दोन नद्यांचा नेत्रांना आनंद देणारा पवित्र संगम पहात असत कालांतराने नदीने मार्ग बदलला व आज हे मंदिर नदीपासून बरेच दूर आहे. या दगडी मंदिराची व्यवस्था काही समाधानकारक वाटली नाही आजू-बाजूच्या अस्वच्छ वातावरणामुळे तर आणखी खंत वाटली सध्याचा अलाहा-बाद विद्यापीठाचा रम्य परिसर या आश्रमाच्या नजीकच आहे हा एक गोड योगायोग आहे विद्यापीठाच्या विविध शाखांच्या इमारती भव्य आहेत. विद्यापीठाचे वाचनालय विविध पुस्तकांनी समृद्ध आहे

भारद्वाज मंदिरानजीक नेहरू घराण्याच्या मालकीचे 'आनंद भवन' पाह-ण्याला प्रवाशाची रीघ लागली होती १९२७ साली बांधलेले आनंद भवन पूर्वी स्वराज्य भवन म्हणून ओळखले जाई मोतीलालजी नेहरू यांनी आनंद-भवन विकत घेतले तेव्हा जवाहरलाल दहा वर्षांचे होते ज्या जागेवर आनंद भवन वास्तु उभी आहे ती जागा अत्यंत पवित्र मानण्यात येते चौदा वर्षांच्या वनवासानंतर परत आलेल्या प्रभुरामाची नि भरताची भेट ज्या ठिकाणी झाली तीच ही जागा असा समज झाला आहे छोटयाशा राजवाडयासारखे दिसणारे

प मोतीलाल नेहरूंचे आनंद भवन आता त्यांच्या नातीने–इंदिरा गांधींनी राष्ट्राला अर्पण केले आहे आनंद भवनचे आवार विविध झाडाफुलांमुळे रम्य वाटते आनंद भवन दुमजली असून त्याच्या ऐटबाज जाळीदार गच्च्या सुरेख दिसतात समोरच पोर्च असून सर्वांत वर घुमटाकार गोल छत्री आकर्षक आहे खालील व्हरांडा उघडा असून गोलाकार खांब शोभिवंत आहेत मागील बाजूला जेथे इंदिराजी व फिरोज गांधी यांचा विवाह संपन्न झाला तेथे फलक लिहून ठेवला आहे जिना सुरू होतो त्या जवळच्या भिंतीवर पंतप्रधान इंदिराजींनी आनंदभवन राष्ट्राला अर्पण केल्याची नोंद असलेल्या कागदपत्राची प्रत फ्रेम करून लावली आहे त्यावर त्यांच्या सहीखेरीज राजीव व संजय गांधी यांच्या सह्या आहेत वरच्या हॉलमध्ये घरगुती जुनी पत्रे, कपडे, फोटो आकर्षकरित्या मांडून ठेवले आहेत म. गांधींचा तर आनंदभवनमध्ये वारंवार मुक्काम व्हायचा त्यांनी ज्या खाटेवर बसून उपवास केला ती खाट, पाण्याचा भग या वस्तु जतन करून ठेवल्या आहेत खाटेवर पहुडलेल्या बापूजींच्या शेजारी बसलेल्या बाल इंदिरेचा फोटो पाहून जुने दृष्य डोळ्यासमोर तरळले

स्वातंत्र्यापूर्व काळात या महान वास्तूत राष्ट्रीय चळवळीसंबंधी अनेक बैठकी व्हायच्या स्वातंत्र्यसंग्रामाची ही जणू समरभूमी ! अखिल भारतीय कॉंग्रेस कार्यकारणीचे ते १९३० ते १९४६ असे सोळा वर्षे केंद्र होते तेथील बैठकीतून अनेक महत्वाचे निर्णय घेतले गेले अनेक महत्वाच्या घटना घडल्या म्हणूनच आनंदभवन ही केवळ दगड, विटा, चुना यांनी बांधलेली इमारत नसून राष्ट्रीय चळवळीशी निगडीत असलेले व नेहरू घराण्याच्या इतिहासाचे जिवंत प्रतीक आहे आनंदभवन राष्ट्राला अर्पण करण्यात इंदिराजींनी औचित्य साधले आहे उत्तमस्थितीत ठेवलेल्या आनंदभवनाच्या टुमदार इमारतीतून बाहेर पडताना मन करारी मोतीलाल नेहरु, व प्रियदर्शिनी इंदिरा यांच्या स्मृतींजवळ रेंगाळत होते.

आनंदभवन पाहुन कमलानेहरु मार्गावरील क्रांतीकारक चंद्रशेखर आझाद बगीच्यात आलो ब्रिटीश युवराज आल्फ्रेड, ड्यूक ऑफ एडिंबरो यांच्या अलाहाबाद शहराच्या भेटीनिमित्त हा बगीचा पूर्वी आल्फ्रेड पार्क नावाने ओळखला जाई. सुप्रसिद्ध क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या आयुष्यातील शेवटचे रोमांचकारी पर्व येथेच घडले ब्रिटीश अधिकाऱ्यांनी या बगीच्यात

असलेल्या आझादावर गोळी झाडली त्यावेळी आपण पोलिसाच्या हाती पडणार असे दिसताच चंद्रशेखर आझादानी आपल्या उजव्या कानशिलात आपल्याच रिव्हॉल्व्हरमधून गोळी झाडली व मृत्यूला सामोरे झाले! ज्या झाडाआडून ते पडले त्या झाडाला महत्व येणार असे दिसताच ब्रिटिशानी ते झाड कापून टाकले स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या बगीच्याला आझादाचे नाव देऊन त्यांचा पुतळा उभारला आहे या बगीचातील आझादाचे बलिदान विसरणे अशक्य अलाहाबादच्या भेटीत आवर्जून पहावे असे हे स्थान आहे.

अलाहाबादचे म्युनिसिपल संग्रहालय चंद्रशेखर पार्कच्या उत्तरेला कमला नेहरू मार्गावर आहे संग्रहालयात चौदा विभाग आहेत एका दालनात सुप्रसिद्ध चित्रकार हालदार यांची बंगाली शैलीची चित्रे आहेत अकराव्या व बाराव्या शतकातील सुरसुंदरीच्या चार मूर्ती खजुराहो आणि अबू येथील दिलवाडा मंदिराच्या शैलीच्या आहेत गुप्तकालीन मूर्तींचाही चांगला संग्रह आहे गांधार कलेतील बुद्धाच्या जीवन प्रसंगांची विविध दृश्ये आहेत पिरॅमीडप्रमाणे दिसणारा वेदिकास्तंभ उत्कृष्टरीत्या कोरलेला आहे जातक कथा प्रसंगांचीही शिल्पे आढळतात नाणे विभागात जुने ताब्याचे शिक्के आहेत राजस्थानी, मोगलकालीन कलेचेही नमुने मांडून ठेवले आहेत या संग्रहालयातील आकर्षक आधुनिक दालन म्हणजे पूर्वेकडील हॉल तेथे कै पंडित नेहरुंना वेळोवेळी भेट मिळालेल्या देशी व परदेशी वस्तूंचा संग्रह केलेला आहे त्यातील उल्लेखनीय वस्तू म्हणजे पंडितजींना दक्षिण भारतातून मिळालेला चंदनाचा रथ कृष्ण अर्जुनाला गीता सांगत असतानाचा प्रसंग त्यावर कोरलेला आहे तेथील एक वैशिष्ट्यपूर्ण वस्तू म्हणजे पं नेहरू यांचे १९२२ सालचे लखनौ जेलचे जेल हिस्टरी तिकीट! पंडितजींना त्यांच्या विदेशातील कॉलेज जीवनात हॅरो (ब्रिटन) येथे बक्षिस मिळालेली पुस्तके संग्रह करून ठेवली आहेत या हॉलमधल्या विविध भेटीदाखल मिळालेल्या वस्तू पाहाताना पं नेहरूंच्या उत्तुंग कर्तृत्वाची व लोकप्रियतेची साक्ष पटते त्यांच्या आयुष्यातील निरनिराळ्या पैलूंचे उत्कृष्ट दर्शन होते

म्युझियम पाहून त्रिवेणी संगमाकडे आलो तेव्हा सूर्य पश्चिमेला बराच कलला होता. गंगेच्या संथ प्रवाहात यमुनेचे निळसर पाणी मिसळून यमुना गंगेत विलीन झाली होती सरस्वती गुप्तरीत्या येथे मिळत असल्याने पवित्र

त्रिवेणी संगमावर प्रत्येक हिंदू भाविकाची स्नान करायची इच्छा असते. प्रयागच्या त्रिवेणी संगमाचा अद्वितीय सुंदर देखावा पाहिल्यावर नरहरी कवीला या काव्य पंक्ती स्फुरल्या—

भागीरथीचे अति शुभ्र वारी
काळी दिसे सूर्यसुताहि भारी
दोहीमध्ये जे जल लाल आहे
सरस्वती ती प्रगटोनी आहे

प्रत्येक बारा वर्षानंतर माघ महिन्यात भरणाऱ्या कुंभ मेळ्याच्या वेळी गजबजलेल्या त्रिवेणी संगमाचे काय वर्णन करावे ? तेथील गंगेच्या विराट पात्रात पडावाच्या रांगा अहोरात्र लागतात लक्षावधी भाविक संगमात स्नान करतात

आम्हाला थोडासा उशीर झाल्यामुळे व अंधार पडायला लागल्यामुळे होडीवाले संगमावर जाण्यासाठी अव्वाच्यासव्वा, तीस रुपये मागू लागले. पंचवीस रुपयाखाली ते यायला तयार होईनात तेव्हा प्रत्यक्ष संगमावर जाण्याचा नाद सोडला। संगमाच्या पवित्र प्रवाहात वेणीदान करण्यात हिंदू सुवासिनी स्त्रिया सौभाग्याचे सार्थक मानतात परंतु अंधार व्हायला सुरुवात झाल्याने तो विचार सोडून दिला होडीवाला म्हणाला संगमावर जात नसाल तर लहान मुलाच्या हाताने नदीला दान करा छोट्या उदयजवळ नदीला वहायला पैसे काढून दिल्यावर त्याने त्याला पाण्यापर्यंत उचलून नदीत पैसे टाकायला लावले व स्वतःच्या हाताची ओंजळ उदयच्या हाता-खाली पाण्यात ठेवून दक्षिणेचे पैसे गोळा केले। होडीवाल्याची चलाखी ध्यानात आली त्याने आम्हाला प्रत्यक्ष संगमावर न नेता दक्षिणा तर उपटून घेतली होती

अलाहाबादच्या त्रिवेणी संगमावरून पाय निघता निघेना आठवत होता पंडित नेहरूंच्या शेवटच्या इच्छा पत्रातील गंगा-यमुना संबंधीचा काव्यात्म हृदयंगम उतारा। त्यांनी लिहून ठेवले आहे—

" अलाहाबाद जवळून वाहणाऱ्या गंगा आणि यमुना या नद्यांशी लहानपणा-पासूनच मी मनाने बांधला गेलो आहे जसजसा मी मोठा होत गेलो तसतसे

हे बंधनही अधिकाधिक दृढ होत गेले जसजसे ऋतु बदलत जातात, तसतसे गंगा यमुनांचे रूप आणि वृत्ती बदलत जातात ही त्यांची बदलती रूपे मी मनात कोरून ठेवली आहेत अनेक वेळा या रूपाच्या पलीकडे जाऊन या नद्यांची गाणी मी ऐकली आहेत त्यांच्या अनादी प्रवाहावरोबर वाहत आलेल्या कथांचे मी श्रवण केले आहे या नद्यांची प्राचीन परंपरा, त्यांचा इतिहास व पुराणातून त्यांच्या संबंधीचे उल्लेख यांच्यावर मी कितीतरी वेळा वारंवार विचार केला आहे

या नद्या, विशेषत: गंगा ही सर्वार्थाने भारताची नदी आहे गंगेवर भारतातील जनतेचे अलोट प्रेम आहे भारताच्या आशा आकांक्षा, जय पराजय यांची गंगा ही साक्षीदार आहे भारतमातेच्या विजयाची गाणी तिने ऐकली आणि पराभवाची आक्रोश–आक्रंदनेही तिने ऐकली गंगा हीं भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे व जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे हा जीवनप्रवाह बदलत राहतो, वाहत राहतो, पण त्याचे प्रतीक मात्र गंगाच राहते

" गंगेकडे पाहिले म्हणजे मला हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांची आणि खोल खोल दऱ्यांची आठवण येते त्याच्यावर मी खूप खूप प्रेम केले आहे या हिमशिखरांप्रमाणेच मला गंगा नदीकडे पाहून समृद्ध आणि विस्तीर्ण अशी गंगेच्या खोऱ्यातील मैदाने आठवतात याच प्रदेशात माझी जीवनगाथा अव्याहत चालू आहे

" सकाळच्या कोवळ्या सूर्य किरणाच्या प्रकाशात गंगा कशी स्मित हास्य करीत नाचत नाचत बागडत चाललेली दिसते ! पण एकदा का संध्या छायेचे आवरण पडले म्हणजे तिचा प्रवाह कसा खिन्न आणि गूढ भासू लागतो ! हिवाळ्यात प्रवाह रोडावतो खरा पण तेव्हाही गंगा कशी मंद गतीने आणि डौलाने वहात जाते ! पावसाळ्यात तिचा प्रचंड प्रवाह घनगर्जना करीत येतो त्यावेळी गंगेचे रौद्र रूप म्हणजे विशाल सागराचे जणू दर्शनच आणि त्या गंगेत असते सागराप्रमाणेच विध्वंसकतेचेही सुप्त सामर्थ्य !

" वर्तमान कालातून वहात वहात भविष्य काळाच्या महासागरात एकरूप होणाऱ्या भारताच्या भूतकालाचे गंगा हे मला प्रतीक वाटते, भव्य स्मारक वाटते !

"भारताचा महान सांस्कृतिक वारसा हे माझेही अभिमानाचे निधान आहे.

त्या परंपरेचा मी एक दुवा आहे म्हणून माझ्या या सर्व मनिषांचा आणि भाव भावनांचा साक्षीदार असलेल्या माझ्या देहाची थोडी तरी राख गंगेत पडावी अशी माझी इच्छा आहे भारताच्या सांस्कृतिक परंपरेला माझा तो अखेरचा प्रणिपात आहे !"

पंडीतजींच्या या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या २७ मे १९६४ रोजी झालेल्या मत्यूनंतर त्यांची रक्षा व अलाहाबादला आनंद भवनमध्ये रक्षापात्रामध्ये २८ वर्षे जतन करून ठेवलेल्या कमलाजींच्या रक्षेचा भाग गंगा यमुनेच्या त्रिवेणी संगमात विसर्जन करण्यात आला अशा प्रकारे वीस वर्षे एकमेकांना साथ देणाऱ्या ह्या प्रेमळ दंपतीचे आत्मे पवित्र संगमात रक्षा रूपाने जोडीने विलीन झाले !

गंगा यमुनेच्या प्रवाहाकडे शेवटचा दृष्टिक्षेप टाकला दूरवर रेल्वेचा भव्य लोखंडी पूल दिसत होता परतताना वाटेत स्टेशन नजीकच्या खुसरो बगी-च्यात एक चक्कर मारली.

एकेकाळी विलासी झगमगाटाच्या थाटाने नटलेली ही बाग जहांगीर कालीन दु:खद घटनांशी निगडित आहे राजपुत्र खुसरो हा जहांगीरची राज-पूत राणी मानबाई उर्फ शाहबेगम हिच्या पोटी जन्मलेला सर्वांत थोरला मुलगा अत्यंत बुद्धिमान, लोकप्रिय व खूप महत्वाकांक्षी पण त्यामुळेच तो कमनशिबी ठरला त्याने जहांगीर विरुद्ध बंड केले म्हणून त्याला प्रथम अटक केले परंतु नंतर कारस्थान, मत्सर व संशय यामुळे त्याचा निर्घृण बळी पडला. बगीच्यात खुसरो, त्याची आई व बहीण निसार बेगम यांच्या कबरी आहेत. पहिल्या दोनवरील चबुतऱ्यांवर संगमरवरी कबरी आहेत त्यावर पेंटींग नक्षीकाम आहे पर्शियन भाषेत कोरलेले आहे त्याच्या आईचा मकबरा तीन मजली आहे बहिणीच्या कबरीमध्ये फक्त चबुतरा आहे परंतु मकबरा नाही त्यामुळे तिला दुसरीकडे कोठे तरी पुरले असावे असे अनुमान निघते. तिचे नाव मात्र कोरलेले आढळते जहांगीरच्या कारकीर्दीतल्या काळ्याकुट्ट प्रकरणाची त्याने केलेल्या राजपुत्र खुसरोच्या निर्घृण हत्येची हा बगीचा जणु साक्ष देतो !

अलाहाबादचा फेरफटका मारून स्टेशनजवळ पोहोचलो तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते तो दिवस दिवाळीचा लक्ष्मीपूजनाचा होता आजूबाजूला फटा-

क्यांचा आवाज येत होता व रोषणाई दिसत होती स्टेशन बाहेरच्या आवा-रात हट्टाने घेतलेले फटाके वाजवून उदयने हौस करून घेतली जेवण आटो-पून रात्री साडे आठला गाडीने अलाहाबादचा निरोप घेतला दिवाळीत चित्रकूटला यात्रा असल्याने गाडीत चिक्कार गर्दी होती

चित्रकूट हे रामायण प्रसिद्ध तीर्थक्षेत्र तपस्विनी नदीच्या तीरावर मध्य प्रदेशातील सतना आणि उत्तर प्रदेशातील बांदा या जिल्ह्याच्या सीमेवर आहे बनवासात जाण्यासाठी अयोध्येहून निघालेले श्रीराम प्रथम चित्रकूट येथे कामदगिरी या पवित्र पर्वताच्या परिसरात राहिले होते अशी माहिती मिळाली यात्रेच्या गर्दीमुळे डब्यात अक्षरश मुंग्यासारखी गर्दी होती प्रत्येक स्टेशनवर रामनामाच्या गजरात प्रवासी चढत होते गर्दीमुळे रात्रभर डोळ्याला डोळा लागला नाही

☐

# नारी सौंदर्याचा आविष्कार–खजुराहो


सकाळचे साडेसहा वाजले रात्रभरच्या दगदगीच्या प्रवासाने शिणून सतना स्टेशनवर उतरलो. सतना स्टेशनहून खजुराहोला जाण्यासाठी बस सकाळी सातला होती त्यामुळे स्टेशनवरच लगबगीने चहापाणी आवरले क्लोकरूम-मध्ये सामान टाकले. रेल्वेस्टेशननजीकच बसस्टँड आहे सतना खजुराहो हा चार तासाचा प्रवास सकाळी साडेसातला सुरू झाला रम्य नैसर्गिक सृष्टी-सौंदर्य पहाता पहाता वेळ मजेत जातो वाटेत हिऱ्याच्या खाणीसाठी जग-प्रसिद्ध असलेले पन्ना गाव लागले बरोबर साडे अकराला खजुराहो मंदिराच्या बाजूला असलेल्या स्टँडवर पोहोचलो

आजच्या ह्या छोटेखानी खजुराहोच्या जन्माची कथा आहे हजार वर्षापूर्वीची ! सुमारे हजार वर्षापूर्वी खजुराहो हे एक विशाल नगर होते त्याच्या सिंहद्वारावरील सुवर्णाचे दोन खजूरवृक्ष दाराला शोभा आणीत होते त्याला 'खजुरवाहक' असे नाव पडले, त्याचेच 'खजुराहो' असे पुढे नाव पडले दुसरे असे संभवनीय आहे की हे नगर खजूर वृक्षांच्या मध्ये वसले असल्याने त्याचे नाव खजूर वाहक व पुढे खजुराहो असे झाले निनोरताल सरोवराच्या काठी वसलेले खजुराहो प्राचीन काळी जनपद, वत्सदेश





लोभस भावमुद्रा—खजुराहो.
चेंडू बरोबर क्रीडा करताना-
पायातील काटा काढताना-



कंदारिया महादेव मंदिर, खजुराहो

आनंद भवन, अलाहाबाद



मध्यकाळात जेजाकभुक्ती आणि १४ व्या शतकानतर, 'बुदेलखड' या नावाने ओळखले जाई सध्या ते मध्यप्रदेशातील छत्रपूर जिल्ह्यात सतना स्टेशनपासून (मुबई–अलाहाबाद मार्ग) १२० कि मी अतरावर व झाशी स्टेशनपासून (मुबई–भोपाळ–झाशी–दिल्ली मार्ग) हरपलपूर मार्गे १०० कि मी अतरावर आहे

खजुराहोच्या महान मदिराच्या निर्मितीची कथा आहे शूर चदेल वशीय राजपूत राजाच्या कर्तबगारीची. चदेल वशाचा आरभ नवव्या शतकात झाला तेराव्या शतकापर्यंत पाच शतके त्यानी राजसत्ता उपभोगली त्याची पूर्वी यमुना आणि वेतना या नद्याच्या सगमावरील महोबा या ठिकाणी राजधानी होती चदेल मध्ययुगीन कालात येथे राहिले. त्यांनी पराक्रमाने लढाया जिकल्या सत्तेच्या परमोच्च उत्कर्षाला पोहोचल्यावर शक्तिमान चदेल राजांनी एका वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्यकलेच्या ऐश्वर्याची व शैलीची साक्ष देणाऱ्या या महान मदिरांची निर्मिती केली

चदेल वशाच्या उद्‌गमाबाबत अनेक आख्यायिकापैकी एक लोकप्रिय प्रणयरम्य कथा अशी आहे काशीच्या इद्रजित राजाचा पुरोहित हेमराज याची हेमवती ही सुस्वरूप कन्या सुन्दरी हेमवती एका चादण्या रात्री ऋतु-मती असताना स्नानाला गेली तिच्या सौदर्यावर भाळून चद्राने आकाशातून खाली येऊन तिला आलिगन दिले चद्र परत जाऊ लागला तेव्हा हेमवती लज्जेने काकुळतीला येऊन त्याला म्हणाली, " मला पती नसल्याने माझा हा कलक कसा धुवून निघेल ?" त्यावर चद्र म्हणाला, " काळजी करू नकोस. तुझ्या मुलाचा जन्म कर्णावती नदीच्या तीरावर होईल तो एका बलशाली वशाचा पराक्रमी राजा होईल त्याच्या वयाच्या सोळाव्या वर्षी यज्ञ केल्यावर तुझा कलक धुवून निघेल " यथावकाश गर्भवती हेमवतीने जन्म दिलेल्या नवजात बालकाचे नाव दैवी पिता चद्रावरून 'चद्रवर्मा' ठेवण्यात आले वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने एक वाघ मारून पराक्रमाची चुणूक दाखवली यथासाग महायज्ञ केल्यानतर माता हेमवतीचा कलक दूर झाला. शक्तिशाली चदेल वशाचा मूळ पुरुष चद्रवर्मा अशा प्रकारे चद्रदेवता व हेमवतीचा वशज होता !

मूळच्या पंचाऐंशी मदिरांपैकी आजमिताला अस्तित्वात असलेली बावीस

मंदिरे आपल्या अलौकिक सौंदर्यासाठी विश्वप्रसिद्ध आहेत म्हणूनच देशी विदेशी प्रवाशांची ह्या छोटेखानी गावात रीघ लागलेली दिसत होती. ह्या मंदिरात हिंदुपंथीय व जैनपंथीय मंदिरे आहेत पण तेथील वास्तूकला व शिल्पकला यांचा प्रभावी एकजिनसीपणा पंथभिन्नतेला झाकाळून टाकतो

खजुराहोची ही मंदिरे आठ चौरस मैलात विखुरलेली आहेत तिची महत्त्वाची वैशिष्टये म्हणजे ती उंच, भव्य आणि एकत्रित बांधणीची आहेत. त्याच्या भोवती आवाराची भिंत नसते आणि ती उंच जोत्यावर बांधण्यात आली आहेत त्यामुळे मंदिर जमिनीपेक्षा उंचावर दिसते मंदिराभोवती प्रदक्षिणेसाठी खुली जागा आहे मंदिराची सर्व दालने एकमेकाला जोडलेली असून त्याच्यात जाण्यासाठी आतून व बाहेरून मार्ग असतात. त्याच्या बांधणीची योजना सामान्यत पूर्व पश्चिम असते. ही सर्व दालने, मार्ग वगैरे मिळून एक एकसंध मंदिर बनते बरीच मंदिरे 'पंचायतन शैलीची' म्हणजे मुख्य मंदिराभोवती चार कोपऱ्यात चार उपमंदिरे अशी आहेत सध्या ही बहुतेक उपमंदिरे नष्ट झाली आहेत गाभारा, सभागृह, पडवी, पुढील देवडी व प्रदक्षिणामार्ग ही मंदिराची पाच आवश्यक अंगे आहेत मंदिराचे मुख्य सभागृह आकाराने मोठे पुरेशा उंचीचे असून त्याची बांधणी हेमाडपंती शैलीची आहे मोठ्या मंदिराना आतल्या बाजूने गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणा मार्ग आहे. मंदिराच्या जोत्यावर विविध प्रकारचे नक्षीकाम केले आहे मंदिराच्या मध्यभागी दोन किंवा तीन आडव्या पट्ट्यात मनोहर मूर्ती कोरलेल्या आहेत मध्यभागानंतर मंदिरांच्या माथ्यावर दिसतात नक्षीदार कळसाच्या वर वर जाणाऱ्या छोट्या छोट्या पिरॅमिडसारख्या रांगा! काही खाली, काही वर अशा ह्या कळसांमुळे ते दृश्य अनेक छोटी मोठी शिखरे असलेल्या कैलास पर्वतांच्या रांगाप्रमाणे दिसते व मुख्य कळसाची उंची प्रकर्षाने जाणवते त्यामुळे मंदिराचा विशालपणा नजरेत भरतो व एक विशिष्ट लयबद्धता प्राप्त होते खजुराहोची ही मंदिरे अंतःबाह्य सजावटीने, ओतप्रोत सजीवतेने भरलेली आहेत मंदिरात स्थापत्य व शिल्पकलेचा जणू हृदयंगम मिलाफ झाला आहे अंतर्रचनेमध्ये दर्शनी देवडीला शोभिवंत नक्षीदार मकरतोरण असते बारीकसारीक आकृत्यांचे जणू टांगते नक्षीकाम! सभामंडपाचे बाजूचे कठडे व खांब नक्षीदार आहेत गाभाऱ्याच्या

प्रवेशद्वारावर सुन्दर नक्षीदार चौकटी असतात, दारांच्या चौकटी, खांब, छत कोरीव शिल्पकामाने संपन्न आहेत छतावर फळे, फुले, लता, वेली, भौमेतिक आकृत्या यांची शिल्प कलाकृती मनोहारी असने खांबाच्या ब्रॅकेटवरील अप्सरांच्या अत्यंत आकर्षक, मोहक कमनीय, नृत्याच्या विविध अवस्थेत कोरलेल्या उन्मादक आकृती मनोवेधक वाटतात प्रदक्षिणा मार्ग असलेल्या गाभाऱ्याच्या भिंतीवरही बाहेरच्या बाजूने दोन किंवा तीन पट्ट्यात प्रतिमा कोरलेल्या आहेत

या प्रतिमा पाच प्रकारच्या आहेत पहिल्या आहेत मुख्य आराध्य देवताच्या दुसऱ्या परिवार देवताच्या त्यात पार्श्वदेवता, दिग्पाल मूर्तींचा समावेश आहे तिसऱ्या महत्वाच्या म्हणजे स्वर्गातील अप्सराच्या. या कलेचा प्राण आहे आलिंगनबद्ध प्रणयी युगुलाच्या सौदर्यशाली मूर्ती आहेत चौथ्या प्रकारात धार्मिकतेचा प्रभाव असलेल्या घरगुती दृश्ये, नर्तक, वादक, गुरुशिष्य अशा मूर्ती आहेत पाचव्या प्रकारात व्याल, शार्दूल तत्सम अन्य पशु पक्षीयांच्या मूर्ती आहेत

मानवाच्या दैनंदिन जीवनातील भय, शका, मत्सर, प्रेम, वासना, आनंद उल्हास, व्यथा, दु.ख, सगीत, गायन, नृत्य अशा सर्व भावमुद्रांचे अप्रतिम व हृदयगम असे कोरीव काम केले आहे जन्म आणि मरण, क्षुधा आणि तृप्ती, युद्ध आणि नृत्य, सरक्षण आणि सहार, राग आणि अनुराग व विभिन्न प्रकारची चित्रे दृग्गोचर होतात खजुराहो येथील शिल्पकला अद्वितीय सवेदनक्षमतेबद्दल, उत्कृष्ट आल्हाददायकतेबद्दल व प्रभावी आकर्षकतेबद्दल प्रसिद्ध आहे तिचे आवाहन ऐहिक व अध्यात्मिक अशा दोन्ही स्वरूपाचे आहे हे एक आगळे वैशिष्ट्य आहे खजुराहोच्या शिल्पकाराजवळ न जाणे कोणती हत्यारे होती की त्यानी केलेल्या कोरीव कामाने जीवनाच्या अगा पागावर प्रकाश टाकला जणू ती मानवी मनाच्या स्पदन शीलतेच्या सपन्नतेची प्रतीके आहेत

खजुराहो मदिरातला नामांकित विषय म्हणजे नारी सौदर्य । नारीच्या अंगप्रत्यगाचे भाव शिल्पकृतीत अकीत केले आहेत. कामिनीच्या कमनीय देहवल्लरीच्या प्रत्येक हावभावाचा आविष्कार शिल्पकामात ठायी ठायी दिसून येतो. ही नारी सर्वत्र आहे मंदिराच्या भिंतीवर आहे दरवाजाच्या कमानीवर आहे खांबावर टेकलेली आहे छतावरून डोकावते आहे जणू

लोभस कटाक्ष टाकून बोलावते आहे ! मंदिराचा असा एकही भाग नाहीं की जेथे तिचे अस्तित्व नाही प्रत्येक इंच न इंचावर तिची लयबद्धता व भावदर्शीपणा दृग्गोचर होतो ! नारीच्या सौंदर्याची स्तुती जागोजागी आहे तिचे प्रसाधन, खेळकरपणा, प्रीती, विनोदबुद्धी, लोभसवाणी दृष्टी वेडावून टाकते खजुराहोच्या शिल्पकारानी दोन प्रकारच्या नारी चित्रीत केल्या आहेत एक भूतलावरील, जी सौन्दर्यशाली, बुद्धिमान व कार्यकुशल आहे दुसरी-स्वर्ग लोकातील सुरसुंदरी, यक्षिणी, अप्सरा ! म्हणूनच म्हटले जाते की खजुराहोत मानवी आणि अलौकिक ईश्वरी सौंदर्याचा सुरेख संगम झाला आहे ! शिल्पांकित केलेल्या नारीचे केवळ बाह्यरूपच सुंदर नाही तर अंतरी ती निर्मल आहे घरकामात ती मागे नाही दक्ष आहे, स्वावलंबी आहे संगीत, नृत्य व ईश्वरोपासना ही तिची मुख्य अंगे आहेत सामुदायिक गायनात ही स्त्री रस घेणारी आहे. पाणी भरणारी, बालकाला स्तनपान करताना मातेचे वात्सल्य उचंबळून आलेली व विशुद्ध प्रेमाचा झरा वाहणारी, ईश्वराची आराधना, अर्चना करण्यात ध्यानमग्न असलेली शिल्पांकित केली आहे पायात घुंगरू बांधून पदन्यासासाठी ती तत्पर आहे तिच्या पायात जणू चंचलता दृग्गोचर होते ही नारी पत्र लिहिणारी, वाचणारी, विचारमग्न, अंतर्मुख झालेली अशी आहे हरणाचे कातडे जवळ बाळगणारी स्त्री जशी आहे तशीच हातात पुस्तक घेतलेली सुशिक्षित विदुषीही आहे वीणावादनात गुंग व एकतारी वाजविणारी आहे विविध वाद्ययंत्रे वाजवणारी आहे चित्र-कलेत तल्लीन होणारी चित्रकला प्रवीण आहे. खेळात रुची ठेवणारी दर्शविली आहे चेंडू चित्रीत केले आहेत. या नारीला शृंगार, प्रसाधनाची आवड आहे. नेत्रात अंजन, ओठावर लाली, पायावर मेंदी तिला प्रिय आहे तिच्या पायात पैंजण आहेत मध्यभागी कटीबंध, मणी, झालर, किंकणी, वक्षभागावर मणि-माला, मोहनमाळ, वैजयंती माला, हार, हातात बांगड्या, गजरा, कानात कर्णफूल, बाहूत बाजूबंद असे आवडते अलंकार आहेत नाकात मात्र काही आढळत नाही तिचे हावभाव कोमल आहेत व कटाक्ष मोहून टाकणारा ! तिच्या चित्रणात वक्ष व नितंब यांना प्राधान्य देण्यात आले आहे त्यांची वक्रता सौंदर्याने ओतप्रोत भरली आहे तिची कंबर एवढी सडपातळ दाखविली आहे की यौवनभार सांभाळायला तिला अवघड झाले आहे !

वृश्चिक कचुकीत शिरल्यामुळे अनावृत्त झालेली सलज्ज कामिनी शिल्पांकित केली आहे मर्कट लीलामुळे अनावृत्त झालेली दुसरी एक यौवना पाहून हसता हसता बेजार होण्याची वेळ आली खजुराहोच्या शिल्पकारानी स्त्रीला पुरुषापेक्षा अधिक कामुक व विषयवासनाधिष्ठ दाखविले आहे प्रेमाच्या खेळात पुरुषापेक्षा अग्रेसर व अधिक आनद उपभोगणारी शिल्पांकित केली आहे पुरुषाला रिझविण्यात तत्पर, यौवनाचे उत्तान रग खेळण्यात तत्परतेने सजलेली अशी शृगारिक दाखविली आहे नारी सौदर्याचा इतका अप्रतिम-आविष्कार जगाच्या पाठीवर दुसरीकडे कोठे नसेल !

भौगोलिकदृष्टचा खजुराहोच्या मदिराची तीन विभागात विभागणी होते पहिला बसस्टँड लगतचा पश्चिमसमूह, दुसरा पूर्वसमूह व तिसरा दक्षिणसमूह

पश्चिम समूहात कदारिया महादेव मदिर, लक्ष्मण मदिर, विश्वनाथ मदिर, चित्रगुप्त अथवा भरत मदिर, चौसष्ट योगिनी मदिर, व देवी जग-दबा मदिर ही प्रमुख सहा मदिरे आहेत.

खजुराहोमधील ११० फूट लाबी, ६० फूट रुदी व जमिनीपासून ११६ फूट उची असलेले कदारिया महादेव मदिर आकार, रचना व बांधणीमध्ये परिपक्व व परिणत आहे बाजूच्या चार उपमदिराचा नाश झाला आहे मदिरात शिरताना प्रवेशद्वाराजवळ नक्षीयुक्त तोरण मन आकर्षून घेते. त्यावर सगीतकार, वाद्यवादक, भीतीदायक मगरी, प्रणयी युगुले, देवदेवता अशा पुष्कळ मूर्ती कोरलेल्या आहेत. छतावर गोलात गोल अशी वर्तुळे अप्रतिम दिसतात खांबावरही विविध मूर्ती कोरल्या आहेत गर्भगृहात शिवलिंग आहे देवीच्या द्वारावर तप करणारे ऋषीमुनी, गंगा यमुना कोरलेल्या आहेत. जोत्यावर दोन पक्तींमध्ये हत्ती, घोडे, लढवय्ये वीर, शिकारी, डोंबारी, गवई, नर्तक, भक्तगण, प्रणयी युग्मे, देवदेवता, अप्सरा यांच्या कलापूर्ण, सजीवतेने भरलेल्या मूर्ती कोरल्या आहेत या मदिरात अतर्बाह्य सुमारे नऊशे मूर्ती आहेत अप्सरा, नर्तकी यांच्या शिल्पकृती रगेल, नखरेल, उद्दीपिक व प्रक्षोभक वाटतात कळस भव्य व बारीक कोरीव कामाने सजलेला नक्षीदार आहे कळसाच्या छोटचा ८५ नक्षीदार प्रतीकृती कळसावर चहू बाजूनी कोरल्या आहेत कळसावरील कळस जणू कैलास पर्वताची आठवण करून देतात खजुराहोमधील सर्व मदिरामध्ये तुलनेने हे

मंदिर मर्शीन जास्त कोरीव कामाने नटलेले आहे मंदिराच्या इच न इचावर उत्फुल्ल स्थापत्यकलेचा परमोच्च विकास आढळतो. मध्ययुगातील ह्या मंदिराची निर्मिती केवळ खजुराहो येथील मंदिरांमध्येच श्रेष्ठ नाही तर सर्व भारतातील ती एक प्रगल्भ अत्युत्कृष्ट कलानिर्मिती होय। या मंदिरातील उल्लेखनीय शिल्पकृती म्हणजे अर्धोन्मिलीत नेत्राच्या कोरलेल्या दोन युवती व चेंडू बरोबर क्रीडा करणारी युवती। चेंडू फेकताना झालेली तिच्या देहाची वक्रता शिल्पकाराने ततोतत दर्शवली आहे

लक्ष्मण मंदिर आतील शिलालेखानुमार राजा यशोवर्मनने बांधले आहे त्याचे उपनाव लक्ष्मणवर्मन म्हणून 'लक्ष्मण मंदिर' हे नाव पडले. मंदिराची लांबी ९८ फूट इतकी भव्य आहे या मंदिराचे वैशिष्टय म्हणजे कडेची चार उपमंदिरे शाबूत आहेत प्रवेशद्वार सुसज्जित असे आहे प्रवेश द्वाराजवळील कमानीवर मध्ये लक्ष्मी, डाव्या बाजूला ब्रह्मा व उजव्या बाजूला शिवाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत दरवाजावर अमृतासाठी समुद्रमथन करणारे देव दानव कोरलेले आहेत मंदिराच्या खांबावरील लांबच लांब, वेलबुट्टीदार, कोरीव नक्षीकाम जास्त उठावाचे आहे शिल्पकाम मोठ्या आकाराचे प्रसन्न वाटते भिंती, छतावर विविध आकृत्या व भरीव शिल्पकाम आहे सडपाच्या सर्व छपराना पिरॅमिड सारखे कळस असून त्याची अग्रे घटाकार आहेत कळस शोभिवंत, जाळीदार, रेखीव आहेत गर्भगृहात चार फूट उंचीची, चतुर्भुज व त्रिमुख—मूर्ती आहे मध्ये मानव, बाजूला नरसिंह आणि वराह अवताराच्या मूर्ती आहेत भिंतीवरील दोन पंक्तीत निर्भय हत्ती, युद्ध, शिकार, मिरवणुका, अप्सरा, नर्तिका, योद्धे, रणक्षेत्रावरील दृश्ये अशा मूर्ती कोरलेल्या आहेत मंदिरातील एक उल्लेखनीय शिल्पकृती म्हणजे मर्कटलीलेला वाचून आपल्या प्रियकराला आलिंगन देणारी मुग्धा व बिलगलेल्या सखीचा माकडापासून बचाव करण्यासाठी त्याला आकडा असणाऱ्या काठीने ढकलणारा प्रियकर !

नंतर विश्वनाथ मंदिरात प्रवेश केला राजा धंगने इ स १००२ मध्ये बांधलेल्या या मंदिराची रचना विशिष्ट आकृतीबध आणि कलाकौशल्याच्या सजावटीने युक्त अशी आहे मंदिराची लांबी ८९ फूट, रुंदी ४६ फूट आहे

मंदिरासमोर मंडपात नंदीची विशाल मूर्ती आहे भिंतीवर तीन पंक्तींमध्ये सिंह व हत्तींच्या जोड्या कोरलेल्या आहेत तीन मस्तकांच्या ब्रह्माची मूर्ती कोरली आहे पूर्वी मंदिरात पाचूचे लिंग होते असे म्हणतात सध्या दगडी शिवलिंग आहे कळस मात्र त्या मानाने साधा आहे पश्चिमेकडील भिंतीवर उजव्या हातात फळ घेतलेली व डाव्या हातात पोपट असलेली, दक्षिणेकडील भिंतीवर बालकाला हातात घेतलेली, उत्तरेकडील भिंतीवर बासरी वाजविणारी नारी अशा नाजूक मूर्ती कोरलेल्या आहेत सुस्नात स्त्री व केस गुफणारी नारी विलोभनीय वाटते. त्याचप्रमाणे हात जोडून प्रार्थना करणारी सात्त्विक नारी कोरलेली आहे मंदिरावर अंतर्बाह्य लहान मोठ्या सुमारे सहाशे मूर्ती कोरल्या आहेत याबरुन भव्यतेची कल्पना येईल

चित्रगुप्त मंदिर भरतमंदिर या नावानेही ओळखले जाते मंदिराची लांबी सुमारे ७५ फूट, रुंदी सुमारे ५२ फूट आहे मंदिरात सूर्याची पाच फूट उंचीची मूर्ती आहे सात अश्वांचा रथ चालवणारी ही सूर्याची मूर्ती कलात्मक आहे. त्याचप्रमाणे शिकार दृश्ये, राजेशाही मिरवणूक, तरुणींची नृत्ये मदांध हत्तींच्या झुंजी, अकरा मस्तकांचा विष्णु अशा मूर्ती कोरलेल्या आहेत. ज्याप्रमाणे स्मित करणारी अप्सरा कोरलेली आहे त्याप्रमाणे या मंदिरात इतरत्र कोठेही न आढळलेली एक शिल्पकृती लक्ष वेधून घेते—ती म्हणजे चेहऱ्यावर मनोवेदना कोरलेली दुःखी चेहऱ्याची नारी खजुराहोच्या विविध मंदिरात क्वचितच आढळणारी ही भावमूर्ती विसरता येत नाही

खजुराहोचे चौसष्ट योगिनी मंदिर सर्वप्रथम नवव्या शतकात बांधलेले आहे हे मंदिर काली देवतेचे व तिच्या देखभाल करणाऱ्या चौसष्ट स्त्री योगिनींचे आहे १२० फूट लांब, ६० फूट रुंद आकाराच्या विस्तृत प्रांगणात मंदिराच्या इमारती एका घेऱ्यात आहेत प्रत्येक मंदिरामध्ये जणू छोटेखानी मठच आहेत मंदिरे साधीच असून दर्शनी थोडे नक्षीचे काम आहे व अंतर्गत कळस आहे

उरलेला असलेले देवी जगदंबा हे शेवटचे मंदिर ७७ फूट लांब व सुमारे ५० फूट रुंदीचे आहे पूर्वी हे विष्णूचे मंदिर होते व आता देवीचे मंदिर म्हणून ओळखले जाते ह्यावर हळूवारपणे कोरलेल्या अप्सरा शृंगारमय आहेत तसेच मीलनोत्सुक प्रणयमुग्ध जोडपी अप्रतिम व दर्जेदार आहेत.

आरशात पाहणारी सूरसुंदरी कोरलेली आहे

पश्चिम समूहाचा फेरफटका पूर्ण झाला होता. तेवढ्यात पाश्चिमात्य स्त्री-पुरुष पर्यटकांचा एक ताफा, एका भारतीय स्त्री गाईडच्या मार्गदर्शनाखाली मंदिराजवळ येऊन पोहोचला गाईडची भाषा पर्यटकांना कळत होती पण आम्हाला कळत नव्हती कारण ती फ्रेंच भाषा बोलत होती। मंदिरातील शिल्पाचे बारकावे गाईडकडून कळल्यावर पाश्चिमात्य स्त्रीपुरुष खदखदून हसत होते कॅमेऱ्याने शिल्पकृतीची अखडच्या अखड फिल्म घेत होते। पाश्चिमात्य प्रवाशांना खजुराहोचे खूप आकर्षण आहे म्हणूनच सरकारने त्यांच्या सोयीसाठी खास लक्झरी बसबरोबरच दिल्ली-खजुराहो विमान-प्रवासाचीही सोय केली आहे

पूर्व समूहात प्रामुख्याने जैन मंदिरे आहेत पार्श्वनाथ मंदिर, आदिनाथ मंदिर, शांतिनाथमंदिर, घटाईमंदिर ही प्रमुख चार जैनमंदिरे होत.

पूर्व समूहातील पार्श्वनाथ या जैन मंदिराकडे जाण्यासाठी स्टँडपासून रिक्षा ठरवली पश्चिम समूहापासून त्याचे अंतर तीन कि मी आहे हे जैनपंथीय मंदिर ९८ फूट लांब, ३५ फूट रुंद असून पंचायतन शैलीचे आहे मंडप, महामंडप, अंतराळ, प्रदक्षिणामार्ग व गर्भगृह यांनी परिपूर्ण पूर्वाभिमुख असे ते आहे चंदेला राजा धांग राजवटीच्या प्रारंभी दहाव्या शतकात पाहिल या वैभवशाली शेठजीच्या द्रव्याने या मंदिराची निर्मिती झाली मंदिरावर जैन देवतांबरोबर हिंदू वैदिक मूर्तीही कोरलेल्या आहेत निमुळत्या दाढीच्या टोकाला गाठ बांधलेली अग्नि--देवतेची मूर्ती मानवी वाटते। कृष्ण जीवना-वरील विविध शृंगारिक कथा, प्रसंग कोरलेले आहेत हे मंदिर धार्मिक एकता आणि सांस्कृतिक संमिश्रणाचे प्रतीक आहे कळसाच्या कामामध्ये तुलनात्मक प्रगल्भता आढळते मंदिराची शिखरे जणू मेरु पर्वताप्रमाणे दिसतात बाहे-रील भिंतीवर तलवार, ढाल, भाला, तीरकमान या युद्ध हत्याराच्या तसेच घोडा, हरीण, सिंह, मगरी यांच्या मनोहारी मूर्ती कोरलेल्या आहेत मंदिराचे एक वैशिष्ट्य म्हणजे राम आणि सीता यांची युगलप्रतिमा कोरलेली आहे गर्भगृहात पूर्वी पार्श्वनाथांची जुनी भग्न प्रतिमा होती, त्या जागी नवीन मूर्ती एकोणिसाव्या शतकात बसविली आहे. स्त्रीच्या विविध भावमुद्रांचे अप्रतिम दर्शन हे या मंदिराचे वैशिष्ट्य मुलासह असलेली, पत्र

लिहिणारी, प्रसाधन करणारी, मेंदी लावणारी, विशाल नेत्रात अंजन घाल-णारी रूपगर्विता, स्तनपान देणारी, बासरी वादन करणारी, पायात घुंगरू बांधणारी, ढोलके वाजविण्यात तल्लीन झालेली। पार्श्वनाथ मंदिरातील विख्यात शिल्पकृती म्हणजे पायात रुतलेला काटा नाजूक हाताने हळुवारपणे काढताना कोरलेली गोंडस अल्लड यौवना मंदिरावर कोरलेल्या आणखी एका अप्रतिम शिल्पकृतीने खजुराहोच्या कारागिराच्या या कलाकृतीपुढे जीव ओवा-ळून टाकावासा वाटला मूर्ती कोरली होती एका सुस्नात स्त्रीची व तिच्या केसातून गळणाऱ्या जलबिंदूना मोती समजून ते टिपणाऱ्या हंसाची। प्रवा-साला निघण्यापूर्वी नगरला हृयांनी नारी सौंदर्याचा आविष्कार समजावून सांगताना जी शिल्पकृती डोळ्यासमोर उभी केली होती ती साक्षात पाह-ताना देहभान हरपून गेले। पार्श्वनाथ मंदिर कदारिया महादेव मंदिरापेक्षा आकाराने लहान जरी असले, तरी तज्ज्ञांच्या मते कलागुणदृष्टचा ते अधिक सरस आहे.

आदिनाथ हे दुसरे जैन मंदिर बाराव्या शतकात बांधले गेले मंदिरात दोन मोठ्या ललितासन मूर्ती कोरल्या आहेत दर्पणात पाहून कुंकू लावणाऱ्या नारीची मूर्ती मोहक आहे डोळ्यात काजळ घालणारी व निर्व्याज प्रेमाने बालकाचे चुंबन घेणारी माता ह्या दोन भावमुद्रांचे अप्रतिम चित्रण केलेल्या मूर्ती तास न् तास उभ्या राहून पहाव्याशा वाटतात शृंगाराच्या दाहकतेने पिडलेला दर्शक जणू मातेचे विशुद्ध प्रेम पाहून आनंदित होतो मंदिरावर तीन पंक्तीत गंधर्व, किन्नर, विद्याधर या देवता, यक्ष, अप्सरा, मिथुन या मूर्ती कोरल्या आहेत अशाच एका ओळीत शास्त्रीय नृत्याच्या विभिन्न भावमुद्रां-मध्ये नारीच्या देहयष्टीचे प्रदर्शन करताना ती अर्धवसना अथवा विवस्त्र दाखविली आहे। पण तितक्याच तत्परतेने तिच्या वक्षःस्थळावर कोरलेले वानर जणू तिच्या लज्जेचे रक्षण करतो। पश्चिम बाजूला एका ओळीत अस्ताव्यस्त वेषभूषेत परंतु लज्जापूर्ण मुद्रामध्ये दाखविलेली एक नारी अशीच सुंदर आहे तिची सलज्जमूर्ती अविस्मरणीय आहे या मंदिरात एका नृत्यां-गनेचे भावलयपूर्ण नृत्याला, पदन्यासाला प्रारंभ होण्याच्या तयारीतले सजीव शिल्पांकन केले आहे। जैन भगवान आदिनाथाच्या वैराग्य प्रसंगी मोहिनी टाकणारी ही नर्तकी निलांजना तर नव्हेना।

शांतिनाथ मंदिरात सोळाव्या तीर्थंकराची शांतिनाथची बारा फूट उंचीची धीर गंभीर, सौम्य भावाची अनुपम मूर्ती आहे मंदिरातील वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती म्हणजे तीर्थंकर पार्श्वनाथचा सेवक धरणेंद्र व पद्मावती या दंपतीची आसनावर आनंदी भावमुद्रेने बसलेली मूर्ती ! त्याच्या हातात श्रीफल आहे देवीच्या हातात छोटे बालक आहे ही युगुल प्रतिमा आलिंगनबद्ध नाही हे वैशिष्ट्य ही मनोहारी युगुल प्रतिमा डोळ्यासमोरून हटता हटत नाही इतकी सुंदर भावमुद्रेने ओतप्रोत भरलेली आहे या मंदिरासंबंधी मूर्तिभंजक मोगल बादशहा औरंगजेबाशी निगडीत मजेशीर हकीगत ऐकायला मिळाली औरंगजेबाच्या सेनेने जेव्हा ही शांतिनाथाची मूर्ती तोडण्याच्या दृष्टीने करगळीवर घाव घातला तेव्हा त्यातून दुग्धधारांचा प्रवाह वाहू लागला गोळा झालेल्या मधमाशा सेनेवर तुटून पडल्या आणि घाबरून सेनेने पळ काढला !

अकराव्या शतकात बांधलेले घंटाई जैन मंदिर आकाराने लहान ४४ फूट लांब व २२ फूट रुंद असे आहे खांबावर घंटा व लोंबकळणाऱ्या बेलाच्या आकृत्या वैशिष्ट्यपूर्ण रीतीने कोरल्या आहेत. म्हणून घंटाईघर हे नाव दिले आहे. मंदिरद्वारावर जैन तीर्थंकर गर्भावस्थेत असताना त्याच्या मातेला दिसलेली सोळा स्वप्नदृश्ये शिल्पकृतीत साकार केली आहेत

दक्षिण समूहातील महत्वाची दोन मंदिरे म्हणजे दुलादेवमंदिर व चतुर्भुज किंवा जतकारी मंदिर. पहिले सप्तरथ दुलादेवमंदिर प्रगत बांधणीचा उत्कृष्ट नमुना आहे मंदिराची लांबी ६९ फूट व रुंदी ४० फूट आहे एका दंतकथेनुसार मंदिराजवळून जाणाऱ्या लग्नाच्या वरातीतील नवरदेव (दुल्हा) अकस्मात मरण पावला म्हणून दुल्हादेव मंदिर हे नाव पडले मंदिराचे सभागृह बंदिस्त आहे गर्भगृहात शिवमूर्ती आहे छताला वीस ब्रॅकेटस आहेत त्यावर झाडाभोवती खेळणाऱ्या अप्सरांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. मंदिराच्या भिंतीवरील शिव–पार्वती यांच्या परंपरागत कोरीव मूर्ती शिल्पशैलीची अंतिम अवस्था दर्शवतात विद्याधराची मोहक मूर्ती येथे कोरली आहे दोन हातात पलिते (प्रकाशदीप) घेऊन नृत्य करणारी, बासरी वाजवणारी तसेच तंतुवाद्य वाजवणारी नारी रेखीव आहे

चंदेले राजाच्या कारकिर्दीत खजुराहो येथील कला व स्थापत्य ज्या गुणा-

मुळे ख्यातनाम झाले त्याच्या प्रभावळीत दुलादेव मंदिर हा तेजस्वी अंतिम आविष्कार ठरतो

खजुराहो गावापासून तीन फर्लांगावर दक्षिणेकडे असलेल्या जतकारी किंवा चतुर्भुज मंदिरातील गर्भगृहात चतुर्भुज विष्णूची नऊ फूट उंचीची मोठी मूर्ती आहे. उत्तर बाजूला नृसिंहाची–विष्णूच्या अवताराची मूर्ती कोरली आहे पूर्वेला वृषावर आरूढ त्रिशूलधारी शिवाची मूर्ती आहे तर दक्षिणेस अर्धा पुरुष व अर्धी नारी असे अर्धनारीनटेश्वराचे रूप धारण केलेली शिवमूर्ती आहे !

मंदिराचा फेरफटका मारताना एक आलिंगनबद्ध हिप्पी युगुल पाहून मनात विचार आले की दहाव्या शतकातील कलापूर्ण सौंदर्याच्या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकात वास्तवतेच्या नावावर केलेले तोकड्या कपड्यातील देहाचे ओंगळवाणे प्रदर्शन किती किळसवाणे वाटत आहे मंदिरावरील शिल्पे उघडीनागडी असूनही उदात्त वातावरणात पोहोचवत होती तर वासनामय विकृतीने पछाडलेल्या हिप्पीची जिवंत प्रणयक्रीडा उबग आणीत होती

खजुराहोच्या मंदिरांचा फेरफटका पूर्ण झाला होता पण मनाची स्थिती "कुणी कोडे माझे उकलील का ?" अशी झाली होती खजुराहोच्या मंदिरावर चित्रीत केलेल्या कामजीवनाबद्दलचे गूढ उकललेले नव्हते त्यासंबंधी संशोधकांनी आपापल्या परीने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे खजुराहो येथील मंदिरे क्रमाने चढत्या शिखरांची आहेत या रचनेवरून तिथल्या स्थापत्य विशारदांना हिमालयाची कल्पना अभिप्रेत असावी हिमालय हा देवतात्मा व त्यावर कैलास हे शिवस्थान हिमालयातील निरनिराळ्या शिखरांवर देव, ऋषी, मुनी, गंधर्व किन्नर इत्यादि देव, मानवाची वस्ती आहे तिथे ज्याप्रमाणे ऋषी, योग्यांची ध्यानसाधना चालते त्याप्रमाणे गंधर्व किन्नरांच्या कामक्रीडाही चालतात गंधर्व किन्नरांचा हा शृंगार केवळ दोघा पुरताच मर्यादित नसून तो सामुदायिक असतो म्हणजे अनेक पुरुष व अनेक स्त्रिया मिळून ती उन्मुक्त कामक्रीडा चालते! या गोष्टीचा उल्लेख महाकवी कालिदासाने 'कुमारसंभव' नाटकात केला आहे. त्या दृष्टीने विचार केल्यास खजुराहोतील कामशिल्पे ही गंधर्व किन्नरांच्या कामक्रीडांची चित्रे म्हणता

येतील त्यामुळे जसे ऋषी, मुनी व देव यांचे चित्रण झाले आहे त्याप्रमाणे यक्ष, गंधर्वांच्या शृंगारलीलाही त्या कलाकारांनी साकार केल्या आहेत दुसऱ्या मताप्रमाणे आलिंगन देणारी युगुले मानवी आत्मा व दिव्यमीलनाच्या अनुभूतीचे प्रतीक आहेत काहींच्या मते जीवनाचे उघडे नागडे सत्य प्रत्यक्षात चित्रीत करण्याचा हा प्रयत्न आहे तर दुसऱ्या एका मते कामप्रधान मूर्ती या साधकाच्या भक्तीची पारख करण्याचे, कसोटी पाहण्याचे एक हत्यार होय की साधक भक्तीमार्गापासून विचलीत होतो किंवा नाही ? एक मत असे आहे अशा मूर्तीमुळे मंदिराचे वीज, वादळ, नैसर्गिक प्रकोपापासून रक्षण होते आणखी एक मत असे आहे की, या मूर्तीवर सांची येथील स्तूपद्वारावर जशा विवस्त्र यक्षिणीच्या मूर्ती कोरल्या आहेत तसा बौद्ध संप्रदायाचा प्रभाव पडला आहे नवव्या ते बाराव्या शतकात हिंदू धर्मावर बौद्ध व जैन धर्माचे सावट आल्या-मुळे एक प्रकारची वैराग्याची भावना पसरली होती त्या भावनेचा लोप होण्यासाठी ही शृंगार चित्रे कोरली

खजुराहोच्या मंदिराचा निरोप घेण्याचा समय आला होता सूर्य अस्तगत होण्याच्या बेताला आला होता मंदिराच्या एकावरील एक उंच उंच शिख-रांना गुलाबी रंगांनी जणू वेढून टाकले होते। मंदिरातून मानवाच्या ईश्वर स्वरूपात विलीन होण्याच्या उत्कट इच्छेचा साक्षात्कार पदोपदी होत होता त्यावेळी नकळत आठवून गेल्या कैलास लेण्यांना पाहून कुसुमाग्रजांना स्फुरलेल्या काव्य पंक्ती—

" पृथ्वीभोवती अवतरलेल्या
ईश्वरतेचे पाऊल हे "

ही शिल्पकला पाहूनही असेच वाटते की

" गवसे जागृत दगडांनाही
दिव्य देणगी भाषेची "

हातोडी आणि छिन्नी घेऊन दगडासारख्या कठोर माध्यमाला मृदु, संवेदना-शील घडविणाऱ्या शिल्पकाराच्या साधनेला, धैर्याला, उत्साहाला, तन्मयतेला तोड नाही ही मंदिरे आज हजार वर्षानंतरही ऊन, पाऊस, वारा याला

'धीरोदात्तपणे तोंड देत चंदेले वंशाच्या दैदिप्यमान कारकीर्दीची ग्वाही सगळ्या जगाला देतात

स्त्री सौंदर्याचा इतका अप्रतिम आविष्कार दाखविणारी ही मंदिरे का निर्माण केली ? या गूढवलयाच्या चक्रात मंदिराची उंच उंच शिखरे जणू भर घालीत होती ! मंदिरावर कोरलेली मोहक कमनीय बांध्याची सुडौल यौवना कोण असावी बरे ? यामध्ये मन हरखून गेले होते. खजुराहोच्या लोककथेत त्याबद्दल प्रसिद्ध असलेली ही भावकथा आहे राजकुमारी अलका व मंदिराचा शिल्पकार मेघराज आनंद याची ! राजा यशोवर्मनची अलका ही असामान्य सौंदर्याने नटलेली कन्या चंदेले वंशाची जन्मदात्री हेमवती एके रात्री राजा यशोवर्मनच्या स्वप्नात आली. हेमवती राजाला म्हणाली, "एका चांदण्या रात्री माझ्या लावण्यावर मोहित होऊन चंद्रमाने मला आलिंगन दिले. माझ्या संयमाचा बांध तुटून मोहाला बळी पडून मी त्याला सर्वस्व समर्पण केले ! आणि तो तर दूर सोडून निघून गेला कर्णावती नदीच्या किनाऱ्यावर माझ्या चंदेले वंशाचा पहिला अंकुर जन्माला आला-पिता नसलेला ! माझ्यावरच्या कलंकाच्या गहिऱ्या वेदनेने मी तळमळत राहिले मोहाच्या क्षणी विचलीत होऊन वासनेला बळी पडण्यापूर्वीच त्यातून मुक्त होण्याची प्रेरणा देणारी मंदिरे तू निर्माण कर. ही मंदिरे अशी असावीत की ज्यात जीवनाच्या सर्व अंगोपांगाचे प्रतिबिंब असेल सांसारीक जीवनातील परम सुखाच्या विविध क्षणांचे उच्च कलात्मक दर्शन ही मंदिरे घडवतील आणि त्यापासून मुक्तीचाही मार्ग दाखवतील !"

स्वप्नपूर्ती करण्यासाठी योग्य कल्पक शिल्पकाराचा शोध राजा यशोवर्मन घेऊ लागला दिवसामागून दिवस जात होते पण योग्य असा शिल्पकार दृष्टीपथात येत नसल्याने राजा संचित होता शेवटी मेघराज आनंद नावाच्या शिल्पकाराला दरबारात हजर करण्यात आले त्याने मंदिराची प्रतिकृती सादर केली मंदिराचा मंडप कसा असेल ? प्रदक्षिणा मार्ग असा असेल, तोरण कसे असेल, गर्भगृहातील मूर्ती कशी असेल याची रचना दाखवून मंदिराची बाह्य सजावट कशी असेल याची कल्पना त्याने राजापुढे मांडली मंदिराच्या बाहेरच्या भागात क्रमाक्रमाने पट्ट्यात सांसारिक जीवनातील अंगोपांगचे चित्रण करणारे मृगया, युद्ध, नृत्य, हत्तीचे युद्ध, उत्सव अशी दृश्ये

असतील आणि त्याच बरोबर कामक्रीडाचेही चित्रण असेल मानवी जीवनात अर्थ, धर्म, काम आणि मोक्ष याला महत्त्व आहे कामक्रीडा हे तर जीवनाचं अविभाज्य अंग आहे अतृप्त कामवासनांनी मोक्ष प्राप्ती होत नाही मिथून शिल्पे पाहून जो विचलित होईल, तो संसाराच्या मायाजलात अडकेल आणि जो स्थितप्रज्ञ असेल तो मोहजालात न अडकता तटस्थपणे गर्भगारा-तील देवदेवताचे दर्शन घेईल व त्याला अध्यात्माचा मार्ग सापडेल संसारीक जीवनातील सगळ्या, अनुभूतीच मंदिरात प्रतिबिंब असेल व सांकेतिक रूपाने मोक्षाच्या मार्गाचे चित्रण केले जाईल " हेमवतीच्या कल्पनेत जे असेल तेच हा शिल्पकार साकार करील याबद्दल राजा यशोवर्मनच्या मनात तिळमात्र शंका उरली नाही त्याने तत्काळ शिल्पकाराला संमती दर्शवीत कोषागारा-तून हव्या तेवढ्या द्रव्याची व्यवस्था केली व त्याला मंदिर निर्मिती सुरू करण्याची सूचना केली, त्यावर शिल्पकार विनम्रपणे राजाला म्हणाला, 'मंदिरावर हजारो मुद्रातील रूपसुन्दरी शिल्पांकित करण्यासाठी अप्रतिम सौन्दर्यवती अशी राजकन्या अलका प्रतिमा म्हणून मला हवी आहे' राजापुढे मोठा पेच पडला एकीकडे त्याला आपल्या वंशाची अधिष्ठात्री हेमवतीचं स्वप्न साकार करायचं होतं, तर दुसरीकडे मंदिरावर विविध कामक्रीडेच्या मूर्ती शिल्पांकित करण्यासाठी आपली कन्या शिल्पकाराच्या हवाली करायची शिवाय तिच्या संमतीचा प्रश्न होताच ही कल्पनाच मुळी राजाला सहन होईना! शिल्पकार नम्र-तेने म्हणाला— " माझ्यावर विश्वास ठेवा महाराज आपल्या कन्येची पवि-त्रता मी भंग होऊ देणार नाही " राजकन्या अलका म्हणजे भूतलावरील अप्सराच! तिचं अंग अंग यौवनांनी बहरलं होतं तिचे हावभाव नाजूक होते नेत्रकटाक्ष मोहून टाकणारा. कटी एवढी सडपातळ की उन्नत उरोजाचा यौवन-भार सांभाळण्यास अवघड झाले होते ती रसिक होती, गुणग्राही होती संगीत, नृत्य आणि चित्रकला याची तिला आवड होती, आणि खरं म्हणजे तिला शिल्प कलेचे मर्म जाणून घ्यायचे होते आणि ती संधी तिला शिल्प-काराच्या रूपाने गवसली होती तिने प्रतिमा होण्यास संमती दिली आणि राजानेही!

आणि मग मंदिराची उभारणी सुरू झाली कर्णावती नदीच्या किनाऱ्या-

वर दगडाच्या राशी पडल्या हजारो कारागीर शिळा घडवायच्या कामासाठी रात्रंदिवस खपू लागले मंदिराचा पाया तयार झाला मुख्य मंदिराचे काम जोमाने सुरू झाले छिन्नी आणि हातोड्याच्या आवाजाने परिसर अहोरात्र घुमू लागला. राजा यशोवर्मन हेमवतीचे स्वप्न पूर्ण होणार यामुळे समाधानी होता शिल्पकार तन्मयतेने मूर्ती मागून मूर्ती घडवू लागला त्याला साकार करायची होती आरशात आपले सौंदर्य न्याहाळणारी रूपगर्विता ! एका हातात आरसा घेऊन व दुसरा हात आपल्या वक्षावर ठेवून स्वतःचे उमलते सौंदर्य न्याहाळणारी अलका शिल्पकारासमोर उभी होती हवी तशी मुद्रा न मिळाल्याने त्याने तिचा हात नीट वक्षावर ठेवला, मान कलती केली. त्याच्या स्पर्शाने तिच्या अंगात जणू वीज चमकून गेली पण त्याचा चेहरा निरागस होता ! पायातील काटा काढण्याची वेदना जशी साकार केली तशी प्रियकराला पत्र लिहिणाऱ्या प्रियतमेची आतूर मुद्राही साकार केली कधी वीणा वादनात गुंग, तर कधी चेंडू खेळताना, तर कधी पायात घुंगरू बांधून पदन्यासासाठी तयार अशा विविध भावमुद्रेतील मूर्ती साकार होत होत्या दिवस सरून रात्र व्हायची खबर न पडता मूर्ती मागून मूर्ती शिल्पकार घडवू लागला आणि अलका त्याला तन्मयतेने साथ देत होती कित्येकदा रात्री अलका शिल्पकाराच्या सान्निध्यात राही अलका व शिल्पकार यांच्या संबंधा-विषयी हळू हळू वादळ उठू लागले कुणी म्हणत अलका संपूर्ण नग्नावस्थेत अत्यंत कामुक भावमुद्रेत संभोगाच्या आसनात शिल्पकारापुढे बसलेली पाहिली !

राजा यशोवर्मनचे मन शंकाकुशंकेने चिंतातूर झाले वेष पालटून राजाने एका मध्यरात्री शिल्पकाराच्या कुटिरात प्रवेश केला शिल्पकार मूर्ती घड-विण्यात मग्न होता त्याच्या समोर अर्धवसना अलका आपल्या भावमुद्रेत तल्लीन होती अलका भावनावेगाने व्याकूळ होऊन शिल्पकाराला सांगत होती की–"कधी विरहिणी, कधी प्रियतमा, कधी कामोत्सुक अशा अनेक भावमुद्रा मी दिल्या तुझ्या स्पर्शाने माझ्या शरीरात वीज चमकायची तू मात्र स्थितप्रज्ञ ! वर्षानुवर्षं या मंदिरावर हजारो नारींच्या मूर्ती निर्जिव पत्थरात घडवत असताना तुला रक्तमांसाच्या जिवंत नारीचा विसर पडला ! तू माझं शिल्प जीवन फुलवलं पण माझ्या प्रेमाचं जीवन वैराण केलेस ! माझ्या मनातल्या प्रेम-

नावना तुला कधीच दिसल्या नाहीत का ?" त्यावर शिल्पकार गभीरपणे अलकाला म्हणाला, " हे रूपसुन्दरी तुझी प्रेमभावना माझ्या केव्हाच लक्षात आली पण माझ मन मोहाच्या पलीकडे गेले आहे का ते मात्र सागण्याची गळ घालू नकोस एवढ मात्र खर की तुझ्या मनाची प्रेमोत्सुकता खजुराहोचं काव्य बनेल कारण तू तर माझी अनुभूती आहे मी तुला हजारो भावमुद्रानी मदिरावर साकार करीन जो कुणी खजुराहोला येईल तो प्रणयापासून वैराग्यापर्यंत तुझी विविध रूपे पाहून मायाजळात ओढला जाईल अथवा विरक्त पावेल तुला मी मदिरावरील शिल्पकृतीत अमर केले आहे "

शिल्पकाराच्या उत्तरातील निग्रह पाहून एकातस्थळी कामार्त वातावरणात स्वतःवर बधन घालणाऱ्या स्थितप्रज्ञ शिल्पकाराबद्दल मनातील शका दूर होऊन राजा समाधानाने परतला

कालातराने मदिराची निर्मिती पूर्ण झाली राजा यशोवर्मनने हेमवतीचे स्वप्न पूर्ण केले मदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली उत्सव मोठ्या धुमधडाक्यात सुरू झाला मदिरावर सहस्रप्रतिमा अकित करणारा शिल्पकार मात्र सार सोडून निघण्याच्या तयारीत होता राजाला तो विनम्रपणे म्हणाला–" माझे कार्य पूर्ण झाले तुमचे स्वप्न पुरे झाले याचे मला समाधान आहे तुमच्या कन्येने मला तन्मयतेने साथ दिली म्हणून मी मदिर निर्मिती करू शकलो आणि मला वाटत मी तुमच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही ! एका ठिकाणी राहून मी मोहपाशात गुनणार नाही तेव्हा मला निरोप द्यावा " राजाने मोठ्या खिन्नतेने शिल्पकाराला निरोप दिला राजकन्या अलकाचा निरोप घेणे शिल्पकाराच्या दृष्टीने फार अवघड काम होते ! सपूर्ण मदिरावर कणाकणावर हजारो प्रतिमानी साकार होऊनही अलका उदास होती ' तिचे कोमल स्त्रीमन शिल्पकाराने जाणले नव्हते तिच्या निस्सीम प्रेमाला त्याने प्रतिसाद दिला नव्हता स्त्री ही स्त्रीच तिची प्रेमभावना जाणण्यात तो अयशस्वी झाला ती जन्मभर अतृप्तवासना मनात ठेवणार होती जगाच्या दृष्टीने सौंदर्यशाली मदिर तिच्या जीवनाची शोकांतिका ठरणार होती. शिल्पकाराला पाहिल्यावर व्यथित अत करणाने हातात हातोडा घेऊन अलका मूर्ती फोडायला निघाली शिल्पकाराने मूर्तीला घट्ट धरून डोळ्यात आसवे आणून अलकाला विनती केली– " अलका मी या मूर्तीवर जीवापाड प्रेम



आनंद भवन मधील एक आगळा फोटो
उपोषण करणाऱ्या बापूजी ( म. गांधी )समवेत प्रियदर्शिनी इंदिरा ( इ. स. १९३० )



सगमरवरी भेडाघाट, जबलपूर

ताजमहाल जवळ – यशवत, ती काका, उल्का, सौ मेधा, उदय, कु मंजूषा



केल आहे त्या नष्ट करू नको मी तुला मंदिरावर हजारो ठिकाणी कोरून अमर स्थान दिले आहेत मी तुला स्थितप्रज्ञ वाटतो, या मागची पार्श्वभूमी इतक्या दिवस मी तुला सांगितली नव्हती, तर ऐक आता—" तरुणपणी मी माझ्या वयस्कर गुरुच्या हाताखाली शिल्पकृती घडवीत गुग असायचो गुरुची षोडशवर्षीय तरुण पत्नी स्वत च्या भावनावर ताबा ठेवू शकली नाही एके दिवशी त्याच्या गैरहजेरीत मीही मोहाला बळी पडलो अध-पतित होऊन माझ्या हातून प्रमाद घडला त्यानतर गुरुशी प्रतारणा केल्याबद्दल मी मनोमनी जळतच होतो मोहावर ताबा मिळवून मी स्थितप्रज्ञ बनलो. म्हणूनच तुझ्यासारखी यौवना विवस्त्र मादक अवस्थेत उभी राहूनही माझे चित्त विचलीत झाले नाही तेव्हा अलका तू माझी असहायता ध्यानात घे तू होतीस म्हणूनच मंदिरावरील हजारो मूर्ती साकार झाल्या. या मूर्ती माझा जीव की प्राण आहेत त्याना नष्ट करू नकोस !"

खजुराहोचा शिल्पकार महान की— त्याची सौन्दर्यशाली प्रतिमा महान ? या विचाराल नारी सौंदर्याच्या आविष्काराचा भावपूर्ण निरोप घेतला

सतना स्टेशनवर पोहोचलो तेव्हा रात्र झाली होती क्लोकरूममधील सामान काढून घेतले तेवढ्यात गाडी आली योगायोगाने चांगली जागा मिळाली. इब्यातच जेवणाचे ताट बोलावले. मनामध्ये खजुराहोत शिल्पांकित केलेली रसिक नारी सारखी डोकावत होती. मध्यरात्री बाराच्या सुमाराला जबलपूर स्टेशनवर उतरून आम्ही लॉजकडे निघालो

☐

## संगमरवरी खडकात–भेडाघाट

पस्तीस दिवसाच्या प्रवासाच्या टप्प्यात जबलपूरला मध्यरात्री दाखल झालो झोप अनावर झाली सकाळी नऊला सूर्य किरणे चोरपावलानी लॉजच्या खिडकीतून आत आली तेव्हा जाग आली सर्व आवरून बाहेर पडलो तेव्हा सकाळचे साडेदहा वाजले होते जबलपूर बस स्टँडवर आलो तेव्हा नर्मदेच्या दर्शनासाठी भेडाघाटकडे जाणारी टेम्पो तयार होती

प्रसिद्ध भेडाघाट जबलपूरपासून २९ कि मी अतरावर आहे. दहा-बारा प्रवाशासह टेम्पो नदीच्या पात्राजवळ वळण घेत भेडाघाटपर्यंत आली भेडा म्हणजे भेट बावन गगा नावाची लहान नदी नर्मदेला भेटते व सगम होतो म्हणून भेडाघाट नाव पडले

प्रथम धुवाँधार या प्रसिद्ध धबधब्याजवळ आलो नदीजवळ गेल्यावर सगमरवरी पांढऱ्या शुभ्र खडकात वहाणाऱ्या नर्मदामाईच्या दर्शनाने मन हरखून गेले नितळ सगमरवरी खडकावरून शुभ्र फेसासारखा प्रपात सुमारे चाळीस फूट उंचीवरून तीन प्रवाहात पडत होता. अतिशय वेगाने कोसळणाऱ्या नर्मदेच्या धाराचे तुषार सगळीकडे धुराप्रमाणे दिसत होते त्यात सूर्यकिरण मिसळून शेकडो इद्रधनुष्ये निर्माण होत होती ! नर्मदेच्या धबधब्याच्या

ार्श्वभूमीवर फोटो काढण्यासाठी पर्यटकांची अहमहमिका लागली होती एक-जण सांगत होता " धबधब्यातून पडणाऱ्या या कडेच्या प्रवाहाखालीच 'जिस देशमे गंगा बहती' मध्ये ओलेती पद्मिनी गात होती "हे ओ मैंने प्यार किया क्या जुल्म किया ऽ।"

नदीच्या प्रवाहापर्यंत आजूबाजूला संगमरवरी दगडापासून घडवलेल्या सुंदर सुंदर वस्तु खूप स्वस्त होत्या त्यात संगमरवरी हत्ती, देव्हारे, फुलदाण्या, दागिन्याच्या पेट्या, कुमकुम पेट्या, मासे अशा अनेक वस्तु होत्या.

धुवांधार पाहून परत टेम्पोने नर्मदेच्या पंचवटी घाटाजवळ आलो तेथे प्रवाशांना नर्मदेच्या संगमरवरी खडकाच्या पात्रातून सफर करून आणण्या-साठी मोठ्या होड्या तयार होत्या सुमारे वीस प्रवासी बसले आणि होडीतून एका अनोख्या प्रवासाला सुरुवात झाली अमरकंटकच्या डोंगरातील गोमुख कुंडात नर्मदा उगम पावते नर्म म्हणजे सुख व दा म्हणजे देणारी सुखदायी नर्मदेबद्दल रेवाखंडात म्हटले आहे की—" गंगा कनखलतीर्थात, सरस्वती कुरुक्षेत्रात पुण्यदायी आहे, तर नर्मदा कुठल्याही गावात, जंगलात पवित्र व पुण्यदायी आहे भेडाघाटजवळ संगमरवरी घाटात नर्मदा अपूर्व सौंदर्यशाली दिसत होती जवळजवळ एक कि मी लांबीच्या दुतर्फा शंभर फूट उंचीपेक्षा अधिक उंच अशा पांढऱ्याशुभ्र संगमरवरी खडकातून नर्मदा संथपणे वहात असते। सुरुवातीला एका वळणाला 'भूलभुलैया' म्हणतात त्याठिकाणी नर्मदा कोणत्या दिशेने येते, कोणत्या दिशेने जाते याचा थांगपत्ता लागत नाही खरोखरच खूप सस्पेन्स निर्माण करणारी जागा आहे ती। नदीचा प्रवाह बेमालूमपणे, अकल्पितपणे, अनपेक्षित वळसा घेऊन पाहणाऱ्यांना गोंधळात टाकत होता सुरुवातीला नदीच्या अरुंद पात्रात उंच उंच खडक वर इतक्या जवळ येतात की तेथे माकड इकडून तिकडे उडी मारू शकेल। म्हणून तर त्याला 'बंदर कुदी' नावाने ओळखले जाते स्फटीकासमान पाण्यात बाजूचे शुभ्र उंचच्या उंच संगमरवरी खडक चमकत असतात। मध्येच एका खडका-वर अहिल्याबाई होळकरांनी प्रस्थापित केलेली महादेवाची पिंड दिसली उंचच्या उंच सुळक्याच्या सान्निध्यात शेवटपर्यंत आलो तर एक चमत्कार दिसला हत्तीच्या आणि घोड्याच्या आकाराचे घडलेले दगड दिसले नदीच्या जोमदार प्रवाहाने झिजून झिजून दगड त्या विशिष्ट आकाराचे बनले अशी

माहिती मिळाली या पात्रात पूर्वी खूप मगरी आढळायच्या नावाडी सांगत होता, फार पूर्वी होडीतल्या एका मुलाने बाहेर पाण्यात हात काढला होता तेव्हा एका मगरीने त्याला पाण्यात ओढून आख्खे गिळले। होडीतल्या एका युरोपियन माणसाने बंदूक चालवून मुलाला मगरीच्या कचाट्यातून सोडविण्याचा व्यर्थ खटाटोप केला नर्मदेच्या पात्रात पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाबरोबर गुलाबी, निळसर संगमरवरी खडक पाहून स्तिमित झालो! खडकातल्या शेवटच्या जागी आल्यावर नावाडी सांगू लागला, "बाबूजी! यहाँ 'जिस देशमे गंगा बहती है' का शूटींग हुआ है।" एका खडकाच्या टोकाकडे बोट दाखवून तो म्हणाला 'उधर पद्मिनी खडी होकर पुकार रही थी।' संगमरवरी खडकातील नर्मदेच्या पात्रातून होडीतून परतताना जणू पद्मिनीचा आर्त हाक ऐकू येत होती 'राजू ऽऽ मत जा!'

होडीत बसलेले एक जबलपूरचे प्रवासी सांगत होते चांदण्या रात्री-विशेषत: पौर्णिमेच्या रात्री नदीतील सफरीची लज्जत और असते! खरोखर एखाद्या कोजागिरी पौर्णिमेच्या शीतल चंद्र प्रकाशात भेडाघाटचे संगमरवर उजळून निघालेले असताना नर्मदामाईत सफर करणे किती बहारीचे होईल

नर्मदेच्या घाटावरून वर आल्यावर '६४ योगिनी मंदिर' पाहण्यासाठी पायऱ्या चढून वर आलो काय योग बघा! आदल्याच दिवशी खजुराहोला ६४ योगिनी मंदिर पाहिले होते आणि दुसऱ्या दिवशी भेडाघाटचे मंदिर पहायचा योग आला होता या गोलाकार मंदिरात ८१ देवींच्या मूर्ती आहेत मंदिराच्या टेकडीवरून आजूबाजूचा रम्य हिरवागार परिसर आल्हाददायक दिसत होता दूरवर वळण घेतलेली नर्मदा दिसत होती

दुपारचे दोन वाजले होते संगमरवरी वस्तू खरेदी केल्या टेम्पो परत जबलपूरकडे निघाला वाटेत जबलपूरच्या अलिकडे ७ कि मी अंतरावर 'मदन महाल' पहाण्यासाठी उतरलो टेकडीवर जाण्यासाठी पायी प्रवास सुरू झाला मदन महाल ज्या टेकडीवर वसला आहे ती टेकडी अद्भूत म्हणावी लागेल! मोठमोठ्या दगडाच्या गोलाकार अजस्त्र शिळा ओलांडत ओलांडत जावे लागते वाटेत निसर्गाचा एक अद्भूत चमत्कार दिसतो एका लहान गोलाकार दगडाच्या शिळेवर अगदी छोट्या क्षेत्रफळावर एक अति प्रचंड गोलाकार दगडी शिळा तोलली गेली आहे! लहान दगडावर मोठ

दगड ही अदभूत किमया निसर्ग नियमाविरुद्ध वाटते खरी पण अपवादात्मक अशी दिसते हा बॅलन्सिंग रॉक अद्‌भुतच म्हणायचा

वर खडकाळ टेकडी चढून गेल्यावर गोंड राज्याचा जुना महाल टेकडी-वरील एका राक्षसी आकाराच्या दगडावर बांधलेला दिसतो या महालाचे हेच वैशिष्ट्य की त्याचे अर्धे बांधकाम जमिनीच्या आधारावर केले होते तर अर्ध्या महालाला एका भल्या मोठ्या दगडाचा आधार होता या तीन मजली महालावर विशेष कलाकुसरीचे काही काम नव्हते। मदन महालावरून जबलपूरचे विहंगम दृश्य दिसत होते

नर्मदेचे घाट, मदन महाल पाहून जबलपूरच्या बस स्टॅंडवर पोहोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते पोटात भुकेन काहूर माजविले होते दिवाळी-तील पाडव्याचा दिवस होता जेवणाबरोबर मिठाई खाऊन दिवाळी साजरी केली एकेकाळी जुन्या मध्यप्रदेशाच्या राजधानीचे शहर असलेले जबलपूर शहर कसे शात शांत वाटत होते थोडी विश्रांती घेतली व गावात सायकल-रिक्षाने छोटासा फेरफटका मारला वास्तविक माणसाने माणसाला ओढणे अमानुष वाटते कडक उन, पाऊस, थंडी सहन करीत सायकलरिक्षा ओढणारे प्रवासात ठिकठिकाणी दिसले होते त्यांचा घामाने डबडबलेला चेहरा, उन्हाने रापलेले शरीर, अंगावरील फाटके व मळके कपडे यावरून त्यांच्या दारि-द्र्याची कल्पना येते बिचारे कर्ज घेऊन सायकल रिक्षा खरेदी करून चालव-तात परंतु कधीतरी कर्ज फिटेल व ही रिक्षा आपल्या मालकीची होईल या स्वप्नाची पूर्तता होण्याआधीच क्षयासारख्या व्याधीच्या तडाख्यात सापडून मृत्युमुखी पडतात आमच्या प्रदीर्घ प्रवासात आम्हाला सायकल रिक्षावाल्यां-बाबत नेहमी अनुकंपा व खंत वाटायची परत येताना रिक्षावाल्याला पूर्ण पैसे देऊन पायीच निघालो

रात्रीचे आठ वाजले होते तासाभराने परतीचा प्रवास सुरू झाला वारा-णसी एक्सप्रेस मनमाडकडे धावू लागली होती

☐

# नगरकडे

पस्तीस दिवसाच्या प्रवासाची शेवटची मध्यरात्र ! मन प्रवासाच्या आठवणींनी, अनुभवांनी नुसते भारावून गेले होते ! २५-३० गावाचे अमोल दर्शन स्फरीत झाले होते भारत भूमी किती विशाल आहे आणि तिचा सांस्कृतिक वारसा किती जुना आहे याची अनुभूती प्रवासात मैलामैलावर आली होती

गंगा, यमुना, जेहलम, सिंध, चिनाब, सतलज, गोमती, नर्मदा या भारताच्या ललाटरेषांच्या परिसरात प्रवास करून आलो होतो प्रवासाची सुरुवात इंदूरच्या अलीकडे नर्मदेने झाली आणि शेवट नर्मदेच्याच खोऱ्यात भेडाघाटला झाला होता नद्यांची खोरी जशी पाहिली तशी हिमालयाची उत्तुंग शिखरेही पाहिली

महाराणी पद्मिनीच्या जोहाराने पुनीत झालेली चित्तोडगडची भूमी पाहिली होती, आणि नूरजहान जिथे प्रेमाचे खेळ खेळली ती शालीमार बागेतील भूमीही पाहिली होती चंदीगडच्या नव्या राजधानीची स्पंदने अनुभवली तसेच उजाड राजधानी फत्तेपूर शिक्रीचा आक्रोशही अनुभवला ! कृष्णाच्या रासक्रीडेची यमुनेकाठची भूमी पाहिली होती ! धर्मवेड्या औरंगजेबाने उखडलेली हिंदूंची मथुरा, काशी येथील मंदिरे पाहिली होती, हिंदू


संस्थानिकांनी बसविलेल्या अजमेरच्या दर्ग्याच्या फरशाही पाहिल्या होत्या! त्याचप्रमाणे शीख राजाने बसविलेला काशीच्या मंदिराचा कळसही पाहिला होता तसेच मुसलमान बादशहा अकबराने हिंदू राणीसाठी बांधलेले जोधाबाईच्या महालातील तुलसी वृंदावनही पाहिले होते! औरंगजेबाने शिखांच्या १० व्या गुरुच्या दोन कोवळ्या मुलांना भिंतीत जिवंत समाधी दिल्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारलेले सरहिंदचे फत्तेगड साहेब गुरुद्वार पाहिले होते तसेच लाहोरच्या मुस्लीम सताने पायाभरणी केलेले अमृतसरचे 'दरबार साहेब' गुरुद्वारही पाहिले होते! चिनारच्या छायेत विसावलो होतो तसेच गंगा यमुनेच्या दुआबातील गर्द आमराईतील वृक्षांच्या सावलीतही विसावलो होतो!

अमृतसरला शीख मंदिराचे दर्शन झाले होते तर सारनाथला–भगवान बुद्धाच्या भूमीत–नतमस्तक झालो होतो अजमेरला ख्वाजासाहेब यांचे दर्शन झाले होते तसेच खजुराहोला जैन तीर्थंकराचे दर्शन झाले होते! काशी, हरिद्वार, अलाहाबादला गंगा–यमुनेला अर्घ्य देताना भाविक हिंदू मन अध्यात्माने उचंबळून आले होते सर्व धर्मांना आपल्या कुशीत सांभाळून घेणाऱ्या भारतमातेला मनोमन प्रणिपात करताना चिरंतन मूल्याला जपणाऱ्या भारताच्या पवित्र भूमीत आपण जन्माला आलो या भाग्याच्या गोष्टीबद्दल अभिमान वाटला!

सकाळी आठ वाजता जाग आली तेव्हा कळले इटारसी स्टेशन आले. खांडवा स्टेशनवर गाडी पोहचेपर्यंत नऊ वाजले चहाचा कार्यक्रम आटोपला. भुसावळला गाडी पोहोचली तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते मनमाडला पोहोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. नगरला जाण्यासाठी कनेक्टींग गाडी [illegible]

रात्री नऊला महाराष्ट्र एक्स्प्रेस आली व नगरकडे प्रवासाचा शेवटचा टप्पा सुरू झाला नगर स्टेशन आले तेव्हा रात्रीचा एक वाजला होता महिन्यापूर्वी प्रवासाला निघालेल्या दिवसाच्या आठवणीने मन भरून गेले होते. दीर्घ प्रवासाची सांगता झाली होती प्रवासाची वाट सरली होती स्मृती सरल्या नव्हत्या शालीमारच्या सादेची सुनहरी याद आयुष्यभर साथ देणार होता...

□


उत्तर भारत
प्रवास मार्ग
सोनमर्ग
श्रीनगर
गुलमर्ग
पहलगाम
पठाणकोट
अमृतसर
जालंधर
लुधियाना
सरहिंद
अंबाला
मसूरी
डेहराडून
ऋषिकेश
हरिद्वार
मुरादाबाद
नवी दिल्ली
शहाजहानपूर
मथुरा
आग्रा
जयपूर
पुष्कर
अजमेर
फतेपूर सिक्री
लखनौ
अलाहाबाद
रामनगर
सारनाथ
वाराणसी
माणिकपूर
सतना
खजुराहो
मावळी
चितोडगड
उदयपूर
रतलाम
इंदूर
कटनी
जबलपूर
भेडाघाट
इटारसी
खांडवा
भुसावळ
नागपूर
नासिक
मनमाड
अहमदनगर
मुंबई
पुणे
अरबी समुद्र

REFBK-0023548

माहिती मिळाली या पात्रात पूर्वी खूप मगरी आढळायच्या नावाडी सांगत होता, फार पूर्वी होडीतल्या एका मुलाने बाहेर पाण्यात हात काढला होता. तेव्हा एका मगरीने त्याला पाण्यात ओढून आख्खे गिळले! होडीतल्या एका युरोपियन माणसाने बदूक चालवून मुलाला मगरीच्या कचाट्यातून सोडवि-ण्याचा व्यर्थ खटाटोप केला. नर्मदेच्या पात्रात पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाबरोबर गुलाबी, निळसर संगमरवरी खडक पाहून स्तिमित झालो! खडकातल्या शेवटच्या जागी आल्यावर नावाडी सांगू लागला, "बाबूजी | यही 'जिस देशमे गगा बहती है' का शूटींग हुआ है।" एका खडकाच्या टोकाकडे बोट दाखवून तो म्हणाला 'उधर पद्मिनी खडी होकर पुकार रही थी।' संगमरवरी खडकांतील नर्मदेच्या पात्रातून होडीतून परतताना जणू पद्मि-नीचा आर्त हाक ऐकू येत होती 'राजू ऽऽ मत जा!'

होडीत बसलेले एक जबलपूरचे प्रवासी सांगत होते चांदण्या रात्री-विशे-षत: पौर्णिमेच्या रात्री नदीतील सफरीची लज्जत और असते! खरोखर एखाद्या कोजागिरी पौर्णिमेच्या शीतल चंद्र प्रकाशात भेडाघाटचे संगमरवर उजळून निघालेले असताना नर्मदामाईत सफर करणे किती बहारीचे होईल.

नर्मदेच्या घाटावरून वर आल्यावर '६४ योगिनी मंदिर' पाहण्यासाठी पायऱ्या चढून वर आलो काय योग बघा! आदल्याच दिवशी खजुराहोला ६४ योगिनी मंदिर पाहिले होते आणि दुसऱ्या दिवशी भेडाघाटचे मंदिर पहायचा योग आला होता या गोलाकार मंदिरात ८१ देवीच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या टेकडीवरून आजूबाजूचा रम्य हिरवागार परिसर आल्हाददायक दिसत होता दूरवर वळण घेतलेली नर्मदा दिसत होती

दुपारचे दोन वाजले होते संगमरवरी वस्तू खरेदी केल्या टेम्पो परत जबलपूरकडे निघाला. वाटेत जबलपूरच्या अलिकडे ७ कि मी अंतरावर 'मदन महाल' पहाण्यासाठी उतरलो टेकडीवर जाण्यासाठी पायी प्रवास सुरू झाला मदन महाल ज्या टेकडीवर वसला आहे ती टेकडी अद्‌भूतच म्हणावी लागेल! मोठमोठ्या दगडाच्या गोलाकार अजस्त्र शिळा ओलांडत, ओलांडत जावे लागते वाटेत निसर्गाचा एक अद्‌भूत चमत्कार दिसतो एका लहान गोलाकार दगडाच्या शिळेवर अगदी छोट्या क्षेत्रफळावर एक अति-प्रचंड गोलाकार दगडी शिळा तोलली गेली आहे! लहान दगडावर मोठा

दगड ही अदभूत किमया निसर्ग नियमाविरुद्ध वाटते खरी पण अपवादात्मक अशी दिसते हा बॅलन्सिग रॉक अद्‌भुतच म्हणायचा.

वर खडकाळ टेकडी चढून गेल्यावर गोंड राज्याचा जुना महाल टेकडी-वरील एका राक्षसी आकाराच्या दगडावर बांधलेला दिसतो या महालाचे हेच वैशिष्ट्य की त्याचे अर्धे बांधकाम जमिनीच्या आधारावर केले होते तर अर्ध्या महालाला एका भल्या मोठ्या दगडाचा आधार होता या तीन मजली महालावर विशेष कलाकुसरीचे काही काम नव्हते ! मदन महालावरून जबलपूरचे विह[illegible]

नर्मदेचे घाट, मदन महाल पाहून जबलपूरच्या बस स्टँडवर पोहोचला
तेव्हा दुपारचे ती[illegible]न वाजले होते पोटात भुकेने काहूर माजविले होते दिवाळी-
तील पाडव्याचा दिवस होता जेवणाबरोबर मिठाई खाऊन दिवाळी साजरी
केली एकेकाळी जुन्या मध्यप्रदेशच्या राजधानीचे शहर असलेले जबलपूर
शहर कसे शांत शांत वाटत होते थोडी विश्रांती घेतली व गावात सायकल-
रिक्षाने छोटासा फेरफटका मारला वास्तविक माणसाने माणसाला ओढणे
अमानुष वाटते कडक उन, पाऊस, थडी सहन करीत सायकलरिक्षा ओढणारे
प्रवासात ठिकठिकाणी दिसले होते त्याचा घामाने [illegible]
रापलेले शरीर, अंगावरील फाटके व मळके कपडे यावरून त्याच्या दारि-
द्र्याची कल्पना येते बिचारे कर्ज घेऊन सायकल रिक्षा खरेदी करून चालव-
तात परंतु कधीतरी कर्ज फिटेल व ही रिक्षा आपल्या मालकीची होईल या
स्वप्नाची पूर्तता होण्याआधीच क्षयासारख्या व्याधींच्या तडाख्यात सापडून
मृत्युमुखी पडतात आमच्या प्रदीर्घ प्रवासात आम्हाला सायकल रिक्षावाल्यां-
बाबत नेहमी अनुकंपा व खंत वाटायची परत येताना रिक्षावाल्याला पूर्ण पैसे
देऊन पायीच निघालो

रात्रीचे आठ वाजले होते तासाभराने परतीचा प्रवास सुरू झाला वारा-णसी एक्स्प्रेस मनमाडकडे धावू लागली होती.

□